म. ग्रं. सं. ठाणे
विषय
सं. क्र.
रांग १९
REF-BK-0001691

म. ग्रं. ग्रंथ संग्रहालय,
ग्रं. क्रमांक नं. ९८०
ता. १८/९/५४
ठाणे

सटीप

# ईशगुणादर्श

अर्थात्

श्रीविष्णुसहस्रनामापैकीं प्रत्येक नावाचा अर्थ
दाखविणारा एक किंवा अधिक निर-
निराळ्या वृत्ताचा श्लोकबद्ध ग्रंथ.

लोकमान्य बाळ गंगाधर टिळक ह्यांच्या
प्रस्तावनेसह

कै० डॉ० गणेश कृष्ण गर्दे
यांनीं रचिला

REFBK-0001691

प्रकाशक,
डॉ० कृष्णाजी गणेश गर्दे,
मेडिकल युनिअन पुणें.

मुद्रक,
दत्तात्रय गणेश खांडेकर,
मालक, "लॉ प्रिंटिंग" प्रेस, ४४९ शनवार, पुणे

१९१९

किंमत १। रुपया.

# प्रस्तावना.

—:०:—

आमच्या धर्मांतील ज्ञानग्रंथांत श्रीमद्भगवद्गीता ज्याप्रमाणें श्रेष्ठ समजली जाते त्याप्रमाणेंच स्तोत्रामध्यें विष्णुसहस्रनाम मुख्य मानलें जातें हें सर्वांस माहित आहे व त्यामुळें महाभारतात गणल्या जाणाऱ्या पंचरत्नांत ह्याचा समावेश झाला आहे. विष्णुसहस्रनाम म्हणजे विष्णूच्या केवळ काल्पनिक एक हजार नांवांची याद नव्हे हें ह्या सहस्रनामांच्या आरंभीं महाभारतात जे कांहीं प्रास्ताविक श्लोक आहेत त्यांवरून स्पष्ट दिसून येतें. त्यांत असें म्हटलें आहे कीं "यानि नामानि गौणानि विख्यातानि महात्मनः। ऋषिभिः परिगीतानि तानि वक्ष्यामि भूतये ॥" म्हणजे पूर्वींच्या ऋषींनीं निरनिराळ्या प्रसंगीं परमेश्वराचें ज्या नांवांनीं श्रुतींत, स्मृतींत अगर अन्य ठिकाणीं स्तवन केलें तीं निरनिराळ्या सांप्रदायांतलीं किंवा शास्त्रांतलीं नांवें विष्णुसहस्रनामस्तोत्रांत एकत्र केलीं आहेत; आणि तीं महाभारताच्या अनुशासनपर्वांत भीष्मांनीं युधिष्ठिरास स्तोत्ररूपानें सांगितलीं असा त्याचा पूर्वेतिहास आहे. विष्णुसहस्रनामाचें अशा दृष्टीनें निरीक्षण केलें असतां हीं सहस्रनामें म्हणजे निरनिराळ्या शास्त्रांतून किंवा धर्मग्रंथांतून परमेश्वराच्या स्वरूपाची जीं वर्णनें आहेत तीं वर्णनें डोळ्यापुढें किंवा स्मृतींत येण्यास हीं कारणीभूत होणारीं सूचकपदें किंवा प्रतीकें आहेत असें म्हणावें लागतें. ह्यांत सांख्य, योग, श्रुति, स्मृति पुराण किंवा शैवादिक निरनिराळे सांप्रदाय ह्याचाहि अर्थातच समावेश झालेला आहे. सारांश ज्यानें हें सहस्रनाम रचलें त्याच्या नजरेपुढें सर्व ऋषिप्रणीत परमेश्वराचीं वर्णनें असून त्या सर्व वर्णनांचें सार म्हणून त्यानें मोठ्या व्यापक दृष्टीनें हें स्तोत्र बनवलें आहे असा सिद्धान्त करावा लागतो; आणि

म्हणूनच त्यातील प्रत्येक नाव कशाकशाचें द्योतक आहे, तें कोणत्या शास्त्रातून घेतलें आहे, त्याची व्युत्पत्ति काय, त्यानें कोणता अर्थ दाखवला जातो, अगर त्यातील गूढ किंवा व्यंग्यार्थ काय आहे, हें सर्वांस समजून देण्याकरता ह्या स्तोत्रावर आचार्यांनीं भाष्यें केलेलीं आहेत. थोडक्यात सांगावयाचें असल्यास विष्णुसहस्रनाम म्हणजे परमेश्वराचे गुण मनात बिंबून त्याच्याठायीं मनुष्याची भक्ति दृढ करण्यास साधनीभूत असा एक भक्तिकोशच होय. हा भक्तिकोश जेव्हां प्रथम तयार झाला तेव्हां भगवद्गीतेप्रमाणें तोही इतका लोकप्रिय झाला कीं, त्याचें अनुकरण करण्याची इच्छा होऊन इतर सांप्रदायिकांनींही आापल्या देवतांचीं इतर सहस्रनामें ह्याप्रमाणें तयार केलीं. शिवसहस्रनाम तर भारतातच आलेलें असून दुर्गा, गणपती, राधा ह्यांचींच नव्हे तर गंगा, गोदा इत्यादि पवित्र नद्यांचीं सहस्रनामें इतर धर्मग्रंथांतून दिलेलीं आढळून येतात. हीं इतर सहस्रनामें विष्णुसहस्रनामाइतकीं प्रगल्भ, व्यापक किंवा धर्मदृष्ट्या अगर शास्त्रदृष्ट्या संग्राहक नाहींत हें ह्या सहस्रनामाचें सूक्ष्मदृष्ट्या अध्ययन करणाऱ्या माणसाच्या सहज लक्षात येईल; व ह्याचमुळें ह्या इतर सहस्रनामावर भाष्यकार किंवा टीकाकार ह्यांनीं विस्तृत विवेचन केलेलें नाहीं तथापि कालिदासाच्या मेघदूताचें पुष्कळांनीं पुढें अनुकरण केल्यानें ज्याप्रमाणें कालिदासाच्या मेघदूताची योग्यता स्थापन होते तद्वतच त्या दुसऱ्या अनेक सहस्रनामामुळें विष्णुसहस्रनामाची महति व योग्यता मात्र अधिक स्थापन होते असें आम्हास वाटतें.

वरील विचार मनांत येऊनच आमचे मित्र कै० डॉ० गणेश कृष्ण गर्दे, एल्. एम्. अँड एस्. ह्यांनीं प्रस्तुतच्या **ईशगुणादर्श**नामक काव्यास सुरवात केली होती. ह्यात विष्णुसहस्रनामांपैकीं एकेक नाम प्रथम घेऊन त्यावर एकेक किंवा जरूर लागल्यास अधिक श्लोक रचून

त्या नांवांत कोणता अर्थ दाखविला जातो ह्याचें सुरस वर्णन केलेलें आहे. हें वर्णन करण्यांत विष्णुसहस्रनामावरील आचार्यांचें भाष्य जरी मुख्य आधारभूत असलें तरी ह्यात कांहीं ठिकाणीं नव्या नव्या कल्पना आहेत; इतकेंच नव्हे तर विषयाची मांडणीहि कांहीं ठिकाणीं नव्या तऱ्हेनें केली आहे. शिवाय हें सर्व विवेचन पद्यात्मक असल्यामुळें तें भक्तिरसाच्या गोडीसहि परिपोषक झालें आहे. निरनिराळ्या नांवांचीं अक्षरें कमीअधिक आणि ऱ्हस्वदीर्घदृष्ट्या निरनिराळीं असल्यामुळें तीं श्लोकाच्या आरंभीं बसविण्यास ते श्लोक निरनिराळ्या वृत्तात रचावे लागले आहेत; आणि त्यामुळें विवेचनाच्या वैचित्र्याबरोबरच वृत्तवैचित्र्यहि साधलें गेलें आहे. शंभर नावाला एक शतक ह्याप्रमाणें हजार नावाचीं १० शतकें ह्या काव्यांत आलीं आहेत. काव्य समाप्त झाल्यावर कांहीं श्लोकांत वर्णन केलेल्या अर्थास आधार म्हणून किंवा त्याचेंच कमीअधिक स्पष्टीकरण करण्यास अखेर टीपा देण्याचा ग्रंथकाराचा विचार होता. पण ही सेवा त्याच्या हातून घेणें परमेश्वराच्या मनांत नसल्यामुळें तें काम अपुरेंच राहिलें आहे. हें आम्हीं पुरें करावें अशी ग्रंथकर्त्याच्या चिरंजिवानीं विनंति केली होती. पण तिचा स्वीकार करणें आम्हांस योग्य वाटलें नाहीं. कारण ग्रंथकर्त्याच्या मनांत कोठें व काय टीपा द्यावयाच्या होत्या हें आम्हांस माहित नाहीं आणि अशी माहिती नसतां ग्रंथकर्त्याच्या ग्रंथास पुस्ती जोडणें आम्हांस प्रशस्त वाटेना. विष्णुसहस्रनामापैकी ज्या नामाची श्लोकांतून व्याख्या केली आहे तें नांव आधीं मोठ्या टाईपांत घातलेलें आहे, व हीं नांवें ओळीनें वाचलीं तर विष्णुसहस्रनामाचा पाठ सहज घडून येईल. संस्कृतांतील विभक्तिप्रत्यय मराठी पद्यांतून घेतलेले नाहींत हें खरें, पण ज्याला संस्कृताचें थोडें ज्ञान आहे त्याला किंवा विष्णुसहस्रनाम अवगत असणाऱ्यांना ते मराठी नांवास सहज जोडतां येतील आणि मग चकारादिकांची पूर्ति करून संस्कृत श्लोक बनवितां येतील

डॉ. गणपतरावजींच्या पश्चात् हा ग्रंथ प्रसिद्ध होत असल्यामुळें त्याठिकाणीं ग्रंथकर्त्याबद्दल थोडी माहिती देणें अप्रशस्त होणार नाहीं. डॉ. गणेश कृष्ण गर्दे हे पुण्यांतील सुप्रसिद्ध डॉक्तरांपैकीं असून त्यांचा व आमचा जवळजवळ ४० वर्षांचा उत्तम स्नेह होता. त्यांचे पूर्वज रत्नागिरी जिल्ह्यांत नांदळजे गावीं राहणारे असून घाटावर बेळगाव-जिल्ह्यांतील गुलेहसूर गांवीं ३।४ पिढ्यांपूर्वीं आलेले होते. कृष्णाजी-पंतांचे वडील विसाजीपततात्या गर्दे हे मोठे मानी व शूर असून पेशवाईंत त्यांनीं चांगलीं कामें केलेलीं होतीं. येथें एवढें सांगण्यास हरकत नाहीं कीं, शेवटच्या पेशव्यांचे प्रसिद्ध सेनापति बापू गोखले ह्यांचेंही हेंच गाव असून तेथें त्यांचा मोठा वाडाहि अद्याप ह्या गोष्टीची साक्ष देत आहे. तसेंच सुप्रसिद्ध साधुपुरुष श्रीचिदंबर दीक्षित यांनींच हा गाव वसविला होता. म्हणूनच या गावास " गुलेहोसूर " हें नाव पडलें. " गुलेहोसूर " या नांवाचा अर्थ कानडी भाषेंत " गुरूचें नवें गांव " असा होतो. सध्यांचा जिल्हा बेळगांव हा पेशव्याच्या राज्याची दक्षिणेकडील सरहद्द होती आणि ह्या सीमेवर राहून दक्षिणे-कडून पेशवाईवर हैदराचे वगैरे जे हल्ले येतील त्यापासून पेशवाईचा बचाव करण्याचें काम ज्या काहीं शूर व कर्त्या घराण्याकडे होतें त्यांपैकीं गुलेहोसूर येथें राहणारीं गोखले, किर्लोस्कर आणि गर्दे हीं घराणीं होत. पेशवाईच्या र्‍हासानंतर महाराष्ट्रांत चोंहोकडेच तत्पूर्व-कालीन घराण्यांतील पुरुषांच्या वंशजांस आपला संसार अदबीनें चालविण्यास इतर रोजगारांचा व धंद्याचा जसा स्वीकार करावा लागला तद्वतच किर्लोस्कर व गर्दे ह्या घराण्याची स्थिति झाली. ह्या किर्लोस्कर घराण्यांतच डॉ. गणपतरावांचे मामेबंधु प्रसिद्ध संगीत नाटककार कै. अण्णासाहेब किर्लोस्कर ह्यांचा जन्म झालेला असून मुंबई हायकोर्टाचे वकील कै. गणपतराव किर्लोस्कर हेहि त्याच घरा-

ण्यालले होते. डॉ. गणपतरावजींचे वडील कृष्णाजी विश्वनाथ गर्दे ह्यांनीं गुळेहोसूर सोडलें नाहीं हें खरें. पण काळाचा महिमा लक्षांत आणून त्यांनीं आपल्या चिरजिवास गांवांतच रोखून ठेवलें नाहीं. त्याचा स्वभाव निस्पृही असून ते चांगले विद्वानहि होते. डॉ. गणपतरावजी ह्यांनीं मेडिकल कॉलेजांत जाऊन डॉक्तरीचा अभ्यास करण्यास त्यांच्या वडिलांचा प्रिय विषय जी वैद्यकी ही बऱ्याच अंशीं कारण झाली. निदान एवढें तरी म्हणण्यास हरकत नाहीं कीं, इंग्रजी डॉक्तरी शिकलेल्या लोकांत दृष्टीस न पडणारी संस्कृताची व प्राचीन विद्येची अभिरुचि व अभिमान जो डॉ. गणपतराव ह्यांच्या अंगीं पूर्णपणें वास करीत होता तो त्यांच्या अंगीं आनुवंशिक संस्कारामुळेंच उत्पन्न झालेला होता.

डॉ. गणेश कृष्ण गर्दे ह्यांचा जन्म शके १७७७ (इ. स. १८५५) सालीं भाद्रपद वद्य चतुर्दशीस झाला. ह्यांचे वडील बंधू सुप्रसिद्ध श्री. बाबा गर्दे आणि त्यांचे धाकटे बंधू बुलढाण्याचे प्रसिद्ध वकील कै. तात्यासाहेब गर्दे होत. गणपतरावजींचा पूर्व अभ्यास बेळगांव येथें होऊन ते म्याट्रिक्युलेशन झाल्यावर मुंबईच्या मेडिकल कॉलेजांत अभ्यासाकरितां राहिले व तेथें त्यांची शेवटची म्हणजे एल्. एम्. एस्. ची परीक्षा सन १८७८ सालीं पास होऊन त्यांचें नांव पहिल्या वर्गात दाखल झालें. म्याट्रिक्युलेशन परीक्षेनंतर गणपतरावजींनीं जरी मेडिकल कोर्स पत्करलेला होता तरी त्यांची संस्कृतावरील आणि प्राचीन विद्यांवरील भक्ति कायमच असल्यामुळें त्यांनीं ह्या अवधींतही शक्य तेवढा संस्कृताचा अभ्यास चालू ठेवलेला होता. आणि बुद्धि जात्याच मार्मिक, सारग्राही आणि कल्पक असल्यामुळें ते ज्या ज्या विषयांचें अध्ययन करीत त्यांतील तत्त्व समजून घेणें अगर त्यांत कांहीं नवी कल्पना काढणें हें त्यांस चांगलें साधलेलें होतें. एल्. एम्. एस्. ची

परीक्षा झाल्यानंतर सन १८७९ साली पुणें येथें बुधवार पेठेंत भिडे ह्यांच्या वाड्यांत त्यांनीं डॉ. रामभाऊ तळवलकर ह्यांजबरोबर आपला दवाखाना काढून डॉक्तरीच्या धंद्यास सुरवात केली. डॉक्तरीच्या धंद्यास अवश्य असणारा बहुभाषपणा ह्यांच्या अंगीं नव्हता. तथापि आपल्या बुद्धिमत्तेनें त्यांनीं ह्या धंद्यांत लौकरच चांगलें यश संपादन केलें आणि अखेरपर्यंत पुण्यातील अग्रगण्य डॉक्तरांत त्याची गणना होत असे. शिवाय इंग्रजी वैद्यकाच्या ज्ञानावरच अवलंबून न राहतां देशी वैद्यकाचें अनुभवजन्य ज्ञानहि ह्यांस त्यांच्या वडिलांकडून मिळालेलें होतें. त्यामुळें आणि होमिओपाथी, हैड्रोप्याथी, क्रोमोप्याथी, बायोकेमिस्ट्री वगैरे वैद्यकीचे आधुनिक अनेक सांप्रदाय निघाले आहेत त्यांचेंहि ज्ञान वेळोवेळीं त्यांनीं काळजीपूर्वक संपादन केलें असल्यामुळें ह्यांच्या चिकित्सेंत किंवा योजनेंत एक प्रकारचा विशिष्टपणा नेहमींच नजरेस पडत असे. कोणतीहि नवी कल्पना, मग ती वैद्यकींतली असो वा इतर शास्त्रांतली असो, लौकर ग्रहण करून तिचें निरनिराळ्या दृष्टीनें परीक्षण करणें आणि प्रसंगविशेषीं अशा प्रकारची कल्पना स्वतः काढणें हे दोन्हीहि गुण ह्यांच्या अंगीं चांगले परिपक्व दशेस आलेले होते. आणि स्वभाव जरी मितभाषणी असला तरी अशा प्रकारच्या चर्चेचा जेव्हा जेव्हा प्रसंग येई तेव्हां तेव्हा घटकातासाकडे लक्ष न देतां हे आपल्या बाजूचें समर्थन करीत असत असा आम्हांस अनेकदा अनुभव आलेला आहे व त्यामुळें एखाद्या विषयावर यांच्याबरोबर वादविवाद करण्यास हौस व आनंद वाटत असे. पुण्यापेक्षां मुंबईसच जर ह्यांनीं प्रथम वैद्यकीच्या धंद्यास सुरवात केली असती तर त्यांच्या अंगच्या गुणाचें चीज अधिक झालें असतें. पण महाराष्ट्राची ह्यांस विशेष आवड असल्यामुळें मुंबईपेक्षां पुण्यासच स्थायिक होऊन आपला धंदा चालविणें ह्यांना अधिक प्रशस्त वाटलें. पुण्यास डॉक्ट-

रीच्या भ्यास ह्याप्रमाणें सुरवात केल्यावर पुढें लौकरच यांचे वडील संन्यास घेऊन कलादगी येथें समाधिस्थ झाले! ह्यानतर कुटुंबातील धाकटे बधू व इतर मुलाबाळांच्या विद्याभ्यासाचा वगैरे बोजा ह्यासच सभाळावा लागला व तो त्यानीं कोणत्या रीतीनें पार पाडला हें हल्लीं त्यांचे चिरजीव किंवा पुतणे ह्याच्या. स्थितीवरून कोणाच्याहि सहज लक्षात येईल. ग्रंथकार या नात्यानेंहि गणपतरावजींची योग्यता मोठी होती. त्यांनीं जें वाग्भटाचें मराठींत भाषातर केलें आहे तें भाषेच्या दृष्टीनें बरें आहे; इतकेंच नव्हे तर त्याच्या अंगची बुद्धिमत्ता आणि कल्पकताहि ह्या ग्रंथावरून वाचकास सहज कळून येते ह्याशिवाय कविता करण्याचा त्याना लहानपणापासूनच फार नाद होता आणि ह्याच्या घराण्याचा साप्रदाय पूर्वीपासूनच भक्तिपर असल्यामुळें त्यात कविता करण्याच्या नादाची भर पडून विष्णूसहस्रनामावर मराठींत पद्यात्मक भाष्य रचण्यांत त्याचा अखेर परिणाम झालेला आहे. ज्या गृहस्थानीं 'केसरी' पत्रास प्रथमत: सुरवात केली त्यांच्याच मंडळी-पैकीं डॉ० गणेश कृष्ण गर्दे हे असल्यामुळें केसरीच्या पहिल्या जाहि-रातीवर ज्याच्या सह्या आहेत त्यात ह्याचीहि एक सही आहे, आणि वैद्यकीवरच नव्हे तर इतर विषयांवरहि ह्याचे कांहीं लेख केसरींत प्रसिद्ध झाले आहेत. ह्याखेरीज पुण्याच्या वसंतव्याख्यानमालेंत, गणे-शोत्सवात व इतर प्रसंगीं ह्याचीं मार्मिक व्याख्यानें होत असत व त्या घेण्यासारखी कांहींतरी नवीन कोटि नेहमीं असे हें पुणेकरांस तरी सागावयास नको. तसेंच याचे आप्त अण्णासाहेब किर्लोस्कर ह्याच्या संगीत कवितेचे हे एक रसिक भोक्ते असून किर्लोस्कर संगीत नाटक मंडळीचेहि शेवटपर्यंत एक पुरस्कर्ते होते. एल्. एम्. एस्. ची परीक्षा पास झाल्यानंतर ह्यांचा सर्व संसार पुणें येथेंच झाला म्हणून ह्यांची गणनाहि पुण्यांतील शिष्टमंडळातच नेहमीं केली जात असे.

शेवटीं शेवटीं ह्यांची प्रकृति अशक्त होत चालली होती व अखेर ता. २ जुलै १९१६ रोजीं ह्यांस देवाज्ञा झाली. आमचे ते फार दिवसांचे स्नेही होते हें वर सांगितलेंच आहे. त्यांच्या ह्या स्नेहामुळें व सहवासामुळें आम्हांला काय फायदा झाला किंवा त्यांच्या मृत्यू-मुळें आमची काय हानि झाली हें सांगण्याचें हें स्थळ नव्हे. त्यांच्या प्रस्तुतच्या ग्रंथास प्रस्तावना लिहिण्याचें काम आमच्याकडे येईल असें आम्हांस वाटलें नव्हतें. पण त्यांच्या चिरंजिवांनीं हा योग जुळवून आणल्यानें मित्रत्वाच्या जबाबदारींतून मुक्त करण्यास आम्हांस सवड दिली ह्याबद्दल आम्ही त्यांचे फार आभारी आहोंत. ह्यापेक्षां प्रस्तावने-दाखल आम्हांस जास्त कांहीं सांगावयाचें नाहीं. ईशगुणादर्श हें भक्तिपर एक काव्यच आहे. आणि हें काव्य रचण्यास विद्वत्तेच्या मानानें जे गुण अवश्य होते ते डॉक्टरसाहेबांच्या अंगीं असल्यानें याची वरच्या प्रतीच्या काव्यांत गणना होईल असा आमचा समज आहे. हा समज कितपत खरा आहे ह्याची वाचकांनींच परीक्षा करून निर्णय केला पाहिजे.

पुणें, ता. २२।३।१८. बाळ गंगाधर टिळक.

# ईशगुणादर्श.

॥ श्री गणेशाय नमः ॥

## ग्रंथकर्त्यांचें मंगलाचरण.

सांख्यांते भासतो जो प्रकृति, पुरुष या दोनही भिन्नरूपीं ( स्र. )
भासे मीमासकाते गुणरहितचि वा वाङ्मय ब्रह्मरूपी ।
शैवांते शंभुरूपें भुजगशयन जो भासतो वैष्णवांते
भासे नानापरी जो विविधरुचिजना पूजितो देव गीतें ॥ १ ॥

नमन करुनि आदीं सद्गुरू रामराया ( मा. )
सदय हृदय ज्याचें मार्ग दावी तराया ।
गुणगणकथनें या-पूजितों देवराया
पटुतर मति देवो तोचि काव्या करया ॥ २ ॥

## सहस्रनामस्तोत्राचा उपक्रम.

**वैशंपायन** ( जनमेजयाला ) **सांगतात:—**

भीष्मा करी प्रश्न पुन्हांहि धर्म ( उप. )
व्रतादि ऐकूनहि सर्व धर्म ।
सर्वांत तें दैवत कोण मोठें
किंवा असें स्थान वरिष्ठ कोठें ॥ १ ॥

स्तवूनि वा पूजुनि नित्य जाते (उप.)
मनुष्य लाहे वद मंगलाते ।
सर्वांत मोठा वद धर्म माते
वारी भवा जो वद त्या जपाते ॥ २ ॥

**भीष्म ह्मणतात:—**

देवाधिदेवास जगत्प्रभूते (उप.)
सदा झटूनी पुरुषोत्तमाते ।
सहस्रनामें स्तवुनी अनंता
लावोनि चित्ता बहुभक्तिमंता ॥ ३ ॥

ध्यानार्चनें पूजुनि अव्ययाला
स्तुती प्रणामा[2] करिं नित्य त्याला ।
अनाद्यनंताखिललोकपाला
महेश्वरा, नंदसुता, कृपाला ॥ ४ ॥

ब्रह्मण्य[3] जो विश्वपती, नियंता
अशेषधर्मज्ञ[4]हि, कीर्तिकर्ता ।
निदान[5] जो भूतगणा, भवाते[1]
दुःखास जिंकीं स्तवुनी तयाते ॥ ५ ॥

माझ्या मतें धर्म वरिष्ठ हाची
स्तुती करावी पुरुषोत्तमाची ।
युगांत या कीर्तन[6] केशवाचें
असेच वा पूजन हेंच साचें ॥ ६ ॥

महत्तेज जो सर्वतेजोनिधान[7] (भु. प्र.)
महैश्वर्य[8] जो ब्रह्म विश्वा निदान ।
जनां स्थान जें प्राप्य[9] सर्वांत उच्च
जयाच्या पुढें पावनें अन्य तुच्छ ॥ ७ ॥

---

१ ससाराला. २ नमस्कार. ३ ब्राम्हण व वेद यांजवर प्रीति करणारा. ४ सर्व धर्म जाणणारा ५ कारण ६ नामस्मरण, नांव घेणें. ७ (सर्व तेजाचें) उत्पत्तिस्थान ८ ज्याचें ऐश्वर्य मोठें असा ९ मिळविण्याला योग्य

असे देव जो सर्व देवादिकांचा
करी भद्र कल्याणमूर्तीच साचा ।
पिता सर्व भूतां नसे नाश ज्याचा
जयापासुनी जन्म होई जगाचा ॥ ८ ॥

जयामाजिं जाई पुन्हा हें लयाला
तया विष्णुची ऐक ही नाममाला ।
असे जो जगन्नाथ जो लोकहेतू
हरी पापराशी भवाब्धीसि सेतू ॥ ९ ॥

ऋषिप्रोक्त जीं तद्गुणांचीं निधानें
हरीचीं सहस्र प्रसिद्धाभिधानें ।
नृपा, सांगतों, ऐक देऊनि लक्षा
जनां देति तीं धर्मकामार्थमोक्षा ॥ १० ॥

---

१ कल्याण. २ भवसागरास. ३ स्थानें. ४ प्रसिद्ध नामें.

॥ श्री ॥

# ॥ ॐ नमो भगवते वासुदेवाय ॥

ॐ कार हें तव असे प्रथमाभिधान ( व. ति. )
मोक्षार्थ जें जपति सज्जन सावधान ।
नौकाचि जो भवसमुद्र तरावयाते
चिंतामणी सकल मंगल द्यावयाते ॥ १ ॥

वारी भया सुखवि जो बहु सज्जनांते
देवोनिया सहज निश्चलता मनाते ।
वर्णत्रयें सुचवि जो विधिमाधवेशा[1]
आकार वा स्फुटे यदीय करी गणेशा ॥ २ ॥

विश्वंभरा रचुनि विश्व शिरूनि त्यांत
तूं राहसी, असिसि वा स्वयमेव तात ।
हें विश्व तूंचि, ह्मणुनी तुज विश्व नाम
वंदूनि तूज विवरीन सहस्रनाम ॥ ३ ॥

हें विश्व एक तव दिव्य शरीर मोठें
हें जाणतांचि मनुजा नच दुःख कोठें ।
सर्वत्र तूज बघतां भय नष्ट होतें
प्रीती दया हृदयिं सर्वसमत्व येतें ॥ ४ ॥

विष्णु प्रसिद्ध अभिधा तव ही श्रुतींत ।
व्याप्तिप्रदर्शक असे विषिधातु तींत ॥
व्यापूनि सर्व उरलासि ह्मणूनि साजे ।
हें पापतापहर नाम जगांत गाजे ॥ ५ ॥

वषट्कार यज्ञांत जो विप्र गाती ( भु. प्र. )
तुझ्या कारणें तो ह्मणोनीच गा ती ।

---

१ ब्रम्हा, विष्णू व महेश्वर याना. २ व्यक्त.

तुला देति संज्ञा श्रुती यज्ञमूर्ती
श्रुतिप्रोक्त तू देवता अंतिमा[1] ती ॥ ६ ॥

**भूतभव्यभवत्प्रभू** तव नाम हें विबुधप्रिया । (वि.)
योग्य तें तुज कोणिही नच पात्र अन्य जगीं तथा ॥
गाजते प्रभुता तुझी भुवनत्रयीं तिंहि कालिं ही ।
वागती तव शासनी यम सोम सूर्य सुरेशही ॥ ७ ॥

**भूतकृत्** प्रभो असें तुलाचि नाम साजतें । (चा.)
ब्रह्मदेव सृष्टिते करी परी तयास तें ॥
ज्ञान तूंच बा दिलें जनींहि नाभिपुष्करीं[2] ।
ओषधींस पोषितो शशांक[3] भानुच्या करीं[4] ॥ ८ ॥

**भूतभृत्** ह्मणोनि नाम घेशि, लोक पाळिशी ।
सत्त्वमूर्तिते धरूनि वाहसीहि पोषिशी ॥
**भाव** नाम सत्स्वरूप तूं ह्मणुनि वाहसी ।
शुद्धरूपिंही तसा प्रपंचरूपिं राहसी ॥ ९ ॥

**भूतात्मा** तुज वदती आत्मा तूंची समस्त भूतांचा । (आ.)
राहुनि सर्वा भूतीं चेतविशी देह पचभूतांचा ॥ १० ॥

**भूतभावन** तुला अभिधानें[5] (स्वा.)
तूंचि बा सकलभूतनिदान ।
वृद्धिहेतु असती सकलांते
पोशिशी, करिशि पालन त्यांते ॥ ११ ॥

**पूतात्मा** असती तूं नच होशी लिप्त आत्मकर्मानें । (आ.)
जगदुत्पत्ति-स्थितिलय होती तव बा स्वभावधर्मानें ॥१२॥

**परमात्मा** ह्मणुनिच तूं असती तू श्रेष्ठ आत्मवर्गात ।
अति शुद्ध बुद्ध ऐसें बोलति तुज लोक वेदही गात ॥१३॥

**मुक्तानांपरमागति** असती तूं मुक्तलोकनिजधाम[6] ।
पावति जन जे तूंते पुनरागम[7] त्या नसे कधीं राम ॥१४॥

---

१ शेवटची. २ नाभिकमलांत. ३ चंद्र ४ सूर्याच्या किरणांनीं. ५ नांव.
६ स्थान ७ परत येणें

**अव्यय** असती, तूते विकार किंवा विनाश कधिं नाहीं । (आ.)
श्रुति अजरामर ऐसें बोले तुजला न काल कधिं पाही ॥१५॥

**पुरुष** ह्मणुनि नामा घेसि विख्यात पूर्णा (मा.)
पुरिं शयन करोनी देहरूपीं पुराणा ।
सकल सतत साक्षाद्दृष्टिनें पाहसी कीं
ह्मणुनि वदति तूंते साक्षिनामेंहि लोकीं ॥ १६ ॥

**साक्षी** तुज ऐसा बा नाहीं दुसरा कुणीच या जगतीं । (आ.)
नेत्रावांचुनि बघसी एका कालींच सृष्टि ही महती ॥ १७ ॥

**क्षेत्रज्ञ** तूंच असती बघसी सदाही (व. ति.)
हा देह, बुद्धि, मन, इंद्रिययुक्त दाही ।
क्षेत्राभिधा त्रिविधदेहगणास साजे
कीं पेरिती जन तिथें निजकर्मबीजें ॥ १८ ॥

**अक्षर** प्रथित नाम हें तुला (स्वा.)
अक्षया सकलसृष्टिहेतुला ।
काल जैं भुवनवर्ग संहरी
तूंच एक उरशी जगीं हरी ॥ १९ ॥

**योगसाधनपरा** वश होशी
योगशास्त्रहि जनाप्रति देशी ।
आत्मयासि घडतो तव योग
देति नाम ह्मणुनी तुज योग ॥ २० ॥

**योगविदांनेता** ही संज्ञा तुजला अशामुळें आली । (आ.)
योग्यांच्या निर्वाहा करिशी तूं कीं स्वयें सदा कालीं ॥२१॥

देवुनि सुयोगमाला करिसी भवरोग-मुक्त योग्यातें ।
दावुनि हिताहितातें वैद्य जसा रोगमुक्त रोग्यातें ॥ २२ ॥

**प्रधानपुरुषेश्वर** प्रकृतिचा पती तूं खरा (पृ.)
प्रभू असतिही तसा पुरुष जो तयाचा हरा ।

---

१ फक्त चांगले योगमार्ग, किंवा ज्यास चांगली औषधें आहेत असा माना.

तुझ्याविण विभो जगा उभय चालवीती कसें ?
जडप्रकृति अंध ती पुरुष तोहि पंगू असे ॥ २३ ॥

विचित्र जग हें तुझ्याविण जरी (जलो.)
अचेतन असें प्रधानचि करी ।
ग्रहादि फिरते क्रमाविण हरी
जलोद्धतगती[1] जसे वनकरी[2] ॥ २४ ॥

**नारसिंहवपु** घेऊनि साचें (स्वा.)
फाडिशी उदर त्या कशिपूचें ।
दैत्यदंतिमद दूर कराया
सिंह तूं स्वजन-भीति हराया ॥ २५ ॥

**श्रीमान्** श्रीपति तूंची धरिशी श्रीवत्सलांछना वक्षीं । (आ.)
लक्ष्मीहि सदा तेथें वरि[3] तुज इतरां सुरां[4] न जी लक्षी ॥२६॥

**केशव** तुजला ह्मणती केश तुझे ते सुरेख किति नामी ।
क, अ, ईश या पदांहीं सूचित विधिहरिहरांस तूं स्वामी ॥२७॥

अथवा केशी दैत्या वधिशी ह्मणुनी तुला अशी संज्ञा ।
कृष्णा मिळेल ऐसें नारदमुनि बोलला तुला सुज्ञा ॥ २८ ॥

**पुरुषोत्तम** तूं अससी क्षराक्षरातीत थोर पुरुषा ( ।
क्षर ह्मणशि सर्व भूतें अक्षर आत्मा स्वकीय गीतांत ॥२९॥

**सर्व** विश्व निपजे लयिं जाई (स्वा.)
तूजपासुनि तुझ्याचहि पायीं ।
ह्यामिशी सकलही जगताते
सर्व नाम ह्मणुनी हरि तूंते ॥ ३० ॥

**शर्व** शब्दीं संहार अर्थ आहे (दिं.)
करिशि तो तू त्या रुद्ररूपिं बा हें ।
विदित करितें हें शिवद नाम शर्व
दुःख जगताचें हरिशि तूंचि सर्व ॥ ३१ ॥

---

१ मदजलानें बेकाम गती ज्यांची असे. २ हत्ती ३ उरावर. ४ देवांना.

**शिव** तुला वदती शुभदायका (द्रु. वि.)
अनघ[1] निर्मल तूं यदुनायका ।
परम मंगल तूंच जगात या
सुखद तूं तुज जे भजती तया ॥ ३२ ॥

**स्थाणु** तूंतेंहि वदति अव्ययाते (दिं.)
विकृति नोहेवा तव स्वरूपाते ।
स्तभ जैसा तो धरी मंदिराते
तूंहि तैसा बा धरिशी या जगाते ॥ ३३ ॥

**भूतादि** तू भूतगणा निदान (उप.)
निर्वाणिं[2] अक्षीण असें निधान ।
समस्त भूतें निवतीहि जाती
तुझ्यांतुनी तूजमधें पुन्हां ती ॥ ३४ ॥

**निधिरव्यय** हेंहि तुला देती म्हणुनीच नाम सयुक्त[3] (आ.)
निधिपरि भक्त प्रीती करिती तुजवरि सदैव संयुक्त[4] ॥३५॥
निधि अव्यय करुणेचा ज्ञानाचा तूं अचिंत्य शक्तीचा ।
सौंदर्यैश्वर्याचा, आनंदाचा, अपार शांतीचा ॥ ३६ ॥
**संभव**सी स्वेछेनें मायारूपीं युगीं युगीं जो तूं ।
साधुपरित्राण तसा धर्मसुरक्षण तया दुजा हेतू ॥ ३७ ॥

**भावन** तूंते वदती पाहुनि कर्में जनांसि फल देशी ।
रक्षिसि सर्वा भूतां तदर्थ निर्मूनि विविध वस्तूंशी ॥ ३८ ॥

**भर्ता** तूंबा वाहसी विश्वभार (शा.)
विश्वाच्या तूं रक्षणीं दक्ष फार ।
बालक्रीडाशालिनी चारु मूर्ती
गोपां रक्षी पर्वता वाहुनी ती ॥ ३९ ॥

**प्रभव** तूं भवना सकला विभू (द्रु. वि.)
सकल धातुगणाप्रत जेंवि भू ।

---

१ पापरहित. २ शेवटीं. ३ जोडलेलें [ जोडनांव ] ४ योगाभ्यासानिरत.

कनक कारण आभरणा जसें
घटपटांस कुलालें[1] कुविंदें[2]से ॥ ४० ॥

प्रभुचि तू मग काय चमत्कृती.
द्विविध कारण तूं जगताप्रती ।
जग तुझी विकृती तरि तूं कृती[3]
विकृत होशि कधीं नच सन्मती ॥ ४१ ॥

प्रभु तुझी प्रभुता तरि हीच गा
नससि लिप्त कधीं करुनी जगा ।
अतुल शक्तिस काय न संभवे
विष जरी असु[4] घे गिळिलें भवें[6] ॥ ४२ ॥

द्वितय वस्तु न एकपदीं वसे
जग तरी तुजमाजिंच हें असे ।
नच जया समजे तव ही कृती
मृगजलासम ते जग मानिती ॥ ४३ ॥

**ईश्वर** जगताचा तूं दावी जग तव अपार ऐश्वर्य । ( आ. )
शक्तिज्ञानांची तूं परमावधि बा अमोघ तव वीर्य ॥ ४४ ॥

**स्वयंभू** स्वतःसिद्ध आहेस नित्य ( भु. प्र. )
तुझ्या संभवा अन्य नाहीं निमित्त ।
स्वयंभू दुजा जो विधी त्वांचि केला
पुढें निर्मि जो या जगन्मालिकेला ॥ ४५ ॥

**शंभू** तुला हें शुचि[5] नाम सार्थ ( उप. )
भक्तांसि सौख्यें करिशी कृतार्थ ।
असे शिवाला जनिं हीच संज्ञा
दोघांमधें भासत भेद अज्ञा ॥ ४६ ॥

**आदित्य** तूंचि असती; रविमंडळांत ( व. ति. )
आहे कला तव ह्मणूनि दिसे तयांत ।

---

१ कुंभार. २ कोष्टी. ३ धन्य, कृतार्थ. ४ प्राण. ५ पवित्र ६ शंकरानें.

सर्गस्थितिप्रलयकारि विचित्र शक्ती
जी पाहुनी नविन नास्तिक थक्क होती ॥ ४७ ॥

आदित्य वेदवचनीं असतीच बारा
' त्यांतील विष्णु मज जाण पृथाकुमारा '।
ऐसें स्वयें वदसि तूं निज गीर्ति आर्या
पृथ्वीस नाम अदिती तव तीहि भार्या ॥ ४८ ॥

'आदित्यवर्णं तमसः परस्तात्' (इं.)
ऐसेंहि सांगे तव तीच गीता।
वर्णावया ऊर्जितं रूप तूझें
नाहींच कीं साधन योग्य दूजें ॥ ४९ ॥

आदित्य जैसा सम सर्व पात्रीं (उप.)
तैसाचि तूं वा सम शत्रुमित्रीं।
जी अर्जुना ती शिशुपालकंसा
दिली गती त्वां नच ही प्रशंसा ॥ ५० ॥

आदित्यबिंबें जलिं भासतीं तीं
अनेक ऐसी मति घे प्रतीती।
तैसी तुझी जी प्रतिदेहिं छाया
अनेक भासे तव हीच माया ॥ ५१ ॥

**पुष्कराक्ष** उपमा नलिनाची[२] (स्वा.)
चारुता[३] कमि करी नयनांची।
काजवा करि न साम्य रवीशीं
आधुनीकहि पुराणं[४] कवींशी ॥ ५२ ॥

**महास्वन** मुनी तुझें श्वसित बोलती वेद हा[५] (पृ.)
धनुष्यरवची तुझा खचित दुष्टमांसादहा[७]।
महासमरिं[६] तूं रथीं दरें निनादुनी कौरवा
दणाणुनि दिलें किती यमहि भी अती त्या रवा ॥ ५३ ॥

---

१ तेजस्वी. २ कमलाची ३ सौंदर्य ४ प्राचीन. ५ शंख ६ युद्धांत.
७ दुष्ट असे जे मांसाद ह्मणजे राक्षस त्यांना मारणारा

ध्वनी परिसुनी मुनीजन महा सदा अंतरीं (पृ.)
तुझ्या अढळ त्या पदा त्वरित पावती बा हरी ।
महाध्वनिमुळें तुला मिळविती ह्मणोनी यती
महास्वन असें तुला ह्मणति तूं तया सद्गती ॥ ५४ ॥

नृसिंह तव गर्जना तयिं दणाणुनी भू नभा
कयाधुपतिची[1] कशी कडकडोनि मोडी सभा ।
समूळ तरु पाडुनी करि सकंप सर्वा जगा
सुटूनि थरकाप ते वदति दैत्य झाला दगा ॥ ५५ ॥

**अनादिनिधन** प्रभो तुज नसे (जलो.)
जनी मरणही; तनू तव असे ।
सदा तरुण दिव्य सुंदर अती
न भूतकृत, वीजशी द्युतिमती ॥ ५६ ॥

**धाता** तूं जगताचा आधार तया दुजा नसे कांहीं । (आ.)
जडसृष्टिमाजिं पूर्वीं प्राणात्मक गर्भ तो तुझा राही ॥५७॥

**विधाता** फलाचा तूचि आहेस साचा (भु. शा.)
ह्मणूनी जनाच्या न्याय होई क्रियेचा ।
जसें कर्म ज्याचें त्यास तैसेंचि देशी
तुझी रीत ऐशी सर्व कालींहि देशीं ॥ ५८ ॥

**धातुरुत्तम** चिदात्मकें[2] बा तूं; (स्वा.)
भूजलादि घटकांशचि धातू ।
तूंच निर्मिशि या भुवनातें
निर्मुनी प्रथम पद्मभवातें[3] ॥ ५९ ॥

धातुरुत्तम असें तव नाम
विश्व तूं घडविशी अभिराम ।
शुक्र जेंवि घडवी जगिं काया
शुक्ररूप असशी जगता या ॥ ६० ॥

---

१ हिरण्यकशिपू. २ चैतन्यमय. ३ ब्रम्हदेवाते.

अप्रमेय तुजला नयनांहीं (स्वा.)
पाहतां न कधिं ये, रसनाही[१]।
घ्राण कर्ण तुज जाणत नाहीं
स्पर्श होय न तुझा तनुलाही ॥ ६१ ॥

व्यर्थ ती अनुमिती उपमाही
दर्शनां गवसशी नच साही।
नेति नेति ह्मणुनी श्रुति गाजे
नाम हें ह्मणुनि बा तुज साजे ॥ ६२ ॥

हृषीकेश आहेस तूं इंद्रियांचा (भु. प्र.)
पती सर्वभूतात्मवासीच साचा।
तुझें हालवी भूतमालासि सार
जशा बाहुल्या नाचवी सूत्रधार ॥ ६३ ॥

पद्मनाभ तव नाभिमधूनी (स्वा.)
पद्म जें उपजलें घडवूनी।
टाकि तें सकलही भुवनाला
शब्द हा ह्मणुनिया तुज आला ॥ ६४ ॥

अमरप्रभु असशी तूं देवाचा देव त्यांसही शरणें। (आ.)
सत्ता तव अति मोठी, संकटिं येती तुलाच ते शरण ॥६५॥

विश्वकर्मा तुला वेद ते बोलती। (स्रग्वि.)
निर्मिशी विश्व हें तूंचि मायापती।
पद्मभू[३] त्वद्धलें विश्वरक्षा विणी
गोलपद्मी[४] तुझी ती तनू स्रग्विणी[५] ॥ ६६ ॥

मनुही तूंते वदती. तूंची मननक्रियेस मूळ झरा। (आ.)
मला मनु संज्ञा जरि, मन्त्रहि तूंची, प्रजापतीहि खरा ॥६७॥

त्वष्टा तूं बा निर्मिशी सृष्टिचक्रा (शा.)
त्वष्टा[६] काष्ठापासुनी जेंवि चक्रा[७]।

---

१ जीभ. २ रक्षण करणारा ३ ब्रम्हदेव. ४ गोलरूपी कमळांचे योगानें
५ मालायुक्त. ६ सुतार. ७ चाक. ८ बळ, शक्ति.

तोही जैसा तासुनी लांकडातें
नाशी तैसा नेशि विश्वा लयातें ॥ ६८ ॥

**स्थविष्ठ** तूं स्थूल अती अनंता [ उपें.
व्यापूनि सारी उरशी अनंता ।
महत्त्वकल्पसी तव बा कराया
अशक्य आहे तव किंकरीं या ॥ ६९ ॥

**स्थविरध्रुव** ध्रुवापरि धरिशी आकर्षुनी भुवनवर्ग। [ आ.
तूं वृद्ध, तो तरुणची; तुजपासुनची तदीयही सर्ग ॥ ७०

ध्रुव शब्द स्थैर्यार्थी, राहसि बा तूंचि एक कल्पांतीं
**अग्राह्य** इंद्रियां तूं, रिघही त्यांचा नसे तुझ्या प्रांतीं ॥ ७१ ॥

**शाश्वत**, जन्मादिरहित, तेजोमय तूं निधान तेजाचें
कृष्णें तनू तरि धरिशी माराया संघ दुष्ट राजांचे ॥ ७२

आकर्षिसि भुवनें हीं, गोपींनांही, तसेंच भक्तांस
**कृष्ण** ह्मणुनि तुज ह्मणती, नामचि हें तारितें विरक्तांस ॥ ७३

**लोहिताक्ष** तव त्या वदनातें [ स्वा.
शोभवीति जशि वीज घनातें ।
मंगलासहित रोहिणि वा ते
शोभवी जशि निरभ्र नभातें ॥ ७४ ॥

**प्रतर्दन** तुझी तमोमय तनू जगा संहरी [ पृ.
चराचर तुझ्या मुखीं प्रलयिं विश्व जाई हरी ।
अशा समयिंही अमोघ विलसे तुझी शक्ति ती
**प्रभूत** ह्मणुनी तुला ह्मणति भक्त लक्ष्मीपती ॥ ७५ ॥

प्रभूत असती प्रभू गुण तुझे, परा शक्तिही
विचित्रघटनापटू रचिशि तूंचि लोकां तिंही ॥ ७६ ॥

अलौकिक तुझा असे सकलही गुणांचा गण
ह्मणूनि तुजला कुणी वदति बा हरी निर्गुण ॥ ७६ ॥

---

१ कल्पना. २ चाकर ३ उत्पत्ति. ४ काळ्या रंगाची. ५ लाल डोळे
६ [illegible]

त्रिककुब्धाम असें तुला मुनींनीं (न. वृ.)
त्रिदिशा व्यापुनि राहसी ह्मणूनी ।
दिधलें नाम, तुझेंचि तेज राहे
भुवन व्यापुनि सर्व सर्वदा हें ॥ ७७ ॥

त्रिपदात्मक[1] अंतरिक्ष जें (वियो.)
भरलें सर्व तुवां अधोक्षजें ।
ह्मणुनी तुज नाम शोभतें
त्रिककुब्धाम असें रमापते ॥ ७८ ॥

कुकुप् शब्द आहे दिशा-शास्त्र-वाची (भु.)
तसी धाम संज्ञाहि देहादिकांची ।
त्रयी[2] ही तुझी दिव्य मूर्तीच साची
तुझी गूढ संज्ञा अनेकार्थवाची ॥ ७९ ॥

श्रुति, स्मृति, पुराण हीं असति बा घरें तीन तीं (पृ.)
जयांत वससी परिस्फुटपणें[3]; तुला जे नती ।
करोनि मन शांतही बघति बा तया दीसशी
त्रिवृत्[4]प्रणवही तुझें घर जिथें सदा राहसी ॥ ८० ॥

त्रिककुब्धाम, त्रिदिशा वास तुझा स्वर्ग, भूमि, पाताळ । (आ.)
द्वारावति, मथुरा, व्रज राहसि या तीन ठायिं गोपाळ ॥८१॥

पवित्र तुजला असे बहुत योग्य हें नाम गा (पृ.)
तुझ्याचि पदसंगमें दुरित हारि गंगाऽपगा[5] ।
हरी वदसि अर्जुना ' सकल धर्म सोडोनि ये
मला शरण एकट्या करिन शुद्ध मी निश्चयें ' ॥ ८२ ॥

मंगलंपरं नाम हें तुला (का.)
सर्वमंगला सौख्यहेतुला ।
दुःख त्या नसे जे तुझ्या पदा
सेवितो सदा सर्वकामदा ॥ ८३ ॥

---

१ तीन चतुर्थांश. २ तीन वेद. ३ स्पष्टपणें. ४ तीन मात्रांचा. ५ नदी.

**ईशान** तूं नियमिशी सकलांहि भूतां ( व. ति. )
सामर्थ्य फार तव तें परि मोक्षदाता ।
ईशान नाम गिरिजापतिलाहि लोकीं
दोघांत भेद न कधीं सुमती विलोकी ॥ ८४ ॥

**प्राणद** तूं प्राणांते देउनि जड सृष्टि चेतविसी । ( उ. आ. )
हरिशिहि ते भूतांचे जेव्हां त्यां मृत्युहातिं बोलविसी ॥८५॥

कसें सर्गारंभीं जडिं भरसि चैतन्य असतीं ( शि. )
अशी शंका यावी नच ह्मणुनि ती गौतमसती ।
शिला उद्धारोनी निजपदरजें दाविलि पळीं
[१]व्रजींही [२]वत्सांते [३]शिशुसह जयांते [४]अघें गिळी ॥ ८६ ॥

सांदीपनी तुजकडे गुरुदक्षिणार्थी [ व. ति. ]
मागे बुडूनि मृत जो निजपुत्र तीर्थीं ।
तो आणुनी क्षणिं तुवां दिधला तयासी
ही कीर्ति विश्रुत असे सकलां जनांसी ॥ ८७ ॥

यमाचा गुरू प्राण घेण्यांत साचा [ भु. ]
तुझा पाहतां खेळ तान्ह्या मुलाचा ।
स्तना चोखितां घेशि तो पूतनेचा
न देतां तिला लेशही यातनेचा ॥ ८८ ॥

जे लोकतापद असे नृपती तयांतें [ व. ति. ]
मारोनि भार महिचा उतरावयातें ।
तूं घेशि या यदुकुलीं अवतार मोठा
नोहे ह्मणूनि मम हा अपवाद खोटा ॥ ८९ ॥

तूं आपुल्याच वदनें वदसी स्वगीतीं
' हें कालरूप बघ पार्थ, धरी न भीती ।
मारावया रिपुचिया सकलांहि वीरां
हें सिद्ध तूजविणही करि युद्ध वीरा ' ॥ ९० ॥

---

१ असत् नाश पावणारें २ गोकुळांत. ३ वासरांना. ४ अघासुर.

**प्राण** तरि तूंच असशी, तुझी पराप्रकृति तीच जीवकला [ आ. ]
अपर-प्रकृतीमधिं ती घालुनी देशि चेतना सकलां ॥९१॥

[ स्वा. ]
**ज्येष्ठ** तूंच असशी सकलांत
कल्प कोटि जरि लोटुनि जात ।
तूं तसाचि अविकार अजात
श्रेष्ठ तूं हरि ह्मणूनि सुरांत ॥ ९२ ॥

[ दिं. ]
**श्रेष्ठ** तूं जगीं हे दयानिधे
जेंवि मेरु तो पर्वतामधें ।
त्वत्पदापगा पावनांत वा
शोभवीतसे जी सदाशिवा ॥ ९३ ॥

[ उप. ]
**प्रजापती** तूं असशी प्रजेचा
पिता तसा पालक तूंचि साचा ।
पूर्वीं जला निर्मिशी तूं जगांत
मागून सौवर्णहि[1] अंड त्यांत ॥ ९४ ॥

हेमांडगर्भीं[2] शिरसी स्वयें तूं
तें अंड होई जगतास हेतू ।
हिरण्यसंज्ञा सुचवी सुधाम[3]
**हिरण्यगर्भ** श्रुति देति नाम ॥ ९५ ॥

**भूगर्भ** तूं भूमिस साठवीशी
देवोनि जन्मा जठरैकदेशीं[4] ॥
अशीं तिथें राहति कोटि कोटी
ब्रह्मांडखंडें अति मोठमोठीं ॥ ९६ ॥

[ स्वा. ]
**माधव** प्रभु तुला स्वयमेव
श्री वरी, मिळविण्या तिज देव ।
व्यर्थ यत्न करिती शतकोटी
ती तुझ्या पदिं सदा शिर लोटी ॥ ९७ ॥

---

१ सोन्याचें. २ सोन्याच्या अंड्यामध्यें. ३ चांगलें तेज. ४ पोटाच्या एका भागांत.

**मधुसूदन** तूं मधु दैत्यवरा [ तोटक. ]
वधिशी उदधीमधिं चक्रधरा ।
मल त्या तुझिया श्रुतिचा बनवी
तुज अर्पिति ही अभिधा सुकवी ॥ ९८ ॥

**ईश्वर** प्रथित नाम हें तुला [ स्वा. ]
सृष्टिच्या नियमनादिहेतुला ।
शक्तिते तव नसेच बा तुला
हेतु तूं सकल धर्मसेतुला ॥ ९९ ॥

**विक्रमी** तुजसमान जगांत
नाहि अन्य,मुनि हें यश गात ।
दैत्यवीर बुजती तव नामा
शीतभानुरविवशललामा ॥ १०० ॥

**धन्वी** तुझ्यासम कधीं नच भूमि-नाकीं [ व. ति. ]
स्वच्छिष्य पार्थ समरीं मघवा पिनाकी ।
यांते करोनि जित विस्मित कीर्ति लाहे
संज्ञा यथार्थ तुज उत्तमकीर्तिला हे ॥ १०१ ॥

**मेधावी** तूं असशि जगीं या सर्व विद्यांत पूर्ण [ मं. ]
जें जें होई जगीं सकल तें चित्तिं घेशीच तूर्ण ।
संस्कारा त्या सतत धरिशी हीच सर्वज्ञता बा
मेधादेवीवरि तव असे सर्वदा पूर्ण ताबा ॥ १०२ ॥

**विक्रम,** क्रमिसि तूं भुवनाते [ स्वा. ]
देउनी अतिमहा त्रिपदांते ।
केलिं ही बलिमही हरण्याला
कासया गरुड तो फिरण्याला ॥ १०३ ॥

' वि ' या अक्षरीं पक्षि हा अर्थ आहे [ स्वा. ]
प्रवासीं तुला पक्षिराजाचि वाहे ।
क्रमाचा असे चालणें हाचि अर्थ
म्हणूनी तुला विक्रमाख्या यथार्थ ॥ १०४ ॥

---

१ चंद्र. २ स्वर्गी. ३ युद्धांत. ४ क्रीडा. ५ भूषण. ६ इंद्र. ७ शंकर.

क्रम दिसे कृतिमाजिं तुझ्या हरी [ द्रु. वि. ]
क्रम ह्मणोनि तुला अभिधा खरी ।
सकल आक्रमिशीहि चराचर
तुज नसे किमपीहि अगोचर ॥ १०५ ॥

अनुत्तम ! तुझ्या नसे सम कुणी [ जलो. ]
असे मग कसा अधीकहि गुणी ।
ह्मणूनि तुजला ‘ अनुत्तम ’ असें
दिलें निगमिं नाम उत्तम असे ॥ १०६ ॥

दुराधर्ष तूते मुनी नाम देती [ भु. प्र. ]
रणीं दैत्य सारे तुला फार भीती ।
कृतज्ञत्वही फार तूझ्याच अंगीं
सदा कर्मसाक्षी उभा अंतरंगीं ॥ १०७ ॥

पत्र, पुष्प, फल, तोय भक्तिनें ( रथो. )
देइ जो मजसि तें सुतुष्टिनें ।
घेउनी भवनिबंधनांतुनी
मुक्त त्या करिन हा तुझा ध्वनी ॥ १०८ ॥

कृति असें तुजला मुनि बोलती [ द्रु. वि. ]
सकळ वस्तु बळें तव हालती ।
विविध जें जगिं कर्म घडून ये
कृति असें अभिधान तयास ये ॥ १०९ ॥

कृती हें क्रियाशक्तिला नांव आहे ( भु. )
क्रियाशक्तिचें मूळ तूझ्यांत राहे ।
ह्मणूनी कृती हें तुला नाम शोभे
कृतीला प्रवृत्ती तुझी नाहिं लोभें ॥ ११० ॥

आत्मवान् ह्मणुनि हें तुज नाम [ स्वा. ]
संयमी असासि तूं जित-काम ।
गोकुळीं भुलविती व्रजबाला
सोडिशी परि न तैं विनयाला ॥ १११ ॥

**सुरेश** तूं देव सुरादिकांचा [उप.]
ब्रह्मादिकांना अधिकार साचा।
स्वकर्मिं तो तूजमुळेंचि आहे
त्वच्छासनानें जग चालताहे ॥ ११२ ॥

**शरण** तूंच वा सर्व ह्या जगा (शु. का.)
भजति चार ते भक्त तूज गा।
सुखद त्यांस तूं, सर्व आपदा
हरुनि देशि त्या ज्ञानसंपदा ॥ ११३ ॥

**शर्म** तूं सर्वही प्राणिमात्रा सदा (स्र.)
देशि दंडोनिया त्याचिया त्रासदा[1]।
जेवि त्यांचा पिता; तूंचि माता पिता
भूतमात्राप्रती देवकीच्या सुता ॥ ११४ ॥

**विश्वरेता** तुला नाम देती श्रुती
बीजदाता पिता तूंचि विश्वाप्रती।
स्वीकरी बीज तें पत्नि मायावती
विश्वरूपी सुता वीतसे माय ती ॥ ११५ ॥

**प्रजाभव** असें तुला ह्मणुनिही (जलो.)
असे श्रुतिंत नाम विश्रुत तिन्ही।
प्रजांस सकलां तुंवा जनि दिली
प्रजापति नसे तुझ्याविण बली ॥ ११६ ॥

**अह** यास्तव तूं असती कर्ता रवि तो तुज्या निदेशाचा [आ.]
अज्ञानरात्र तुजला नाहीं वा हेतु तूं प्रकाशाचा ॥ ११७ ॥

**संवत्सरही** यास्तव, काल तरि तुझेंचि रूप असे (उ. आ.)
**व्याले**[2] जसा धरण्याला कठिणचि तूं फार तुजसि रूप नसे ॥११८॥

**प्रत्यय** तरिही येतो कारण हें ज्ञानची तुझें रूप [आ.]
प्रत्यय ह्मणुनी तुजला श्रुतिगत हें नाम शोभतें खूप ॥११९॥

---

१ त्रास देणाऱ्याला. २ सर्प.

**सर्वदर्शन** तुला श्रुति वानी [स्वा.]
' विश्वतोनयन ' ह्या अभिधानीं ।
सर्वही बघशि तू तुजलाही
ज्ञानवान् सकलही जन पाही ॥ १२० ॥

**अज** असें तुला वेद बोलती ( शु.का. )
जनि नसे तुला तीन्हि कालिं ती ।
तरि करावया धर्मसंपदा
धरिशि तूं तनू शुद्ध कामदा ॥ १२१ ॥

**सर्वेश्वर** तूं ऐसें इतुक्या वरुनीच जाहलें सिद्ध । [आ.]
**सिद्धचि** तूं बा असशी, वेद ह्मणाति नित्य शुद्धही बुद्ध ॥ १२२ ॥

**सिद्धि** खरी तूच हरी ज्ञान तपोदानयोगधर्मांची
स्वर्गादीक फलें तीं शाश्वत नच आगमोक्त कर्मांचीं ॥ १२३ ॥

**सर्वादि** आदिकारण असशी तूं या समस्त भूतांते
अच्युत होशी न च्युत पतन नसे कधिं तुझ्या स्वरूपाते ॥ १२४ ॥

**अच्युत** च्युति तुला तरी घडे [रथो.]
व्योम हें जरि मुठींत सांपडे ।
पावकासि कुणि जाळण्या शके
काल हा जरि धांवण्या थके ॥ १२५ ॥

हीरकासि खरडूं शके शिसें
अंधकार जरि भानुते दिसे ।
भक्तिहीन जरि तूज पारखे
मोक्ष येइ जरि कर्मठा मखें ॥ १२६ ॥

---

१ वर्णन करी.

**प्रथम शतक समाप्त.**

# शतक २ रें.

**वृषाकपि** असें श्रुती वदति त्या रवीतें जरी (पृ.)
तुलाचि अभिधा असे दिधलि ही पुराणांतरीं।
वराह म्हणजे कपी वृषहि धर्मसंज्ञा खरी
घनापरि सुकामना सकल वर्षि ऐसी हरी
वराहतनु ती तुझी सहज मेदिनी उद्धरी ॥ १ ॥

हिरण्याक्षा मारी तनु तव वराहासम जुनी **शिखरिणी**
स्वदंष्ट्राच्या अग्रें उचलुनि धरी मग्न अवनी; ।
सुवर्णाशा भारी धरुनि सकलांतें जुलुम जे
करोनी गांजीती नृप मद तयांचा जिरविजे ॥ २ ॥

हिरण्यची कारण पातकाला, **उपजाति**
आशा तयाची बहु ज्या नृपाला, ।
तोची हिरण्याक्ष खरा तयाला
तूं दक्ष शुद्धीवरि आणण्याला ॥ ३ ॥

तूं धर्म—मेघ जयिं वर्षिशि या जगाला **वसंततिलका**
तेंव्हाचि त्या सुमति येइल तारण्याला; ।
जी पापपंकिं सुनिमग्न मही तुवां ती
उद्धारिली धरुनि सूकररूप दांतीं ॥ ४ ॥

**अमेयात्मा** तूं बा, अमितचि तुझा देहमहिमा **शिखरिणी**
धरी राईचा हें हरि तुजपुढें विश्व अणिमा।
कशी सानी मूर्ती बळिस फसवी दानसमयीं
तशी मार्कंडेया लुलितें शयनीं त्या जलमयीं ॥ ५ ॥

**सर्वयोगविनिःसृता** तुला **नवीन वृत्त**
शब्द हा अति गूढ लाविला;
तूं असंग अलिप्त शुद्धही,
व्यापिशी नभ जेंवि सृष्टि ही ॥ ६ ॥

---

१ मेघाप्रमाणें. २ पृथ्वी. ३ सोनें. ४ वराह- ५ लोळणारी किंवा सुंदर-

जगज्जननपालनप्रलयकर्म ह्याची असे (पृथ्वी)
तुझा सहज योग वा तुजसि लेप त्याचा नसे ।
नभीं पवनसी तुझ्यांमधि वसे महा सृष्टि ही,
अलिप्त असती अशापरि जगें स्वकर्मांनिही ॥ ७ ॥

अशापरी निःसृत सर्व योगा उपजाति
पासूनि आहेस अलिप्त तूं गा ।
स्वरूप अप्राप्य तुझें तयातें,
जो योग भक्तीविण सेवि ते ते ॥ ८ ॥

योगि जे धरुनि नाक बैसती, रथोद्धता
कुंभका[1] करुनि वृत्ति रोधिती ।
त्यांस तूं नससि लभ्य वा हरी;
भक्त मात्र तव चित्त तो हरी ॥ ९ ॥

योग जे विविध रीतिं वर्णिशी
त्यांहिं तूं निज जनांस पावशी, ।
यामुळें वरिल नांव साजतें
आणखी वदिन अर्थ वा हरे ॥ १० ॥

योगे[2] जे विविध कंस भूपती
मारण्या तुजसि योजि दुर्मती ।
त्यांतुनी निसटुनीच नीवसी,
नाम हें ह्मणुनि सार्थ वाहसी ॥ ११ ॥

वसु अशी तुजला अभिधा हरी (द्रु. वि.)
वससि तूं सकलांहि चराचरीं ।
वसति सर्वहि लोक तुझ्यांत ते
वसुगणीं[3] तव अग्नि विभूति ते ॥ १२ ॥

वसु असें ह्मणती कनका मुनी
वसुगणासहि ती अभिधा जुनी ।

---

१ प्राणायामांतील श्वासावरोध. २ उपाय, युक्ति. ३ अष्टवसूमध्यें.

विमलतो द्युति दोहिंतही वसे,
वसुमना मन शुद्ध तुझें तसें ॥ १३ ॥
लोहापरी मलिन हें मन मानवाचें
त्याच्यावरी चढति गंज रजस्तमाचे ।
सोनेंच बावनकसी तव सत्त्व साचें
तेथें सदा रजतमाविण सत्वें सांचे ॥ १४ ॥
सत्य तूं असशी अविनाशी ल. स्वा. ( न. धृ. )
वेदिं ही अभिधा तुज खाशी ।
सत्य हें तुजला प्रिय भारी
सज्जना असशी कइवारी ॥ १५ ॥
समात्माहि तूं सर्वदा चित्तिं साम्य [ भुजंगप्रयात ]
नसे द्वेष्य तूंतें न कांहींहि काम्य ।
तरी भक्तिनें चित्तिं जो तूज पाहे
तयामाजिं तूं, तोहि तुझ्यांत राहे ॥ १६ ॥
संमितें तूंही होशी, भक्ताची बुद्धि घालि तुज सीमा । [ आर्या ]
असासि असंमिताचि परी;भुलली ती पाहुनीच तुजसी मॉं ॥ १७ ॥
समचि तूं बघसी सकलांसही ( द्रु. वि. )
करिसि वाहन तूं गरुडा अही ।
जरि रमापति जांबुवतीसही
भजासि गोकुलिंच्या युवतींसही ॥ १८ ॥
अमोघ तव पूजन, स्तुति, नती, चरित्रश्रुती ( पृथ्वी )
जशा फलति ह्या, तशा त्वरित जान्हवी न श्रुती ।
' न भक्त मम पावती कधिं विनाश बा अर्जुना '
असा पण तुझा जनां विदित तो असे बा जुना ॥ १९ ॥
पुंडरीकाक्ष तूं राहसी हृत्पुरीं स्रग्विणी
जेंवि वैकुंठिच्या कांतिमन्मंदिरीं ।

---

१ स्वच्छता. २ तेज. ३ मन ४ सत्वगुण. ५ मर्यादित. ६ अमर्याद. ७ लक्ष्मी. ८ सर्प. ९ भागीरथी.

पद्मनेत्रा तुझी दृष्टि भक्तांवरी
पुंडरीकांपरी सौख्यदायी खरी ॥ २० ॥

**वृषकर्मा** तुज वदती वृषापेरी तूं जनांस तोषविशी। आर्या
वर्षिसि अमृता शीतल तापत्रय वारुनीही शांतविसी ॥ २१॥

**वृषाकृति** तुझी तनू द्युतिमती अतिप्रीतिदा (पृथ्वी
सुभक्तमतिते, नती करिति जे तुझ्या सत्पदा।
वृषापेरि करी तया अमृत–शीत–धारा–स्रुती
हरी वृजिनसंततीहि विरतीप्रती संसृती ॥ २२ ॥

धर्मस्थिती स्थापित तूं कराया (उप.)
अनेक घेशी तनु देवराया।
लावण्यराशी नय-धर्म-मूर्ती
समस्त-भक्ताखिलकामपूर्ती ॥ २३ ॥

**रुद्र** तूं म्हणुनि भक्तजनाला स्वागता
द्रावुनी अणिशि अश्रुजलाला।
नेशि सर्व जन त्याच थराला
जैं जगत् सकल जाइ लयाला ॥ २४ ॥

द्राविशी सकल दुःख ह्मणूनी
नाम हें तुज दिलेंहि मुनींनीं।
अर्थ हे दिसति दोन तयांत
भासती अगदि जे विपरीत ॥ २५ ॥

**बहुशिरा** तुजला ह्मणती मुनी (द्रु. वि.)
पुरुषसूक्ति करी श्रुति हा ध्वनी।
मुळिं नसूनि शिरही शिरकर्म तूं
करिशि वा अडशी न जसा क्रतू ॥ २६ ॥

**बभ्रु** तूं सकल विश्व वाहसी रथोद्धता.
हें गिरी करिं धरूनि दाविशी।

---

१ कमलाप्रमाणें. २ मेघाप्रमाणें. ३ गळणें, थेंब पडणें ४ दुःख किंवा पाप-परंपरा. ५ थांबणें. ६ संसार. ७ यज्ञ, दक्षप्रजापति.

गोकुळीं, जयिं सुरेंद्र तो करी
वृष्टिच्या अमित थोरही सरी ॥ २७ ॥

**विश्वयोनि** भुवना सकला या (स्वागता)
हेतु तूंचि असती प्रकटाया ।
नाम हें जरि असे प्रकृतीते
तुजवीण न कधीं स्थिति तीते ।
भक्त मिश्र करिशी स्वतनूंत
नाम हें ह्मणुनिही तुज युक्त ॥ २८ ॥

**शुचिश्रवा** हें तुज नाम शोभे (उप.)
श्रुती पिती त्वद्यश फार लोभें ।
श्रुतींत तूझीं श्रवणीय नामें
बहूत आहेतचि मोक्षधामें ॥ २९ ॥

श्रवण तू करिशी निजनामें (द्रु. वि.)
वदति सेवक जीं हितकामें ।
ह्मणुनि हें तुजला अभिधान
स्तुतिविषा करिशी बहु पान ॥ ३० ॥

**अमृत** तूं ह्मणुनी नच बाधतें (द्रु. वि.)
अमृत भक्तजनांसहि लाधतें ।
अमृत नाम म्हणूनि तुला हरी
अमृतसंमित[1] दे तव वैखरी ॥ ३१ ॥

**शाश्वतःस्थाणु** तू वृक्ष जैसा स्थिर (स्र.)
न व्यया पावसी नाम घे हें हर ।
एकचीं देव तूं लोकदृष्ट्या द्विधा
वेद होई जसा एकची तो त्रिधा ॥ ३२ ॥

**वरारोह** तूं स्थान सर्वांत मोठें (भु.)
तुझ्यावीण मुक्तां नसे ठाव कोठें ।

---

१ तुल्य.

मुमुक्षू तुला सर्वही मीळती ते
असे सौख्य मार्गीहि जातां गतीते ॥ ३३ ॥

**महातपा** असें तुला महाद्युती वदे श्रुती (पं चा.)
असे तुझी अती महा मती जगज्जिची कृती ।
प्रतापही महा तुझा तपस्वि राम तूं खरा
वनीं जनार्थ जाशि बा त्यजूनि पंचचामरा ॥ ३४ ॥

**सर्वगा** सर्व तू व्यापुनी राहशी (स्र.)
नाहिं कांहीं जगीं जें न तूझ्यानिशी ।
**सर्वविद्भानु** तूं जाणशी सर्वही
त्वत्प्रभेनेंच बा भासती स्वर्मही[1] ॥ ३५ ॥

**विष्वक्सेना** नाम हें तूज येई (शा.)
दैत्यांचें तें सैन्य भीवूनि जाई ।
सर्व प्राणी हेंचि सेना; तिचा तूं
नेता, त्यांच्या हालचालीस हेतू ॥ ३६ ॥

**जनार्दन** असज्जना करिशि तू सदा मर्दना (पृ.)
हितार्थ अपुल्या सदा जन करी तुझी प्रार्थना ।
अनुग्रह तसा सुनिग्रह असे तुझ्या हातिं तो
नृसिंहकर तत्सुता वरद जो पित्या फाडितो ॥ ३७ ॥

**वेदा**चि तूं बा असशि; जनांला (मौ.)
ज्ञानहि देशी, हरिशि तमाला ।
जे तुज येती शरण तयांला
सत्वर नेसी परम पदाला ॥ ३८ ॥

**वेदवित्** तुझेंचि नाम । वेद हें त्वदीय धाम[2] ॥ (स.)
ऋग्यजू तसेंचि साम । पूर्ण जाणसीच राम ॥ ३९ ॥

**अव्यंग** तूं पूर्ण निवास साचा (उप.)
ऐश्वर्यवीर्यादिक षड्गुणांचा ।

---

१ स्वर्ग व पृथ्वी. २ घर.

श्रुती तुझा देह तशीच आज्ञा
वेदांगही तूज ह्मणूनि संज्ञा ॥ ४० ॥

वेद जो हरुनि सागरिं नेला (स्वा.)
त्यास तूं धरुनि मत्स्यतनूला ।
आणिशी फिरुनि या जगताला
वेदवित् धरिशिही अभिधेला ॥ ४१ ॥

कविहि कवि तुलाच बोलती (भ.)
सकल बघशि बुद्धि खोल ती ।
मनुज तरि कवित्व पावती
भजति तुज करूनि जे नती ॥ ४२ ॥

लोकाध्यक्ष स्थावरा जंगमाचा (शा.)
स्वामी तूं वा स्वर्ग-पाताल-भूचा ।
ब्रह्मांडें तूं पाहसी एककालें
आज्ञेवीणें पान तूझ्यार न हालें ॥ ४३ ॥

सुराध्यक्ष तूं ईश सर्वां सुरांचा (भु.)
पिता पद्मभूचा[1]हि आजा हराचा ।
दिशांचे पती इंद्रचंद्रादि त्यांचा
पती तूंचि आहेस भोक्ता क्रतूं[2]चा ॥ ४४ ॥

धर्माध्यक्षा सांगशी तूंचि धर्मा (शा.)
वर्ते कैसा आचरी कैंवि कर्मा ।
पाहूनी हें देशि त्या त्या फलाते
संता मोक्षा देशि शिक्षा खलाते ॥ ४५ ॥

कृताकृत प्रभो तुला अशामुळें वदे श्रुती (पं.)
असेच कार्यकारणात्मकाच कीं तुझी स्थिती ।
तुझेंच रूप विश्व हें असेहि जें तुझी कृती
निरंजना[3] निरामया[4] निराकृती[5] त्वदाकृती ॥ ४६ ॥

---

१ ब्रह्मदेवाचा. २ यज्ञाचा. ३ निर्मल ४ निरोगी. ५ निराकार.

**चतुरात्मा** ह्मणती तुला अनंता
परमात्मा, मन, जीवही अहंता ।
असती चार असे तुझेचि आत्मे
वदती सात्वंत[1]शास्त्रिं ते महात्मे ४७ ॥

**चतुर्व्यूह** तूं बा तुझ्या चार मूर्ती (भु.)
परा वासुदेवाख्य मूर्ती अमूर्ती[2] ।
तमोरूप संकर्षणाख्या द्वितीया
तशी घेइ प्रद्युम्न संज्ञा त्रितीया ॥ ४८ ॥

रजोगुणी ती अनिरुद्ध मूर्ती (उ.)
जी निर्मिते हें जग पुण्यकीर्ती ।
संकर्षणाख्या विलयास नेते
प्रद्युम्न रक्षी निजवैभवें तें ॥ ४९ ॥

**चतुर्दंष्ट्र** तूं नारसिंहोग्ररूप (भु.)
भलें घेशि मारावया दैत्यभूप ।
जणू पूर्व संस्कार घेऊनि होशी
चतुर्दंष्ट्र मूर्ती पुन्हा सूर्यवंशी ॥ ५० ॥

**चतुर्भुजा** अगा हरी । गदांबुजों[3], दॆरा[4], अॆरी[5] ॥ (प्र.)
धरूनिया सदा करीं । जगद्विपच्चिते हरीं ॥ ५१ ॥

**भ्राजिष्णू** तूं तेजोराशी । श्यामांगीं ती शोभे खाशी ॥ (वि.)
प्रॆत्यग्रा[6] जी वन्या माला । मेघीं जैशी विद्युन्माला ॥ ५२ ॥

**भोजन** तूं भक्तजनां । सेविति ते त्वद्गुजना ॥ (मा.)
खाउ जसा माणवकीं[7] । तूंहि तसा स्वस्तवकीं[8] ॥ ५३ ॥

**भोक्ता** तू सर्व यज्ञांचा । असती मधुसूदना ॥ (अ.)
भक्तांनीं वाहिलीं पुष्पें । तुझ्या तोषविती मना ॥ ५४ ॥

**सहिष्णु** तूंचि एकटा । लढूनि जिंकिशी भटां[9] ॥ (प्र.)
प्रसन्न होशि त्यावरी । प्रहार जो उरीं करी ॥ ५५ ॥

---

१ पांचरात्रमतांत. २ निराकार ३ गदा व कमल. ४ शंख. ५ चक्र. ६ ताजी. ७ मुलाला. ८ आपल्या भक्ताला. ९ योद्धयांना.

**जगदादिज** संभवसी प्रथमचि तूं कनकरूप अंडांत । (आ.)
शोभसि हिरण्यगर्भा जैसा तो अग्नि होमकुंडांत ॥ ५६ ॥

**अनघ** असासि तूं तरी हरी
जनन तुज न बंधना करी ।
**विजय** तव असे सदा करीं
त्रिभुवन हरि[1]च्या जसा करी[2] ॥ ५७ ॥

**जेता** तूं सकलांचा, सुरासुरांचा, तसाच कालाचा । (आ.)
आश्रय तव जे करिती लेशहि त्यांना नसेचि हालाचा ॥५८॥

**विश्वयोनी** पुन्हां नाम हें वाहसी (स्र.)
विश्ववेषातरीं झांकला राहसी ।
विश्व हेतू असे तूझिया प्रत्यया
विश्व जे चिंतिती व्यक्त होशी तयां ।
विश्व हा आरसा ज्याचिया भीतरीं
पाहती संत ते रूप तूझें हरी ॥ ५९ ॥

**पुनर्वसू** तूं अवतार घेशी (उ.)
पुनःपुन्हां या जगिं पुण्यवंशीं ।
नृसिंह तूं, वामन तूंच होशी
तूं कृष्ण, तूं रामहि धर्मराशी ॥ ६० ॥

**उपेंद्र** तुज वासवानुज[3] म्हणूनि संज्ञा जरी (पृ.
तयास नच ये तुझ्या बलपराक्रमांची सरी ।
बली जित करावया धरिशि कश्यपाचे घरीं
तनू रुचिर ठेंगणी सुर-विपत्तिते जी हरी ॥ ६१ ॥

उपेंद्र, वज्रायुध-बंधु होशी (उ.)
करावया निर्भय निर्जरांशी ।
त्रिपाद भूदानमिषेंच वेशी
त्रिलोक, नेशी बलि भूतलाशीं ॥ ६२ ॥

---

१ सिंहाच्या २ हत्ती. ३ इंद्राचा धाकटा बंधु ४ इंद्र. ५ देवांना.

वामनस्वरूप घेशि । दैत्यराजसत्रिं जाशि ॥ (स.)
भू त्रिपाद मागतांचि । हस्तिं तोयें घालितांचि ॥ ६३ ॥

प्रांशु तूंचि होशि भारि । व्यापिशीच सृष्टि सारि ॥
घालशी बली तलासि । शीर्षिं देशि पावलासि ॥ ६४ ॥

अमोघ कर्म हें तुझें । जयामुळें दुही विझे ॥ (प्र.)
सुरासुरांमधील ती । सुखांत तेहि नांदती ॥ ६५ ॥

शुचि तूं तुला नसे तुला । रचितोस धर्म-सेतुला ॥ (भु. सं.)
शुचि तोहि जो भजे तुला । सकला त्यजूनि हेतुला ॥ ६६ ॥

ऊर्जित तूं वनमाली । वीर्ययशोबलशाली ॥ (चि.)
इंद्र, विधी, शशिमौली । रक्षिसि संकटकालीं ॥ ६७ ॥

अतींद्रची उपेंद्र तूं । वडील, तो शतक्रतू ॥ (प्र.)
त्वदीय शक्ति सात्विकी । वृषायुत-प्रमाणिका ॥ ६८ ॥

संग्रह तुजला ह्मणती, प्रलयीं साठेंच विश्व तव उदरीं । (आ.)
भक्ता सुग्राह्यचि तूं, घेशीही त्यांसि शेवटीं पदरीं ॥ ६९ ॥

सर्गहि तूंची असती, निर्मुनि सृष्टी तिच्यांत तूं वससी ।
पाहति विचार करुनी, सृष्टी त्यांना न, तूंच वा दिससी ॥ ७० ॥

धृतात्माचि तूं राहसी आत्मरूपें (भु.)
नसे देह तूंते परी घेशि रूपें ।
उतावीळ जे भक्त त्वद्दर्शनार्थ
कराया तयां देउनी तें कृतार्थ ॥ ७१ ॥

नियम तुजला नाम, तूंवा नियंता । (चंद्र.)
विविध घटनायुक्त विश्वा अनंता ।
यमहि ह्मणती, तूं वसूनी जनांच्या
हृदिं नियमिसी वृत्ति नाना मनाच्या ॥ ७२ ॥

वेद्य तूंच असती सकलांते (स्वा.)
ज्ञान अन्य नच देइ फलातें ।

१ ठेंगणें　२ पाणी.　३ उच.　४ हे सत्ववंता.　५ दहा हजार इंद्रांच्या बरोबर.

त्यापरी ह्मणुनि बा सुविचारी
चिंतिती तुज तशा श्रुति चारी ॥ ७३ ॥

**वैद्यचि** तूं ह्या संसृतिरोगा (चंप.)
सर्वहि विद्या वेदपुरोगा[1] ।
जाणसि तूंची देवपुरोगा[2]
देउनि योगा घालवि रोगा ॥ ७४ ॥

**सदायोगी** तूंबा नसतिच तुझ्या चित्तिं लहरी (शि.)
सदा आत्मीं दृष्टी तरि निकट सिद्धी तव हरी ।
कदा नाहीं निद्रा, जरि करिशि कर्मा बहुपरी
जरी जन्मा घेशी, अनुभवसि बंधा नच परी ॥ ७५ ॥

**वीरहा** असें त्यास कीर्तिती (का.)
वीर जिंकुनी ज्यास कीर्ति ती ।
प्राप्त होतसे, वीर ते किती !
जे तुझ्या पदीं प्राण टाकिती ॥ ७६ ॥

**माधव** तुजला ह्मणती, मा परविद्या तिचाच तूं स्वामी । (आ.)
मौना, ध्याना, योगा कोणी बघतीच गूढ या नामीं ॥ ७७ ॥

**मधुसम** गोडाचि असती खचिताचि तूं भक्तभृंग-मकरंद ।
मकरंद गजेंद्राही, बा तव मधुनाम कर्णमकरंद[3] ॥ ७८ ॥

**अतींद्रिय** तरी तुला बघति ते (ज.)
नसे विषय अन्य तत्सुमतिते ।
सदा परिसती तुझें चरित ते
तुझे धरिति पाय इंद्रियपते ॥ ७९ ॥

**महामाय** माया तुझी दुस्तरा ती (भु.)
तुला नम्र जे होउनी पावताती ।
तिला तेचि जाती तरूनी सुखानें
असें अर्जुना सांगसी तू मुखानें ॥ ८० ॥

---

१ वेद आदीकरून. २ हे देवश्रेष्ठा. ३ कानाला अमृतासारखें.

महोत्साह तूं दाविशी सर्व कर्मी
प्रजारक्षणीं, सृष्टिसंहारकर्मीं ।
तरी सर्व हें होइ संकल्प-लेशें
नसे स्पर्शिलें तूज संकल्प-लेशें ॥ ८१ ॥

महाबल तुझें हरी किमपि त्यास नाहीं तुला (पृ.)
अवश्य नच निर्मितां जग सहाय्य कांहीं तुला ।
जगत्प्रसवहेतु ती तव अमोघ इच्छा खरी
ह्मणूनि तुजला महाबल अशी सुसंज्ञा हरी ॥ ८२ ॥

महाबुद्धि तूं निर्मिशी बुद्धिसारें (भु.)
सुयंत्रव्यवस्थेनिशी विश्व सारें ।
बघूनी तुझें सृष्टिकौशल्य बा तें
विचारी जनाची मती गुंग होते ॥ ८३ ॥

महावीर्य तूं बा तुझें वीर्य खास
असें पावलें विश्वरूपें विकास ।
महद्ब्रह्म जी आदिशक्ती तिच्याशीं
मिळूनी तयानेंच केलें जगाशीं ॥ ८४ ॥

महाशक्ति तूं विश्वसंकल्पमात्रें
क्षणें निर्मिशी गारुडी जेंवि पात्रें ।
जसें स्वप्नि हा जीव मातंग अश्व
लयाते पुन: तूंचि हें नेशि विश्व ॥ ८५ ॥

महाद्युती सार्थ तवाभिधान (उप.)
सर्व प्रभेचें असती निधान ।
नक्षत्रपंक्ती, रवि, चंद्र, तारे
प्रकाशती तूजमुळेंचि सारे ॥ ८६ ॥

अनिर्देश्यवपु आहेस तूंची (अ. व.)
नसे जगीं रूपवर्णादिसूची ।
कांहीं, ह्मणूनी तुजला समर्थ
दिलें असें हें अभिधान सार्थ ॥ ८७ ॥

आहेचि ऐश्वर्य तुझें अनंत (उप.)
**श्रीमान्** ह्मणूनी तुजला अनंत।
अनन्यसाधारणें नाम आहे
तुझीच ती श्री अचलत्व लाहे ॥ ८८ ॥

**अमेयात्मा** अशा नामा। पावसी तूंचि वामना ॥ (अ.)
सुगंभीर तुझी बुद्धी। अचिंत्या मानवा मना ॥ ८९ ॥

**महाद्रिधृक्** तूं धरिशी धरांते (उ. व)
सलील गोवर्धन-मंदरांते।
करावया गोकुल-पालनाते
सुरासुरांशीसह मंथनाते ॥ ९० ॥

**महेष्वास** मोठें तुझें दिव्यचाप
जयानें रिपूच्या सुटे देहिं कांप।
शरें एक तूं पाडिशी सप्त ताल
नगा भेदिशी भूमितेही विशाल ॥ ९१ ॥

तुझा लागतां एकची तीव्र बाण
किती क्षुब्ध अब्धी पडे दैत्य बाण।
जसा रुद्रकोपानलें पंचबाण
तुझ्या बाणमोक्षें तसे दैत्य जाण ॥ ९२ ॥

पुरा कूर्माकारा धरुनि धरिशी पृष्ठिं धरणी (शि.)
किती शोभा दावी मथनसमयीं अद्रिधरणीं।
तुझी कौर्मी मूर्ती कुसुमतरुवाही शिखरिणी
**महीभर्ता** सज्ञा उचित पैं तू भूमिभरणीं ॥ ९३ ॥

जी निघे जलधितूनि इंदिरा (र.)
ती तुझ्या करि हृदीं स्वमंदिरा।

---

१ धनुष्य. २ बाणानें. ३ ताडाचीं झाडें. ४ पर्वताला. ५ समुद्र ६ मदन. ७ पर्वत धारण करितांना. ८ कासवरूपी ९ (पर्वताच्या) शिखरांनीं युक्त. १० समर्थ ११ पृथ्वीचें रक्षण व धारण करण्यास. १२ दुसऱ्या कोणासही नसणारें १३ सहज, लीलेनें.

तेथुनी नच कधींहि ती ढळे
चंचला ह्मणुनि आळही टळे ।
**श्रीनिवास** तुज नाम हें मिळे ॥ ९४ ॥

तसाच वससीहि तूं सतत साधुहृत्पुष्करीं[1] (पृ.)
तुझ्याविण नसे दुजा विषय सौख्य जो त्या करी ।
अनन्यगतिका तया असिसि तूंचि जीवापरी
**सतांगति** असें तुला ह्मणुनि बोलती बा हरी ॥ ९५ ॥

**अनिरुद्ध** तुला अभिधान असे (तो.)
तुझिया कृतिला प्रतिबंध नसे ।
अवतार तुझे बहु जैं घडले
तव कांहिं न तैं कधिंही अडलें ॥ ९६ ॥

ह्मणूनी सुरांते सदा तोषवीशी (भु.)
हरूनी तयांच्या महाविघ्नराशी ।
सदा संकटीं त्यां सहाय्यासि देशी
**सुरानंद** हें नाम यासाठि घेशी ॥ ९७ ॥

**गोविंद** संज्ञा त्रिविधार्थसूची (इं.)
गोशब्द वाग्धेनु-धरित्रिवाची ।
वाक्पाल गोपालहि भूमिपाल
त्राता त्रिलोकांप्रति तू कृपाळ ॥ ९८ ॥

**गोविदांपति** असें अभिधान (स्वा.)
पावशी सकल वेदनिधान ।
वेद ज्या विदित होय जनांसी
एक तूचि असशी धनि त्यासी ॥ ९९ ॥

**मरीचि** संज्ञाहि तुलाच देती (उ.)
प्रकाश ही एक तुझी विभूती ।
वपू तुझें तैजस[2] दिव्य साचें
निदान चंद्राग्निदिवाकरांचें ॥ १०० ॥

---

१ हृदयकमलांत. २ तेजोमय.

दमन तूं करिशी सकला जगा (द्रु. वि.)
भिवुनि वायु, शशी, रवि तूंजगा।
उगवती, फिरती; तव भीतिनें
सकल वागति लोकहि नीतिनें ॥ १०१ ॥

हंस प्रसिद्ध अभिधा तव आगमांत[1] (व. ति.)
हंसापरी फिरशि सूर्यचि तूं नभांत।
तूं प्राणरूप धरुनी फिरशी उरांत
तैसें धरूनि शिशुरूप[2] महार्णवांतें[3]।
हंसापरी निवडसी जगिं सारभूत
अज्ञान नाशुनि जनां करिशीहि पूत ॥ १०२ ॥

सुपर्ण[4] जो पक्षिगणांत राजा (उ.)
येई तुझ्या जो वहनार्थ काजा।
असेच तो एक तुझी विभूती
ह्मणूनि संज्ञा तुजला प्रभू ती ॥ १०३ ॥

भुजंगोत्तम[5] हाचि पलंग तुजा. (तो.)
न शके निजु त्यावरि कोणि दुजा।
सकला जगता धरि जो स्वशिरीं
तव तोहि असेचि विभूति खरी ॥ १०४ ॥

हिरण्यनाभा, तव नाभिकूपीं (उ.)
उत्पन्न जें पुष्कर विश्वरूपी।
होई, तयाची वरकर्णिका ती
हिरण्मयीही[6] अति चारुकांती ॥ १०५ ॥

सुतपा तुजला वदती सुमती (तो.)
करिशी तप तू वनिं हैमवंतीं[7]।
नर तेंवि नरोत्तम नाम मुनी
अवतार तुझे दिसती अजुनी ॥ १०६ ॥

---

१ वेदांत. २ बालरूप. ३ महासागरांत. ४ गरुड ५ शेष.
६ सोन्याची. ७ हिमालयांतील.

पद्मनाभा तुझी नाभी । पद्मापरि सुरेख ती ॥ ( अ. )
स्वहृत्पद्मीं तुझी मूर्ती । भक्त नित्यहि देखती ॥ १०७ ॥

प्रजापती तूं अमरादिकांचा ( उपें. )
पिता प्रभूही सकला प्रजांचा ।
तयांस जन्मादि विकार होतो
अमृत्यु तूंची तुज काल भीतो ॥ १०८ ॥

धरी तुला जो हृदयांत नित्य
स्मरे तुझें वा शुचि नाम मर्त्य ।
नसे तयालागि कधींच मृत्यू
अमृत्यु तूं माधव मृत्युमृत्यू[६] ॥ १०९ ॥

सर्वदृक् तूंचि बा, सर्वही पाहसी ( स्र. )
सर्वदा सर्वठायीं तसा राहसी ।
सिंहसा शूर तूं, शत्रुमातंगहा[१]
सर्वशक्ती तसा, भक्षिसी सर्ग[२] हा ॥ ११० ॥

स्तंभा फोडोनी सिंहाननमूर्ती येइ ती वीर्यशाली ( सिं. )
कोपाच्या ज्वाळा नेत्रोद्गत ऐसे भासती केश भालीं[३] ।
ठोकी आरोळी, मोडी जणु वाडा, फाडि दैत्यास हातें,
अंत्रांते[४] काढी, ऐशापरि दावी सिंहविस्फूर्जिताते[५] १११ ॥

---

१ शत्रुरूपी हस्तींना मारणारा. २ सृष्टि. ३ कपाळावर. ४ आंतड्यांना.
५ आरोळी, खवळणें, पराक्रम ६ मृत्यूलाच मारून टाकणारा

## द्वितीय शतक समाप्त.

# शतक ३ रें.

ऐसा बा तूं जरि रिपुगजध्वंसनीं दक्ष भारी (मं.)
**संधाता**ही अससि तरि कीं भक्तसंश्लेषकारी।
प्रल्हादाते धरिशि उरिं तूं प्रेमभावें कृपाळा
ताता त्याच्या चिरिशि उरिं त्या वित्तमत्ता नृपाळा ॥ १ ॥

प्राणी जें जें सुकृत अथवा आचरी अन्य कर्म
त्याचें त्याते नियतफळ तें येइ यांतील वर्म।
आहे हें, कीं तव कुशलता येतसे येथ कामीं
संधाता ह्या ह्मणुनि तव बा सार्थता येइ नामीं ॥ २ ॥

संधाता तू कौरवापाडवांचा (शा.)
होशी जेव्हां होउनी दूत साचा।
जाशी अंधा सूपदेशा कराया
पाही भागा पाडुच्या जो हराया ॥ ३ ॥

संधाता तू अससि सकलां जीववर्गी अरूप
मूर्ती नाना दिसति परि त्यामाजिं तू एकरूप।
दोरा जैसा विविध मणिंते साधितो मालिकेंत
तूंही तैसा शिरुनि वससी सर्वभूताशयांत ॥ ४ ॥

**संधिमान्** अससि भक्तजनांसी (स्वा.)
नित्य योग तव तत्सुमनासी।
चंद्रहासमुख भूपवरांसी
संधियुक्त करिसीहि नरासी ॥ ५ ॥

**स्थिर** तुझी स्थिति भक्तहृदीं हरी (द्रु. वि.)
स्थिरहि तूंचि खरा भुवनांतरीं।
मज गमे वरुनी तुज सुंदरी
प्रकृति-चंचल मा स्थिरता धरी ॥ ६ ॥

---

१ आलिंगन, संयोग २ धृतराष्ट्राला ३ अर्जुनाशी ४ लक्ष्मी

**अजेंचि** तूं असती प्रकृती अजा
रमसि तूं तिजसीं परि ही मजा ।
नससि सक्त जसा अज तो दुजा
प्रभव होइ अयोनिजही तुजा ॥ ७ ॥

**दुर्मर्षण** नाम तुला हरी (उपस्थिता.)
साही नच तेज तुझें अरी ।
युद्धीं बघुनीच उपस्थिता
तूंतें, रिपु सोडिति जीविता ॥ ८ ॥

**शास्ता** तूं ह्मणुनि दिसे जगांत नीती (प्र.)
शास्त्राज्ञा तव सुजनां प्रहर्षिणी ती ।
शत्रूंते तवहि असे अतीच भीती
त्वन्मूर्ती हृदिं तदीय सदा उभी ती ॥ ९ ॥

**विश्रुतात्मन्** तुझा देह वैराट तो (स्र.)
सच्चिदानंद जो तोहि बा वाटतो ।
नाममात्रेंचि विख्यात ऐसा मना
कल्पना पूर्ण त्याची कुणा होईना ॥ १० ॥

कोणी तुला पाहति विस्मयानें (उप.)
कोणी तुला वर्णिति विस्मयानें ।
वेदीं तुला ऐकिति विस्मयानें
तरी न जाणे कुणि निश्चयानें ॥ ११ ॥

विश्रुतात्मन् तुला नाम देती मुनी (स्र.)
सुप्रसिद्धा तुझ्या मूर्ति नाना जनीं ।
मूर्ति तेजोमयी योगियां विश्रुता
ज्ञानियां तेंवि ती चिन्मयी संमता ॥ १२ ॥०

**सुरारिहा** तू वधसी सुरांचे (उप.)
रिपू हिरण्याक्षमुरादि साचे ।

---

१ बकरा. २ शेळी ३ विराटस्वरूप किंवा विश्वरूपी देह.

गुरुहि तूं सर्व सुरादिकांचा
येथें जसा उद्धवफाल्गुनांचा ॥ १३ ॥

गुरुतम गुरुंमाजीं श्रेष्ठ तूंची विलोकीं (मा.)
तुजसम नच कोणी ज्ञानवान् या त्रिलोकीं ।
विधिहरसुरनाथा ज्ञान तें तूंचि देशी
वडिलहि सकलांना तूंचि सर्वत्र होशी ॥ १४ ॥

धाम तूं परम सर्व जगाचें (स्वा.)
स्थान तूं सकलकामफलाचें ।
तेज तूं सकलविश्वभासका
तारकेंदुरविरणिप्रकाशका ॥ १५ ॥

सत्य तूं असासि कारण साचें
विश्व जें सदसदात्मक त्याचें ।
कार्यजात न टिके तिंहिकाल
तूंच एक असशी जितकाल ॥ १६ ॥

सत्यपराक्रम असशी, कुंठित नोहे कधींहि तव शक्ती । (आ.)
जेथें तूं जेथें नर तेथें श्री, विजय, भूति खरि नीती ॥१७॥

निमिष नाम तुझें सुचवी जरी (द्रु. वि.)
नयनमीलन, तूं बरसी तरी ।
सकल सृष्टि सदा, तशि झोंप ती
भुजगिं यौगिक घेशि रमापती ॥ १८ ॥

अनिमिषनयना नसे तुला (भ.)
विदित शयन बोधहेतुला ।
असासि सतत जागरूक तूं
धरिशि झषशरीर भास्वत्तूं ॥ १९ ॥

---

१ अर्जुन २ बृहस्पति ३ इंद्र. ४ स्थान (अधिष्ठान) ५ चिज्जडात्मक ६ अर्जुन. ७ वैभव. ८ डोळे झांकणें. ९ योगसंबंधी (झोंप) १० माशाचें शरीर. ११ तेजस्वी. १२ तारे, चंद्र व सूर्य यांचा प्रकाशक.

मला ताजी सतत धरिशी विश्वरूपी स्वकंठीं (मं.)
जेथें पद्में चमकति बहू सूर्यचंद्रादि मोठीं ।
आरक्ता ती सुललित उषा पाकळी पाटलाची
वृक्षोद्‌धाही शिखरिशिखरें श्यामदुर्वांच साचीं ॥ २० ॥

प्रालेयाच्छादित सितें जगद्भाग ते कुंद पांढू
मेर्वादी जे कनकगिरि ते सोनचाफाहि झेंडू ।
नीलाकाश प्रिय तुलसि ती मंजरी व्योमगंगा
**स्रग्वी** तूंतें ह्मणुनि ह्मणती भक्त निर्मुक्तसंगा ॥ २१ ॥

**वाचस्पतिरुदारधी** ह्मणूनी (पु. श्र.)
संज्ञा तुज दिली असे मुनींनी ।
त्वद्धी सकलशास्त्ररत्नखाणी
तूंची वदसि मंजु वेदवाणी ॥ २२ ॥

**अग्रणी** नाम बा शोभतें हें तुला (स्र.)
श्रेष्ठतेला तुझ्या नाहिं कोठें तुला ।
रुद्र दुर्गेसवें ध्यान तूझें करी
रामनामा जपे, माळ घेई करीं ॥ २३ ॥

राजसूयीं तुला अग्र पूजा करी
धर्म भीष्मोक्त ती ऐकुनी वैखरी ।
अग्र देतोस तूं स्थान भक्तांप्रती
अग्रणी नाम हें द्व्यर्थची या रितीं ॥ २४ ॥

**ग्रामणी** नाम तें श्रेष्ठता दावितें ।
ग्राम नेशीहि तूं द्वारकेमाजिं तें ।
भूतसंघासही नेशि कार्याप्रती
सिद्धसंघास तूं नेशि विद्यापती ॥ २५ ॥

ग्राम अयोध्या नेशी, स्वर्गातें भुवन-नंदना रामा । (आ.)
सक्षुद्रजीवजंतू, तरु तृण लतिकाहि नंदनारामा ॥ २६ ॥

---

१ वृक्ष धारण करणारी. २ पर्वत. ३ बर्फांनें आच्छादित. ४ पांढरे. ५ पंचभुतांच्या समुदायास ६ नंदनवनाप्रत. ७ तुझी बुद्धि. ८ पांढरा

**श्रीमान्** सौंदर्यराशी, निरतिशय तुझी कांति, शोभा सुरम्या; ( स्रग्ध )
चंद्रा, पद्मा, वसंता, मदनरतिसही देशि आरामहर्म्यां ।
शोभा तूंची, असे जी अतिच लघु कला तूझिया चारुतेची
श्रीमान्नामा ह्मणोनी ललितगुणगण-स्रग्धरा पात्र तूंची ॥२७॥

**न्यायमूर्ति** अससी हरि खास ( स्वा. )
नाम हेंच इतरां उपहास ।
न्यायशास्त्रहि तुला प्रतिपादी
नाम देति तव जे रत पादीं ॥ २८ ॥

**नेता** जगाचा अससीच साचा ( इं. )
हें चालवी यंत्र तुझीच वाचा ।
नेशी जना कर्मफलाप्रती तूं
नामास ह्या यापरि दोन हेतू ॥ २९ ॥

**समीरण** प्रेरक तूं जगाचा ( उप. )
तूं प्राणची जीवसमुच्चयाचा ।
अनंतशीर्षें तुज यामुळें तें
**सहस्रमूर्धा** अभिधान तूंते ॥ ३० ॥

**विश्वात्मा** तूं वा विश्व हें अंग तूजें ( वै. )
त्याचा आत्मा तूं नाम हें तूज साजे ।
नाना अन्या जो भक्त देवांस सेवी
तत्पूजा पावे तूज ती वैश्वदेवी[1] ॥ ३१ ॥

**सहस्राक्ष** तूं पाहसी हें अजस्रें[2] ( भु. )
अचक्षूच तूं वा त्वदक्षी सहस्र ।
नसे मंदु तूते तरी तूं विचारी
नसोनी पदें तूज तूं कामचारी[3] ॥ ३२ ॥

**सहस्रपात्** पूरुषनाम सूक्तें ( उप. )
ह्मणोनि गाती तुज वेदवेत्ते ।

---

१ सर्व देवांची ( पूजा ). २ सतत. ३ इच्छेस येईल तिकडे जाणारा.

आवर्तन, प्रेरिशि तुं जगाशी
पुनःपुन ही अवतार घेशी ॥ ३३ ॥

निवृत्तात्मा तूं बा, नसति फलहेतू तव कृती (शि.)
जरी गोपींसी तूं रमसि मन पावे न विकृती ।
तुझ्या ठायीं प्रीती निरतिशय ठेवूनिच कृती
कशा होती त्या हें बघुनि जनिं कीजे अनुकृती ॥ ३४ ॥

संवृत करी ती तुज तव माया (कु. वि.)
प्रकट ह्मणूनी नससि जनां या ।
व्रजिं दिससी तूं नरसम लोकां
प्रकटहि होसी नरसम लोकां ॥ ३५ ॥

कठिण तराया बहु तव माया
शरणचि येती तुज यदुराया ।
तरुनि तिला ते सहजचि आर्ती
हरुनि तमाते परहि पहाती ॥ ३६ ॥

संप्रमर्दन ह्मणूनि तुला हरी । (यू.)
नाम ये; तव कृपाचि तमा हरी ।
दुष्ट मर्दिसि जसा करिला हरी
रुद्ररूप तव हें जग संहरी ॥ ३७ ॥

अहःसंवर्तक नाम हरी घेशी (दिंडी)
अहोरात्रीते तूंचि जनां देशी ।
तवाज्ञेनें तो रवि नभांत चाले
अन्य तारेही तेंवि नियतकालें ॥ ३८ ॥

वन्हिरूप धरुनी अमरांते (स्वा.)
नेशि तूं सकलही हवनाते ।
प्राणि जे विविध अन्न भक्षिती
त्वद्बलें पचवि सर्व कुंक्षि ती ॥ ३९ ॥

---

१ मनुष्यासारखा २ अर्जुनासारख्या (लोकांना) ३ परमात्मस्वरूप. ४ सिंह ५ कोठा, पक्वाशय आच्छादित.

अनिल नाम असे पवना हरी (द्रु. वि.)
पवन होय विभूति तुझी खरी ।
सकल जीवगणांतिल जीवित
असासि तूचि सुषुप्ति-विवर्जित ॥ ४० ॥

धरणीधर, शेषशिरीं मही (उ. चि.)
धरिशी, तशि सूकररूपिंही ।
तव पर्वतराज विभूति तो
हिमरत्नगणासहि जो वितो ॥ ४१ ॥

सुप्रसाद, करिशी अनुग्रहा । (रथो.)
त्यासि जो करि तुझ्यासि विग्रहा[1] ।
मारिशी परि अरीस[2] तारिशी
भृत्यसा भजकगेहिं राबसी ॥ ४२ ॥

तव प्रसादा जगिं नाहिं साम्य (उप.)
देशीच तूं भक्तजना स्वसाम्य ।
परीस लोहा करि जातरूप[3]
परंतु त्या दे नच आत्मरूप ॥ ४३ ॥

प्रसन्नात्मा तूं बा, तव मन असे शुद्धचि हरी (शि.
त्यजी रागद्वेषा, विषय जरि तें सर्वहि वरी ।
सदा तुष्टी, शांती, अरिवरिहि दावी बहु दया
क्षमाही विप्रा जो तव करि पदाघात हृदया ॥ ४४॥

यामुळें करिशि विश्वधारण (रथो.)
सुव्यवस्थित, भवाब्धितारण ।
नाम घेशि अज[4] तूं अकारण
विश्वधृक् म्हणुनि हें सकारण ॥ ४५ ॥

सर्वभोग तुजलाचि पावती
लोक तीनहि तुझ्यांत मावती

---

१ युद्ध. २ शत्रूला. ३ सोनें. ४ ज्याच्या उत्पत्तीस दुसरें कारण नाहीं असा.

सर्वभूतगत त्यांस पाळिसी
**विश्वभुक्** ह्मणुनि नाम पावसी ॥ ४६ ॥

**विभु** नामहि तेंवि पावसी ( वि.
विविधाकार धरूनि राहसी ।
विधिपासुनि तों अती तनू[1]
कृमिपर्यंत तुझ्याचि त्या तनू[2] ॥ ४७ ॥

**सत्कर्ता** तूं द्विजमुनिजनां योग्य सत्कार देशी
स्वाचारानें नयपथ नरां श्रेष्ठ तू दाखवीशी ।
भीष्माचार्यां शरशयनिं त्या भेटण्या जाशि जेव्हां
पांचा बंधूसह करिशि त्या वंदना तूंहि तेव्हां ॥ ४८ ॥

दारिद्र्यमूर्ती तव घेइ भेट ( इं. व. )
ठेवूनि पोहे तुजपाशि भेट ।
जेव्हां सुदामा तव पूर्वमित्र
सत्कार त्याचा करिशी विचित्र ॥ ४९ ॥

आलिंगिशी, धूशि पदाब्ज, पाणी
घेशी शिरीं जेंवि पिनाकपाणी[3] ।
घे जान्हवी[4], लाविशि गंध अंगा
तांबूल देशी शयना पलंगा ॥ ५० ॥

व्यंजन[5] चामर वारि करें रमा ( द्रु. वि. )
बघुनि सत्कृति पावति संभ्रमा ।
सकलही युवती, वदती ' अहा
किति तरी सुकृती अवधूत हा '! ॥ ५१ ॥

**सत्कृत** तूंते वदती. पूजिति तूंते शिवादि ते थोर । ( आ. )
भक्तर्चार्पित अल्पहि तूं प्रीतीनें घेशि जेंवि तें बोर ॥ ५२ ॥

जें ती शबरी तुजला देई अथवा कण्याहि ज्या विदुर ।
तूं आप्तकाम; तुजला असती सम कांष्ठ लोष्ठही भिदुर[6]॥५३॥

---

१ सूक्ष्म २ देह. ३ शंकर. ४ गंगा. ५ पंखा. ६ हिरा

करिति तुजला सत्कारातें [1] अजीं हरिणीक्षणा [2] (ह.)
विरहिं तव बा कष्टें नेती युगापरि त्या क्षणा ।
निरतिशय ती प्रीती त्यांची तुझ्यावरि माधवा
भजति तुजला सोडोनीही गृहा, तनुजा, धवा ॥ ५४ ॥

सत्कारातें करिशि फिरुनी तूंहि त्या अंगनांतें (मं.)
शिष्या त्या बा गुरुसम तुझें त्यांशि निःसंग नातें ।
भक्ती त्यांची बघुनि वदसी मी बुडालों ऋणांत
तैशी वृत्ती धरिति नर जे मुक्त होती क्षणांत ॥ ५५ ॥

असत्कृतें [3] असें तुला म्हणितलें असें अर्जुनें (पृ.)
बघूनि तव रूप जो चकित होउनी तें जुनें ।
स्मरे सवगड्यापरी तुजशिं आपुलें वर्तन
त्वदीय शिशुपाल तें करि अतीच निर्भर्त्सन ॥ ५६ ॥

अपमानचि हा तुझा हरी (वि.)
जन तूंतें गणती नरापरी ।
परमेश्वररूप गूढ तें
नच जाणों शकतीचिं मूढ ते ॥ ५७ ॥

सत्राजित अपमाना करि तव घेवोनि तूजवरि आळ । (आ.)
सत्कारातें करिही घालुनि तुज कन्यकाकरीं माळ ॥ ५८ ॥

साधु तूं सकल कार्य नीतिनें (रथो.)
साधिशी सहज आत्मशक्तिनें ।
युद्धिं भारति तुझी रथोद्धता [4]
धूलिकाच हरि शत्रुजीविता ॥ ५९ ॥

जन्हु तूं प्रलयिं सर्व लयासी (स्वा.
नेशि; देशि निजभक्तजनासी ।
मोक्ष; टाकिसि अभक्त खलांसी
या भवांबुधिस तुंच खलासी ॥ ६० ॥

---

१ गोकुळांत. २ हरिणासारखे डोळे ज्यांचे अशा (स्त्रिया) ३ ज्याचा अपमान केला आहे असा. ४ रथवेगानें उधळलेली

**नारायण** नाम शुची[3] तुला (उपस्थि.)
नारा ह्मणतात मुनी जला।
सर्गीं प्रलयीं जलिं राहसी
व्यासी तव भूतगणीं तसी॥ ६१॥

**नर** तुज ह्मणती नर ते; विभूति नर[1] तो तुझी मला स्मरतो। (आ.)
नेशी चराचरांते, भूतगणां जेंवि हर हृतस्मर[2] तो॥ ६२॥

**असंख्येय** तूं सांगतां ये न रूप (भु. प्र.)
असंख्या विभूती तुझ्या विश्वरूप।
जशी तत्त्वसंख्या गणी सांख्यवेत्ता
गणाया शकेना तुला तत्त्ववेत्ता॥ ६३॥

**अप्रमेयात्मा** म्हणुनि तुला संत (दिं.)
देति नामाते; असिसि तूं अनंत।
माप नोहे बा तुझ्या शरीराते
कठिण चिंताया तव स्वरूपाते॥ ६४॥

**विशिष्ट** नामा तुज शिष्ट देती (उप.)
आहेस तूं श्रेष्ठचि सर्व भूतीं।
विचित्रची बा तव सर्व लीला
नसे कुठें पाड तुझ्या कृतीला॥ ६५॥

**शिष्टकृत्** प्रभो नाम हें तुला (का.)
योजिती कवी शास्त्रहेतुला।
वागसी स्वयें बोलसी जसें
द्व्यर्थ नाम हें यापरी असे॥ ६६॥

**शुचि** पुन्हां वदती तुजला यती (द्रु. वि.)
बघुनि ती तव सुंदर आकृती।
रुचिर मूर्ति तुझी तशिही कृती
रुचिरही मति, तूंच आह्मा गती॥ ६७॥

---

१ अर्जुन. २ ज्यानें मदन मारला आहे असा. ३ पवित्र. ४ सृष्टिकालीं

**सिद्धार्थ** ऐसें तुज देति नाम (इं.)
आहेस तूं नित्यचि आप्तकाम ।
न स्पर्शही तो करि तूज कामं ।
तू बा सुखाचें अविनाशि धाम ॥ ६८ ॥

**सिद्धसंकल्प** तूं ईश्वरा शर्मदा (स्र.
आणिशी जें मनीं सिद्ध होई सदा ।
कल्पना बा तुझी सृष्टिरूपा धरी
सांगते यापरि ती तुझी वैखरी ॥ ६९ ॥

**सिद्धिद** तूंची असती तुजविण जगिं या कशात नच सिद्धी । (आ.)
भक्तां प्रसाद करिशी तरि सुलभ तया समस्तही सिद्धी ॥७०॥

**सिद्धिसाधन** तुला ह्मणती हरे (यू.)
सिद्धिरूप तव साधन तें खरें ।
अन्य साधन वरी तुझिया वरें
सिद्धितेः जन भवाब्धि सुखें तरे ॥ ७१ ॥

**वृषाही** असें भक्त तो तूज कीर्ती (भु.)
तुझा होय जन्माह तो पुण्यकीर्ती ।
तिथी अष्टमी, देवकी जन्म देती
अजा; दोघि त्या धन्य यालागि होती ॥ ७२ ॥

वृषशब्द धर्मवाची, अहि शब्दहि सूर्यवाचि तो साचा (आ.)
धर्मरवि तूं उगवतां घालविशी अंधकार लोकांचा ॥ ७३ ॥

अज्ञानतिमिररजनी नाशिसि तूं उगवताचि धर्मार्क
वेदाब्धिजलें निर्मुनि गीतांबुद वर्षिशीहि धर्मार्क ॥ ७४ ॥

**वृषभ,** वर्षिशिं तूं जनकामना (द्रु. वि.)
हरुनि तापहि तोषविशी मना ।
भवदवानलदग्ध जनाप्रती
अमृतवृष्टिद तूं घन सद्गती ॥ ७५ ॥

---

१ पूर्ण झाल्या आहेत इच्छा ज्याच्या. २ मदन. ३ स्थान. ४ मंगलदायक.
५ वाणी. ६ जन्मदिवस. ७ ज्याला जन्म नाहीं त्याला.

**विष्णू** तुला वदति तूं सकला जगातें (व. ति.)
देवोनि आक्रमिशि[1] तीनचि पावलांतें।
एक्या पदें करिशि संवृत भूमिलोका
पाताळ लोक दुसऱ्या तिसऱ्याहि नाका[2] ७६ ॥

**वृषपर्वा**[3] तुज ह्मणती, तुज मिळण्या धर्म हाच सोपानें (आ.)
धर्म तरि तोचि, पार्थी उपदेशिसि जो; तदन्य सोपा न ॥७७॥

**वृषोदर**चि तूं, तुला वृषचि होय पुष्टिप्रद (पृ.)
नसे यजनपूजनाविण तुला दुजें अन्न गा।
तुला यजुनि तोषवी जन, तयासि तूं अन्नद
रवी पिउनिया जला फिरुनि तेंचि देई जगा ॥ ७८ ॥

**वर्धन** नाम यथार्थचि, अल्पहि तूं भक्तदत्त वाढविशी (आ.)
हृदयीं अल्पहि देतां स्थल तुज साम्राज्य तूं तया देशी ॥७९॥

**वर्धमान** असशी भवरूपें (स्वा.)
वाढण्या धरिशि तूं बहुरूपें।
एकची असुनि तूं बहु होशी
नाम हें ह्मणुनि सार्थक घेशी ॥ ८० ॥

**विविक्त** तू बा असशी अलिप्त (उपे.)
अनेकरूपीं वससीच गुप्त।
तुझ्या कृतीला नच कांहिं हेतू
ह्मणोनि घेशी अभिधान हें तूं ॥ ८१ ॥

**श्रुतिसागर** तूंचि बा सुधी (वियो.)
श्रुतिरत्नाप्रति तूं महोदधी।
श्रुति तूजकडेच वाहती
सरिता जेंवि महोदधीप्रती ॥ ८२ ॥

**सुभुज** तुझे अरिदमना। ललित अती सुखद मना ॥ (त्व. ग.)
बघुनि जया अरि पळती। त्यजुनि रणा त्वरितगती ॥८३॥

---

१ आच्छादित. २ स्वर्गाला. ३ धर्म ४ जिना.

दुर्धर तूं बा भक्तजनांते                                        ( रु. )
ध्यान तुझें दुःसाध्य मनाते ।
नंद यशोदा कष्टिति भारी
आवरण्या तूते व्रज-नारी ॥ ८४ ॥

वाग्मी तूं सकल जना प्रहर्षिणी ती                                  ( प्र. )
त्वद्वाणी, मितहिततांहि भाषणीं ती ।
वेदांते वदसि ह्मणूनिही वदान्या
संज्ञा ही दिधलि न योग्य ती त्वदन्या ॥ ८५ ॥

महेंद्र तूं; इंद्र जसा सुरांचा                                     ( उप. )
पतीच तूं सेंद्रसुरासुरांचा ।
त्वदीय ऐश्वर्य अपार मोठें
न ठाव इंद्रा मलयांत कोठें ॥ ८६ ॥

वसुद तूं ह्मणुनीच सुदामया                                      ( द्रु. वि. )
पुरवराप्रति देशि हिरण्मया[1] ।
वसुहि तूं सकलात्मक बा खरा
वसुहुनी[2] प्रिय भक्तवरा हरा ॥ ८७ ॥

नैकरूप असती नरमित्र[3]                                          ( स्वा. )
विश्व हेंचि तव चित्र विचित्र ।
भक्त कल्पिति तुला बहुधा ते
तूं अरूपचि खरा विबुधांते[4] ॥ ८८ ॥

कोणी तुला वर्णिति ब्रह्मनामें                                     ( इं. व. )
निर्वाणशब्दें कुणि कर्मनामें ।
सर्वेश्वराते वदतीं प्रधान
देती तसेंची इतराभिधान ॥ ८९ ॥

कोणी तुझा वर्णिति वर्ण लाल
गोरा, तसा पीतहि मेघनील ।

---

१ सोन्याचें. २ द्रव्य. ३ अर्जुनाचा मित्र. ४ ज्ञात्यांना

कोणी गळां घालिति पुष्पमाला
रुद्राक्ष मुक्तामणि रुंढमाला ॥ ९० ॥

कोणी तुझे वर्णिति हात चार
तोंडें सहा, तीन, पदें हजार ।
कोणी तुला वाहन नंदि देती
हंसाखु[३]सिंहावरि बैसवीती ॥ ९१ ॥

कोणी तुला लाविति सोंड लांब　　( उप. )
रुद्राक्षभस्में करितीच सांब ।
जगत्पित्याते वदतीहि देवी
कपींद्र[४]रूपीं कुणि तूज सेवी ॥ ९२ ॥

कोणी तुला नेसवि पीतवासा
नीलांबरा रक्तहि कृत्तिवासा[५] ।
दिगंबरा, श्वेत कषाय वासा
चिदात्मकातेंहि जगन्निवासा ॥ ९३ ॥

कोणी तुला वाहति बिल्वपत्रा
दूर्वा, शमीही, तुळसी पवित्रा ।
कोणी तुला चर्चिति चंदनानें
सुकुंकुमें[१], भस्मविलेपनानें ॥ ९४ ॥

चिताविभूतीगिरिसिंदुरानें
हारिद्रचूर्णांहि सुकज्जलानें ।
कोणी तुला अर्चिति विष्णुसूक्तें
श्रीसूक्तरुद्रेंहि, अथर्वसूक्तें ॥ ९५ ॥

कोणी तुला अर्पिति मोदकांते
कोणी वड्यांतेहि गुडोदकाते ।
अपूप[२] तैसाचि शिराहि शुद्ध
मांसासवांतेहि कुणी अशुद्ध ॥ ९६ ॥

---

१ चांगल्या केशरानें. २ घारगे. ३ आखु = उंदीर. ४ मारुती. ५ हत्तीचें कातडें

१९९९.

कोणी तुला पर्वतकाननांत
तरूंत, तीर्थी, पितृकाननांत¹।
वैकुंठिं, कैलासिं, हृदीं, नभांत
सूर्याग्निमाजीं, गृहिं पाहतात ॥ ९७ ॥

रुची जनाची जसि ती विचित्र
तैसें तुझें ते करितीच चित्र।
तूंची फला अर्पिशि भक्तमात्रा
सेवोत ते, शंभु, गणेश, मित्रा² ॥ ९८ ॥

**बृहद्रूप** वानूं कसें वामना तें (भु. प्र)
नसे कल्पना आमुच्या ती मनातें।
तुझ्या रोमरंध्रांत ब्रह्मांडमाला
किती खेळती अंत नाहींच त्याला ॥ ९९ ॥

**शिपिविष्ट** ह्मणति तूंते, शिपि यज्ञपशू तयांत तूं वससी (आ.)
शिपिनाम रश्मितेही, सूर्यादिकरश्मिरूप तूं अससी ॥१००॥

**प्रकाशन**चि तूं जगा असासि सर्व तेजोमया पृ.
रवी शशि तुझ्यामुळें करिति दीप्त विश्वासि या।
प्रकाशित करोनिया सहज विश्वरूपाकृती
तुवां समयिं त्या कसा प्लवगकेतु³ केला कृती ॥ १०१ ॥

**ओजस्तेजोद्युतिधर** तुला कीर्तिती पुण्यकीर्ती (मंदा.)
ओज शब्दें अतुलबलता, तेज तें शौर्य कीर्ती।
औज्वल्यातें द्युति ह्मणति. ती ज्ञानवाचीहि आहे
अन्वर्थी बा ह्मणुनि दिसते दीप्त संज्ञा तुला हे ॥ १०२ ॥

**प्रकाशात्मा** तूंते सुकवि वदती ज्ञानतनुला (शिख.)
मुनि प्राणायामें बघति हरि तेजोमय तुला।
अमूर्तीही तूं बा प्रकट अससी भक्तहृदया
तसे ज्ञानी तूंते बघति जगिं सर्वत्र सदया ॥ १०३ ॥

---

१ स्मशानांत २ सूर्य. ३ अर्जुन.

**प्रतापन** श्रीपति नाम तूंते । (उप.)
कल्पांतिं तूं तापवुनी जगातें ।
विद्राविशी हेम जसें मुशींत
तूं सूर्यरूपें हरिशीहि शीतें ॥ १०४ ॥

**ऋद्ध** नामही तूजला कुणी (का.)
देति, पूर्ण तूं नित्य षड्गुणीं ।
ज्ञानशक्तिवीर्यादियुक्तही
कीर्तिमूर्ति तूं, धर्म विग्रही ॥ १०५ ॥

**स्पष्टाक्षर** प्रणवनाम असे प्रसिद्ध (व. ति.)
ओंकार हें मधुर नाम तुझें विशुद्ध ।
एकाग्रता करुनिया मुनिमानसाची
जें निर्गुण प्रकटवी तव मूर्ति साची ॥ १०६ ॥

**मंत्र** तूजला वेदमूर्तिते (का.)
नाम देति बा ज्ञानहेतुतें ।
मनन जो तुझें नित्य चालवी
त्राण त्यास तूं या भवार्णवीं ॥ १०७ ॥

**चंद्रांशु** तूं केवल रामचंद्रा (इं. व.)
छे ! छे ! न येई तव साम्य चंद्रा ।
संसारदावानलदग्ध जीवां
तो तूजसा देइल काय जीवां ॥ १०८ ॥

**भास्करद्युति** असें तुज नाम (स्वा.)
भास्करद्युतिपरी तव धाम ।
भास्करद्युतिस तूंचि निदान
तूंच बा सकलदीप्तिनिधान ॥ १०९ ॥

**अमृतांशूद्भव** तूंते वदती तूं कीं निदान चंद्राचें । (आ.)
अंश मनाचा तव तो, हेतु तया वा मथन समुद्राचें ॥ ११० ॥

---

१ घडी २ मूर्तिमंत. ३ शरण्याला. ४ प्राण ५ सूर्यप्रकाश ६ तेज.

बीज जसें तरु तैसा, लौकिक ह्मण ही खरीच कीं बापा
साक्षात्तव अंशचि जो शशि तो मग कां न हारि संतापा ॥ १११ ॥

**भानु** हें तुजसि बा अभिधान (स्वा.)
तूंच कीं भुवनभासेनिदान ।
दीप्तिनें प्रकट विश्व तुझ्या हें
दीप्तिनें तव तया नर पाहे ॥ ११२ ॥

**शशबिंदू** तुज वदती, ओषधि पोषीशि सोमरूपानें (आ.)
भक्त चकोर, शशी तूं ल्हृष्टचि ते तव पदाब्ज-मधुपानें ॥ ११३

**सुरेश्वरचि** तूं महेश्वर-गुरू (ज. ग.)
सुरांत वरें तूं तयां सुरतरूं ।
सुरेंद्र तव तो विभूतिच खरी
सदा करिशि त्या सहाय्य समरीं ॥ ११४ ॥

**औषध** भवरोगातें असशी तूं बा स्वभक्तभयभंगा । (आ.)
अज्ञानतिमिरभानू किंवा तूं सिंह मोह-मातंगा ॥ ११५ ॥

**जगत सेतू** तूंते वदती, तूं कीं भवार्णवा सेतू
धर्मस्थापन करुनी होशी लोकांसि मोक्षपदहेतू ॥ ११६ ॥

**सत्यधर्मपराक्रम** प्रभो हें (स. ध.)
नाम देउनि भक्त तूज वाहे ।
ज्ञान वीर्यहि शक्ति तेज धर्म
अक्षयी तव ईश सर्व धर्म ॥ ११७ ॥

**भूतभव्यभवन्नाथ** वदती तूज पंडित (अनु.)
ऐश्वर्य तव तें राहे कालत्रयिं अखंडित ॥ ११८ ॥

**पवन** नाम तुझेंचि मनोजव (द्रु. वि.)
पवन वाहतसेहि बळें तव ।
तव विभूतिहि तो ह्मणुनी तुला
कथिलि ही अभिधा गति-हेतुला ॥ ११९ ॥

---

१ जग प्रकाशित होण्यास मूळकारण. २ शंकराचा गुरू. ३ श्रेष्ठ ४ कल्पतरु. ५ भ्रमररूप हत्तीला.

**पावन** करिशी जन हे हरुनी त्यांच्या अपार पापांते।  ( आ. )
शरण जयीं तुज येती, स्मृतिमात्रें हरिसि भक्ततापांते ॥ १२०

**अनल** तूं, न पुरे स्तुति ती तुला  ( द्रु. वि. )
करिति जी जन मंगलहेतुला।
ह्मणुनि सेविसि आजवरी तिला
अनल इंधन तेंवि, न तृप्तिला ॥ १२१ ॥

अनल, जाळिसि तूं दुरितेंधना
अमृतरूपहि देशि निजा धना।
अनल होय विभूति तुझी खरी
हवन देवगणांप्रति जी हरी ॥ १२२ ॥

**कामहा** तुला नाम शोभतें। भृत्यता तुझी ज्यास लाभते॥ ( का. )
सोडितीच ते वासनामदा। पावुनी तुला सर्वकामदा ॥ १२३॥

**कामकृत्** तरी तूंच माधवा। भक्त मागती देशि तेधवां ॥
काम जो पुरा जाळिला हरें। जन्म त्या तुवां दीधला हरे ॥ १२४॥

पादपद्म जे सेविती तुजें। नावडे तया कांहिंही दुजें ॥
वाढवींशि तूं भक्ति ती सदा। स्त्रीसुताहि ते सोडिती सदा ॥ १२५॥

**कांत** तू किती शांत सुंदरा। भूलली तुला फार इंदिरा ॥
पूर्वरूप तें पावण्या स्मरें। आश्रिलें तुला हेंचि बा खरें ॥ १२६॥

**काम** नामही प्रेशि तूं हरी। कामना तुझी भक्त तो करी ॥
चार अर्थही साधण्यास तो। प्रेम ठेवुनी तूज सेवितो ॥ १२७॥

**कामप्रद** असशी तूं, पुरविशि भक्ता समस्त कामांते।  ( आ. )
मोक्षप्रदही तैसा ज्ञान्यांते बा निरस्तकामांते ॥ १२८ ॥

**प्रभु** तूं प्रभवासि बहुधां मायाधृत विविध दिव्य रूपानें।
हीच तुझी प्रभुता कीं, वागुनि भवीं राहसी स्वरूपानें ॥ १२९॥

---

१ पापरूपी इंधन किंवा जळण जें त्याला. २ स्वकीय भक्तांना ३ दास्य (सेवा) ४ मदनानें ५ मायेनें धारण केलेल्या. ६ संसारात. ७ आत्मस्वरूपी ८ घराप्रत. ९ अग्नि

**युगादिकृत्** तूं करिसी युगाचा ( उप. )
आरंभ; मन्वंतरहेतु साचा।
आहेस; तूं चालविशीहि चक्रा
कालात्मका या, धृतशंखचक्रा ॥ १२० ॥

तृतीय शतक समाप्त.

---

# शतक ४ थें.

घडे नाश कल्पांतिं जेंव्हां जगाचा ( भु. प्र. )
तया तूं पुन्हां जन्म देशीच साचा।
यथापूर्व ही सृष्टि घेई स्वरूपा
**युगावर्त** संज्ञाहि तूं विश्वरूपा ॥ १ ॥

**नैकमाय** असती यदुराया ( स्वा. )
दाविशी विविध या जगिं माया।
लागला नच कुणा तव थांग
वर्णुनी तुज शिणे श्रुति सांग[1] ॥ २ ॥

**महाशन** श्रीपति तूज नाम ( उप. )
कल्पांतिं तूं भक्षिसि हें त्रिधाम[2]।
**अदृश्य** तूं या सकलेंद्रियांते
अग्राह्य बुद्धीसहि तूं मनाते ॥ ३ ॥

**व्यक्तरूप**ही नाम तूजला ( का. )
सृष्टिरूपिं तूं दृश्य या जगा।

---

१ अंगासहित श्रुति = षडंगवेद. २ तीन लोक.

योगियास तूं व्यक्तची सदा
ज्ञानरूप तूं भक्तकामदा ॥ ४ ॥

**सहस्रजित्** तूं रणरंगधीरा (उप.)
सहस्र तूं जिंकिशि युद्धिं वीरां ।
**अनंतजित्** तुज असेंहि नाम
भक्तार्थ तूं जिंकिशि मोक्षधाम ।
अनंत तूं जिंकिशि युद्धकाम ॥ ५ ॥

**इष्ट** तू सकललोकनंदना (स्वा.)
सर्वभूतकृतपादवंदना ।
प्रेमपात्र अति तूं स्वजनाते
तो तुझ्या करि सदा भजनाते ॥ ६ ॥

**विशिष्ट** तूंवा असती जगांत (उप.)
होई सदा नष्टचि दृश्यजात ।
आत्मा जरी वा तव अंश खास
स्वामी तया तू तव तोहि दास ॥ ७ ॥

अविशिष्टहि तू असती, स्वरूप तव तें समान सर्वत्र (आ.)
सम तू सर्वांभूतीं नोहे तूते अमित्र वा मित्र ॥ ८ ॥

देती 'विशेष' संज्ञा पंडित भूम्यादि पंचभूतांते
वर्णाया रूपादिक तत्सम नसती विशेषणें तूंते ॥ ९ ॥

**शिष्टेष्ट** तू वा म्हणुनीच देवा (उप.)
तुझी महात्मे करितीच सेवा ।
तुझ्यावरी प्रेम अती तयांचें
तयांवरी प्रेम तुझेंहि साचें ॥ १० ॥

**शिखंडी** किती शोभसी गोपवेषीं (भु. प्र.)
पिसें बर्हिचीं वाहसी जैं स्वशीर्षी ।
जसा मेघ तो शोभतो इंद्रचापें
महामेघ तूं तस लोकां त्रितापें ॥ ११ ॥

---

१ योद्धे. २ आपल्या भक्ताला. ३ इंद्रधनुष्याच्या योगानें.

नहुष तुज असे हें नाम बा मोहहेतू (मालिनी.)
करिशि सतत मायाबद्ध कीं लोक हे तूं ।
वृषहि असासि तू जो वर्षिशी सर्व कामा
निजजनमनिच्या बा सर्वदा पुर्णकामा ॥ १२ ॥

क्रोधहा पावशी नाम बापा हरी (स्र.)
रम्य मूर्ती तुझी भक्तकोपा हरी ।
काश्यपप्रार्थना जेंवि ती संहरी
क्रोध तूझाहि जो क्षत्रिया संहरी ॥ १३ ॥

क्रोधकृत् तूं तरी नारसिंहा किती
भार्गवा त्वत्कुठारीपुढें वा किती ।
कोटि कोटी महाक्षत्रवीराग्रणी
यच्छिरीं रुंद्रसी युद्धभू स्रग्विणी ॥ १४ ॥

कर्ता तूं जो रणिं उडविशी त्या सहस्रार्जुनाचे (मंदाक्रांता.)
बाहू ज्यांहीं क्षुधित रणभू हर्ष पावोनि नाचे ।
कर्ता तूं बा, भुवनगण हें कर्म तूझेंचि साचें
ऐसा वाटे द्विविध तव या अर्थ नामांत सांचे ॥ १५ ॥

विश्वबाहु तुजला श्रुति बाहे (स्वा.)
कर्तृता बघुनिया तव बा हे ।
सर्व ठायिं असती तव बाहू
वीर्य कोणि न शके तव साहूं ॥ १६ ॥

महीधर तरी खरा असासि तूच विश्वंभरा (पृथ्वी.)
नियलित कसा अही करु शकेल विश्वंभरा ।
रवी करि॰तशी असें ह्मणति ते जरी पडित
तदतरिं तुझी तनू वसतसे प्रभामडित ॥ १७ ॥

अच्युत च्युति कधीं नसे तुला (रथो.)
शाश्वता, सकलविश्वहेतुला ।

---

१ अज्ञान उत्पन्न करणारा २ हे परशुरामा ! ३ ज्याच्या मुडक्यांनी. ४ शकराप्रमाणें ५ रणभूमि. ६ माला धारण करणारी. ७ पृथ्वी

अव्यया, सकलशक्तिचालका
अद्वया, सकलभीतिहारका ॥ १८ ॥

जे तुज अनन्यभक्ती पावति जन त्या कधीं नसे भ्रंश (आ.)
तुजपासुनि ह्मणुनि तुला अच्युत संज्ञा; तुझाचि ते अंश ॥१९॥

**प्रथितचि** तूं बा या तिहिं लोकीं (अन.)
गुण तव व्रेदीं गातिहि लोकीं ।
वरुण, रवी वन्ही, वसु, मित्र
वदति तुला या नामिं विचित्र ॥ २० ॥

**प्राणचि** तूं या सर्व जगा (मणि.)
तूंच तयाचा चालक गा ।
**प्राणद** तूं त्या देवगणा
मंथनकालीं श्रीरमणा ॥ २१ ॥

**वासवानुज** असें तुला हरी (रथो.)
देति नाम जयिं कश्यपोदरीं ।
घेशि जन्म धृतवामनाकृती
[३]वासवा करिशि वामना कृती ॥ २२ ॥

**अपांनिधि** असें तुला ह्मणति बा दयासागरा (पृथ्वी.)
विभूति वदसी हरी निजमुखें तया सागरा ।
जला प्रलयिं सर्गिंही असासि तूंच आधार गा
समुद्रमथनीं जसा कमठरूपिं त्या बा नगा ॥ २३ ॥

**अधिष्ठान**, तूं या जगाचें निधान (भु.)
नसे हेतु त्याले अशब्द प्रधान ।
असे सृष्टि ही तूजठायींच गोप
नभी वायुसी; स्वर्ण तूं तीहि गोप ॥ २४ ॥

**अप्रमत्त** अससी निजकर्मीं (स्वा.)
देशि त्यास फल जे जन कर्मी ।

---

१ कूर्मरूपानें. २ पर्वताला (मदर). ३ इंद्राला ४ कृतार्थ. ५ ठेंगणी आकृती धारण केलेला.

सावधान करिशी श्रवणातें
भक्त गाति तव जें स्तवनातें ॥ २५ ॥

सावधान फिरशी वनिं रामा
सांडिशीहि सुजनावनिं रामा ।
ब्रीद हेंच तव बा अभिरामा
रावणादि खल नेशि विरामा ॥ २६ ॥

**प्रतिष्ठित** असें तुला ह्मणति बा निरालंबना (पृ.)
स्ववीर्यचि धरी तुला अढळ तूं सदालंबना ।
प्रतिष्ठित असे तुझ्यावरिच ही त्रिलोकी तरी
तुझाच महिमा असे श्रुतिंतही पुराणांतरीं ॥ २७ ॥

**स्कंद** सुरांचा सैन्यपती । अंश तुझा तो विश्वपती ॥ (मणि.
शक्ति तुझी रक्षोगण ती । शोषि तया नाहीं गणती ॥२८॥

**स्कंदधर** असासि तूं कीं धर्मपथ स्कंद त्यास आधार (आ.
अनिलांतेही तैसा, काढिलि श्रुतिधेनुची तुंवा धार ॥ २९ ॥

**धुर्य** तूं त्रयजगध्दुरंधरा (रथो.)
विश्वभार धरिशी गदाधरा ।
शेष तो शिरिं जसा धरी धरा
श्रीकरांबुजगृहीतकंधरा ॥ ३० ॥

**वरद** ! अर्पिशि भक्तवरा वरा (द्रु. वि.)
वरद त्वत्सम नाहिं रमावरा ।
तव समान सुता सुतपा पुरा
वरि; तयाहि वरा करिशी पुरा ॥ ३१ ॥

सुतपा वर साधण्या जनीं
वसुदेवाकृति घेइ या जनीं ।
स्वसमात्मज द्यावया तया
अवतारा धरिशी जगांत या ॥ ३२ ॥

---

१ स्त्री. २ या शब्दांत श्लेष आहे; पहिला अर्थ वायूला व दुसरा अर्थ इला ह्मणजे निद्रा ती नाहीं ज्यांना अशा योग्यांना.

**वायुवाहन** ! बलें तव वाहे (स्वा.)
वायु; तो गरुडही तुज वाहे ।
वायुसा चपल जो बहु आहे
वायु नाम ह्मणुनी खग[1] लाहे ॥ ३३ ॥

**वासुदेव** वसुदेवकुमार
देवकीतयन जो सुकुमार ।
आठवा, हरि महीगत भार
आठवा तवहि जो अवतार ॥ ३४ ॥

**बृहद्भानु** तूं सर्वतेजोनिधान । (भु.)
त्वदेकांशु तो विश्वतेजोनिदान ।
सहस्रावधी भानु त्यांतून येती
स्फुलिंगा[2] जशा अग्निपासूनि जाती ॥ ३५ ॥

**आदिदेव** ह्मणुनी तुज नाम (स्वा.)
आदिहेतु सकलद्युतिधाम ।
खेळसी, मुदित तूं जयशाली
सार्थ नाम तुज हें वनमाळी ॥ ३६ ॥

**पुरंदर**, मयासुरत्रिपुर तूं स्वयें जाळिशी (पृ.)
शरीं शिरुनि शंभुच्या; वृषवपू[3] रथा पाळिशी ।
तसें पिउनि टाकिशी अमृत दैत्यमृत्युंजय[4]
सहाय तव घेउनी त्रिपुर जिंकि मृत्युंजय[6] ॥ ३७ ॥

**अशोक** करिशी अशापरि समस्त देवादिकां
स्वभक्तनृजिना[5] त्वरें हारिशी आधिदैवादिका ।
अशोक असशी स्वयें मुदित-मानसा माधवा
मला तव घडो सदा मनन, जेंवि कायोधवा ॥ ३८ ॥

**तारण** तुजला ह्मणती, कारण तूं हा भवाब्धितरण्यास । (आ.)
तारहि यास्तव वदती, भजती तुज सर्व दुःख हरण्यास ॥ ३९ ॥

---

१ पक्षी २ ठिणग्या ३ बैलाचें रूप धारण केलें आहे ज्यानें असा. ४ दैत्यांना अमर करणारें ५ प्रल्हादाला. ६ शंकर.

शूरत्व मूर्तिमंताचि दावियलें विविध जन्म घेवोनी ।
कनककशिपु, अर्जुनही, रावण शिशुपाल, कंस मारोनी ॥४०॥

शौरी शूरकुलमणी, वसुदेवसुता तुला असो नमन ।
न मनन तव जे करिती, तृणसम नर ते तया असोन मन ॥४१॥

जनेश्वरचि तूं जरी विजनिं दंडकीं हिंडसी । (पृ.)
जनां शरण एकला; अनय जो तया दंडिसी ।
वनीं, नगरिं वा खरा नृपति तूं अम्हां राघवा
तपोधन तुला असें वदुनि वंदिती तेधवा ॥ ४२ ॥

अनुकूलचि तूं जरी जनां (वियो.)
सकलांते असमी जनार्दना ।
नच विस्मय त्यांत भासतो
सकलात्मन्, तव जीव भासे तो ॥ ४३ ॥

अनुकूल व्रजांगनांस तू
सकलां भाससि, जेविं भास्वतू ।
दिसतो सकलां समोरची
वेन तूं त्या जणु मत्त मोरची ॥ ४४ ॥

अनुकूल तुला करी हरी
पदपद्मा तव भक्त जो धरी ।
प्रणयात्मक रज्जुनें तुला
करितो बद्धचि मोक्षहेतुला ॥ ४५ ॥

शतावर्त तूं घेशि जन्मां अनेकां (भु.)
खला मारण्या तारण्या साधुलोकां ।
जगीं वर्तती लोक जेव्हां अधर्मी
कराया प्रतिष्ठा तयाची स्वधर्मी ॥ ४६ ॥

पद्मी तुझ्या हस्तिं असे सुपद्म (इं. व.)
लीलार्थ लक्ष्मीद्युतिकांति-सद्म ।

---

१ छाया किंवा प्रतिबिंब. २ गोकुळातील स्त्रियांना. ३ सूर्य. ४ मेघ. ५ भक्तिरूप. ६ शोभा, तेज इत्यादिकांचें स्थान.

त्रैलोक्यपद्मा धरिशीहि हस्तीं
शुंडाग्रिं जैसा नलिनीसें हस्ती ॥ ४७ ॥

**पद्मनिभेक्षण** तूंते जरि म्हणती सुकवि दिव्यनयनातें ( आ. )
उपमा खद्योताची द्यावी कां न तरि लोकनयनातें ॥ ४८ ॥

**पद्मनाभ** तव नाभिंत राहे ( स्वा. )
विश्वपद्म, म्हणुनी तुजला हें ।
नाम देउनि पुनः कवि बाहे
अर्थ हाचि तिसरा दिसताहे ॥ ४९ ॥

**अरविंदाक्ष** प्रभु तव नेत्रा ( अर. )
बघुनी लाजे कमल पवित्रा ।
भवतप्तातें सदय कटाक्षें
निववीशी तूं बघुनि निजाक्षें ॥ ५० ॥

**पद्मगर्भ** अभिधा तव खासी ( स्वा. )
तूं सदा मुनिहृदंबुजवासी ।
विश्वपद्म तव गर्भाचि तात
न्यस्त जो प्रकृतिच्या उदरांत ॥ ५१ ॥

**शरीरभृत्** तूं रणरंगधीरा ( उपं. व. )
युगीं युगीं तूं धरिशी शरीरा ।
करावया सज्जनपालनातें
हरावयाही अवनीभरातें ॥ ५२ ॥

शरीरही पोषिशि तूंच बापा ( उप. )
घेवोनि अन्नादिमय स्वरूपा ।
तूं अन्न, तूं प्राणहि, तूंच वारी
तूं जाठराग्नी रसरक्तकारी ॥ ५३ ॥

**महर्द्धि** तूं हे मधुकैटभारी
ऐश्वर्य तें वा तव थोर भारी ।

---

१ सोंडेच्या टोंकावर २ कमलाच्या वेलीस. ३ काजव्यांची ४ सूर्याला.
५ ठेवलेला. ६ पाणी

जगीं अती श्रेष्ठ तुझ्या विभूती
ह्मणूनि संज्ञा तुजला प्रभू ती ॥ ५४ ॥

**ऋद्ध** तूज वदती कवि वृद्ध (स्वा.)
विश्वरूपिं अससी अति वृद्ध।
तूं समृद्ध परिपूर्णहि पुष्ट
ऋद्ध ते करिति जे तुज तुष्ट ॥ ५५ ॥

**वृद्धात्मा** अससी तूं, जरि जगिं घेशी नवा नवा देह (आ.)
होशी वामन तूची, रामहि तू, कृष्ण तूं न संदेह ॥ ५६ ॥

प्रपितामह जगताचा, तरि गोकुलिं घेशि सोंग बालाचें
क्रीडा गोपीसंगें कामहि करिशीच धेनुपालाचें ॥ ५७ ॥

**महाक्ष** तूं बा वसुदेव-पुत्रा (उप.)
प्रफुल्ल-राजीव-विशाल-नेत्रा
मोठा तुझा तो रथ पार्थ-मित्रा
सर्वेंद्रियेंही पटु[1] चारुगात्रा ॥ ५८ ॥

**गरुडध्वज** अससी तूं शोभे ध्वजिं तव गरूड खगेराज[2]। (आ.)
तव मित्राच्या जैसा वीरमणी रामदूत कपिराज ॥ ५९ ॥

**अतुल** अससि तूं बा कोण तूतें समान (मा.)
निरुपम तव शक्ती तूंचि विश्वा निदान।
निरतिशय तुझी ती कांति सौंदर्यधाम
अमितचि तव वीर्य ज्ञान चातुर्य राम ॥ ६० ॥

खलजना करिशी खरशासना (द्रु. वि.)
अनुसरे नच जो अनुशासना।
विलसतेहि शरीरिं तुझी कला
**शरभ** नाम ह्मणूनि दिलें तुला ॥ ६१ ॥

शरभरूप[3] धरूनि सुदारुण
करुनिया फलपर्णविदारण।

---

१ समर्थ. २ पक्ष्यांचा राजा. ३ टोळांचे रूप.

अतिच होशि जना भयकारण
करिशि तूंचि तयासि निवारण ॥ ६२ ॥

रक्तवर्ण करिशी तरु सारे
पाडिशीहि झुडपें तनुभारें
शोभती सकल जेंवि अशोक
लोकमात्र करिती बहु शोक ॥ ६३ ॥

प्रिय खचित तुला बा पत्रपुष्पादि भारी (मा)
जनिं तुज न मिळे तें भक्तिलोपें मुरारी ।
म्हणुनि मज गमे जी वाढली त्वद्बुभुक्षा
करिशि शरभरूपें तृप्त भक्षूनि वृक्षा ॥ ६४ ॥

प्रमाद वडतां जना करिति दंड जैं सज्जन (पृ.)
असे खचितची असज्जनहितार्थ तें वर्तन ।
विनाश करण्या तुझी मग प्रवृत्ति कैसी हरे
अशा समयिं संभवे करिशिही अरीचें बरें ॥ ६५ ॥

**भीम** तूं, तव भयें रवि चाले (स्वा.)
इंद्र वर्षि, पवमानहि हाले ।
उष्णता अनल दे यम धांवे
भक्तवर्गभवभी भय पावे ॥ ६६ ॥

**समयज्ञ**चि जाणसि तूं सकला (तो.)
नियमां भुवनांतिल या अखिला ।
जगदुद्भव रक्षण भक्षण हीं
नियमें करिशी, न चुके क्षणही ॥ ६७ ॥

समदृष्टि सर्व भूतीं, अर्चन हें तव तया न सम यज्ञ (आ.)
तुजला प्रियतम हाची, देती अभिधा ह्मणूनि समयज्ञ ॥६८

तूं देश, काल, द्रव्यें, मंत्रहि, तंत्रहि, कृशानु, तूंच क्रतू
यजमान, देवताही, धर्महि तूंची तसाच ऋत्विज तूं ॥ ६९॥

---

१ वारा. २ अग्नि. ३ भक्तजनांची संसाराची भीति ४ आपल्या अंगाच्या भारानें.

यज्ञोपकरण जेथें सकलहि यापरि समान त्वद्रूप
तो यज्ञचि ब्रह्मरूप प्रिय तुज, नामहि ह्मणूनि अनुरूप ॥७०॥

हविर्हरि असें तुला वदति सर्वयज्ञाशना (पृ.)
हरी, हविहि तूंच वा हरिशि पाप भीनाशना ।
तया करिशि शुद्ध, जो भजक कृष्णवर्त्मा[1], जना
धरी सहज त्या करी दहन कृष्णवर्त्मा[2] जना ॥ ७१ ॥

सर्वलक्षणलक्षण्य वदती तुज पंडित । (अनु.)
प्रमाणानीं तुला नाना जाणती गुणमंडित ॥ ७२ ॥

लक्षणें अवघीं तूते शोभतीं गुणसागरा ।
धर्मव्यतिक्रमा भीशी नच तू शिवसा गरीं[3] ॥ ७३ ॥

महावीर तू शूर, रक्षोनिहंता[13] (भु.)
यतात्मा[4], वशी[5], वश्य, वाग्मी[6] नियंता ।
महाबुद्धि, सुग्रीव[7], आजानुबाहू
महोरस्कही[14], गूढजत्रू[8], सुबाहू ॥ ७४ ॥

विशालाक्ष तू पीनवक्ष, प्रतापी
यशस्वी, शुची, शांतही शत्रुतापी ।
महेष्वास[9], सौंदर्यराशी, समांग,
धनुर्वेदिं निष्णात वेदींहि सांग ॥ ७५ ॥

प्रजारक्षणीं दक्ष, सर्वत्र जैत्रं[10]
जगन्मित्र तूं चित्रयोधी[11], पवित्र ।
क्षमा-धैर्य-गांभीर्यशाली, उदार
जनाराधनीं त्यक्तसौख्यार्थदार[12] ॥ ७६ ॥

---

१ कुमार्गगामी. २ अग्नि. ३ विषाला ४ मनोनिग्रही. ५ वश आहेत इंद्रियें ज्याचीं असा ६ चांगलें भाषण करणारा ७ ज्याची मान चांगली आहे असा. ८ छातीचें हाड मांसाच्छादित आहे असा. ९ ज्याचें धनुष्य मोठें असा. १० विजयी. ११ नानाप्रकारांनीं युद्ध करणारा. १२ सुख, द्रव्य व स्त्री यांचा त्याग केलेला १३ राक्षसांना मारणारा १४ रुंद छातीचा.

अशा सर्व तूं लक्षणांनीं वरिष्ठ
ह्मणूनी चरित्रा करी ब्रह्मनिष्ठ ।
मुनी वाल्मिकी नारदाच्या नियोगें
भवा पार जाती जयाचेनि योगें ॥ ७७ ॥

माती भक्षिसि, विश्व दाविशि मुखीं मातेस मायापती (शा.)
लोणी चोरुनि दामबद्ध असतां देशीच यक्षा गती ।
गोपींशीं करिशी विलास, गिळशी दावानला श्रीपती
भूभारा हरिशीहि वर्षिशि जगीं सद्धर्मवृष्टीप्रती ॥ ७८ ॥

होशी अर्जुनसारथी अधन तो अत्यादरें पूजिशी
पूजा राजमखीं समस्त विबुधांमाजीहि घेशी तशी ।
ऐशीं हीं दिसतीं विचित्र अवधीं तव लक्षणें केशवा
जाणूं काय शके त्वदीय चरिता भूतेश[1], लोकेश[2] वा ॥ ७९ ॥

**लक्ष्मीवान्**[3] तूं असासि म्हणुनी तूज लक्ष्मी वरी ती (मं.)
सोडोनी त्या अभिलषुनिया जे तपा आचरीती ।
राहे ठायीं तव सतत ती चंचलाही स्वभावें
नामा येते ह्मणुनि तव बा सार्थता या द्विभावें[4] ॥ ८० ॥

**समितिंजय** तूंते बा भवसंमरीं[5] विजय नित्य हा नियम (आ.)
योगेश्वर जेथें तूं तेथें कैसी करील हानि यम ॥ ८१ ॥

**विक्षर** तुजला म्हणती, क्षर ह्मणजे नाश तो तुला नाहीं
**रोहित** तूं कमलद्युति, अथवा त्या धरिशि मीनतनुलाही[6] ॥ ८२ ॥

**मार्ग**हि मोक्षाचा तूं शोधिति तुज साधु संत भक्तीनें
**हेतु** जगाचा तूंची रचिशी तें तूं अचिंत्य शक्तीनें ॥ ८३ ॥

**दामोदर** दाव्यांनीं उदरीं तुजला तुझ्याच मदतीनें
बांधि यशोदा, पूर्वीं लाविलि बहु तीं उगीच गुंदतीनें[7] ॥ ८४ ॥

---

१ शंकर. २ ब्रह्मदेव. ३ श्री व सौंदर्य यानीं युक्त ४ दोन प्रकारच्या अर्थामुळें. ५ संसाररूपी युद्धांत किंवा शंकराशी जें युद्ध त्यांत. ६ मत्स्याचा देह ७ जिचे दांत सुंदर अशी.

लोकार्थ दामनामीं उदरीं तूं धरिशि सर्व लोकांते
दमयुत उदारधी जे, सुलभ अशा तू निगर्व लोकांते ॥८५॥

**सह** तुज ह्मणती सज्जन; तेजोबल, वीर्य, शौर्य अमित तव
तूं सहनशीलहि तसा, पाहे तव सत्त्व विघ्र तो कितव ॥८६॥

**महीधर** श्रीधर तूज नाम (उप.)
तूंते महात्मे करिती प्रणाम
हरूनि भारा धरिशी धरेते
तुझी विभूतीहि महागिरी ते ॥ ८७ ॥

**महाभाग** तूं भाग्यशाली मुरारी (उपें.)
तुझी थोरवी फार गाई पुरारी ।
जरी तूं महायोगिही ब्रह्मचारी
हजारो तुला सेविती दिव्य नारी ।
स्वयें चामरा रुक्मिणी तूज वारी ॥ ८८ ॥

**वेगवान्** असति तू मनोजव , (रथो.)
शीघ्र येशि करिताचि सस्तव ।
भक्ततापहरणीं सुदक्षता
दाविली खरि गजेंद्र रक्षितां ॥ ८९ ॥

**अमिताशन** तुज वदती, भक्षिसि जग हें समस्त कल्पांतीं (आ.)
उत्पादिशी पुन्हां तें टाकिशि जणु त्या करूनिया वांती ॥९०

**उद्भव** यास्तव वदती, उद्भव पावे तुझ्यांतुनी सृष्टी
. जग हेंचि एक जाळें विस्तृत करिशी तयास तूं कोष्टी ॥९१॥

**क्षोभण**ही तुज वदती, सर्गारंभीं स्वयेंच तूं करिशी
क्षोभण परमाणूचें, प्रकृती जेव्हां असेच सुप्त जशी ॥ ९२ ॥

**देव** हें प्रथित नाम बा तव (रथो.)
धातु त्यांत विविधार्थि तो दिव ।

---

१ कपटी. २ शंकर. ३ मनाप्रमाणें गति ज्याची असा ४ ' लोक ' असा अर्थ.

लोक सर्व करीती तव स्तव
खेळसा तव दिसे मला भवें ॥ ९३ ॥

जिंकिशी विविध शत्रु माधवा
देति जें बहुत ताप मानवा ।
तेजही विलसतें तुझें सदा
घेशि तूं म्हणुनि देव या पदा ॥ ९४ ॥

**श्रीगर्भ** तूंते श्रुति नाम देती (इं. व.)
श्रीशब्द दावी तव आदिशक्ती ।
गर्भापरी ती चिकटूनि तूंते
राहे न साहे कधिं भिन्नतेते ॥ ९६ ॥

जसा चंदनामाजिं राहे सुवास (उपे.)
करी वीज मेघांत जैसा निवास ।
कृशानूत वा उष्णता जेंवि राहे
तशी श्री तुझ्या देहिं तीं ईश्वरा हे ॥ ९७ ॥

**परमेश्वर** तुज वदती असासि नियंता समस्त जगताचा (आ.)
सकलहि ऐश्वर्याचा अससी तैसा निवास तूं साचा ॥ ९७ ॥

**करण** तूंचि जगज्जननीं खरें (द्रुत.)
इतर साधन तूज नको हरे ।
रवि अयंत्रचि[1] अब्धिजला[2] हरी
घडवि अंबुद[3] वृष्टिसही करी ॥ ९८ ॥

**कारण** ब्रह्मांडाते अससी तूं जेंवि कनक वलयाते (आ.)
निपजे तुझ्यांतुनी तें जाई पुनरपि तुझ्यांत विलयाते ॥९९॥

कर्ता तूंचि तयाचा अससी तद्घटक तेंवि संभार
हेतू तूं द्विविध तया, जेंवि घटा मृत्तिकाहि कुभार ॥१००॥

---

१ यंत्रसहाय्यावांचूनच २ समुद्राचें पाणी. ३ मेघ ४ सामुग्री. ५ ससार किंवा सृष्टि

**कर्ता** तूं असासि अनादि या जगाची (प्रह.)
स्वेच्छेनें रचिसि विचित्र घाट त्याचा।
ज्ञानानें रहित असें प्रधान[1] कैसें
निर्माया क्षम जग हें सुयत्र ऐसें ॥ १०१ ॥

**विकर्ता**हि तूं, या विचित्रप्रकारा (भु. प्र.)
जगा निर्मुनी नेशि त्यातें विकारा।
अशा रीतिनें द्व्यर्थ हें नाम राहे
कळेनाचि लीला तुझी पामरा हे ॥ १०२ ॥

**गहन** नाम ह्मणूनि तुला असे (द्रुत.)
चरित शक्तिहि रूप तुझें[2] तसें।
**गुह** तुला ह्मणती, निज शक्तिनें
असिसि गूढ परिस्फुट भक्तिनें ॥ १०३ ॥

**व्यवसाया**चि मूर्तिमान तूं (वियो.)
असती निश्चयिं मेरुपर्वतू।
व्यवसायमती[3] जनास तूं
दिससी स्पष्टचि बोध-भास्वतू[4] ॥ १०४ ॥

**व्यवस्थान !** या सार्थता येइ नामीं (भु. प्र.)
व्यवस्था जगाची तुझी फार नामी।
तुझ्या आश्रयें विश्व राहे सुयत्र
जसे सर्व ओंकारि वेदादि मंत्र ॥ १०५ ॥

**संस्थान्** ऐसें ह्मणतीहि तूतें (उप.)
प्रवेशती अंतिं तुझ्यात भूतें[5]।
तुझी प्रतिष्ठा न विनाश पावे
त्वदेकदेशीं जग सर्व मावे ॥ १०६ ॥

---

१ सांख्यांनीं मानिलेली प्रकृति = जगांतील पचमहाभूतादि जडांश
२ गहन. ३ ज्यांच्या मनांत तुजविषयीं निश्चय झाला आहे अशा जनास ४ज्ञानरूपी सूर्य ५ पचमहाभूतें

**स्थानद** तूंते वदती, देशी तूं स्थान योग्य भक्तांते (आ.)
पाहुनि त्यांचीं कर्मे, देशी कैवल्यपद विरक्तांते ॥ १०७ ॥

**ध्रुव** तुला वदती कवि ते सुधी (द्रु. वि.)
स्थिरपणा तव तो नढळे कधीं ।
असिसि तूं अविनाशि सनातन
ह्मणुनि हें तुज नाम पुरातन ॥ १०८ ॥

**परर्द्धि** नामें मुनि तूज गाती (उप.)
त्वच्छ्री परार्थी नच तूज गा ती ।
श्री, सिद्धि, जी जी, जगिं वा विभूती
असेचि तेजोंश तुझा विभू ती ॥ १०९ ॥

**परमस्पष्ट** वदति तुला चिद्रूपचि तूं ह्मणूनि सुस्पष्ट । (आ.)
हस्तामलकापरि तुज सुभक्त बघती न पावतां कष्ट ॥११०

अवतार तुझे रमापते । बहु झाले जरि नैकरूप ते । त्रियो.
धरुनी यदुच्या कुलीं जनी । करिशी दृश्यचि ब्रम्ह तूं जनीं । १११

अमलकमलनेत्रा कृष्णरूपा धरूनी (मा.)
विपुल धवल कीर्ती चित्र कृत्यें करूनी ।
नवल सकल लोकां दावुनी तूं अरूप
विमल सरल भक्तां ब्रह्म होशी सरूप ॥ ११२ ॥

**तुष्ट** तूं प्रमोदरूप त्दष्ट सज्जनावनीं[1] (चा.)
कैंकर्यीष्ट साधण्यास जाशि, सज्जना, वनीं ।
दुष्टजीवजुष्ट[2] मार्गि कष्ट सोशिसी परी
नष्ट होय तुष्टता न ती तुझी कधीं हरी ॥ ११३ ॥

**पुष्ट** कंदमूल भृष्ट[3], वातवृष्टि, आतपा
सेवुनी अनिष्टतोयमज्जना महातपा[4] ।
इष्टपत्निविप्रयोग[5]कष्ट फार साहुनी
पुष्टता न जो त्यजीच पूर्ण कोण त्याहुनी ॥ ११४ ॥

---

१ सज्जनांचें रक्षण करण्यांत. २ दुष्ट जीवजतूंनीं युक्त. ३ भाजलेले ४ मूर्तिमंत. ५ वियोग.

**शुभेक्षण** तुझें शुभंकर जना असे दर्शन (पृ.)
तथापरि नसे तुझें दुरितदुःखसंकर्शन ।
मुमुक्षुस करी त्वरें जननमृत्युनिर्मुक्त जें
तदीय मनकामना पुरवि भक्त आसक्त जे ॥ ११५ ॥

**राम** नाम तुझें हरी बहु गोड हें विबुधप्रिया (त्रि. प्रि.)
मोक्ष इच्छुनि घेइ जें पतिच्यासवें गिरिशप्रिया[1] ।
लोकिं तूं रमसी तुझ्या मधिं योगिही ह्मणुनी तुला
नाम हें अभिराम गा, न सहस्रनाम तया तुला ॥ ११६ ॥

**विराम** तूंच संसृतीस मोक्षधाम साजिरें (पं.)
समस्त विश्व होय लीन अंतिं तूजमाजिरे ।
ह्मणूनि नाम शोभतें; विराम आपदासही
तुझी स्मृतीच; मन्मती भजो तुझ्या पदास ही ॥ ११७ ॥

रघुपति सम तूंते काष्ठ किंवा परीस (मा.)
वचन प्रिय पित्याचें राज्यलक्ष्मीपरीस ।
**विरजें**[2] न तुज ऐसा, जाशि तूं काननांत
अजिनधर, जटाला, मृत्युच्या आननांत ॥ ११८ ॥

**मार्गे** भरद्वाजादिक तेथें बघति तव दर्शनोत्कठ (आ.)
मुदित मनीं चिंतुनि, कीं आतां पावेल नाश दशकंठ ॥११९

**नेय** तुला वदती ते, पाहुनि त्या तव विनीतवृत्तीते (आ.)
रोधुनि निजचित्ताच्या करिती तुज हृदयेनीत[3] वृत्तीते ॥१२०

**नय** ह्मणजे नायक तूं, नेशी बा या समस्त विश्वास
नेशिहि पुष्पफलादी अर्पिति जे तुज अनन्यविश्वास ॥१२१॥

---

१ पार्वती. २ वैराग्यशील. ३ हृदयांत नेलेला (हृदयस्थित).

अनयहि असती तूं बा, नायक तूंते त्वदन्य नच कोणी
अनया करिशी बालावर्सनें हरुनीहि चोरुनी लोणी ॥१२२॥

चवथें शतक समाप्त.

---

## शतक ५ वें.

वीरवर्गवर तू रणधीरा ! ( स्वा. )
रावणादिक भिती तव तीरा।
दृप्तदैत्यकरिदर्प हराया
तूंचि केसरि खरा रघुराया ॥ १ ॥

शक्तिमतांश्रेष्ठ असें वदती तूते अचिंत्यशक्तीते ( आ. )
धर्महि ह्मणती त्यापरि, धर्मचि हेतू तुझ्याहि व्यक्तीते ॥ २ ॥

तूं धर्म मूर्तिमानचि, धारण करिशी समस्त तत्त्वांते
धर्मविदुत्तम तूंची जाणसि तूं पूर्ण धर्मतत्त्वांते ॥ ३ ॥

वैकुंठ नामाशि घेशी हृषीकेश ( सा. )
निर्बंध नोहे तूंते कधीं लेश।
पादाब्जसारंगभक्तां विकुंठासि
नेशी विनिर्मुक्तबधा विकुंठासि ॥ ४ ॥

जगदारंभीं करिशी गति कुंठित तूं समस्त भूतांची ( आ. )
अन्योन्यमिश्रणास्तव, मंत्री करि जेंवि मस्त भूतांची ॥५॥

---

१ वर्ग. २ उन्मत्तदैत्यरूपी हत्ती. ३ सिंह. ४ वैकुंठाला. ५ अकुंठित आहे असि ह्मणजे तरवार ज्याची.

पुरुष ! असासि सर्वांपूर्वीं तूं; या जगाचें (मा.)
अवन करिशि, राशी जाळिशीही अघाचे ।
सकल भुवनवर्गामाजि तूं अग्रगामी
दिससि विविध ऐसे अर्थ या श्रेष्ठ नामीं ॥ ६ ॥

प्राणवायु राम तूंचि चेतवीशि या जगा (चा.)
शक्तिवान जे तदीय तूंचि शक्ति तेज गा ।
प्राणसा प्रजेस इष्ट प्राणची सदा सतां
प्राणदेव तूंचि जो वरी त्वदीय दासता ॥ ७ ॥

प्राणद पाषाणाते होशी तूं त्या तपोवनीं रामा (आ.)
स्वजनांतेही जेव्हां येशी परतोनि घेउनी रामा ॥ ८ ॥

प्राणद पौलस्त्याही दस्यूते दुष्ट दस दारहरा
सुरमुनितापदविभवा मिळवी जो पूजुनी उदार हरा ॥ ९ ॥

प्रणव तूं तुज कीं प्रणती स्तुती (द्रु.)
सुरवरादिकही करिती कृती ।
पृथु यशा तव गावुनिया मती
करिति पावन पावति सद्गती ॥ १० ॥

पृथु तुझें यश जेंवि तसाचि तूं
महति वर्णु शके न शतक्रतू ।
रुचिररूपवतामधिं मन्मथू
नृपतिमाजिं तसा वर तूं पृथू ॥ ११ ॥

हिरण्यगर्भा जलिं सोडिशी जें (उप.)
सृष्ट्यर्थ पूर्वीं निज बीज तेजें ।
असे सुवर्णासम, याचसाठीं
हें नाम देती तुज वेदपाठी ॥ १२ ॥

शत्रुघ्न ऐसें म्हणतीहि तूते
सुरादिकांच्या वधिसी रिपूते ।

---

१ दास्य. २ स्त्री ३ रावणाला. ४ बायको हरण करणारा. ५ इंद्र. ६ मारुती. ७ धन्य, भाग्यवान्.

तूं मारिशी भक्तमनोवनींचे[1]
कामादिरूपी पशु दुष्ट साचे ॥ १३ ॥

भक्तचित्त-काननस्थ मारिशी रिपू सहा (चा.)
कामसिंह हा दशास्य[2], कोप वाघ कंस हा।
मोहखड्ग[3] कुंभकर्ण, लोभबाण[4] हा वृक[5]
मत्सर प्रचंड नाग, दंभ जंभ[6] जंबुक[7] ॥ १४ ॥

**व्याप्त** तूं, त्रिलोकि सर्व व्यापिशी त्रिविक्रम
व्योम[8] जेंवि व्यापि विश्व सर्वतत्वसंक्रम[9]।
**वायु** तूं मनोजवी, कृशानुजन्मकारण[13]
वाहसी घनावली[12], समस्त-जीव-धारण ॥ १५ ॥

**अधोक्षज** असें तुला ह्मणति बा सुविज्ञान ते (पृ.)
न जाणु शकतें तुला कधिंहि अक्षज[10] ज्ञान तें।
अधोमुख निजेंद्रिया करुनि जे सदा राहती
करामलकसें[11] परिस्फुटपणें तुला पाहती ॥ १६ ॥

ऋतूसही हेतु तुझेंचि वीर्य (उप.)
शीतोष्णवृष्टी जरि निर्मि सूर्य।
तुझीच आज्ञा फिरवी तयास
तेजोंश तूझाचि वसत खास ॥ १७ ॥

जरी जनांतें करि तप्त चैत्र
उल्हास देई तरुतें विचित्र।
तापे रवी, तोय दिसे न कोठें
रानीं तरू पल्लवयुक्त मोठे ॥ १८ ॥

असह्य ज्यांचेवरि उग्र ऊन
चैतन्य ऐसा तरुचें बघून।

---

१ भक्तांचे मन हेंच जें एक वन त्यांतील. २ रावण. ३ गेंडा. ४ लोभ-रूपी बाणासुर हाच वृक स० ५ लांडगा. ६ जम्भ नामक राक्षस. ७ कोल्हा ८ आकाश ९ सर्व भूतांत प्रवेश करणारें. १० इंद्रियजन्य. ११ तळहातावरील आवळ्यासारखा १२ मेघमाला. १३ अग्नीच्या उत्पत्तीस कारण.

तीं पालवी तो फलपुष्पभार
तुझी स्मृती होयहि चित्त गार ॥ १९ ॥

वर्षाऋतू तोहि उदार भव्य
प्रभुत्व दावी तव देव दिव्य ।
आनंद देईच कृषीवलांते
उदात्तता शांतिहि दे मनातें ॥ २० ॥

ती आर्द्र नीला पृथु मेघपंक्ती (इं. व.)
ती स्निग्ध सौदामिनिचीहि कांती ।
गभीर तें गर्जित, तोयधारा
पाहूनि वृत्ती मनिंच्या उदारा ॥ २१ ॥

न मेघ तो श्यामचि कृष्ण खास (उप.)
सौदामिनी भासत पीतवास ।
मयूरपिच्छें जणुं इंद्रचाप
हा घोषभर्ता घन शार्ङ्गचाप ॥ २२ ॥

प्रभुत्व, दीनत्व, तुझें जनांचें
ऋतूंत या व्यक्तचि होय साचें ।
गंगादि तीर्थांसहि तीर्थतेते
हा दे ऋतू देउनि पूततेते ॥ २३ ॥

हेमंति भूमी बहु शोभते ती
यवादि धान्यें रसपुष्ट होती ।
सुनीलवर्णं अँतसी फुलांच्या
विडंबि वर्णासि तुझ्या तनूच्या ॥ २४ ॥

गुलाब, बटमोगरा, बकुल, मोगरी, यूथिका (पृ.)
शिरीष मृदु, मोतिया, तगर, आम्र, वासंतिकां ।

---

१ शेनकन्याना. २ मोठी, विस्तृत. ३ विजेची ४ गर्जना धारण करणारा, किंवा (दुसरा अर्थ) गोकुळाचें रक्षण करणारा. ५ मेघ. ६ कृष्ण. ७ अळशी किंवा जवस (याचें झाड) ८ जुई ९ शिरसाचीं फुलें १० कस्तुर मोगरा.

अशोक, दवना कुडा, कमल, केतकी, मालती
कदंब मुचकुंदही गुलछबू जपा[1] शेवती ॥ २५ ॥

ऋतूंत फुलती फुलें विविध षट्पदां[2] पोषक
सुदर्शन, सुगंधही, नयननासिकातोषक ।
जनां सुखद तीं, मनां तव उपासकांच्या अती
विचित्रघटनापटू कुशलता तुझी बानिती ॥ २६ ॥

ऋतूच्या असे होतिं ही जीवसृष्टी (भु.)
करी शीत उष्णासि तो देइ वृष्टी ।
तयाच्या प्रवृत्तीस आहेस हेतू
म्हणूनीच घेशी ऋतू नाम हें तूं ॥ २७ ॥

**सुदर्शन** श्रीपति तूंच राम (उप.)
लावण्यमूर्ती भुवनाभिराम ।
तूं पाहसी भक्त दयावलोकीं
तोही तुला प्रेमभरें विलोकी ॥ २८ ॥

**काल** तूजला नाम बा हरा (का.)
संहरीशि तूं या चराचरा ।
रुद्र तूंचि बा, तूंचिही यम
सत्त्व तूंचि बा, तू रजस्तम ॥ २९ ॥

**परमेष्ठी** तुज वदती सर्वांहूनी वरिष्ठ तव धाम[3] (आ.)
जेथें नच प्रकाशे रवि, तारागण, हुताश[6], वा सोम[7] ॥३०॥

**परिग्रह** श्रीधर तूज नाम (उप.)
देती तुला जें जन संप्रणाम[4] ।
तें घेशि पुष्पादिक हर्षयुक्त
घेशी स्वलोकींहि मुमुक्षु भक्त ॥ ३१ ॥

**उग्ररूप** धरुनी जगतांतें (स्वा.)
शोषिशी रवि जसा सरितांते[5] ।

---

१ जासवद. २ भुंग्यांना. ३ स्थान किंवा सेज. ४ नमस्कारयुक्त ५ नद्यांना ६ अग्नि. ७ चंद्र.

विश्वतोय पिउनी जगदंतीं
पावशी तृषितसा सुख देती ॥ ३२ ॥

**संवत्सर** तुज वदती, विश्व सकल हें वसे तुझ्या पायीं    ( आ. )
वससी तूही तैसा विश्वांतिल सकल वस्तुंच्या ठायीं ॥३३॥

**दक्ष**हि संज्ञा देती अससी तूं कीं, समस्त कर्मीत
सुसमर्थ शीघ्रकारी, तत्पर तैसा स्वकीय धर्मीत ॥ ३४॥

**विश्राम** तूंते श्रुति नाम देती    ( इं. व.
विश्रांति योगी तव पादिं घेती ।
तापत्रयाते हरुनी तयाते
तू शांति देशी हरिशी तमाते ॥ ३५ ॥

**विश्वदक्षिण** तुला अभिधान    ( स्वा. )
दक्षिणार्थ करिशी क्षितिदान ।
सर्वभूतगणिं तूं अति दक्ष
सर्व कर्मि बहु देशिहि लक्ष ॥ ३६ ॥

**विस्तार** तूंते वदती त्रिलोकीं    ( उप. )
तुझ्यांतची ही पसरे त्रिलोकी ।
तूं विश्वरूपी तरु एक साचा
विस्तार लोकीं दिसतो जयाचा ॥ ३७ ॥

**स्थावरस्थाणु** तूं सारखा राहसी    ( स्र. )
नाहिं तूंते गती नाशही नेणसी ।
सर्वही व्यापिशी, सभवेना गती
सर्व शक्ती तुझ्या हातिं त्या वागती ॥ ३८ ॥

**प्रमाण** तुजं जाणण्या तुजविणें नसे चिन्मया    ( पृ. )
हिताहित ऋतानृता विधिनिषेध जाणावया ।

---

१ विश्वरूपी जल. २ कल्पांतीं. ३ हत्ती ४ पृथ्वीचें दान ५ खरें खोटें

प्रमाण तरि तूंच गा, सदय सांगसी तूं श्रुती
तुझ्याविण कसें मना विषय दावि नेत्र, श्रुती ॥ ३९ ॥

बीज अव्यय जगत्तरुला या ( स्त्रा. )
तूंच एक असशी यदुराया ।
नैकवार उगवे लयिं जाई
विश्व तूज मधुनी तुजठायीं ॥ ४० ॥

अर्थ तूंचि असशी जगीं एक
अर्थिती सुखमया तुज नैकें ।
ज्ञानिआंसि असशी प्रिय फार
तेचि जाति तरुनी भव पार ॥ ४१ ॥

अनर्थ नाम सार्थ हें अनेकधा दिसे मना ( पं. चा. )
न इंद्रियार्थ तू कदा न काहिं तूज कामना ।
अनात्मरूप अर्थ सर्व, आत्मरूप तू खरा
नव्हेसि अर्थ नास्तिकासि अर्थकामिनीपरा ॥ ४२ ॥

महाकोश तू राखिशी विश्व पोटीं ( भु. )
तिथें खेळती मोकळीं कोटिकोटी ।
सुवर्णद्युती चंद्रसूर्यादि नाणी
तुझी कुक्षि रक्षी किती रत्नखाणी ॥ ४३ ॥

महाभोग तूं सौख्यसिंधू अनंतं
तुझा वासँ, पर्यंक, सिंधू अनंतं ।
सदा सेवि लक्ष्मी सुलक्ष्मा पदाते ॥
तुला भोगिती भक्त सौख्यें सदा ते ॥ ४४ ॥

तुवा द्वारका स्वर्गतुल्याच केली
सहस्रांगनासी जिथें नित्य [12]केली ।

---

१ कान २ अनेक. ३ इंद्रियांचा विषय. ४ जड. ५ द्रव्य व स्त्री यांच्याविषयीं तत्पर ६ विष्णु ७ वसतिस्थान ८ पलंग ९ समुद्र १० शेष. ११ चांगल्या चिन्हांनीं युक्त. १२ क्रीडा

नव्या स्वर्गिंची पाहण्याला मजा ते
उतावीळ होवोनि त्या पारिजातें
गमे प्रार्थिली भामिनी आपुल्याते
इथें आणण्या, प्रार्थि ती तेंवि तूंते ॥ ४५ ॥

**महाधन** तुझे सहा गुण जया न हानी कधीं
महाधनचि तो तुला प्रिय सदा भजे एकधी ।
महाधनचि तूं तया असासि सर्व-भोगास्पद
महाधन तुलाचि हें उचित नाम लक्ष्मीप्रद ॥ ४६ ॥

**अनिर्विण्ण** तूं रक्षणीं दक्ष भारी (भु. प्र.)
तसा सृष्टि-संहारिंही कैटभारी ।
वनीं शांतिनें नोशि तूं दीर्घकाला
दशास्यादिकां अर्पिशी अंतकाला ॥ ४७ ॥

**स्थविष्ठ** तूं त्वदंश अल्प विश्व हें अमूप गा (पंच.)
पदांगुलांतुनी तुझ्या निघे नैभस्थ आपगा ।
अनत कोटि गोल ते जिच्या जलीं तरगती
महानदींत मीनसे महाद्युती महागती ॥ ४८ ॥

**भूः** नाम शोभे तुज ईश्वरा हे (इं.)
सत्ता तुझी व्यापुनि विश्व राहे ।
भूतांसि जैसी धरिते धरा हे
तूं वाहसी विश्व गदाधरा हें ॥ ४९ ॥

अभू तुज ह्मणूनची वदति बा; निराधारता (पथ्वी.)
तुझी प्रकट, भू कसी धरिल तूज राधारता ।
अभूमि वससी स्वयें करुनि भूमिदानें जनीं
अजन्म असुनी तुवां बहुत घेतल्या बा जनी ॥ ५०

**धर्मयूप** तूंच गा समस्तधर्मबंधना (चा.)
भक्त भिन्न पाळिती त्वदर्थ सर्व साधना ।

---

१ सत्यभामा. २ रावणादिकांना ३ यमाला. ४ आकाशांतील ५ नदी. ६ जन्म. ७ ज्याच्या मालकीची कांहींच जमीन नाहीं असा.

भृंगी ते, सरोजें तूंचि, लोह तेहि, कांतै तू
अर्पिती तुलाचि ते स्तुती, स्मृती, नैंती, क्रैतू ॥ ५१ ॥

**महामख** असें तुला ह्मणति भक्त मोक्षास्पदा (पृ.)
त्वदीय जप मेळवी मखगणांत आद्या पदीं।
जपात्मकचि तूं खरा अससि मंत्रमूर्ते हरे
महामखहि पांच ते असति रूप तूझें खरें ॥ ५२ ॥

**नक्षत्रनेमि** ह्मणती तुजला कवी ते (त्र.)
नक्षत्रचक्र तव वीर्यचि चालवीतें।
ज्योतिर्गणात्मक-शरीर-हृदबुजात
राहूनि तूं फिरविशी नभ-सृष्टिजात ॥ ५३ ॥

**नक्षत्री** तव नाम हें सुचवितें रूपा उदात्ता अती (शा. वि.)
पाहोनी मति गुंग होय तव ती तारामयी आकृती।
जीते वर्णिति शिशुमार ह्मणुनी वेदीं पुराणीं ऋषी
यत्पुच्छीं विलसे सदा ध्रुव तया शेजारिं साती ऋषी ॥५४॥

**क्षमचि** अससि तू बा यापरी वाहण्याते (मा.)
अखिलभुवनभारा विश्वही पाळण्याते।
तव सहनगुणाते भूमिशी तोलण्यांत
खचित कवि चुके तो वाल्मिकी बोलण्यांत ॥ ५५ ॥

**क्षामरूप** तव या पृथुदेहीं (स्वा.)
चाळवी पवनसें जैलवाहा।
जैंवि चुंबकमणी धरि लोहा
क्षोभवी उदधि जेंवि विधू हा ॥ ५६ ॥

क्षामता धरि तुझें विधुरूप
वृद्धिहानि करि त्या बहुरूप।

---

१ भ्रमर. २ कमल. ३ लोहचुंबक. ४ नमस्कार. ५ यज्ञ ६ पंच महायज्ञ ७ ढग ८ चंद्र. ९ कृशपणा. १० स्थुल देहाला. ११ स्थानाला.

कांति ये पारि तयास अमूप
लांछनेंहि[1] नच होय कुरूप ॥ ५७ ॥

समीहन विधू[2] तुझें उचित नाम विद्यानिधी (प.)
सचेष्ट करिशीच तू भुवनरूप अंभोनिधी[3] ।
सुरासुरनरा सदा सहज खेळवीशी सुधी
नियुक्त निजकर्मिंही करिशि तू पिनाकी[4] विधी[5] ॥ ५८ ॥

यज्ञ नाम तुज देति कवी ते (स्वा.)
अर्पि तूज यजमान हवीते ।
नामिं या श्रुति तुला विनवीते ।
नैकवार; अभिधा न नवी ते ॥ ५९ ॥

इज्य तूंचि सकला यजनात
इंद्र, रुद्र तुजलाचि जनांत ।
देति नाम श्रुतिच्या वचनांत
गाति सद्यश तुझें भजनांत ॥ ६० ॥

महेज्य तूं वा मधुकैटभारी (उप.)
पूजा तुझी श्रेष्ठचि कर्म भारी ।
निष्काम जे पूजिति तूज लोक
देशी तया शाश्वत सत्यलोक ॥ ६१ ॥

क्रतू तरी रूप तुझेंच नाना
तज्जन्य देशी फल तू जनांना ।
तूं भोगिशी अग्निमुखें हवीते
देवोत संज्ञा तुजला हवी ते ॥ ६२ ॥

सत्र हें तरि असें तव धार्म (स्वा.)
जेथ तूं पसरिशी निजधामें ।
स्तोत्र गाति तव ते द्विज राम
देशि जन्ममरणासि विराम ॥ ६३ ॥

---

१ चद्रावरचा डाग. २ विष्णु किंवा चंद्र. ३ समुद्र ४ शकर. ५ ब्रह्[illegible]
६ घर ७ तेज

**सतांगति** असें तुला ह्मणुनि बोलती ते यती (प.
क्रिया करुनि अर्पिती तुजसि जे तया आयती।
मिळे सहज मुक्ति; ते त्वरित तूज गा पावती
गती परम तूच त्या असासि बा ध्रुवा शाश्वती ॥६४॥

**सर्वदर्शीच** तूं, पापपुण्याप्रती
त्यांचिया पाहशी, लाविशीहि प्रती।
जेंवि ज्याची कृती तेंवि त्यासी गती
सर्व भूतीं तुझी सारखी बा मती ॥ ६५ ॥

**विमुक्तात्मा** तूं बा गुणरहित सर्वा सम तसा (शि.)
न रागद्वेषांनीं असासि युत तूं हा नर जसा।
ह्मणूनी विश्वात्मन् बघति तुज सर्वत्र सम जे
तयांची धी आत्म्याप्रति कधिं विनाशी न समजे ॥ ६६ ॥

देहेंद्रियादि नसतीहि उपाधि तूंते (व. ति.)
आधारभूतहि तुला नच पंचभूतें।
आत्मा विमुक्त ह्मणुनी तव बोलिजेतो
साक्षात्पदार्थ दिसतो तुज पाहिजे तो ॥ ६७ ॥

**सर्वज्ञ** तूं हें ह्मणणें विचित्र (इं. व.)
शब्दें तुझ्या विश्व घडे विचित्र।
तूं विश्व किंवा तव तेंचि चित्र
तू जाणसी तूज न यांत चित्र ॥ ६८ ॥

**ज्ञानमुत्तमं** नाम हें तुला (का.)
देति यामुळें ज्ञान-हेतुला।
ज्ञानरूप तू, साधनाविणें
शक्य तूजला सर्व जाणणें ॥ ६९ ॥

**सुव्रत** रात्रव हेंच तुझें कीं (दो.)
मी तव यापरि बोलुनि टाकी।

त्वत्पदिं मस्तक त्यास अभीती
देउनि रक्षिसि ही तव रीती ॥ ७० ॥

**सुमुख** तूं ह्मणुनी असती सदा (द्रु. वि.)
वचन-रक्षणिं सोशिसि आपदा।
त्यजिसि राज्यसुखा बहु संपदा
मुदित ठेविशि घोर वनीं पदा ॥ ७१ ॥

सुमुखनिर्गत गीत तुझें हरी
नरमनोगत[1] कश्मल[2] तें हरी।
स्मित-सुचारु-मुखा द्विजमानसीं
रमसि हंस जसा द्विज[3] मानसीं[4] ॥ ७२ ॥

**सूक्ष्म**चि सूक्ष्माहूनी असती तूं ईश्वरा निराकारा (आ.)
गगनहि तुझ्याहुनी घन, कथिजे सूक्ष्म मग कँवि तो वारा ७३

**सुघोष** तू बा असती मुरारी (उप.)
गंभीर वाणी तव चित्तहारी।
सुघोषची बा तव वेदवाणी
जी या जगीं ज्ञानसुवर्णखाणी ॥ ७४ ॥

**सुखद** तूं असती रघुनंदना, (द्रु. वि.)
करिति जे तुझिया पदवंदना।
तुजसि पूजिति अर्पिति चंदना
सुखद त्या वनही सम नंदना[5] ॥ ७५ ॥

**सुहृत्** तुला बा वदती वदान्य (उप.)
समान तूंते न सखाच अन्य।
सेवूनि तूते मतिनें अनन्य।
सखा तुला जो करि तोच धन्य ॥ ७६ ॥

---

१ अर्जुनाच्या मनांतील २ उदासीनता ३ पक्षी ४ मानससरोवरांत.
५ नंदनवनाशी

**मनोहर** हरी तयासि अति तू (ज.)
शशांक न तसा वसंतहि ऋतू ।
न चंद्रवदना[1] न नंदनवन
भयंकर तया नसे भववन ॥ ७७ ॥

**जितक्रोध** तूं सर्वदा शांत-बुद्धी (भु. प्र.)
जरी शूर तूं शत्रुहंताहि युद्धीं ।
तुला कोप दुर्वास आणावयाते
करी शीघ्रकोपी उगाचि श्रमाते ॥ ७८ ॥

**वीरबाहु** वदती हरि तूंते (स्वा.)
युद्धिं जिंकिशि समस्त रिपूते ।
रावणादि रवितें तव बाहू
ग्रासण्या खचित होतिच राहू ॥ ७९ ॥

**विदारण** सुदारुणा कृति तुझी ह्मणोनी हरी (प.)
तुला वदति तूं नखें चिरशि दैत्यभूपा उरीं ।
उदाहरण हें तुझ्या अवनदक्षतेचें खरें
कृतादरचि तू सदा असासि त्या तुला जो स्मरे ॥ ८० ॥

**स्वापन** तुजला वदती, माया-मोहीं प्रसुप्त जन करिशी (आ.)
संमोहनविद्येनें निद्रेमाजीं तयास वर्तविशी ॥ ८१ ॥

**स्ववश** असती ह्मणूनाचि साधे विद्या तुलाच ही मोठी
लोकां निद्रित करुनी स्वेच्छेनें वागसीच जगजेठी ॥ ८२ ॥

**व्यापी** तूं वा असती व्यापुनि जग हें समस्त तूं उरशी
**नैकात्मा** तुज वदती सावात्म्यें वा जगांत तूं वसती ॥ ८३ ॥

---

1 चंद्रासारख्या सुंदर मुखाच्या स्त्रिया

विष्णू विरिंचि[1] शंभू रूपें हीं त्रिविध तूचि बा धरिशी (आ.)
त्रिगुणांच्या संसर्गे स्थितिसर्गप्रलयकर्महीं करिशी ॥ ८४॥

**नैककर्मकृत्** प्रभो ह्मणोनि नाम तूज गा (चा.)
सृष्टिकर्म तूं करोनि पाळिशीहि या जगा।
अंतिं त्यास संहरूनि घेशि तें निजोदरीं
त्रिप्रकार हें तुझेंच कर्म होय बा हरी ॥ ८५ ॥

**वत्सर** तूंते वदती वससी तूं कीं समस्त भूतांत (आ.)
**वत्सल** तूं अससीही, सर्वांते तूं दयार्द्र बहु तात ॥ ८६ ॥

**वत्सी** तूं वत्सापरि पाळिशि सर्व प्रजा सदा प्रेमें
वत्सें गोकुळिं बहु तव चारिशि जीं तू वनांत बहु नेमें ८७

**रत्नगर्भ** वदती हरि तूंते (स्वा.)
अष्टधा प्रकृतिते पुरुषाते।
वाहसी उदरिं या नवरत्ना
अबुधी धरि जसा नवरत्ना ॥ ८८ ॥

**धनेश्वर** श्रीपति तूज नाम (उप.)
संपत्तिचें तूं अविनाशि धाम।
कुबेर जो यक्षगणाधिराज
विभूति तो बा तव देवराज ॥ ८९ ॥

**धर्मगुप्** अससि तूंच ईश्वरा (र.)
धर्म ह्याचि नद त्यास तूं झरा।
धर्मसंस्थिति करावया सदा
होउनी प्रकट दाविशी पदा ॥ ९० ॥

**धर्मकृत्** तरिहि तूच माधवा (रथो.)
धर्मतत्त्व वदसीच उद्धवा।
अर्जुनासि वदसीहि तेंवि तें
वैखरी श्रुति तुझीच दाविते ॥ ९१ ॥

---

१ ब्रह्मदेव. २ वासरें

**धर्म** तुजला म्हणती, आधारचि तू समस्त धर्मांते (आ.)
उपदेशिसी नरा जो तोचि वदे भीष्म धर्म धर्मांते ॥ ९२ ॥

**सत्संज्ञ** ब्रह्मचि तूं वर्णिति ज्यातें समस्त वेदांत
जाणति यथार्थ जें मुनि, भजती तुज जे सम स्तवें दांते ॥९३॥

**असत्संज्ञ** जें विश्व हें तूंच तेंही (भु. प्र.)
जगद्रूपिं या लीन तूं स्थूल देहीं।
महीचंद्रसूर्यांत तारागणांत
वसे त्वत्कला, चालवी त्यां नभांत ॥ ९४ ॥

**क्षर** असें म्हणती जड नश्वरा (द्रु. वि.)
सकलभूतगणांसहि ईश्वरा।
क्षरहि तूंचि; निघेच तुझ्यांतुनी
वटतरूपरि तें किणिकेतुनी ॥ ९५ ॥

**अक्षर** अभिधा देती वेदत्रयसारभूत प्रणवातें (आ.)
तो तव विभूति साची; दुरितवना जाळण्यास वणवा तें ॥९६॥

**अविज्ञाता** तूं बा विदित तुजला संसृति नसे (शि.)
तुझ्या सान्निध्येंची प्रभव लय रक्षा घडतसे।
जसा लोहा ओढी निकट धरितां चुंबक मणी
जगद्व्यापाराची सकल तव तैसीच करणी।
अविज्ञाता बुद्धीहुनि पर चिदानंदमय जो
असा जीवात्मा तूं वदसि निज अंशात्मकचि तो ॥ ९७ ॥

**सहस्रांशु** तूंतें वदति कवि चिद्रूपरविला
तुझ्या पासोनी ती भुवनिं पसरे जीवनकला।
सहस्रांशू जैसा जलगत अनेकां परि दिसे
तुझी चिद्भानूची प्रतिकृतिहि भूतांतरिं वसे ॥ ९८ ॥

---

१ अर्जुनाला. २ धर्मराजाला. ३ समचित्त. ४ स्तोत्रानें. ५ जितेंद्रिय ६ बीजरूपी कणांतून ७ (ती विभूती) ८ पलीकडचा. ९ प्रतिबिंब. १० सूर्य.

**विधाता** असें नाम देती पुन जें (भु. प्र.)
जनां तूंचि आधार त्यालागिं साजे ।
अनंता खगोलां तसें भूमिगोला
त्वदीयाचि लीला धरी जेंवि माला ॥ ९९ ॥

**कृतलक्षण** तुज ह्मणती तव असतीं पूर्ण लक्षणें सकल (आ.)
निर्मिशि शास्त्रें, विद्या, तत्रेंही तेंवि तूं क्षणें सकलें ॥१००॥

**गभस्तिनेमी** तुज नाम साजतें (वं.)
त्वदीय चक्रा रवितेज लाजतें ।
सुमूर्ति शोभे तव सूर्यमंडलीं
जशी महा पांच सुवर्णकुंडलीं ॥ १०१ ॥

**सत्त्वस्थ** तूं राहुनि शुद्ध सत्त्वीं (इं.)
जीवात्मरूपींहि समस्त सत्त्वीं ।
संरक्षिसी त्या धृतनंदकारी
सिंहापरी शत्रुगजांतकारी ॥ १०२ ॥

**सिंह** नाम ह्मणुनी तुज साजे (स्वा.)
त्वत्पराक्रम जगीं बहु गाजे ।
नारसिंहवपु तूं अति दक्ष
फाडण्यास रिपुचें पृथु वक्ष ॥ १०३ ॥

**भूतमहेश्वर** तूं बा नच तुजसा परम ईश जगतातें (आ.)
शंकर महेश याते निर्मियलें बा तुवांचि अजतातें ॥१०४॥

**आदिदेव** ह्मणुनी तुज नाम (स्वा.)
सर्वकाल विलसे तव धाम ।
कालिं ज्या नसति चंद्र रवीही
तारका, शनि, गुरूहि कवीही ॥ १०५ ॥

---

१ नंदकनांवाची तरवार व चक्र धारण केलेला २ ब्रह्मदेवाच्या पित्यानें. ३ शुक्र ४ कलांसहित ५ प्राण्यात

**महादेव** तूं श्रेष्ठ सर्वां सुरांत (भु.)
पडे वैर ज्या कालिं देवासुरांत ।
सहायार्थ तूतें सदा देव येती
स्तुतीनें तुला पूजिती, मान देती ॥ १०६ ॥

**देवेश** तूं यास्तव देवराज (उप.)
हिमाद्रि जैसा अचलाधिराज ।
पंचास्य[1] तो जेंवि मृगाधिराज
त्वद्भक्तवर्गीं प्रथमाधिराज ॥ १०७ ॥

**देवभृद्गुरु** तुला अभिधान (स्वा.)
इंद्रही करि तुला बहुमान ।
रक्षिसी सकल निर्जर[3] आद्या
त्यांसि तूं शिकविशी परविद्या[10] ॥ १०८ ॥

**उत्तर** तुजला ह्मणती, नौका तूं या भवाब्धिसंतरणीं (आ.)
उत्तम सर्वांहूनी ग्रहसमुदायांत जेंवि तो तरणी ॥ १०९ ॥

**गोपति** या तूं असती पालक वाग्धेनुभूमिमातांचा
**गोप्ताहि** ह्मणुनि ह्मणती, रक्षक तूं या समस्त भूतांचा ॥ ११० ॥

**ज्ञानगम्य** हरि तामरसाक्ष[4] (स्वा.)
तूं; तयास सकल श्रुति साक्ष ।
कर्म, यज्ञ, तप, सस्तवें[5], योग
हीं करू न शकती तव योग[6] ॥ १११ ॥

**पुरातन** श्रुतींत हें त्वदीय नाम गाजतें (प. चा.)
पुराण सर्व वस्तुहूनि तूं ह्मणूनि साजतें ।
**शरीरभूतभृत्** प्रभो समस्त देह पोशिसी
असुस्वरूप[7] तूं समस्त धातुमाजिं[8] राहसी ॥ ११२ ॥

---

१ सिंह. २ शंकर ३ देव ४ कमलनेत्र ५ स्तुति ६ प्राप्ति, ऐक्य. ७ प्राणरूपी ८ शरीरांतील सप्त धातुंत ९ पर्वतांचा राजा. १० ब्रह्मविद्या

**भोक्ता** यज्ञाचा, तूंचि वा पूजनाचा (वै.)
संध्याहोमाचा, रक्षिताही जनाचा।
पुष्पां, फलातें, धूपदीपास तेंवी
येशी नैवेद्या, आहुती वैश्वदेवीं ॥ ११३ ॥

पांचवें शतक समाप्त.

श्री ग्रंथ संग्रहालय
नं.
ना.
ठाणे.

## शतक ६ वें.

**कपींद्र** तू घेउनि वानरांचें (उप.)
सहाय्य कार्यार्थ सुरानरांचे।
आत्मे दशास्यादि निशाचरांचे[1]
देशी करीं वा यमकिंकरांचे[2] ॥ १ ॥

मागुनी निजपुरां रघुराया। (स्वा.)
येशि लोकविरहार्ति हराया।
सौख्यकारि चिरराज्य कराया
पुण्यकीर्ति जगिं या पसराया ॥ २ ॥

अश्वमेध मखंही[3] शत केले
दक्षिणा अमित घेउनि धाले[4]।
विप्रसंघ तुजला पदवी ती
**भूरिदक्षिण** अशी मग देती ॥ ३ ॥

**सोमप** तुजलाही ते ह्मणती वा अश्वमेधयजमाना[5] (आ.)
अमृतप[6] तरिही तूं त्या येशी वा आदरेंचि बहुमाना ॥ ४ ॥

---

१ रावणादि राक्षसांचे २ यमदूतांच्या ३ यज्ञ. ४ तृप्त झाले.
५ अश्वमेधयज्ञ करणारा ६ अमृत पिणारा

भोक्ता यज्ञाचा तू, सोम पिशी तूंचि सर्व यजनांत
यज्ञीं प्रवृत्ति तव ती श्रद्धाजननार्थ मात्र सुजनांत ॥ ५ ॥

अमृतप तुजला बा देति या नामधेया　　( मा. )
वृषभतनु धरूनी टाकिशी पीवुनीया ।
त्रिपुरदहनकालीं दैत्यकूपामृताते
समरहत रिपूते देइ जें जीविताते ॥ ६ ॥

सोम विभूती तव तो पोशी जो ओषधीस रसदानें[1]　　( आ. )
पुरुजित् तूं बा जिंकिशि बाणें रिपु दीनही सरसदानें[2] ॥ ७ ॥

सत्यानें परलोका, शुश्रूषेनें गुरूप्रती रामा
यापरि जिंकिशि बहुते पातिव्रत्यें जशी पती रामा[3] ॥ ८ ॥

पुरुसत्तम तूं सर्वग परि विलसे तव सुतेज सद्रत्नीं
पाषाणीं नच विलसे जैसें तें सूर्यतेज सद्रत्नीं ॥ ९ ॥

पुरुशब्द महत्वार्थी बहुवाचिहि, सत्तमार्थही श्रेष्ठ
बहु सज्जन तुज मिळती ज्ञानतपोयोगयुक्त सन्निष्ठ[13] ॥ १० ॥

बहु तव विभूति असती आदित्यादी जयांत तूं बससी
तूं विश्वरूप ह्मणुनी मोठा सर्वांत श्रेष्ठही अससी ॥ ११ ॥

दनुजमनुजवर्गीं, यक्षरक्षोमृगांत　　( मा. )
सुरमुनिकविमाजीं, अश्वधेनूनगांत ।
जलचरखगनागांमाजिं, वृक्षायुधांत
बहुविध गणि ऐशा. श्रेष्ठ जो तूंचि तात ॥ १२ ॥

प्रल्हाद तूं, भूप, कुबेर, तूं हरी　　( उप )
तूं इंद्र, पाराशर[14], शुक्रही हरी ।
तूं कामधेनू हिमवज्जलेशही

---

१ रस देऊन　२ उत्तम देणगीनें.　३ स्त्री.　४ दैत्य.　५ पर्वतांत.　६ पक्षी　७ हत्ती किंवा सर्प　८ वरुण　९ यज्ञांत　१० युद्धात मेलेल्या　११ सज्जनरूप रत्नात　१२ चांगल्या रत्नांत.　१३ ब्रह्मनिष्ठ.　१४ व्यास.

९१
नं.

खगेंद्र, ऐरावतही, महा अही
अश्वत्थ तूं पादप, तूंच वज्रही ॥ १३ ॥

जनपदहितकर्ता श्रेष्ठ तू भूपवर्गीं (मा.)
जनकचरणसेवासक्तही पुत्रवर्गीं ।
प्रियतम पति, बंधू, मित्र तूंची जगांत
धवल यश जयाचें लोक आहेत गात ॥ १४ ॥

विनयमूर्तिच तू रघुनंदन (द्रु. वि.)
अनयकृत्खलदुष्टविमर्दन ।
अनय तू करिशी न कधीं हरी
जय मिळे तुज षड्रिपुंच्या वरी ॥ १५ ॥

सत्यसंध असती रघुराया (स्वा.)
दक्ष तू वचन सत्य कराया ।
जीविता त्यजिसि वा निजजाया
जाऊ देशि परि शब्द न वाया ॥ १६ ॥

दाशार्ह नामीं तव दोन अर्थ (उपें.)
तूं पात्र भक्तांसि निजार्पणार्थ[3] ।
दशार्हवंशीं अवतार घेशी
मारावयाते मुर कंस केशी ॥ १७ ॥

सात्वतांपति असें तुला हरी (रथो.)
देति नाम यदुवंशकेसरी ।
वैष्णवां पति तसा यदूंस तूं
स्वर्गिं जेंवि अमरां शतक्रतूं[4] ॥ १८ ॥

जीव तूंच असती सकलांचा (स्वा.)
पुज तूं सकल जीवकलांचा ।

---

१ गरुड २ शेष ३ स्वतःला अर्पण करण्याकरितां. ४ इंद्र.

सूर्य तू, उगम चित्किरणांचा
तूजपासुनि घडे जगिं साचा ॥ १९ ॥

**विनयितासाक्षी** नाम तूज देती (दिंडी)
चित्तिं राहोनी बघशि धर्म नीती ।
कोण कैसा या जन जगांत वागे
बघसि सारें हें सतत दिव्य योगें ॥ २० ॥

विनयिता वदती तुजला यती (द्रु. वि.)
नियमिशी जगतासि महामती ।
करिशि पालन तूंचि तयाप्रती
स्वजनलालन तेंवि रमापती ॥ २१ ॥

साक्षी तुजला वदती, राहुनि देहत्रयीं तथा बघशी (आ.)
साक्षी त्रिदशांचा तू जगताचाही तसाच वा असशी ॥२२॥

**मुकुंद** तू देशि जनास मुक्ती (उप.)
जो पूजितो तूज अनन्यभक्ती ।
श्रद्धा तुझ्याठायिं धरोनि चित्तीं
असक्त जायासुतगेहवित्तीं ॥ २३ ॥

**अमितविक्रम** वामन तू तरी (द्रु. वि.)
त्रिपद ठेवुनिया वहु अंतरीं ।
भुवनभृंगतती बलिही हरी
करिशि लीन पदांबुरुहांतरीं ॥ २४ ॥

**अंभोनिधी** तूचि निधान जीवां (उप.)
नरासुरांते, पितरांहि, देवा ।
आधार घ्यायाहि महार्णवास
कूर्माकृती होशि जगन्निवास ॥ २५ ॥

---

१ ज्ञानकिरणांचा. २ स्थूल, सूक्ष्म व कारण ह्या तीन देहांत ३ देवांचा ४ वर ५ भुवनरूप भ्रमरांची माला ६ आच्छादित किंवा नम्र ७ पद-कमलाखालीं

अनताख्या त्याते स्वशिरिं धरिं जो शेष जगती (शि.)
तयाचा तूं आत्मा, ह्मणुनि शिरिं घेई भुजग ती ।
स्वरूपाते नाहीं तव कधिंहि कांहीं परिमिती
**अनंतात्मा** तूते ह्मणुनि ह्मणती साधु सुमती ॥ २६ ॥

**महोदधिशय** प्रभो निजसि जैं महासागरीं (पृ.)
सुरम्य दिससी उमारमणकंठ जैसा गरीं ।
स्वदीय तनुनीलिमा बघुनि कंठिं शंभू धरी
जणू सतत नामही तव विषोष्णता जें हरी ॥ २७ ॥

**अंतक** तुज सत कवी ह्मणती तूं करुनि अंत कल्पांतीं (आ.)
अखिलहि भूतगणांचा, भोगिशि भुजगीं अनंत सुख शांती॥२८

अंतक प्रलयिं सर्व तूं जगा (र.)
भक्षिशी, ह्मणुनि नाम तूज गा ।
देति हें, शयनशाति तेधवां
भोगिशी भुजग-भोगिं माधवा ॥ २९ ॥

**अज** तूं ह्मणुनी तुज जनि, अंत नसे गा दुरंतवीर्याते (आ.)
पुनरपि सृष्टी करिशी सोडुनि प्रकृतींत आत्मवीर्याते ॥३०॥

अज तुला ह्मणती निगमीं जनीं (द्रुतवि.)
निर्धन तूज नसे अथवा जनी ।
त्रिभुवना स्वतनूंतुनि काढिशी
सहज जालकें कातिण ती जशी ॥ ३१ ॥

**महार्ह** तूं यास्तव देवतांत (उ. जा.)
तुलाचि बा पूजिति देव तात ।
महाफलाते तव देइ भक्ती
येथें सुखें सर्व, परत्र मुक्ती ॥ ३२ ॥

---

१ विषाचे योगानें. २ सर्पतनूवर. ३ वेदांत ४ मरण. ५ अगाध आहे वीर्य ज्याचें त्या तुला ६ अगाचा निळसरपणा. ७ जाळें

**स्वाभाव्य** नामीं तव गूढ भाव (भु. प्र.)
तूंते करी व्यक्त तव स्वभाव ।
जगीं दिसे जी तव दिव्यशक्ती
स्वभाव ही एक तयास उक्ती ॥ ३३ ॥

अधिष्ठान आहेस तूं या स्वभावा
म्हणोनी तुला देति या गुह्य नांवा ।
जगच्चालका ईश तूं षड्गुणाचा
यशोज्ञानवैराग्यवीर्यादिकांचा ॥ ३४ ॥

शक्तीते देति संज्ञा तव विविध जशी भिन्न ज्याची यदृच्छा[1] (स्र.)
माया वेदांतवेत्ते, नियति ह्मणतिही, काल कोणी यदृच्छा[2] ।
कोणी अव्यक्त तीते, प्रकृति, परिणती वा स्वभाव प्रधान
कोणी षाड्गुण्य किंवा भगहि ह्मणति जे भक्तिमार्गी प्रधान ३५

शक्ती शक्तिमताहुनी नच कधीं भिन्ना जगीं तत्त्वता (शा.)
धातूमाजिंच तापल्या वसतसे भिन्ना नसे उष्णता ।
शक्ती ज्या विविधा त्वदीय जगतीं स्वाभाविका निस्तुला[3]
त्या भिन्ना तुजपासुनी न, म्हणुनी स्वाभाव्य संज्ञा तुला ॥३६॥

**जितामित्र** तू मित्रसा अधकारा (भु.)
सदा शत्रुते वारिशी निर्विकारा ।
जयाच्या हृदीं राहसी तापहारी
रिपू जिंकि तो ज्ञानवित्तापहारी[4] ॥ ३७ ॥

**प्रमोदन** हरी तुला ह्मणति सर्व सौख्यास्पदा (पृ.)
रुचे न किमपी नरा इतर जो भजे त्वत्पदा ।
न तत्सुख हरावया क्षम कधीं महा आपदा
पदाब्जरजसाम्य ना तव न येइ पृथ्वीपदा ॥ ३८ ॥

**आनंद** तूं केवल नदनंदना (इं. वं)
आनंदि तो जो करि तूज वंदना ।

---

१ इच्छा. २ साहजिकपणा ३ निरुपम. ४ ज्ञानरूपी वित्त हरण करणारे
५ सूर्याप्रमाणें. ६ श्रेष्ठ. ७ नांव

त्वज्जन्मयोगें यदुवंश शोभला
त्या इंद्रवंशापरि धन्य तो भला ॥ ३९ ॥

**नंदन** तुज नंदसुता ह्मणती ह्मणुनीच सौख्यसिंधूते (आ.)
भवसिंधु बिंदुपरि त्या तुजला जे भजति लोकबंधूते ॥ ४० ॥

**नंद** नामासि तूं घेशि नंदात्मजा (स्र.)
नांदती त्वद्बलें सर्वही या प्रजा।
तेंवि भूमंडलें शेंकडों ज्यापरी
द्वारके माजि त्या नांदती सुंदरी ॥ ४१ ॥

अगणित भुवनें हीं नांदती यत्प्रभावें (मा.)
युवति बहु तयाच्या वागती मित्र-भावें।
बघुनि नवल वाटे मानसीं नारदाते
नवल खचित हेंची वाटतें फार माते ॥ ४२ ॥

राघवा तू तरी सर्वदा नांदसी (स्र.)
रानिं वा ग्रामिं वा लोक आनंदिसी।
सर्वदां ऋद्धिनें[1] युक्त सीतापते
दर्शनें सर्वही नाशिसी ताप ते ॥ ४३ ॥

जन्मुनी अन्वयीं[2] भानुच्या चिद्घना
गाधिजा-राधनें[3] अस्त्रविद्याधना।
साधुनी, ताडिका ताडुनी, मोडुनी
शंभुचें चापही[4], जानकी जोडुनी ॥ ४४ ॥

राजधानीप्रती येउनि पावना
तात-वाक्पालना जाशि तूं वा वना।
दंडकीं हिंडुनी, दैत्य ते दंडुनी
जानकी धुंडण्या मारुती धाडुनी ॥ ४५ ॥

वानरांचें नरांच्या परी लष्कर
ठेवुनी, बांधुनी सेतुही दुष्कर।

---

१ समृद्धीनें. २ वशांत. ३ विश्वामित्राला प्रसन्न करून. ४ धनुष्य.

सिंहला जाउनी रावणा हाणुनी
जानकी मागुती सत्वरें आणुनी ॥ ४६ ॥

वत्सरें काढुनी वन्यवासीं पुरीं
येसि माघारि तूं आपुलीया पुरीं ।
नांदसी दीर्घ तू तेथ राज्यावरीं
तोषवीशी जना कैकयीच्या परी ॥ ४७ ॥

**सत्यधर्मा** तुला याचसाठीं मुनी (स्र.)
नाम देतीहि, तूं धर्मशिक्षा जनीं ।
द्यावया पाळिशी सत्यधर्म स्वयें
धर्ममूर्तीच तूं अल्पही जैं वयें ॥ ४८ ॥

**त्रिविक्रम** तुवां पदत्रितय देउनी झांकिलें (पृ.)
जगत्रय, तसेंचि त्या बलिनृपासही जिंकिलें ।
असें ह्मणति तें वृथा; विजयशालि तोची खरा
अलभ्य पदसंगती तव मिळे जयाच्या शिरा ॥ ४९ ॥

**महर्षिःकपिलाचार्य** । ह्मणती मुनि तूंजगा ॥ (अ.)
विभूति तव तो देई । सांख्यशास्त्रासि या जगा ॥ ५० ॥

**कृतज्ञ** तुजसा नसे सकलकर्मसाक्षी हरी (पृ.)
स्मरूनि कृतितें तुवां सकल तुष्ट केले हरी ।
बिभीषणहि बंधुच्या बसविलाचि राज्यावरी
जगत्तव कृती दिसे तुज करस्थ बोरापरी ॥ ५१ ॥

**मेदिनीपती** तूंच बा खरा (का.)
प्रेम ठेवुनी पाळिशी धरा ।
पत्निते पती जेंवि सर्वदा
बालका पिता जेंवि कामदा ॥ ५२ ॥

---

१ पूर्ण ( १४ वर्षें ) २ गांवीं ३ शिक्षण. ४ सर्व कर्में पहाणाऱ्या ( हें संबोधन आहे ). ५ वर्षें. ६ पृथ्वी. ७ वानर

त्रिपद हें पद घेशि त्रिविक्रमा (द्रु. वि.)
बळि पडे बळिं तो तव विक्रमीं।
भिउनि जायहि ती विबुधापदा
द्रुत विलंबित ठेविशि जें पदा ॥५३॥

त्रिदशाध्यक्षचि असली, स्वामी तूं वा समस्त त्रिदशांचा (आ.)
जागृत्स्वप्नसुषुप्ती साक्षी तैसाचि त्याहि त्रिदशांचा ॥ ५४ ॥

महाशृंग तूं मत्स्य होशी धराया (भु. प्र.)
जलीं मग्न भू, वेदही उद्धराया।
वराहाकृती घेउनीया महीते
धरूनी रदीं घेशि तू नामही तें ॥ ५५ ॥

कृतांतकृत् प्रभो तुझी विचित्र ही कृती अती (पं चा.)
करोनि सृष्टि आदिं ही लयास नेशि मागुती।
न यांत दोष वा असे, कुकर्म सर्व नाशिसी
स्वभक्त नेशि पुण्य लोकिं, मृत्युतेहि मारिशी ॥ ५६ ॥

संसार मृत्युरूपी; हरुनि तया हरि यमासि वंचाया (आ.)
शिकविशि जरि भक्ताते नाशुनि कृतकर्म,दोष कंचा या ॥५७॥

महावराहाकृति घेउनी ती (उप.)
करावया जागृत धर्म-नीती।
उद्धारिशी पंकनिमग्न धांली
समान दृष्टी तव जीवमात्रीं ॥ ५८ ॥

गोकुळिं गोगण तुजला बहुत मिळाला म्हणूनि गोपाळ (आ.)
गोविंद गोड नामा देती तूतें समस्त गोपाळें ॥ ५९ ॥

विनष्ट भूमी परतोनि आणिली (उप.
गोविंद संज्ञा म्हणुनी तुला दिली।

---

१ त्वरित. १॰ लांब अतरावर. २ देवांचा ३ तीन अवस्थांचा ४ पृथ्वी. ५ दातानें (दांतावर) ६ गाईंचा समुदाय [कळप] ७ नाहींसी झालेली. ८ देवांची विपत्ति ९ पराक्रमाला. ११ गवळी.

गोशब्द वाणीसहि लाविती कवी
तव स्वरूपा श्रुतिवाक्य शीकवी ॥ ६० ॥

**सुषेण** ऐसा तुज गाति नामीं (उप.)
सेना तुझी राघव फार नामी ।
तैसा तुझा पार्षदसव साधू
नामीं तुझ्या अर्थ अनेक सोधूं ॥ ६१ ॥

**कनकांगादि** बाहु तो तव । घन सौदामिनियुक्त आर्तवें ॥ (वियो.)
कृतिमाजिंहि साम्य दाविता । क्षणमात्रें जनताप वारितो । ६२ ।

**गुह्य** तूं श्रुतिसही अगोचर, व्यापिशी जरिहि हें चराचर । (रथो.)
हृद्गुहेमधिंहि गूढ राहसी, भस्मिं पावककला लपे जसी ॥६३॥

**गभीर** तूंते ह्मणतीहि धीर (उप.)
ऐश्वर्य बुद्धी बलही अपार ।
तुझ्या कृतीचा न कुणास थांग
श्रुती शिणे वर्णुनि तूज सांग ॥ ६४ ॥

**गहन** तूं, तुजपासुनि बा हरी (द्रु. वि.)
परतची फिरती मन वैखरी ।
अनुमिती, उपमा नच ती टिके
तव कृपेविण शास्त्र पडे फिकें ॥ ६५ ॥

**गुप्त** तूं असासि या जगतांत (स्वा.)
विश्वचित्रपट नेमुनि तात ।
जे तुला उघडुनी बघतात
भक्तिनेत्र, जन ते तरतात ॥ ६६ ॥

**चक्रगदाधर** तू बा, धरिशी स्वकरांत कालचक्रातें (आ.)
कालगदाही तैशी तारिशि वधुनी भवोग्रनक्रातें ॥ ६७ ॥

---

१ चांगला. २ सिद्ध करू ३ मेघ. ४ विजेनें युक्त. ५ वर्षाऋतूतील. ६ अगांसहित ७ वाणी ८ विश्वरूपी विचित्र वस्त्र ९ संसाररूपी उग्र मगर
१० ज्यावर सोन्याचे अंगद आहेत असा.

वेधाहि तूंच असती, इच्छाशक्तीच निर्मि तव सर्गे[13]
कर्महि पाहुनि करिशी त्या त्या परि तूं जनां फलोत्सर्गे । ६८ ।

स्वांग तूं, तव तनू असे निजें (रथो.)
जन्म होय तव वा अयोनिजें ।
अन्य देह परकीय, जो घडे
रेत रक्त मिळुनीच बापुडें ॥ ६९ ॥

कुक्षींत[1] रक्षी जननी जयाते (इं.)
देवोनि पोशी रुधिरा, पयाते ।
जन्मोनि जो खावुनि अन्न पुष्ट
होई, जयाते वडतीहि कष्ट ॥ ७० ॥

उवा, लिखा, रोग, कृमी जयाते (उप.)
खाती, मजेनें करिति गृहाते ।
मेल्यावरी भक्षिति ज्या शृगाल[2]
श्वा[3] काकही[4] टोंचिति गृध्र गाल ॥ ७१ ॥

जो देह ऐसा परकीय साचा
तो आपुला हा भ्रम मानसाचा ।
स्वाधीन जो नित्यहि तो स्वताचा
तुझाचि तो एक जगत्पित्याचा ॥ ७२ ॥

अजित तूं ह्मणुनी असती हरी (द्रु. वि.)
सुरगणीं, पशुमाजिं जसा हरी[12] ।
रिपु तुला कधिं जिंकुं शकेच ना
करिशि केशव अतर्कवंचना[11] ॥ ७३ ॥

कृष्ण ! सत्य असती सुखधाम (स्वा.)
सत्सुखांस सुचवी तव नाम ।

---

१ पोटांत २ कोल्हे ३ कुत्रा. ४ कावळे. ५ सिंह ६ यमाला फसविणें. ७ सत्ता व आनंद यांना. ८ फलार्पण ९ स्वत:ची १० योनीवाचून होणारा ११ यमाला फसाविणें. १२ सिंह १३ सृष्टि.

कृष्णं जो तनय सत्यवतीचा
अंश तो तव निधीहि श्रुतीचा ॥ ७४ ॥

**दृढ** तुझ्या सम कोण बलाढ्या (द्रु. वि )
रविशशीसह जाय इला लया ।
अनलरूप जयीं तव संहरी
प्रलयिं कर्षुनिया जगता हरी ॥ ७५ ॥

**संकर्षण** नामहि यास्तव (उप.)
देती तुज भक्त प्रियस्तव ।
त्यांचे अघराशिहि कर्षिशी
त्यांते निजसंनिध ओढिशी ॥ ७६ ॥

**अच्युत** स्थळ तयास ना मिळे। नामही तुजसि हें तयामुळें (रथो.)
तूजपासुनि तया च्युती नसे। शांति त्यांस प्रलयांतही असे ७७

**वरुण** जो सुर पश्चिमदिक्पती • (द्रु. वि.)
प्रथित जो श्रुतिमाजि अपांपती ।
तवचि तोहि विभूति रमापती
म्हणुनि अर्पिति ही अभिधा यती ॥ ७८ ॥

**वारुण** तुजला वदती, वरुणतनय जे वसिष्ठ कुंभजनीं । (आ.)
ते तव विभूति साचे, सिद्धहि परि जे सतृष्ण तव भजनीं ।७९।

**वृक्ष** तूज वदती कवीश्वर
वृक्षसा अचल तू सदा स्थिर ।
वृक्ष देइ फल तेंवि सावली
भक्तकल्पतरु तूहि मावली ॥ ८० ॥

वृक्षिं पक्षि बसती तुझ्यावर
राहतें सकल हें चराचर ।

---

१ स्तुति ( ईश्वराची ) ज्यांना प्रिय असे २ नाशिसी. ३ अगस्तिऋषी. ४ लोलुप ५ शक्तीचा सांठा. ६ पृथ्वी ७ कृष्ण द्वैपायन [ व्यास ] ८ अढळ

विश्ववृक्ष असतीच बा हरे
छेदिसी भवतरूहि सत्वरें ॥ ८१ ॥

वारुणोवृक्ष हें नाम देती श्रुती । (स्र.)
विश्वरूपीच जो वृक्ष तू त्या प्रती ।
मूळ ज्याचें असे अंतरिक्षांत तें
स्कंधपर्णावली खालती लोंबते ॥ ८२ ॥

**पुष्कराक्ष** वदती तुज वाचें
व्यापिशी हृदयपुष्कर साचें ।
भक्त जैं तुजसि चिंतिति योगें
प्राप्त होशि हृदयीं अति वेगें ॥ ८३ ॥

(स्वाक्ष) ९६०९ (उप)

**महामना** हें तुज नाम वामन
तुझें महाशक्ति उदार बा मन ।
मनेंच तूं हें रचिशी महाजग
मनेंच संरक्षिशि नाशिशी मग ॥ ८४ ॥

**भगवान्** तुला बा अति योग्य नाम (उप.)
तूं षड्गुणांचें निजधाम राम ।
अपार ऐश्वर्य तुझें अनंता
व्यापी सुकीर्ती तव ह्या दिगंता ॥ ८५ ॥

तूं धर्म, वैराग्यहि देहधारी
श्रीही तुझी ती उपमा झुगारी ।
अगाध शक्तीहि दुरंत वीर्य
तू ज्ञानतेजोमय तेंवि सूर्य ॥ ८६ ॥

**भगहाही** तुज वदती, घेशी ऐश्वर्य वित्तमत्तांचें (आ.)
अचलचि भाग्य तयाचें जैसें हातांत वित्त मत्ताचें ॥८७॥

---

१ अपार. २ द्रव्यानें उन्मत्त जो त्याचें ३ दारू प्यालेल्याच्या ४ फांद्या व पानें ५ हृदयकमल ६ मूर्तिमत.

**आनंदी** तुज वदती, मग्नचि तूं सर्वदा निजानंदीं
**वनमाली** माला तव पदलंबी जणु पदांसि तव वंदी ॥ ८८ ॥

राहे सदाहि ताजी मुनिची काया जशी महायोगें
वनपुष्पिं नीलगिरिसा शोभे तव देह फार तिजयोगें । ८९ ।

**हलायुध** स्थूल तुझें करायुध (उपें.)
करीं सदा नांगर घेशि तूं बुध ।
विभूति तूं बा हरिची महाबल
म्हणूनि तूंते अभिधाहि बा बल ॥ ९० ॥

**आदित्य** तूं अदितिच्या उदरीं जनीते (व. ति.)
घेशी धरोनि अति ऱ्हस्व अशा तनूते ।
देवाधिराजभयहेतु हरावयाते
दैत्याधिराज बलि बद्ध करावयाते ॥ ९१ ॥

**ज्योतिरादित्य** तूं भानुबिंबांतरीं (स्र.)
राहुनी देशि त्या दीप्ति लोकोत्तरा ।
भानु कल्पांतिं तो लुप्त होई तरी
नष्ट नोहे तुझी दीप्ति दामोदरा ॥ ९२ ॥

**सहिष्णु** ऐसें अभिधान बा तुला (उप.)
लत्तामिषानें भृगु देइ दाखला ।
अजूनि तो तूं धरिशी उरावरी
शोभे जिथें तो पदकापरि हरी ॥ ९३ ॥

**गतिसत्तम** तुज वदती, उत्तम गति तूं समस्त संतांते (आ.)
पावुनि तूंते नेती जन्ममरणबंधनासि अंताते ॥ ९४ ॥

**सुधन्वा** तुला नाम देती मुरारी (उपें.)
तुझ्या शार्ङ्गचापा अरी भीति भारी ।

---

१ पायापर्यंत लोंबणारी २ इंद्राच्या भयाचें कारण. ३ शत्रु

रैवें रज्जुच्या शत्रु सोडी रणाते
जशी सिंहशब्दें धृती वारणाते ॥ ९५ ॥

**खंडपरशू** या घेशि तूही नामा (दिं.)
क्षत्रियांतें तूं वधशि परशुरामा।
छिन्न करिशी त्या एकवीस वेळां
डोह होई होवोनि रुधिर गोळा ॥ ९६ ॥

**दारुण** कर्म तुझें हें, तर्पण करिशी तदीय रुधिरानें (आ.)
**द्रविणप्रद**ही तैसा, कश्यप करिशी सुतुष्ट भूदानें ॥ ९७ ॥

**दिवस्पृक्** तुला वामना नाम शोभे (भु.)
किती उंच होशी महीच्याहि लोभें।
गळे व्योमगंगा पदाच्या प्रहारीं
पडे भूवरी लोकपापापहारी ॥ ९८ ॥

**सर्ववेदव्यास** तूं पांचवा वेद तो (स्र.)
निर्मिशी जो जनां बोधितो, ल्हादितो।
ज्यांत संवाद तो धर्म दावी जुना
गीतरूपी तुझा, ज्ञान दे अर्जुना ॥ ९९ ॥

**वाचस्पतिरयोनिज** प्रभो हे (पु. श्र.)
तूंते जनन योनिजन्य नोहे।
तूची करिशि वेदरूप नौका
न्याया तरुनि हा भवाब्धि लोका ॥ १०० ॥

**त्रिसामा** असें नाम हें तूज देती (भु.)
तुझी तीन सामें पवाडाच गाती।
बृहत्साम तैसें रथंतर्यही तें
तसें वामदेवाख्य हीं सामगीतें ॥ १०१ ॥

---

१ शब्दानें. २ धैर्य ३ हत्तीला ४ धनदाता

**सामग** तूंतें वदती रमसी तूं नित्य सामगानांत (आ.)
**सामहि** तूंची असशी विभूति तव सामवेद वेदांत ॥ १०२ ॥

**निर्वाण** तूज वदती मुनिवर्य बुद्ध[8] (व. ति.)
तूं शांत, चिन्मय, विराग, असंग, शुद्ध ।
तूं ब्रह्म निर्गुण, निरंजन, निर्विकार
तू पूर्ण, अव्यय, अरूप, अनंतपार ॥ १०३ ॥

ऊर्मीविणें जलधि चिन्मय जीवनाचा[1]
विस्तार तूं शशिविणें चितिचंद्रिकेचा[2] ।
आनंद तू विषयशून्य, तरंगशून्य
सद्रूप वस्तु किमपी हरि तूं, न शून्य ॥ १०४ ॥

**भेषज** भवरोगाते असशी तूं बा भर्वप्रिया[3] राम (आ.)
सेवुनि तूंते मिळविति, भवतापें तप्तचित्त आराम ॥१०५॥

**भिषक्** भवाख्या[4] हरिशी गदाते[5] (उप.)
कामादि नागा[6] हरिशी[7] गदा ते ।
मारी तयाच्या हरुनी मदाते
आर्ता[9] तुझी भक्तिच कामदा ते ॥ १०६ ॥

शस्त्राविणें हरिशि हृद्गतशल्यपुंज (व. ति.)
रागादिरोग अगदाविण एक गुंज ।
तूं आदिवैद्य वरवैद्यगणाधिराज[10]
ज्या सेविती हर विरिंचि[11] गणाधिराजें[12] ॥ १०७ ॥

**संन्यासकृत्** तूं अवधूत दत्त (उप.)
वैराग्य हेंची तव सर्व वित्त ।

---

१ पाण्याचा २ ज्ञानरूपी चांदण्याचा. ३ शंकराला प्रिय किंवा शंकर आहे प्रिय ज्याला असा. ४ संसाररूपी ५ रोगाते. ६ हत्तीला ७ सिंहाप्रमाणें. ८ ज्ञानी लोक किंवा बौद्ध. ९ आर्त [ पीडित ] जनाला १० श्रेष्ठ वैद्यसमूहाचा राजा. ११ ब्रह्मदेव १२ गणपति

संचारिशी भूवरि भिक्षुवृत्ती
*करावया लोकतमोनिवृत्ती ॥ १०८ ॥

**शम**चि तूं हरि निग्रह विग्रही (द्रु. वि.)
सहज पावति तूज सुनिग्रही ।
शमचि साधन तूं उपदेशिसी
विषय सोडि तया पद दाविसी ॥ १०९ ॥

**शांत** तूं जलधि नष्टतरंग (स्वा.)
सर्वदा निजसुखातचि दंग ।
शांततेंत न घडे कधि भंग
भीति ते तुजसि कोप अनंग ॥ ११० ॥

**निष्ठा** तुला वदति विठ्ठल वेदनिष्ठ । (व. ति.)
निष्ठाचि साधन तवाभिगमीं वरिष्ठ ।
कल्पांतिं होइ तुजमाजि जग प्रविष्ट
भक्ताचिया हृदिं जशी तव मूर्ति इष्ट ॥ १११ ॥

**शांतिरूप** असती यदुराया (स्वा.)
तूंचि साधन भवाब्धि तराया ।
शांति त्या भजति तूज जे सदा
मोददा, भवदवाग्नितोयदा ॥ ११२ ॥

**परायण**चि तूं सुरासुरनरा मुरारी खरा (पृ.)
हरादि सुर ते तुला शरण येति मायाहरा ।
पदांबुज तुझें तयां परम इष्ट तें स्थान गा
तदीय रजलेशही पविचि पापरूपी नगां ॥ ११३ ॥

**शुभांग** तव पाहुनी भुलुनि जाति गोपी किती !
त्वदर्थ धन बांधवां धवसुताहि त्या टाकिती ।

---

१ मूर्तिमान २ ज्याचे तरंग [ लाटा ] शांत झाल्या आहेत असा. ३ काम, मदन ४ तुझ्या प्राप्तींत. ५ संसारदावानलाला मेघ. ६ वज्र ७ पर्वताला

कुणी बघति रूप तें करुनिया दिठी निश्चळा
कुणी सुरव[1] ऐकुनी ह्मणति पुण्य आलें फळा ॥ ११४ ॥

कुणी करिति गानही तव सुगीत ऐकोनिया
कुणी वदति कृष्ण वा तुज मुकुंद लाजोनिया ।
कुणी त्यजुनि लाजही निकट होति देहें तुला
कुणी गुरुभयें[2] मनेंच निज पावती हेतुला ॥ ११५ ॥

तुझी सुरसमूर्ति ती निजमनांत आणोनिया
करूनि निजवृत्तिही सतत चिंतनें तन्मया ।
सुखा अमित पावुनी सकल पुण्य नेती लया
अती व्यसन भोगुनी विरहजन्य पापोच्चया ॥ ११६ ॥

जगत्प्रसवहेतुते तुजसि चिंतुनी ईश्वरा
निरुच्छ्वसन होउनी, विसरुनी जगा नश्वरा ।
जरामरण वारुनी, तुजसि पावती सत्वरा
शुभकरें[3] शुभांग हें तव किती जना तत्परा ॥ ११७ ॥

**शांतिद** यापरि होशी भक्तां जे चिंतिती तुझी कांत (आ.)
मूर्ती निशिदिनि हृदयीं पावुनि स्वांतप्रसाद[4] एकांत ॥ ११८ ॥

**स्रष्टा** तूं जगताचा सर्गारंभीं समस्त तत्त्वांते
निर्मिशि; त्यावरि धाता निर्मी भुवनासवेंचि सत्त्वांते[5] ॥ ११९ ॥

**कुमुद** तूं धरुनी मनुजाकृती (द्रु. वि.)
भुवनिं या करण्या मनुजा कृती[6] ।
हरुनि आत्मबलें अवनीभरा
विपुल भोगिशि वा सुखनिर्भरा ॥ १२० ॥

**कुवलेशय** नाम तुला हरी । निजसी सागरिं तूं अहींवरी[7] ॥ (वि.)
अथवा जगिं जीवहृदंतरीं । हरि जैसा गिरिराजगव्हरीं ॥ १२१ ॥

---

१ मधुर स्वर. २ वडिलांच्या भयानें. ३ कल्याणकारक ४ मनाची प्रसन्नता ५ प्राण्यांते ६ कृतार्थ. ७ शेषावर.

**गोहित** तुज ह्मणती, कीं मोहित जन करिशि सातव्या वर्षी (आ.)
अंगुलिनें गिरि धरुनी गोरक्षणिं जैं सुरेंद्र जल वर्षी ।१२२।

**गोपति**हि याचसाठीं पालक तूं धेनुभूमिराणीचा
खाणी जी ज्ञानाची कर्ता तूं त्याहि वेदवाणीचा ॥ १२३ ॥

**गोप्ता** विश्वाचा तूं, मायापटलात राहसी गुप्त
प्रकटहि होसी, जेव्हा होती जगिं धर्म सर्वही लुप्त ।१२४।

**वृषभाक्ष**हि तैं वदती पाहुनि तव धर्मरूप दृष्टीते
देई जी तुष्टीते वर्षुनिया भक्तकामवृष्टीते ॥ १२५ ॥

**वृषप्रिय** असें तुला ह्मणति; धर्म तूंते प्रिय (पृ.)
तदर्थ धरिशी विचित्र तुनु तू विचित्रक्रिय ।
वराहनरकेसरी[2]कमठ[3]कृष्णरामादिका
जनांसि तव तारितें चरित शूद्ररामादिकां[4] ॥ १२६ ॥

**अनिवर्ती** तुज ह्मणती, धर्माचरणीं पराक्रमांत रणीं (आ.)
दक्ष न कोणी तुजसा, हरिशी रिपुतें जसा तमा[5] तरणी[6] ।१२७।

**निवृत्तात्मा** तूं बा तरिहि असती; सगरहिता (शि.)
तुझी कर्मी वृत्ती खचितचि कराया जनहिता ।
निजाचारें लोकां अनुकृति कराया शिकविशी
जनांची ही रीती अनुसरति ते श्रेष्ठकृतिशी ॥ १२८ ॥

**संक्षेप्ता** तूं विश्व नेशी लयास (शालि.)
पोटीं घेशी भक्षुनीया तयास ।
बीजामाजीं वृक्ष जैसा वडाचा
त्वत्पादाब्जी वास या चिज्जडांचा[7] ॥ १२९ ॥

**क्षेमकृत्** नाम हें तूजला शोभतें (स्र.)
त्वत्कटाक्षें जना क्षेम तें लाभतें ।

---

१ रक्षण करणारा २ नारसिंह ३ कूर्म ४ स्त्रियादिकांना. ५ अधःकाराला. ६ सूर्य ७ चैतन्य व जडवस्तु यांचा

भक्तवित्तासि तूं रक्षिसी कामदा
त्याचिया त्रासदा त्रास देशी सदा ॥ १३० ॥

शिव तुज ह्मणुनी हें नाम देती श्रुतींत (मा.)
त्वरित हरि अघा जें प्राप्त होतां श्रुतींतें ।
वरतम तव भक्ता नामही हेंच आहे
निशिदिनिं हरि नामा कंठिं जो नित्य वाहे ॥ १३१ ॥

सहावें शतक समाप्त.

---

## शतक ७ वें.

**श्रीवत्सवक्ष** सितें चिन्ह तुझ्या हृदातें (व. ति.)
श्वेताब्जसें सजवितें यमुनाह्रदातें ।
पाहूनिया तिजमधें निजरूपसाम्य
केली तुवां तटिं तिच्या बहु केलि रम्य ॥ १ ॥

**श्रीवास** हें तुज असे बहु योग्य नाम
श्रीचें सदा असासि तूंचि विलासधाम ।
तीतें नसे प्रिय तसें स्थल रम्य अन्य
राहे सदोदित ह्मणूनि तिथेंच धन्य ॥ २ ॥

**श्रीपती** जलधिमथनकालीं (स्वा.)
सुंदरी प्रकट जी जगिं झाली ।

---

१ त्रास देणाराला. २ कानात. ३ पांढरें ४ पांढऱ्या कमळाप्रमाणें. ५ यमुनेच्या डोहाला ६ घर ७ क्रीडा ८ श्रेष्ठ.

दिसे क्रम जगीं तुझ्या सकल सृष्टिकर्मीतही
क्रमें निपजवी जलस्थलचरादि जीवां मही ॥ ८० ॥

जग प्रथम हें असे गगनरूपची बा प्रभू
समीर निपजे नभीं पवनिं तोय त्यांतूनि भू ।
महींत निघती क्रमें विविध जातिच्या ओषधी
वनस्पतितुनीच जीव निघती सहस्रावधी ॥ ८१ ॥

कलेवरँ दिसे अणूपरिसही कुणांचें तनू
विशाल बनती गिरीपरिसही कुणांच्या तनू ।
तयांत निपजे शिरोमणि मनुष्य हा शेवटीं
विचित्रचि अशा क्रमें घडति सृष्टिच्या राहटी ॥ ८२ ॥

**महाकर्मा** तू बा; कारिशि अति या अद्भुत जगा (शि.)
असंख्य व्योमीं तू फिरविशि सदा तारकगणा ।
महत्वाची ज्याच्या गणति करणें शक्य नच गा
अती दूरत्वाची मनिं न करवें कल्पिहि कुणा ॥ ८३ ॥

असंख्य प्राणी या जगिं विविधही निर्मिशि हरी
शरीराची ज्याच्या तव कुशलता दावि रचना ।
मयूरादी पक्षी रुचिर दिसती ते किति तरी
समुद्रसृष्टीही विविध करिते विस्मय मना ॥ ८४ ॥

**महातेजा** तूते कवि वदति तेजोनिधि हरी
तुझ्या तेजोलेशें दिनकर जगा भासित करी ।
जगाच्या अंती ते रवि शशि लया जाति गगनीं
स्वयंज्योती तू बा, विदित तुज नोहेच रजनी ॥ ८५ ॥

**महोरग** प्रथित नाम देतिही (चि.)
विभूति तो तवचि वासुकी अही ।

---

१ पाण्यांतील व जमिनीवरील [ प्राण्यांना ] २ वायु ३ आकाशांत ४ वायूत ५ पाणी. ६ पृथ्वी ७ शरीर ८ सूक्ष्म. ९ रात्र १ सर्प [ शेष ]

महापुरूष जरि तूं, तुला धरी
उपासक प्रतनु आपुल्या उरीं ॥ ८६ ॥

**महाक्रतू** हें तव नामधेय (उप.)
तुझी विभुती हयमेध होय ।
प्रपंच हा एक महाश्वमेध
लीला तुझी ज्या करि ती अगाध ॥ ८७ ॥

**महायज्वा** तूं बा करिशि हयमेधा रघुपती (शि.)
ऋषी विश्वामित्रासम बहु जयासाठि यजती ।
जगत्सर्गत्राणप्रलयविधि हा अध्वर महा
महायज्वा शब्द प्रभु तुजसि देती म्हणुनि हा ॥ ८८ ॥

**महायज्ञ** संज्ञा तुला देति सुज्ञ (उपें.)
तुझी नामचिंता असे हाचि यज्ञ ।
जया साधिती भक्तियोगें कृतज्ञ
विभूती तुझी हा असे नामयज्ञ ॥ ८९ ॥

देती तुला नाम कवी महाहवी (उप.)
सेना कुरूची करिशी महाहवी ।
महाहवीं त्या निजकोपपावकीं
स्ववंश तैसा द्विज-कोप-पावकीं ॥ ९० ॥

**महाहवी** तू स्वयमेव होशी
लोकार्थ घेवोनि बहू श्रमाशी ।
देशी बळी जैं निजविग्रहाते
विप्रप्रकोपोत्थविभावसूते ॥ ९१ ॥

महाहवीं त्या मिळवूनिही जया
लोकार्थ तू ती त्यजसी निज प्रिया ।
महाहवी तीस करोनि पावकीं
देशी सुकीर्ती तिजला जगत्रिकीं ॥ ९२ ॥

---

१ लहान. २ अश्वमेध. ३ यज्ञ ४ नामस्मरण ५ मोठी आहुती ६ महायुद्धात ७ आपल्या देहाला ८ ब्राह्मणाच्या कोपापासून उत्पन्न झालेल्या अग्नीने ९ मोठ्या युद्धांत [ रावणाबरोबरच्या ].

**वीर** तूं गतिमधें मनोजव (रथो –
धीर तू अतुल बुद्धिवैभव ।
शूर तूं विजितसर्वशात्रवं
दूर तो रिपु तुला मनोभवं ॥ ६४ ॥

**अनंत** तव बा हरी गुण, शरीर, शक्ती, मती (पृ.
न देश तुज कालही नियमिती; अचित्या कृती ।
**धनंजय** तुझी कला तरिहि विश्वरूपाकृती
तुझी बघुनि विस्मयें चकित होय त्याची मती ॥ ६५ ॥

धनंजय खरे तुह्मी उभयतांहि कृष्णद्वय
अमूल्य धन तू धना इतर जिंकिशी चिन्मय ।
किरीटिहि तसा रणीं करुनि शत्रुते इंधनें
प्रतापदहना, हरी सकलही तयांचें धन ॥ ६६ ॥

**ब्रह्मण्य** तूं ब्राह्मण वेद यांचा (इं. व.
कैवारिही ज्ञानतपोधनाचा ।
शत्रू तयांचे चिरिशी स्वतां ते
तूं इंद्रवज्रापरि पर्वताते ॥ ६७ ॥

**ब्रह्मकृत्** तुला नाम बा असे । वेद निर्मिसी ज्ञानही तसें ।( का. )
वेदरक्षणा कारणें द्विज । निर्मिसी तपातेहि नंदज ॥६८ ॥

**ब्रह्मा** असें वर्णिति तूज वेद (उप.)
नसेच कांहीं उभयांत भेद ।
जैं सृष्टिकृत् तू तुज नाम ऐसें
रक्षार्थ विष्णू लयिं रुद्र जैसें ॥ ६९ ॥

**ब्रह्म** तूंचि निर्गुणा, निरंजनों निरामयों (चा.)
निश्चला, निराकृती, निरुत्सुका, निरप्ययां ।
निष्कला, सुनिर्मला, निरीश्वरा, निराश्रया
निष्क्रिया, निरंकुशा, निरंतरा; निरालया ॥ ७० ॥

---

१ अर्जुन २ धनाला जिंकणारे. ३ जळण ४ निर्दोष. ५ निरोगी ६ निराकार. अविनाशी. ८ ज्याला स्थान किंवा घर नाहीं असा ९ शत्रुमंडळ १० काम

ब्रह्म तूज वदती मुनिवर्य (स्वा.)
तू जगत्प्रभवकारण वीर्य ।
तूंच रक्षण जगा करिशीही
तें तुझ्यातचि पुन्हा शिरतेंही ॥ ७१ ॥

सच्चित्सुखात्मकचि तू हरि एक तत्त्व (व. ति.)
सर्वातिशायिहि असेच तुझें बृहत्त्व[1] ।
चित्ता अचिंत्यचि तुझे गुणधर्म सारे
यालागि निर्गुण तुला वदती मुरारे ॥ ७२ ॥

मनुष्यगुणकल्पना अनुचिता तुझ्या ठायिं ती (पृ.)
अचिंत्य तव शक्तिला उचित नाम माया किती ! ।
तुला न वदवे प्रभो पुरुषही वदूं स्त्री कसें !
यथार्थ म्हणुनी तुला खचित ब्रह्म संज्ञा असे ॥ ७३ ॥

**ब्रह्मविवर्धन** तूते ह्मणती तू करिशि वेदवृद्धीते । (आ.)
विप्रतपोवृद्धीही; ज्ञानोत्कर्षार्थ देशि बुद्धीते ॥ ७४ ॥

**ब्रह्मवित्** तुला विप्र बोलती । ब्रह्म जाणसी तूंच सन्मती (का.)
तूंच देशि तें ज्ञान मानवां । व्यर्थ चालते लोकिं वानवा ७५.

**ब्राह्मण** वास्तव तूंची, अत्रिकुलीं घेशि तूंची अवतार (आ.)
प्रल्हादयदुप्रभृती नृपतींते करविशीच भव पार ॥ ७६ ॥

**ब्रह्मी** तुजला ह्मणती, श्रुतिसागर तूं, तपोनिधी, ज्ञानी
**ब्रह्मज्ञ** याचसाठीं दिधलें तुज नाम सत सुज्ञानीं ॥ ७७ ॥

**ब्राह्मणप्रिय** नाम हें तुला । देति विप्र वा लोकबंधुला (का.)
तूंहि सांगसी आपुल्या मुखें । 'विप्र ते मम प्रीतिचे सखे' ७८

ब्राह्मणांसही तूंच बा प्रिय । तूजवीण त्यां सर्व अप्रिय ।
तूजसाठिं ते राज्य सोडिती । धर्म पाळुनी तूज जोडिती ७९

**महाक्रम** असें तुला उचित नाम बा वामना (पृ.)
समुद्धरसि तू क्रमें भवमहाब्धिमग्ना जना ।

---

१ मोठेपणा. २ सर्वांहून ज्यास्त

**कालनेमिनिहा** तूंते, म्हणती यदुनायक । (अ.)
मारिशी कालनेमीते, विघ्ना जेंवि विनायक ॥४८॥

नेमि[1] जी कालचक्राची, अविद्या नाशिसी तिला ।
देउनी ज्ञान भक्तांते, ह्मणुनी नाम हें तुला ॥ ४९ ॥

**वीर** तू दनुजदर्पमर्दना (रथो.)
शीघ्रवेगखगराजवाहना[2] ।
शूरवंश[3]धृतदेह पावना
**शौरि** तूं विहित[4]गोकुलावना ॥ ५० ॥

**शूरजनेश्वर** रामा, मारुति सुग्रीव दास्य तव करिती (आ.)
इंद्रादिक शूरांची सत्ता राहे सदैव तव करिं ती ॥ ५१ ॥

**त्रिलोकात्मा** तूं बा, त्रिभुवन तुझा देहचि हरे (शि.)
वियद्गंगा[5]रूपी भगण[6] तनुचें मध्यचि खरें ।
मृगव्याधादी[7] तीं अमित तव शीर्षेच असती
तसे ते केतूही[8] तदुपरि शिखाकार दिसती ॥ ५२ ॥

**त्रिलोकेश** तू ईश सर्वा जगाचा (भु.)
जिव्हाळाच ऐश्वर्यवीर्यादिकाचा ।
त्वदांशेंत लोकेश[9], भूतेश[10], शक्र[11]
तुझें चक्र भेदी महामोहनक्र ॥ ५३ ॥

**केशव** तुजला ह्मणती, लोकेशहि तो महेश तव तनुजे[12] (आ.)
जिंकीति भृंगीरागा[13], केश तुझें तूंहि केशि तो दनुजें[14] ॥ ५४ ॥

**केशिहा** तुला नाम यास्तव (का.)
देउनी मुनी गाति संस्तव ।
अश्वरूप तो केशि संचरे
मारण्या तुला गोकुळीं हरे ॥ ५५ ॥

---

१ धांव २ गरुड. ३ शूरनामक यादव राजांचा वंश ४ केलें आहे गोकुलाचें रक्षण ज्यानें. ५ आकाशगंगा. ६ ताऱ्यांचा समूह. ७ मृगाजवळचा एक मोटा तारा. ८ धूमकेतू ९ ब्रह्मदेव १० शंकर ११ इंद्र १२ पुत्र १३ भृंगाच्या रंगाला १४ राक्षस

**हरिशि** यापरी दुष्टदुर्मदा । करिशि भक्तही शुद्ध कामदा ॥ ( का. )
हरुनि त्याचिया पापराशिते । हरि सुनाम हें ताप नाशितें ५६

**कामदेव** तूज नाम पूरवीशि कामना ( चा. )
याचिती तुलाच लोक काम सर्व वासना ।
**कामपाल** तूंच देशि रक्षिसीहि अर्थ ते
तोय निर्मि पंकजासि राखितेंहि त्यास तें ॥ ५७ ॥

**कामी** खराचि तूं बा, लोका सांगोनि कर्म निष्काम ( आ. )
ह्मणवूनि आप्तकामहि घेण्या भक्तार्पितार्थ बहुकाम ॥५८॥

**कांत** तू अती श्यामसुंदरा । सेवितें सदा तूज इंदिरा ॥ (का.)
जेंवि भक्तधी सेवि सत्पदा । तूझिया हरे सर्वकामदा । ५९ ।

'क' प्रजापती सृष्टि जो करी । अंत त्यासही तो तुझ्या करीं
अर्थ हा दुजा नामि या असे। कांत ज्यास तूं सार्त तो नसे६०

**कृतागम** असें तुला ह्मणति सर्वविद्यानिधी ( पृ. )
श्रुती वदसि तूच बा कथिति ज्या निषेधा विधी ।
श्रुतीतरहि आगमा रचिशि तूंचि बौद्धादिकां
मनू, कपिल, बादरायणहि तूच विश्वात्मका ॥ ६१ ॥

**अनिर्देश्यवपु** तूं विश्वरूपा
वराहकूर्मादि घेशी स्वरूपा ।
निर्देश रूपासि तुझ्या कराया
न शक्य कोणासहि रामराया ॥ ६२ ॥

**विष्णू** तुझी अतुल शक्ति शिरून राहे . ( व. ति. )
विश्वांत या तनुत जीवित जेंवि बा हें ।
देती ह्मणूनि निगमागम वेद सारे
हें नांव सत तिलका यदुच्या तुलारे ॥ ६३ ॥

---

१ इच्छा २ इच्छितार्थ ३ पुष्कळ आहे इच्छा ज्याची असा. ४ विनाश-युक्त ५ ब्राह्मण [ ऐतरेयादि ] व मन्त्र किंवा तंत्रे

अशोकवनिं जी वसे बहु सशोक ती सुंदरी ( पृ. )
**विशोक** करुनी खला वधसि त्या तिला जो हरी ।
महीपति बिभीषणा करिशि सर्वलोकप्रिय
प्रियेसहित येउनी निजपुरीं प्रजेचें प्रिय ॥ ३५ ॥

**शोकनाशन** ह्मणोनिच नाम
तूज देति सदया सुखधाम ।
दर्शनेंच हरिशी जनशोक
वृक्षसा सुमनर्युक्त अशोक ॥ ३६ ॥

( ग्रं. )

**अर्चिष्मान्** तू चंद्रसूर्यादिकांना ( आ. )
तेजा देशी सर्वतेजोनिधाना ।
तेजोरूपी व्यापिशी तूं अखड
सर्वा भूतां तेजसें कांचखड ॥ ३७ ॥

**अर्चित** तुजला ह्मणती, अर्चिति सज्जन तुझ्याच अर्चेते ( आ. )
चर्चिति चदन खर्चिति कालहि करुनी त्वदीय चर्चेते ॥३८॥

**कुंभाचि** तूं जो निर्मुनि ब्रह्मांडकलश तयात मग शिरसी
अथवा त्रिभुवनरूपी हा जो घट तो स्वयेंचि तूं अससी॥३९॥

कुंभीं जीवन जैसें, चिज्जल सर्वहि तुझ्यांतची सांचे
सर्गारभीं अंतीं जलमय भुवनास पात्र तूं साचें ॥ ४० ॥

**विशुद्धात्मा** तू बा तरिहि अससी, स्पर्श तुजला ( शि. )
नसे विश्वाभाचा; जल न चिकटे अर्बुजदला ।
जसा वायू राहे गगनिं परि तें स्पर्शि न तया
तशी सृष्टी राहे तुज मधिंच ही पार्थसखया ॥ ४१ ॥

**विशोधनचि** तूंच बा अससि जीवसघाप्रती ( पृ. )
निजापरि तदीयही करिशि तूं विशुद्धा मती ।

---

१ फुलांनीं युक्त २ कांचेचा तुकडा. ३ मूर्तीते. ४ चैतन्यरूपी जल [ किंवा चित्- व जड ] ५ विश्वरूपी पाण्याचा ६ कमलपत्राला

तुझें करुनि कीर्तन स्तवन-चिंतनानुस्मृती
विधूत-मल होउनी त्वरित पावती सद्गती ॥ ४२ ॥

**अनिरुद्ध** तुला म्हणती सुमती (तो.)
तव कुंठित होय न कधींच गती ।
अवरोध[1]गृहीं रिपुच्या शिरशी
रणिं जिंकिशि बा[2]ण, उषा हरिशी ॥ ४३ ॥

**अप्रतिरथ** असशी तू जिंकिशि त्या हरसहाय्य[3] बाणाते (आ.)
वाटे तूंच पुरारी पाहुनि तुज हरसहाय्य[4] बाणाते ॥ ४४ ॥

**प्रद्युम्न** तूं चिरचि या जगाचें (उप.)
श्री मूर्तिमान् मंदिर षड्गुणांचें ।
सर्वाति[5]शायी तव दिव्य भू[6]ती
पती रतीचाहि तुझी विभूती ॥ ४५ ॥

**अ[illegible]विक्रम** कसविमर्दना (द्रु. वि.)
विजितरावण, अर्जुन[7]तर्दना ॥
क्रमित[8]लोक, बलिस्मय[9]दारणा
हतकश्य[10]पुपती, निज[11]तारणा ॥ ४६ ॥

रदसमुद्धृ[12]तभू श्रुतिमंदिर
अमृतमथनकृत् धृतमंदर ।
प्रलयतोयनिमग्न[13]धराधर
चरित वानु शके न धराधरें[14] ॥ ४७ ॥

---

१ अत.पुर [जनानखाना] २ बाणासुराला. ३ शंकर आहे सहाय्य ज्याला असा. ४ शंकराच्या सहाय्यार्थ घेतलेलें बाणरूप ५ सर्वाहून श्रेष्ठ. ६ ऐश्वर्य ७ सहस्रार्जुनाला तोडून टाकणारा. ८ तिन्ही लोकांचें (तीन पावलांनी) आक्रमण केलेला. ९ बलिराजाचा गर्व किंवा मद हरण करणारा. १० हिरण्यकशिपुला मारणारा ११ स्वकीय भक्तांना तारणारा. १२ दांतानें भूमीला उद्धरणारा [असा जो वेदरूपी वराह] १३ प्रलयजलांत बुडालेल्या पृथ्वीला [मत्स्यरूपानें] धारण करणारा १४ शेष.

**ज्योतिर्गणेश्वर** हरी, शशि सूर्य तारे  ( व. ति. )
आज्ञेंत वागति तुझ्या नभिं गोल सारे ।
तेजें तुझ्या चमकतीहि उजेड देती
अंतीं तुझ्यांतचि पुन: विलयास जाती ॥ २० ॥

**विजितात्मा** तू असती, भक्तीनें भक्त जिंकिती तूंते  ( आ. )
प्रेमें अर्पिति जें जें, घेशी अत्यादरें किती तूं तें ॥ २१ ॥

**विधेयात्मा** तूं बा नरगृहिं हयों चोळिशि करीं  ( शि. )
कण्या प्रेमें खाशी विदुर तुज ज्या अर्पण करी ।
तनूते जो वेधी तव समरिं त्या बाणनिकरीं
तया भेटी देशी शरशयनिं जैं लुंठन करी ॥ २२ ॥

पित्याच्या आज्ञेते अनुसरुनि जासी झडकरी
घनीं सोडोनीया धन, तुरगें, सिंहासन, करी ।
जयाते जिंकोनी हरण करिशी राज्य सहसा
उभा त्याचे द्वारीं सतत वससी सेवक जसा ॥ २३ ॥

**सत्कीर्ती** ह्मणुनी तुझी जगिं बहू झाली असे वामना (शा. वि.)
जीते सेवुनि भक्तियुक्त करिती लोक स्वकीया मना ।
पापें जाति लयास, पुण्यनिचयप्राप्ती तशी होतसे
पाहोनी तव चित्रचित्र चरितें ईशत्व चित्तीं ठसे ॥ २४ ॥

**छिन्नसंशय** ह्मणूनिच बा हें  ( स्वा. )
नाम देउनि तुला श्रुति बाहे ।
सर्व विश्वहि तसें तुजला हें
आवळ्यापरि करीं दिसताहे ॥ २५ ॥

नाना तर्क कुतर्क जे मनिं बहू येती अशा मानवां (शा. वि.)
अध्यात्माचा करितां विचार तवही या सृष्टिची वानवा ।
षट्शास्त्रें शिणती, न कांहिं सुचतें, येते उदासीनता
या काळीं न कुणी तुझ्याविण हरी शंका हरी तत्त्वतां ।२६।

---

१ अर्जुनाच्या घरीं  २ समुदायानें  ३ लोळणें. ४ घोड्यांना.  ५ हत्ती.

**उदीर्ण** हरि तूं गुरू सकलही गुरूंचा पती (पृ.)
जगीं प्रगट होशि तूं करिसि शिष्य संतांप्रती ।
श्रुतिग्रथित अर्थही विवरुनी जगा सांगशी
उदाहरण द्यावया जगिं तसें स्वयें वागसी ॥ २७ ॥

**सर्वतश्चक्षु** तूं पाहसी सर्व ही (स्र.)
[1]सृष्टि जेंवी तुला भक्त ते सर्वही ।
सर्वही व्यापिशी ज्ञानरूपी जरी ।
काय चक्षू तुला कायद्याते करी ॥ २८ ॥

**अनीश** तूंते जगदीश नाम (उपें.)
धनी तुला अन्य नसेचि राम ।
स्वतंत्र तूं तात प्रजापतीचा
प्रजापतीसा गिरिजापतीचा ॥ २९ ॥

**शाश्वतस्थिरचि** तूं सनातन (रथो.)
नित्य, निश्चल तसा निरंजन ।
अन्य वस्तु अथवा रितें स्थळ
नाहिं वा, ह्मणुनि तूं अचंचल ॥ ३० ॥

**भूशयन** करिशि रामा दर्भावरि दक्षिणाब्धिच्या तीरीं (आ.)
शरण न येतां तुजला क्षुब्धहि करिशी समुद्र निज तीरीं ।३१।

भूषणभूषित निज भुजि टेकुनि शिर नेशि तनि रजनीते
**भूषण** निजवंशाचें जाणुनि तो येइ शरण मग तूते ॥ ३२ ॥

भूषण तूं ब्रह्मांडा, जगता तेजोनिधान जेंवि रवी
ज्याच्या तेजोलेशें मृन्मय तनु नर जगांत या मिरवी ॥ ३३॥

**भूति** तू सकलवैभवधाम (स्वा.)
भूतिदायक जना तव नाम ।
भूतिलाभ घडण्या हृत[2]काम
भूतनाथ[3] भजसी हतकाम ॥ ३४ ॥

---

१ निरिच्छ. २ ज्यानें मदन मारला आहे असा ३ शंकर. ४ ऐश्वर्य (विभूति).

खाण जी सकल सुंदरतेची
ती तुलाचि सकलातुनि वेची ॥ ३ ॥

**श्रीमतांवर** खरा हरि तूची
श्री त्वदीय विविधाशयसूची ।
त्वत्कटाक्षलव अन्य सुराशी
देतसे अमित वैभवराशी ॥ ४ ॥

**श्रीद** तूज ह्मणुनी ह्मणती ते
श्री तुवा दिलि तिच्या गणतीते ।
कोणिही नच शके करण्याते
दातृतेसम न ये वरण्याते ॥ ५ ॥

श्रीसही तुजमुळेंच वा असे
श्रीत्व; चंद्रकृत चांदणें जसें ।
सांवली जशि पदार्थसंगता
सुप्रभा जशि सुरत्ननिर्गता ॥ ६ ॥

**श्रीश** नाम ह्मणुनी तुज साजे
नित्य ती तव अधीन विराजे ।
जी जगत्प्रभवकारिणि माया
श्रीच नाम तिज ती तव जाया ॥ ७ ॥

**श्रीनिवास**चि तुझा असे हरी । तीजवाचुनि तुझी स्थिती तरी (रथो.)
जाणण्या क्षम असे जगीं कुणी । जाणिजे गुणगणींच वा गुणी ।८।

**श्रीनिधि** तुजला ह्मणती, असशी लक्ष्मीनिधान गा राम । ( आ. )
सागर सौंदर्याचा, भक्तांचा कल्पपादपाराम ॥ ९ ॥

**श्रीविभावन** हरी तुज नाम । वित्त अर्पिशि जना धनकाम । (स्वा.)
पाहुनी विविध तत्कृत कर्म । जैमिनीस नकळे तव वर्म ।१०।

---

१ कल्पवृक्षांचा बाग २ ज्याला गुण आहेत तो [ पदार्थ ]

**श्रीधर** तुजला ह्मणती, धरिशी श्रीते सदैव निजह्रदयीं (आ.)
भक्त परम तुज जैसे, सोडुनि श्रीते सदैव निजह्रदयीं ।११।

**श्रीकर** नामहि देती, धरिशी तूं कीं सदाहि श्रीस करीं
देशी भक्ता मुक्ती, यश विमल दिशांत दाहि श्री सकरी ।१२।

**श्रेयः** स्वरूप असती सुख शाश्वत तूं सनातन ब्रह्म
**श्रीमान्** वेदश्रीनें, सुचवी श्रशिब्द वाङ्मयब्रह्म ॥ १३ ॥

**लोकत्रयाश्रय** असें वदती तुला ते (व. ति.)
आधारभूत असती भुवनत्रयाते ।
ब्रह्मांड तूं निजबलें धरिशी स्थितींत
आहे ह्मणोनि नियेती नभिं तद्वतींत ॥ १४ ॥

**स्वक्ष** तूं असासि देवकिबाला (स्वा.)
नेत्रतेज भुलवी व्रजबालीं ।
लोकतापहरणींहि शशांका
जिंकितील तव नेत्र न शंका ॥ १५ ॥

**स्वंग** तू निपजसी यदुनाथ । या भयेंच जणु तो रतिनाथ ।
पोळला, मग निमित्त पिनाकी । होउनी दवडि त्याप्रति नीकी १६

भवनेत्रपातपुण्यें तेथुनि मग तो सुतत्व तव लाहे (आ.)
साधाया पहिल्याहुनि सुंदर तनुते सुसंधि ही पाहे ॥१७॥

**शतानंद** तू वद्य आनदकंद (भु.)
त्वदानंदलेशा भजे भूतवृंद ।
जगातील आनद ओंढेचि साचे
त्वदानंद सिंधू तिथें सौख्य साचे ॥ १८ ॥

**नंदि** तू वरद, नंदनदना । नंदिकेशकृतपादवदना । (रथो.)
नंदकारिकृतदैत्यकदना । इंदिरार्पितसुगधचंदना ॥ १९ ॥

---

१ लक्ष्मीला २ सपत्तीला ३ हत्तीसहित [ गजांत लक्ष्मी ] ४ वेद ५ नियमितपणा ६ गोकुळातल्या तरुण स्त्रिया ७ मदन. ८शंकर ९ नंदक नामक तरवार व सुदर्शन चक्र. १० अंगानें चांगला [ सुरूप ]. ११ सुनेत्र. १२ स्वर्गी.

विराटरूपी निज देह हा हवी
कल्पांतवैश्वानरवार्क्ति घालिशी ।
म्हणोनि तूते अभिधा महाहवी
स्वयेंच वा विश्वहवीस भक्षिशी ॥ ९३ ॥

**स्तव्य** तूंचि असशी जगतांत (स्वा.)
तूजलाचि सुमती भजतात ।
भिन्न भिन्न पथ जे धरितात
लोक तेहि तुजला मिळतात ॥ ९४ ॥

**स्तवप्रियचि** तूं, अती प्रिय तुला स्तुती श्रीपती (पृ.)
किती तुज यथामती स्तवुनि सद्गती पावती ।
नती करुनि जे रती धरुनि तूज येती यती
कृ[1]ती कारिशि त्याप्रती न ववताचि जाती मती ॥ ९५ ॥

**स्तोत्रप्रवृत्तिहि** असे तुजपासुनी ती (वसं.)
चित्तांत तू कारिशि जागृत धर्मनीती ।
स्तुत्यर्थ तूं करिशि मूक बृ[2]हस्पतीही
तूं स्तोत्ररूप वससी निगमांत तीही ॥ ९६ ॥

**स्तुति** अशी अभिधा तुजला हरे (द्रु. वि.)
करण कारण कार्यहि तूंचरे ।
तुजविणें नच कांहिं जगांतरे
उमजुनी नर तत्त्व भ[3]वा तरे ॥ ९७ ॥

**स्तोता** तूंते ह्मणति; असशी अंतरात्मा जगाचा (मंदा.)
तूते तूंची स्तविसि ह्मणतां दोष तो ये कशाचा ।
स्तोत्यातें तूं स्वसम करिशी सच्चिदानंदमूर्ती
मंदाक्रांता करुनि वनितापुत्रवित्तादिसक्ती[5] ॥ ९८ ॥

**रणप्रिय** खराचि तूं, करुनिही ह्मणोनीच गा (पृ.)
कटाक्षर[6]विशुष्कशीच कुरुची च[7]मूनीचगा ।

---

१ कृतार्थ २ वेदांत ३ संसाराप्रत. ४ हळू हळू आक्रांत म्हणजे जिंकलेली.
५ स्त्रीपुत्रद्रव्यादिकांविषयीं आसक्ति. ६ नेत्रकटाक्षरूपीं सूर्यानें शुष्क ७ सैन्यमदो.

वृथा करुनिही पणा कधिंहि मी न युद्धा करीं
रणीं लढसि त्या स्वयें धरुनि शस्त्र अस्त्रें करीं ॥ ९९ ॥

**पूर्ण** तूं सकलवैभवधाम (स्वा.)
सर्वदा असिसि पूरितकाम ।
चिद्घना, सकलशक्तिधारका
मोदसागर, भवाब्धितारका ॥ १०० ॥

**पूरयिता** तुज वदती, पुरविशि तूं कीं, समस्त कामांते (आ.)
**पुण्य**चि तू पापाते हरिशी हर जेंवि मस्त कामाते ॥ १०१ ॥

**पुण्यकीर्ति** तूं पापनाशना । नामकीर्तनें जे उपासना ॥ (का.)
करिति बा तुझी, ते तुझ्या पदा । त्वरित पावती भक्तकामदा
॥ १०२ ॥

**अनामय** सुनाम हें धृतगदाहि साजे तुला (पृ.)
जरामरणवर्जिता भवमहानदीसेतुला ।
हरे ! प्रणतदु:ख तूं त्वरित वारण्या धांवशी
**मनोजव**चि तूं स्मृता करिति त्या क्षणीं पावसी ॥ १०३ ॥

**तीर्थकर** वदति तुजला, पावन करितें जनांस तव नाम (आ.)
गंगा भवभयभगा करि तव संगामुळेंच गुणधाम ॥१०४॥

तीर्थहि वेदत्रय जें निर्मिसि तूं ते त्वदीय नि:श्वास
पावन जें लोकांते ठेविति जे त्यावरी सुविश्वास ॥ १०५ ॥

**वसुरेता** तुज वदती, तेजोमय जें जलात निजवीर्य,
सोडिशि. कनकाची त्या उपमा देती समस्त मुनिवर्य ॥१०६॥

**वसुप्रद**, वसू किती विविध या जगीं निर्मिसी; (पृ.)
प्रसन्नमन तूं जनां, बघुनि कर्म, तें अर्पिसी ।
न होय वसुधा कधीं वसुमती तुझ्याबीण ही
प्रसाद घडतां तुझा नरपती घडे रंकही ॥ १०७ ॥

---

१ गदा (किंवा श्लेषार्थ घेतलेल्यास रोग) धारण केलेल्याला. २ गुणांचें घर.
३ पृथ्वी ४ धनधान्ययुक्त. ५ निरोगी

तुवां करुनि राघवा तुरगमेध विप्रा धन
दिलें अमित मोक्षही हरुनि कर्मनिर्बंधन ।
करोनि वश राक्षसाहि बहु तद्वसू जिंकिलें
**वसुप्रद** असें पुन्हा ह्मणुनि नाम तूतें दिलें ॥ १०८ ॥

**वासुदेव** वसुधा वर्सनानें[1]                                        ( स्वा. )
झाकिशीच निजदीप्तिमयानें ।
सूर्य जेंवि अपुल्या किरणानें
भक्त जेंवि तुज भक्ति-सुधेनें ॥ १०९ ॥

**वसु** तुला वदती वसुदेवजा[2]                                        ( द्रु. वि. )
वससि सर्वहि वस्तुमधे अजा[3] ।
सकलभूत-निवासहि तूंच गा
तुजविणें नच ठाय मिळे जगा ॥ ११० ॥

**वसुमना** तुजला वदती यती
सकल ठायिं तुझें मन सन्मती ।
वसुकुलोद्भव भीष्म तयावरी
मन वळे तव जैं शर-पंजरीं ॥ १११ ॥

**हविहि** यज्ञपती यजनांत तूं
अनल[4] तूं यजमानहि तूं क्रतू
यजन-साधन-पात्रहि तूंच गा
यजन-साध्यहि सद्गति तू जगा ॥ ११२ ॥

**सद्गति** ह्मणुनी तुजला वदती तूं की गतीच बा संता      ( आ. )
उत्फुल्ल-सुमन-तरुसा[5] मधुपा[6] श्रुति-मंजुनाद[7] वासंता[8] ॥ ११३ ॥

**सत्कृती** तुझी या जगीं दिसे । विविध रीतिनें व्यक्त होतसे ॥ ( का. )
जग रजोगुणीं तूंच निर्मिशी । सत्त्वरूपिंही त्यास पाळिशी ११४

**सप्तम शतक समाप्त.**

---

१ वस्त्रानें. २ हे वसुदेवपुत्रा ३ हे जन्मरहिता. ४ अग्नि ५ फुललीं आहेत फुलें ज्याचीं असा वृक्ष ६ भ्रमराळा ७ कर्णमधुर ज्याचा स्वर ८ वसंतऋतूतील.

# शतक आठवें.

**सत्ता** असें तुजसि सत्कवि देति नाम (व. ति.)
सत्ताचि एक तव निश्चित रूप राम।
कोणी वदो सगुण निर्गुण तूज कोणी
अस्तित्व मात्र तव निश्चित चक्रपाणी ॥ १ ॥

सत्तेमुळेंच तव वस्तुत सत्य आहे
सत्ता त्रिकाल जगिं एक तुझीच राहे।
तूं ज्ञानरूपचि विराजसि या त्रिलोकीं
नाहींच वस्तु तुजवीण जगीं विलोकीं ॥ २ ॥

**सद्भूति** तूज वदती स्थिरवैभवातें
देशीच तूं अचल वैभव सज्जनातें।
संतांसि तूंच धन, बंधु, सुहृत्सखाही
तूं दूत सारथि करीलहि अर्थ तींही ॥ ३ ॥

**सत्परायण** ह्मणूनिच तूंतें (स्वा.)
नाम सात्वत-चकोर-विधूतें।
प्राण तूं सकल भक्तजनांचा
भक्त आश्रय तुझ्याहि सुखाचा ॥ ४ ॥

**शूरसेन** असती रघुवीर
स्वच्छमूत बहु वानरवीर।
मारुतीप्रमुख शोभति फार
जे त्वरें हरिति भूतल-भार ॥ ५ ॥

**यदुश्रेष्ठ** उत्कृष्ट तू यादवांत (भु. प्र.)
स्वजन्में जयां कीर्ति देशी जगांत।
जगत्तापशांती करायास घेशी
परब्रह्म तूं जन्म त्या चंद्रवशी ॥ ६ ॥

---

१ वायको २ भक्त. ३ चंद्र.

**सन्निवास** असती यदुराया (स्त्रा.)
सत सेविति सदा तव पाया ।
तूं निवासतरुसा द्विजवर्गा
त्यास; ते न गणती अपवर्गा ॥ ७ ॥

**सुयामुन** असें तुला वदति अर्भकांते कवी (पृ.)
विलास यमुनातटा किति तरी तुझा शोभवी ।
न्हदा करिशि निर्विषा हरुनि कालियाच्या मदा
विहार पुलिनी तुझा करि पवित्र त्या कामदा ॥ ८ ॥

**भूतावासचि** तूं निवास करिती भूतें तुझ्यामाजिं हीं (शा. वि.)
वायूते नभसा अलिप्त धरिशी स्वांगींच लोकां तिंही ।
सर्वां भूतिंहि तूं निवास करिशी अव्यक्तमूर्ती हरी
भूतें जाति तुझ्यांत रुद्रतनु जैं त्याते तुझी संहरी ॥ ९ ॥

**वासुदेव** म्हणुनी तुज नाम (स्वा.)
तूच या त्रिभुवना निजधाम ।
झांकि सर्व जगती तव माया
रूप कष्टचि तिचें अनुभाया ॥ १० ॥

**सर्वासुनिलय** तूचा आधारचि तूं समस्त चैतन्या (आ.)
सूर्य जसा तेजाते अथवा ज्यापरि पयोद पर्जन्या ॥ ११ ॥

**अनल** तूं श्रुतिचें पर दैवत (द्रु. वि.)
त्रिविध रूप तुझें अति भास्वत ।
रविविभावसुमाजिंहि विद्युतीं
त्रिविध धाम तुझें श्रुति वर्णिती ॥ १२ ॥

अमित शक्ति तुझी स्थिर शाश्वत
सकल शक्तिस हेतुच अद्भुत ।
धरणिमाजिंहि तूं असती स्थित
सकलभूततनूतहि संतत ॥ १३ ॥

---

१ पक्षिगणाला. २ मोक्ष. ३ मुलाला. ४ डोहाला. ५ वाळवंटाला ६ मेघ

असुंच तूं असती सचेतनीं
गतिस कारण तू अचेतनीं ।
स्मृतिमतिप्रतिही कृतीस तू
असासि हेतुहि तूंच ऋतू क्रतू ॥ १४ ॥

दर्पहा तुला वन्हिमूर्तिते (का.
नाम शोभते पुण्यकीर्तिते ।
दैत्यदर्प तू मर्दिशी हरे
द्युतिपुढें तुझ्या काय बा ठरे ॥ १५ ॥

दर्पद सात्वतवर्गा होशी निज इष्टयोगदानानें (आ.)
स्वानंदें डोलति ते मधुप जसे मत्तनागदानानें ॥ १६ ॥

दृप्त तूं निजसुखांतचि दंग (स्वा.)
इंदिरातनुसरोजिनिभृंग ।
दृप्त मूर्ति तव भार्गव भारी
राघवावरिहि शस्त्र उभारी ॥ १७ ॥

दुर्धर तू त्वद्ध्वजका (माणवक.)
देवकिच्या माणवका ।
शोधुनि तुते शिणती
दर्शनमात्रें रमती ॥ १८ ॥

अपराजित तूं नरसारथिरे (तो.)
रणिं तूजपुढें नच कोणि ठरे ।
स्मर तो टक लावुनि तूज हरे
बदरीवनिं त्या समनीं कचरे ॥ १९ ॥

विश्वमूर्तिच असे तव साची (स्वा.)
माय जी सकलजीवतनूंची ।

---

१ प्राण. २ यज्ञ ३ यादवांना किंवा भक्तांना. ४ इच्छित वस्तू देऊन किंवा चांगळे योगमार्ग दाखवून ५ भ्रमर ६ मस्त हत्तींच्या गंडस्थळांतून वाहणाऱ्या मदानें ७ लक्ष्मीच्या शरीररूपी कमलिनीवरील भ्रमर ८ हे परशुरामा ९ मुला. १० काम ११ हे अर्जुनसारथि कृष्णा

अस्थिसंघ तव भूमय भाग
तोर्यं रक्त जणु निर्गतैराग ॥ २० ॥

**महामूर्ति** ती पाहूनी कुन्तिपुत्र (भु. प्र.)
कसा भीउनी जाय तूझी पवित्र ।
सुटे कप रोमांच देहा अमूप
ह्मणे आवरीं शीघ्र हें विश्वरूप ॥ २१ ॥

**दीप्तमूर्ति** तव पाहुनि वाटे (स्वा.)
कोटिकोटिरैविभा नभिं दाटे ।
दिव्य नेत्र दिपती विजर्याचे
पाहुनी प्रखर तेज तनूचें ॥ २२ ॥

**अमूर्तिमान्** तूं परि विग्रहाते (उप.)
तोषावया घेशि उपासकांते ।
**अनेकमूर्ती** अवतीर्ण होशी
मत्स्यादिरूपीं जगिं सौख्य देशी ॥ २३ ॥

**अव्यक्त** तू आकृतिवर्णहीन
तूं ग्राह्य चित्तासहि धीस ही न ।
अतर्क्य तूझे गुणधर्म वा ते
अव्यक्त संज्ञा ह्मणुनीच तूंते ॥ २४ ॥

आकार कांहीं जरि तूज नाहीं
रूपें तुझीं कल्पिलीं बा जनांहीं ।
जे मानिती आकृति तूज नाहीं
देती तुला बा पुरुषत्व तेही ॥ २५ ॥

**शतमूर्ती** तुज वदती, असतीं रूपें जगांत तव भारी (आ.)
इंद्र, रवी, मित्र, वरुण, नामें यापरि श्रुतींत बहु चारी ।२६

**शतानन** असें तुझें उचित नाम कालात्मका (पृ.)
प्रतिक्षणिं किती मुखीं पडति जीव कंसांतका ।

---

१ पाणी. २ ज्याची लाली नाहींशी झाली आहे असें. ३ सूर्यतेज. ४ अर्जुनाचे ५ देहाते.

असी करुनि संहेती नच तुझी क्षुधा शांत ती
म्हणोनि गिळुनी महाप्रलयिं विश्व होशी कृती ॥ २७ ॥

(चि. प.)
एकचि तूं बा जगिं राजा
सर्वहि अर्पी तुज पूजा ।
चित्रपदा[1] नामगणांते
योजुनिया प्रार्थिति तूंते ॥ २८ ॥

(स्वा.)
एकची असासि तूं जगिं देव
देति लोक बहुधा तुज नाव ।
तूंचि दत्त, शिव, रामहि तूंगा
तूचि विठ्ठल, गजानन, दुर्गा ॥ २९ ॥

नैकधा[3] प्रकट तूं जगिं होशी
नैक नाम ह्मणुनी हरि घेशी ।
नित्य युक्त अससी प्रकृतीनें
घेशि तू त्रिविधरूप कृतीनें ॥ ३० ॥

(द्रु. वि.)
सव तुला ह्मणती क्रतुरूप तूं
क्रतुत जो पिळती द्विजें[4] सोमें[5] तू ।
पिउनि जो यजमान शतक्रतू[6]
अमर होउनि राहति शाश्वतू ॥ ३१ ॥

(भु. प्र.)
कशब्दीं सुखार्थ श्रुती ती निरूपी
कसें संभवे दुःख आनंदरूपीं ।
कनामा[7] ह्मणूनी कवी तुज देती
करीं भक्तकल्याण कल्याणमूर्ती ॥ ३२ ॥

(उप.)
किं ब्रह्म ऐसें पुसती गुरूते
जिज्ञासु, किंनाम ह्मणूनि तूते ।
यत् सर्वनामें तुज वेद वर्णी
तत् शब्द हा फुंकिति मंत्र कर्णीं ॥ ३३ ॥

---

१ नानाप्रकारचे आहेत शब्द ज्यांच्यांत ( असे नामगण. ) २ सहार, ३ अनेक प्रकारें. ४ ब्राह्मण ५ सोमरस ६ इंद्र किंवा १०० यज्ञ करणारा ७ क हें नांव

'तत्त्वमसि' श्रुति तूंतें सुचवी तच्छब्द योजुनी रामा (आ.)
निर्देशाया पतितें योजिति बा रीत ही जुनी रामा ॥ ३४ ॥

**पदमनुत्तमं** नाम हें तुला (शु. का.)
सुकवि अर्पिती मोक्षहेतुला[१]।
सकल इच्छिती भक्त ज्या प्रती
परम तूंच तें स्थान सद्गती ॥ ३५ ॥

**लोकबंधु** तूं माय बाप गा
स्थानिं अन्य हा शब्द वावगा।
तूंच मित्रही तूंच सोबती
तूंच सद्गती हे जगत्पती ॥ ३६ ॥

**लोकनाथ** तूं लोकनायका
लोकपोषका लोकपालका।
लोकरक्षणा लोककारणा
लोकयंत्रणा लोकतारणा ॥ ३७ ॥

**माधव** तूंतें पुनरपि ह्मणती मधुकुलसमुद्भवा संत (आ.)
शोभसि यादववर्गीं ऋतुसमुदायांत जेंवि वासंतें ॥ ३८ ॥

**भक्तवत्सला** हे कृपाघना (का.)
दर्शनें तुझ्या सर्व कामना।
पुर्ण होति तू वर्षि याजला
प्रेमदृष्टिच्या शीतला जला ॥ ३९ ॥

**सुवर्णवर्ण** प्रभु तूज नाम (उप.)
तेजोमयी त्वत्तनु दिव्यधाम।
दृष्टांत हा कांतिस त्या भुलोनी
देती मुनी अन्य नसे ह्मणोनी ॥ ४० ॥

**हेमांग** संज्ञा तुज मेघवर्णा
त्वदंग भूषार्थ धरी सुवर्णा

---

१ स्त्रिया किंवा सुंदर. २ त्रैलोक्याच्या उत्पत्तीस हेतु. ३ वसंत (ऋतूचें विशेषण.) ४ वर्षाव कर.

अन्योन्यवर्णा बहु शोभवीती ।
तडिद्घनांच्या[1] नभिं जेंवि पंक्ती ॥ ४१ ॥

वरांग[2] तें पाहुनि देवकी ती
होई अती विस्मित आत्मचित्तीं ।
प्रफुल्ल-राजीव-विशाल[3] नेत्र
श्रीवत्स शोभे उरिं चारुगात्र ॥ ४२ ॥

**चंद्नांगदी** शोभती तव (का.)
बाहुयुग्म ते अंगदास्तव
अंगदांसि ते देति रम्यता
हीच उक्ति[4] बा दावि सत्यता ॥ ४३ ॥

**वीरहा**[5] तुवां वीर जिंकिले
धर्मबंधना ज्यांहिं टाकिलें ।
त्वद्वधार्थही यत्न जो करी
कंस तो दिला मृत्युच्या करीं ॥ ४४ ॥

**विषम** दीससी यापरी जरी
सत्यधर्म तू ही श्रुती खरी ।
सम तुझ्या जगीं कोणिही नसे
अधिक तैं हरी संभवे कसें ॥ ४५ ॥

**शून्य** तूजला कोणि बोलती
लक्षणा तुझ्या कीं[6] न जाणती ।
लक्षणा विणें शून्यता धरी
सत्स्वरूप बा तें तुझें हरी ॥ ४६ ॥

**घृताशी** असे नाम घेशी मुरारे (भु. प्र.)
घृता भक्षिसी गोकुलीं तूं पुरा[7] रे
निमाल्या तुझ्या सर्वही चित्तवृत्ती
म्हणोनीच नामा मिळे ह्या प्रवृत्ती ॥ ४७ ॥

---

१ वीज व मेघ यांच्या. २ उत्तम शरीर. ३ फुललेल्या कमलासारखे मोठें ४ ह्मणणें. ५ हे वीरहन्त्या, शत्रुहन्त्या ६ कारण कीं. ७ पूर्वी.

**अचल** तूं अससी अवनीपते (द्रु. वि.)
नच ढळे कधिंही तव रूप तें ।
अचल शक्ति तुझी अचलाहि धी
ह्मणुनि देतिच ही अभिधा सुधी ॥ ४८ ॥

**चलहि** तू अससी पवनात्मका
तनुस देशि गतीहि बलाहका[१] ।
सतत वाहसि तूं गगनीं उरीं
सकल वांचति जीव तुझ्यावरी ॥ ४९ ॥

**अमानी** तुला नाम देती विवेकी (भु. प्र.)
अनात्मीं[२] नसे आत्मबुद्धी तुला कीं ।
सदा सोडिशी मान तूं भक्तकार्या
असें द्व्यर्थ साजे तुला नाम आर्या ॥ ५० ॥

**मानद** तूंते वदती देशी तूंकीं सुरादिकां[३] मान । (आ.)
खडिशि दुर्वृत्ताचें व्यसनें तूंते सुरादि[४] कामा न ॥ ५१ ॥

**मान्य** तूंचि अससी सकलांते (स्वा.)
पूजिती मुनि वनीं तुजला ते ।
स्वर्गही मिळवुनी मुनिवर्ग
तेथ पाहत बसे तव मार्ग ॥ ५२ ॥

**लोकस्वामी** तूं कीं दर्शन देशी तयास प्रत्यक्ष । (आ.)
स्वर्गस्वासी केवल काय मग तया सहस्राक्ष[५] ॥ ५३ ॥

**त्रिलोकधृक्** तूं धरिशी त्रिलोकी (उ. जा.)
तूं पोशिसी तीस निजावलोकीं[६] ।
तद्वार तूंते अणुशी समान
गोवर्धनाचें मग काय मान ॥ ५४ ॥

**सुमेधा** तुला नाम मेधावि[७] देती (भु. प्र.)
तुझी धी प्रकाशे विचित्रीं जगीं ती ।

---

१ मेघ. २ जडवस्तूचेठायीं. ३ देवादिकांना. ४ मद्य वगैरे ५ इंद्र. ६ आपल्या दृष्टीनें. ७ बुद्धिवान.

कसे रंग ते पुष्पपर्णांसि देशी
किती रम्य पक्षी तरू देशि देशीं ॥ ५५ ॥

**मेधज** तूंते ह्मणती निपजशि यजनेंच देवकीजठरीं । ( आ. )
कौसल्येच्याहि तसा उदरीं यजनीय जी प्रसाद घरी ॥५६॥

**धन्य** तूंच असमी जगतांत ( स्वा. )
तू सदाहि कृतकृत्यचि तात ।
त्वत्कटाक्ष करि भक्त कृतार्थ
देउनी सकल त्या पुरुषार्थ ॥ ५७ ॥

**सत्यमेधा** तुला नाम देती मुनी ( स्र. )
सत्य होई तुझ्या येतसे जें मनीं ।
चित्तवृत्ती तुझी बीजची बा असे
उद्भवे ज्यांतुनी विश्व हें वृक्षसें ॥ ५८ ॥

**धराधर** श्रीपति तूज नाम ( उप. )
धरी धरेते तव दिव्य धाम ।
हा विश्वशाखी तव हस्ति वेणू
धरा तिथें केवळ पुष्परेणू ॥ ५९ ॥

**तेजोवृष** तुज ह्मणती वर्षिशि तेजासि सूर्यरूपानें । ( आ. )
तेजोनिधान तूं बा तेज रवीचें तुझ्यापुढें सानें ॥ ६० ॥

**द्युतिधर** ह्मणुनी बा नाम देती तुला हें ( मालि. )
ग्रहगण निजतेजा तूजपासूनि लाहे ।
तरुणपणिं तुवां तै दावुनी बाळलीला
शतमख निजतेजें गोकुलीं लोपवीला ॥ ६१ ॥

**सर्वशस्त्रभृतांवरा** हरी ( रथो. )
तीव्र फेंकिशि तीक्ष्ण तें अरी ।
जे समस्तहि संहरी अरी
मोह दारुण नकंही चिरी ॥ ६२ ॥

---

१. यज्ञसंबंधीं २ पृथ्वीला. ३ तेज, वीर्य ४ वृक्ष ५ वेळू (हातांत धरावयाची काठी) ६ अल्प, ७ इंद्र, ८ चक्र, ९ शत्रु, १० सुसर, ११ पृथ्वी.

अग्रह तुजला ह्मणती भक्तार्पित वस्तु आदरें घेशी । ( आ. )
कामक्रोधादिकही षड्रिपु त्यांचे त्वरें लया नेशी ॥ ६३ ॥

निग्रह नामहि घेशी शासन देशी जनास सुधराया ।
व्यग्रचि तूं बा अक्षय निजजनकार्यी निमग्न यदुराया ॥ ६४ ॥

व्यग्र तूं सदा हे दयानिधे ( का. )
सर्ग[1]पालनध्वंसनामधें ।
नाहिं तूजला एकही क्षण
विश्रम प्रभो शांत तूं पण ॥ ६५ ॥

अव्यग्र नामहि तुला तव देति दास ( व. ति. )
तूं सृष्टिकर्मि अससीच सदा उदास ।
सान्निध्य मात्र घडवी तव खेळ सारा
ओढी जसा उपल[2] चुंबक अश्मसारा[3] ॥ ६६ ॥

नैकशृंग[4] हरि जो गिरि मेरू ( स्वा. )
ज्या सभोंवति फिरे रवि[5] वारू[6] ।
जेंवि तें जलनिधीवरि तारू
तो विभूति विलसे तव चारू[7] ॥ ६७ ॥

गदाग्रज श्रीधर घेशि नामा ( उप. )
सावत्र माता तव ती सुनामा[9] ।
तूं जन्मतांची प्रसवे सुताते
दिले जयाते गद नाम तातें ॥ ६८ ॥

गर्दाग्र[8] जो वेद तयामुळें हरी
प्रकाशसी तूं जनमानसांतरीं ।
ह्मणोनि तूते वदती गदाग्रज
ओंकारही दावि तुझें पदांबुज ॥ ६९ ॥

चतुर्मूर्ती तूं बा रघुकुलिं चतुर्धा निपजशी ( शि. )
विशुद्धाचारानें सुरनरमुनींतें सुखविशी ।

---

१ सृष्टि. २ पाषाण ३ लोखंड. ४ अनेक शिखरांनीं युक्त ५ सूर्य. ६ घोडा. ७ सुंदर. ८ वाणांमध्यें श्रेष्ठ वाणी. ९ सुनामा या नावाची श्रीकृष्णाची सावत्र आई.

रणीं जिंकोनीया दशवदन, इंद्रारि, लवेण
तसें गंधर्वांते करिशि अवनीभारहरण ॥ ७० ॥

**चतुर्बाहु** दिग्बाहु तूं विश्वरूपा (भु. प्र.)
दिशा चार घेती तुझ्या बाहुरूपा ।
तयांमाजिं नक्षत्रपंक्ती विराजे
बरी अंगदांच्या परी तूज साजे ॥ ७१ ॥

बलोद्रिक्त हे राम ! कृष्णा विशुद्धा
रतिप्राण प्रद्युम्न शूरानिरुद्धा ।
तुह्मां माजिं तें ब्रह्म झालें चतुर्धा
**चतुर्व्यूह** संज्ञा ह्मणोनी प्रसिद्धा ॥ ७२ ॥

**चतुर्गती** तूं गति चारि वर्णा (उप.)
विप्रादिकांते घननीलवर्णा ।
चतुःश्रुतीही तुज एकभावें
मधुस्वरें वर्णिति भिन्न नावें ॥ ७३ ॥

**चतुरात्मा** तुज वदती सात्वततंत्रज्ञ ते कवी प्राज्ञ । (आ.)
आत्मा तुरीय तूंची तैसा तूं विश्व तैजस प्राज्ञ ॥ ७४ ॥

**चतुर्भाव** तूंते हरी नाम साजे (भु.प्र.)
अवस्थांत सत्ता तुझी चार गाजे ।
जनां अर्पिसी अर्थ ते चार तूंची
तुझें नाम बा हें अनेकार्थसूची ॥ ७५ ॥

चतुर्भाव तूं राहसी चार रूपीं
निराकार तूं ईश्वरब्रह्मरूपीं ।
अभिव्यक्तमूर्तीहि तूं विश्वरूपीं
जगा तारण्या रामकृष्णादिरूपीं ॥ ७६ ॥

---

१ इंद्रजित २ लवणासुर ३ दिशाच आहेत बाहू ज्याचे. ४ पांचरात्रमत जाणणारे. ५ देहत्रयापलीकडचा शुद्ध आत्मा. ६ स्थूलदेहाभिमानी आत्मा. ७ सूक्ष्म देहाभिमानी आत्मा ८ निद्रेंतील कारणदेहाभिमानी आत्मा.

चतुर्वेदवित् तूं रघूत्तंस[3] जाशी श्रुतीते पढाया  ( क्री. च. )
वसिष्ठाकडे त्या जसा सिंधु सिंधूनदा तोय प्याया ।
तुला अस्त्रविद्या समर्पी तपाचा निधी गाधिसूनू[1]
जसी द्यावि चिंतामणीनें सुरद्रूप्रती[2] कामधेनू ॥ ७७ ॥

एकपात् तुला नाम देति गा  ( का. )
अंश एकची वा तुझा जगा ।
तारण्या धरी रूप नैकदा[4]
स्थापि धर्म जें सर्वकामदा ॥ ७८ ॥

विश्व हें अती स्थूल जें दिसें
अल्प अंशची तें तुझा असे ।
विश्व सर्व हें व्यापुनी वरी
शेष राहसी निर्गुणा हरी ॥ ७९ ॥

समावर्त संज्ञा तुला आर्त्तचक्रा[8]  ( भु. प्र. )
फिराया सदा लाविशी विश्वचक्रा ।
पुन्हा सृष्टि येते पुन्हा लीन होते
ऋतूंच्या प्रभावें तृणादी जसें तें ॥ ८० ॥

अनिवृत्तात्मा तूंते वदती म्हणुनीच नित्य उद्युक्ता ।  ( आ. )
नच कर्मबंध तूंते निष्कामाते जसा जगीं मुक्ता ॥ ८१ ॥

दुर्जय दितिजां[5] दनुजां[6] असशी देवांहि काय मग मनुजां
दुरतिक्रम आज्ञा तव रविशशिरविजांहि[7] देवकीतनुजा ॥ ८२ ॥

दुर्लभ सुरनरमुनिंते सुलभचि तूं विषय सक्तचित्ताते
दुर्गम भक्तांतेही कुमतीतें विषयसक्त-चित्ताते ॥ ८३ ॥

दुर्गम योग्यांते तूं शोधुनि बहु शिणति तुज मुनिवर्ग
ज्ञान्यांतेही तैसा देती म्हणुनीच नाम तुज दुर्ग ॥ ८४ ॥

---

१ विश्वामित्र. २ कल्पवृक्ष. ३ रघुकुलशिरोमणी ४ अनेक वेळां ५ दैत्य ६ दानव. ७ शनि. ८ चक्र धारण केलेला

**दुरावास** तूंते मुनी नाम देती (भु. भ.)
तुझा वास चिर्री मिळायास होती ।
महायास योग्यांस हे वासुदेवा .
भवाब्धीस नौका तुझी पादसेवा ॥ ८५ ॥

**दुरारिहा** तू असती मुरारी (उप.)
संहारिसी तू बहिरंतरारी ।
अभद्र जें जें जगतांत भासे
समग्र नाशे तव दृग्विलासें ॥ ८६ ॥

जें जें जगीं मंगलरूप आहे
त्वदंग त्याचेंच धरून राहे ।
कल्याण मूर्ती तव पाहती जे
लोपे तयांचें तम त्या सुतेजें ॥ ८७ ॥

समूळ त्यांची अघराशि भाजे
सुदग्ध होती निजकर्मबीजें ।
सुकीर्ति त्यांची जगतांत गाजे
**शुभांग** संज्ञा तुज फार साजे ॥ ८८ ॥

**लोकसारंग** हें शोभतें तूज गा (स्र.)
नाम बापा हरी चेतवीशी जगा ।
विश्वपद्मास तू बोधहेतू रवी
अंधकारा नगा तूंचि मोठा पवी ॥ ८९ ॥

दिग्गजांच्या मिषें विश्व घेशी करीं
मेघरूपें जगा वर्षिशी सीकरीं ।
विश्वपद्मामृता भृंगसा चाखिशी
शोषुनी सर्व हें अंतिं संहारिशी ॥ ९० ॥

सार सर्वांसि तू देशिही घेशिही
सूर्य जैसा करी आर्द्र शुष्का मही ।

१ मोठे आयास २ बाह्यशत्रु व अंतःशत्रु ३ पर्वताला ४ वज्र ५ तुषारांनीं.

लोकिं सिंहापरी एकला शोभसी
लोकिं सचारसी हंससा मानसीं[1] ॥ ९१ ॥

कंठिं शोभे तुझ्या तारमुक्तामणी[2]
हार ज्याच्यामुळें त्वत्तनू स्रग्विणी[3] ।
लोकसारंग हें शोभतें तूजगा
नाम बापा हरी चेतवीशी जगा ॥ ९२ ॥

असे माळ ही गुंफिली जिर्ज्जडांची[4] (भु.प्र.)
तुझ्या माजि तंतूंत जेंवी फुलांची
फुलें जीर्ण जाती नवीं येति काहीं
सुतंन्तूचि तूं राहसी कालिं तींही ॥ ९३ ॥

तन्तुवर्धन असें तुज नाम (स्वा.)
तन्तुवाय[5] रचितो निजर्धाम[6]।
जेंवि काढुनि तनूंतुनि तन्तू
तेंवि तूं रचिशि हा भवंतन्तू ॥ ९४ ॥

इंद्रकर्मा तुला नाम देती हरी (स्रग्वि.)
इंद्ररक्षार्थ तीं केलिं नानापरी ।
शूरकर्में तुवां युद्धभूमीवरी
दैत्यमत्तद्विपध्वंसनीं[7][8] तूं हरी ॥ ९५ ॥

तुझ्या हातिं राहे जगाची रहाटी (भु. प्र.)
तुवां निर्मिले इंद्र कोट्यानुकोटी ।
कटाक्षें तुझ्या क्षुद्रही इंद्र होय
ह्मणूनी तुला योग्य हें नामधेय ॥ ९६ ॥

महाकर्मा तूं बा सहज फिरतां दंडकवनीं (शिख.)
वधूनीया रक्षोगण करिशि निर्भार अवनी ।

---

१ मानससरोवरीं २ तारे ह्मं च मोतीं ज्याच्यांत असा ( हार ) ३ मालायुक्त. ४ चैतन्य व जड पदार्थ यांची. ५ कोळी. ६ आपले घर ( जाळें ). ७ हत्ती. ८ सिंह. ९ श्रेष्ठ किंवा उत्तम तंतु. १० संसार.

कपींचीही सेना करुनि करिशी निर्जित अरी
अवध्यत्वा लाहे विधिहरवरें जो सुरेकरीं ॥ ९७ ॥

महाकर्म तें बा तुझें राघवेश (भु. प्र.)
तुवां जिंकिला दंडकारण्यदेश ।
महासागरा बांधिला थोर सेतू
जनां तारण्या पुण्यकीर्तीस हेतू ॥ ९८ ॥

**कृतकर्मा** या परि तूं दशमुख घटकर्ण मारुनी रामा । (आ.)
तद्बंधु नृपति करुनी येशी परतोनि घेउनी रामा ॥ ९९ ॥

कृतकृत्य जरी अससीच सदा (तो.)
द्विजदेवहिता झटसी वरदा ।
निजकर्म जनीं नियमें करिशी
कृतिनें निज सत्पथ दाखविशी ॥ १०० ॥

**कृतागम** असें तुला म्हणति बा श्रुतीच्या पते (पृ.)
जनांसि कृतिचें सदा फळ तुझ्यामुळें लाभतें ।
तुझ्याविण कसें मिळे नियत योग्यही तें तया
असें समजुनी करी मनुज कर्म पाळी नया ॥ १०१ ॥

**उद्भव** तूं या सकल जगाते (मौक्ति.)
आगमवाणी तव गुण गाते ।
जन्म नसे बा कधिं तव झाला
मायिक रूपा धरिशि दयाला ॥ १०२ ॥

**सुंदर** तें बा अति तव रूप
पाहुनि गोपी भुलति अमूप ।
योगिजनांते बहु सुख देई
वृत्ति लयाते त्वरितचि नेयी ॥ १०३ ॥

---

१ शत्रु २ देवांच्या हातानीं ३ कृतकृत्य. ४ स्त्री. ५ केलेल्या कर्माबद्दल आगम म्हणजे प्राप्ति ( फळाची ) ज्याच्यापासून होते तो. ६ जन्महेतु. ७ ब्रह्मदेव व शंकर यांच्या वरामुळें.

**सुन्द** तूं सदय नंदनंदना (रथो.)
जे तुला करिति भक्त वंदना ।
त्यांस तूं त्वरित पावशी हरे
वर्षिशी निजदयांबुसीकरें ॥ १०४ ॥

**रत्ननाभ** तव नाभि विराजे (स्वा.)
रत्न जेंवि अभिधा तुज साजे ।
सर्वरत्नमय या अवनीते
दिव्य नाभि तव देइ जनींते ॥ १०५ ॥

**सुलोचन**प्रभा तुझ्या मुखीं अतीच साजते (पंच.)
चकाकते जशी सुनील नीरदांत वीज ते ।
नभांत कालमेघयुक्त एककालिं भासते
जरी रवी शशांक ते तशाच देति कांतिते ॥ १०६ ॥

**अर्क** तूज वदती रघुराया (स्वा.)
अर्चिती तव हरादिक पाया ।
अर्चिरूप तव देह दिनेश
अर्चिती सकल तूंहि रमेश ॥ १०७ ॥

**वाजसन** वदति तूते देशी लोकांस तूंच वाजाते । (आ.)
भजती व्यर्थ नरा नर सोडुनि तूते त्रिलोकराजाते ॥१०८॥
**शृंगी** तूंते वदती धरिशी प्रलयांत मस्तकीं शृंगा ।
धरुनी मीनतनूते करिशी भुवनेश भूमिभयभंगा ॥ १०९ ॥

**जयंत** तूं हे विजयाब्धिचंद्र (उप.)
तूं जिंकिशी काल सुरेंद्र रुद्र ।
जे सेविती तूज अनन्यभक्ती
ते पावती श्री, जय, नीति, मुक्ती ॥ ११० ॥

---

१ आर्द्र (दयेनें) २ दयारूपी जलाच्या वृष्टीनें ३ जन्मापत. ४ चांगल्या नेत्रांची प्रभा. ५ ढगांत. ६ सूर्य. ७ चंद्र ८ किरणात्मक (देह). ९ अन्न. १० मत्स्यदेहाते. ११ विजयरूपी समुद्राला चद्रासारखा (आकर्षून घेणारा).

सर्वत्रिज्जयी नाम हें तुला (१का.)
ज्ञानि देति बा ज्ञानहेतुला ।
सर्व जाणसी जिंकिसी तसें
जोड नाम हें यामुळें असे ॥ १११ ॥

सुवर्णबिंदू तुज नाम देती (उप.)
मंत्रज्ञे मलौतमकदिव्यमूर्ती
अगें तुझीं शोभेन दीप्तिमंत
मंत्राक्षरांचीं जशि बिंदुयुक्त ॥ ११२ ॥

शतक ८ वें समाप्त.

---

## शतक ९ वें

अक्षोभ्य तू क्षुब्ध महाणवात (उप.)
महोरगींही निजसी प्रशांत ।
रजस्तमो-रूप महासुरांहीं
न क्षुब्ध होशी मधुकैटभांहीं ॥ १ ॥

सर्ववागीश्वरेश्वर तुज शोभते (वागी.)
नाम हें फार बा हरि सर्ववर्णपते ।
ब्रह्मदेवादिकां श्रुति तूंच बा दिली
शारदा ती तुझी रसना असे भली ॥ २ ॥

महाह्रदचि तूं सुधामय जयामधें मज्जन (पृ.)
करूनि रमती अती नियत-चित्त ते सज्जन
महाह्रद भवाख्य तू बुडति ज्यामधें बा नर
तसे इतर खावुनी बहु गटंगळ्या पामर ॥ ३ ॥

---

१ उत्तम वर्णाचें शरीर ( बिंदु ) ज्याचें तो. २ मंत्र शास्त्र जाणणारे ( नाम देती च्या कर्ता ) ३ मंत्रमय आहे दिव्य ज्याचें शरीर असा जो तूं ( हे संबोधन आहे ) ४ सुंदर. ५ महासर्पावर ( शेषावर ). ६ हे सर्व वर्णांच्यापते. ७ जीभ. ८ मोठा डोह.

महांगतें तूं वा तुझे धर्म गाया (भु. प्र.)
नसे शक्ति कोणा तुझी गूढ माया ।
तुझ्या सेविती जे सदा पूज्य पाया
तया मात्र सोपें तिला वा तराया ॥ ४ ॥

महाभूत तूं श्रेष्ठ वा सर्व भूतीं
इयत्ता नसे देशकालीं तुला ती ।
नसे कर्मबाधा नसे मृत्युभीती
जगा व्यापुनी राहसी सर्व भूतीं ॥ ५ ॥

महानिधी तूं जणु एक कोश (उप.)
ब्रह्मांड भासेच जयांत लेश ।
हिरण्य[2]कोशाहुनि तूंच सांधू[3]
तुलाच वा सेविति संत साधू ।
तूं श्रेष्ठ रत्नादिनिधिपरीस
समस्त-संपत्कर तूं परीस ॥ ६ ॥

कुमुद तूं हरुनी अवनीभर (द्रु. वि.)
मुदित होशि जनां सुखनिर्भर ।
हरुनि दुर्दिन[4] तो विलसे रवी
मुदित लोक करी तम लोपवी ॥ ७ ॥

कुंदर तूं वा सुकृत[5]फलाते (मौक्ति.)
देशि जनांते तुजहि फलाते ।
अर्पिति ते वा कुसुमजलाते
स्वीकरिशी तूं धृतकमला तें ॥ ८ ॥

सूकर[6]रूपा अमितबलाते
घेउनिया त्वां अति धवल[7]ाते ।
दारण केलें अवनितलाते

---

१ मोठा तडक. २ सोन्याचा खजिना ३ चांगला. ४ मेघाच्छादित दिवस. ५ पुण्य, ६ वराहरूपा. ७ शुभ्र किंवा शुद्ध.

ध्वस्त कराया असुर खलाते
मौक्तिक-माला सजवि गलाते ॥ ९ ॥

कुन्द फुलाच्या परि सित[1]कांती
स्वयश या तें जरि नच मूर्ती ।
दान तुवां ही अवनिहि केली
कश्यप धाला बघुनिच केली ॥ १० ॥

पर्जन्यसा वर्षिशि सर्वकामा (इंद्र.)
देती तुला या म्हणुनीच नामा ।
तापत्रयार्ता करुणांबुधारा
वर्षूनि तूं नीववि‌सी उदारा ॥ ११ ॥

पवनसा निज भक्त-जनाकडे [द्रु. वि.)
त्वरित येशिहि वारिशि सांकडें[2] ।
स्मरण मात्र करी तव जो हरी
तव कृपामृत पावन त्या करी ॥ १२ ॥

अनिल तूं असती जितनिद्र गा
सतत चेतविसी सकला जगा ।
तुज नसे कुणि चेतविता दुजा
म्हणुनि नाम पुन्हां दिधलें अजा ॥ १३ ॥

अमृताश[3] तुला वदती सुकवी (तो.)
स्वसुखामृतभोग तुला सुखवी ।
अमरांसि[4] तुवां अमृताशन तें
उदधी मथुनी दिधलें सुमतें ॥ १४ ॥

अमृतवपु तुला या नाम मृत्युंजयाते (मा.)
अमृतमय शरीरा पाहुनीया जयाते ।
नवल मज न वाटे लाधलें निर्जरींते
अमृत तव सहाय्यें मंथुनी सागराते ॥ १५ ॥

---

१ शुभ्र किंवा शुद्ध, २ संकट. ३ अमृत भक्षण करणारा. ४ देवांना. ५ क्रीडा.

मथिति दैत्यहि ज्या दनुंचे अरी (द्रु. वि.)
उदधि तो तव शेज असे हरी ।
मथनसाधनभूत महागिरी
धरिशि मंदर पृष्ठिंहि तूं करीं ।
अमृत कां न मिळे मग सागरीं
विफल होय सुसंग कधीं तरी ॥ १६ ॥

**सर्वज्ञ** तूं असिसि बा सकलांतरात्मा (व. तिं.)
भूताधिवास भुवनात्मक तूं महात्मा ।
जें जें दिसें सकल नश्वर तेंहि तूंच
जें भीतरीं अचल चिन्मय तेंहि तूंच ॥ १७ ॥

**सर्वतोमुख** ह्मणूनचि बा तूं (स्वा.)
मार्ग नैक तव साधनिं हेतू ।
विश्वरूप बहुबाहुमुखाक्ष
दाउनी दिपविशी विजयाक्ष ॥ १८ ॥

स्मरति सदा तुज जे सुमनानें (तामरस.)
करिति पदार्चन वा सुमनानें ।
तव मुखतामरसा नयनानें
बघति सदा भजती स्तवनानें ॥ १९ ॥

**सुलभ** तया असशीं नमनानें
मनुज वृथा शिणती यजनानें ।
यजन तुझें करितों कवनानें
त्वरित जरामरणा निधना ने ॥ २० ॥

**सुव्रत** तूं निजधर्मपरायण (दोधक.
जो शरणागत त्या भवतारण ।

---

१ राक्षसांचे शत्रु (देव). २ सर्व भूते राहण्याची जागा. ३ अनेक आहेत भुज तोंड व डोळे ज्याचे. ४ अर्जुनाचे डोळे ५ चांगल्या मनानें. ६ फुलांनीं. ७ मुखकमल ८ यज्ञानें ९ नाशाप्रत

त्वत्पद वंदुनि होय बिभीषण
लब्धमहोदय वैष्णव-भूषण ॥ २१ ॥

(स्वा.)

सिद्ध तूं सकल योगिजनांचा
साधनाविण परी गुरु साचा ।
सर्व सिद्धि पडती तव पायां
नित्य मुक्त असती यदुराया ॥ २२ ॥

शत्रुजित् तुज ह्मणूनचि नाम
शत्रु निर्जित करी तव धाम ।
शत्रुतापन तुझें खर[1] तेज
दग्धची करितसे अरिबीज[2] ॥ २३ ॥

(व. ति.)

न्यग्रोध[3] तूज वदती भवपार्दपाते
शाखा अनंत फुटती उलट्या जयाते ।
ज्याचें असे उपरि मूल सदा सजीव
मायापटीं सतत वेष्टिशि सर्व जीव ॥ २४ ॥

(पृ.)

उदुंबरफलीं जसे निपजती कृमीचे थवे
तुझ्या उदरिं वा तसी सकल सृष्टि ही उद्भवे ।
विभूति तव तो असे यजनवृक्ष औदुंबर
निरंजन सनातना तव तनू असे अंबर ॥ २५ ॥

(उप.)

अश्वत्थ तूं पादप संसृतीचा
वर्णी जयाते ध्वनि तो श्रुतीचा ।
वृक्षांत अश्वत्थ तुझी विभूती
ह्मणूनि संज्ञा तुजला प्रभू ती ॥ २६ ॥

(शु. वि.)

चाणूरांध्रनिषूदन प्रभू
आश्चर्ये भरिशीच रंगभू ।
चाणूरा वधुनी सलील तू
वृत्रा जेंवि वधी शतक्रतू ॥ २७ ॥

---

१ प्रखर २ शत्रूचें बीज ३ वड. ४ आकाश. ५ वृक्ष. ६ संसारवृक्ष.
७ सहज. ८ इंद्र.

सहस्रार्चि तूं सर्वतेजोनिधान[1] (भु. प्र.)
तुझें तेज तें कोटिसूर्यासमान ।
नसे नाश त्यातें त्रिकाळीं विराजे
म्हणोनीच या हें तुला नाम साजे । २८ ॥

सप्तजिव्ह म्हणती अनलातें[2] (स्वा.)
नेइ जो हवन त्या अमरांतें[3] ।
पूजिती सकल विप्र जयातें
तो विभूति तव उज्वलमूर्ते ॥ २९ ॥

सप्तैधा[4] म्हणुनीहि नाम ते (शु. वि.)
देती विप्र तुला रमापते ।
दीप्ती सप्त तुझ्या महोरुची
घेशी तूं समिधाहि सातची ॥ ३० ॥

सप्तवाहन रवी तव मूर्ती
अश्व सप्तचि जया रथिं नेती ।
वाहसी पवनसप्तक[5] तूंची
उक्त नाम विविधाशयसूची ॥ ३१ ॥

अमूर्ति तूं या तुज देह नाहीं (उपेंद्र.)
नसोनि चक्षू बघशी सदाही ।
नसोनि बाहू धरिशी जगातें
अपादगामी[6] श्रुति तूज गाते ॥ ३२ ॥

अनघ तूं अघहा[7] अघनाशना[8] (द्रु. वि.)
सुखमया सुखदा अमृताशना ।
शुचि तुझ्यासम कोण दुजा हरी
स्मृति तुझी करितां दुरितें हरी ॥ ३३ ॥

---

१ सर्व तेजांचे उत्पत्तिस्थान. २ अग्नि. ३ देवांना. ४ अति तेजस्वी. ५ अंतरिक्षांतील पुराणोक्त ७ प्रकारचे वायु ( परिवहादि ). ६ पायांवांचून चालणारा. ७ असुराला मारणारा. ८ पापनाशन. ९ पाप.

**अचिंत्य** तव बा कृती मति गति स्थिती श्रीपती (पृ.)
अचिंत्य तव रूपही प्रभव[1] शक्ति वीर्योन्नती।
किती तव चमत्कृती वधुनि गुंग होते मती
धृती धरुनि जो स्तुती करि तुझी यंती तो कृती ॥ २४ ॥

**भयकृत्** भुजंगसंगता[3] (भु. सं.)
जरि तूं न ही विसंगता[2]।
सकला कुसंग बाधितो
न कधीं मृषा प्रवाद तो ॥ २५ ॥

**भयनाशन** तुंचि बा हरी (वियो.)
असशी तूं भववारणा[5] हरी[6]।
तव नाम भयास लोपवी
भवरूपी गिरितेहि तें पवीं[7] ॥ २६ ॥

**अणुचि** तूं अति सूक्ष्म अणूहुनी (द्रु.वि.)
अणुपणा तव थे न कधीं मनीं।
मनहि हें घन फार गमे तुला
मग कशी गगनासि करूं तुला ॥ २७ ॥

**बृहत्** शब्द देती तुला ब्रह्मनिष्ठ (भु. प्र.)
महत्वांत सर्वाहुनी तूं वरिष्ठ।
परिच्छेद नाहीं तुला बा अनंत
जसा देश काला कधीं नाहि अंत ॥ २८ ॥

**तनु** ती[8] तनुता[9] धरी तपें (वियो.)
**कृश** लोहितनील[10] आतपें[11]।
उपवास करूनि राहसी
पदि एका बहुकाल तूं वशी[12] ॥ २९ ॥

---

१ प्रभाव (पराक्रम). २ सर्वसग परित्याग केलेला ३ सर्पाशीं सहवास करणारा. ४ खोटा. ५ संसाररूपी हत्तीला ६ सिंह ७ वज्र. ८ शरीर. ९ कृशता १० तांबूस निळें. ११ उन्हानें. १२ जितेंद्रिय.

बदरीवनिच्या तपोवनीं
कृश होशी जरि तूं महामुनी ।
तप आचरुनी अशा परी
अति तेजा तव ती तनू धरी ॥ ४० ॥

स्थूल फार तव सूकरमूर्ती[1]                                  (स्वा.)
जी धरी वसुमती[2] निजदंतीं ।
पद्मिनी करिं जसा धरि दंती[3]
मग्न जी सलिलिं होय दिनांतीं ॥ ४१ ॥

गुणभृत् तुज नाम शोभते                                  (वियो.)
त्रिगुणाते धरिशी जगत्पते ।
सुमनांत[4] सुवास तो वसे
भव[5] हा तेंवि तुझ्यांतची असे ॥ ४२ ॥

निर्गुण तूं बा असशि निरंजन                                  ( शु. मोदक. )
भक्त जनांते भवभयभंजन ।
सर्व गुणांहीं असशि जरी युत
त्वत्तनु नोहे गुणमय अच्युत ॥ ४३ ॥

महान् तुला बा म्हणुनीच नाम                                  ( उप. )
सर्वातिशायी तव दिव्य धाम ।
तूं सर्वगामी अति शुद्ध-बुद्ध
कर्मादिकांहीं नससीच बद्ध ॥ ४४ ॥

अधृत तूं धृतचक्र धराधरा[6]                                  ( द्रु. वि. )
तुज धरी नच कोणि गदाधरा ।
स्वधृत तूं निजवीर्य-तुला धरी
तुजसि कोण जगांत तुला[7] धरी ॥ ४५ ॥

स्वास्य[8]-तूं हरी श्यामसुन्दरा                                  ( का. )
पाहुनी भुले वक्त्र[9] इंदिरा ।

---

१ वराहमूर्ती. २ पृथ्वी. ३ हत्ती. ४ फुलांत. ५ संसार. ६ पृथ्वीला धारण करणारा. ७ साम्य. ८ तोंड. ९ सुमुख.

ज्यांतुनी निघे वेदभारती
गतिही तसें युद्धिं भारती ॥ ४६ ॥

**भार्गवंश** तूं मूलचि सर्व वंशा (इं.)
ब्रह्मादिकांच्या जनका सुरेशा ।
तूं बीजची या भवरूप वंशा
तूं शोभवीशी रवि-सोमवंशा ॥ ४७ ॥

**वंशवर्धन** असें तुज नाम (स्वा.)
वंशवृद्धि करिशी सुतकाम ।
पुत्रवर्ग तव यादववंशा
वृद्धिनाशकर वा धृतवंशा ॥ ४८ ॥

वृद्धीस नेशी भववंश हा तूं
अंतीं तयाच्या विलयास हेतू ।
दावूनि जीवाप्रति धर्मसेतू
होशी अविद्याटवि-धूम-केतू ॥ ४९ ॥

**भारभृत्** भुजंगशायि तूजसी (रथो.)
नाम तूं भुवनभार वाहसी ।
शेष जो निजशिरीं धरी धरा
तो विभूति तव वा गदाधरा ॥ ५० ॥

**कथित** तूं असती निगमामृतीं (द्रु. वि.)
स्मृतिपुराणगणांतहि भारतीं ।
उपनिषद्वचनें कविंच्या मती
शिणति वर्णुनि तूज रमापती ॥ ५१ ॥

**योगीच** तूं सतत वा सहज स्थितींत (व. ति.)
नोहे कदापि चलता तव सन्मतींत ।

---

१ वेदरूपी वाणी. २ पुत्रांची इच्छा करणारा. ४ अज्ञानरूपी रानाला अग्नीसारखा. ३ देह धारण केलेला. ५ शेषशायी. ६ पृथ्वी. ७ वेदरूपी अमृतांत. ८ महाभारतांत ९ स्वाभाविक.

निर्वातदीपसम चित्त तुझें प्रशांत
सर्वज्ञ तू सकल सिद्धि तुझ्या वशांत ॥ ५२ ॥

जगत्सर्ग-रक्षा-विनाशस्वरूपी (भु. प्र.)
असे योग हाची तुझा या निरूपी ।
तुझी योगमाया करी या भवाते
तुवां नाहिं केलें कधीं साधनाते. ॥ ५३ ॥

योगीश तूज म्हणुनी म्हणती यती ते (व. ति.)
अष्टांगसाधन तुला नलगे कृतीते ।
योग्यांस तूचि मति देशि तशी गती ते
मडूकेंही करि निरुद्ध सदागतीते ॥ ५४ ॥

सर्वकामद असें तुज नाम (स्वा.)
पूर्ण तू करिशि सर्वहि काम ।
भक्तिमुक्तिद असे तव सेवा
पूज्य होशि गिरिशादिक देवां ॥ ५५ ॥

आश्रम संतां तूची निज-पद-निरतां सुरादिकां महता । (आ.)
निज भोग्य विषय जैसा वरयुवतिरता सुरादिकांमहता ।५६।

श्रमण तू असली रघुनंदना (द्रु. वि.)
श्रमविशी अधमां खरकंदना ।
उपवना परि जैं वरिशी वना
श्रमणही करिती तुज वंदना ।
वनफलांसह अर्पिति चंदना ॥ ५८ ॥

श्रमणरूप धरूनि दयाघना
करिशि तू मख-मार्गविनाशना ।

---

१ हातांत. ( स्वाधीन ). २ संसाराप्रत. ३ कृतार्थ जो तू त्याला. ४ ती उत्तम गति. ५ बेडूक. ६ वायूप्रत ७ भोग व मोक्ष देणारी ८ शंकरादि. ९ उत्तम स्त्रियांशीं रममाण १० दारू वगैरेच्या वासनेने घेरलेले. ११ यतिजन १२ यज्ञमार्गाचा नाश करणारा.

रचिशी धर्मपथा हरिशी तमा
जनपदा उपदेशिसि गौतमा[1] ॥ ५८ ॥

क्षाम[2] नाम हें तूज देतिही (का.
अंति भक्षिशी लोक तूं तिंहीं ।
क्षीण होउनी विश्व हें वसे
तूज माजिं बा बीजिं वृक्षसे ॥ ५९ ॥

सुपर्ण तूं वृक्षचि विश्वरूपी (उप-
आम्नाय[3] ऐसें स्मृतिही निरूपी ।
जयासि छंदोमय पर्णमाला
साजे जसी ती वन-पुष्पमाला ॥ ६० ॥

वायुवाहन तुला अभिधान (स्वा.
देति बा तव भयें पवमान[5] ।
वाहतो सतत या जगतात
प्राणियां सकल जीवित देत ॥ ६१ ॥

धनुर्धर असें तुला उचित नाम सीतापते (पृ.
कुमारपणिंही तुवां उचलिलें महाचाप[6] तें ।
जया नमवितां तुटे कडकडा करोनी रवा[7]
करी चकित ही कृती तव सुरादिकां रावा ॥ ६२ ॥

धनुर्वेद हें नामही तूज साजे (भु. प्र.
सुकीर्ती तुझी बाणविद्येंत गाजे ।
धनुर्वेद लोकांत साकार[8] व्हाया
प्रवेशी जणू ती तुझी दिव्य काया ॥ ६३ ॥

दंडरूप तूं घेउनी जना (का.)
देशि शिक्षणा बा जनार्दना ।
दंड नाम हें देति यास्तव
भाव हा असे गीतिंही तव ॥ ६४ ॥

---

१ गौतम बुद्ध २ क्षीण करणारा. ३ वेद ४ चांगल्या पर्णांनीं युक्त. ५ वारा.
६ धनुष्य. ७ आवाज. ८ मूर्तिमान

दमन तूं करिशी सकला जगा (द्रु. वि.)
यमनृपादिक रूप धरूनिया ।
दमयिता ह्मणुनी तुज नाम गा
मुनिजनीं दिधलें विजितेंद्रिया ॥ ६५ ॥

दमन जें करिती मुनि इंद्रियां
खचित हेतु तुझीच कृपा तया ।
सतत जे करिती तव चिंतना
नच तयां कधिं षड्रिपुयातना ॥ ६६ ॥

दमहि एक विभूति तुझी असे
सतत जी यतिच्या हृदयीं वसे ।
दम ह्मणूनि तुला मुनि सन्मती
उचित ही अभिधा स्तविं योजिती ॥ ६७ ॥

अपराजित असती तूं न पराजय संभवे जगन्नाथा । (आ.)
रिपुगण बघुनी तुजला नमविति मनिं नम्र होउनी माथा ६८

सर्वसहहि तुज वदती कविवर हरि सर्वशक्तिमंतातें ।
रिपुबल सहन कराया क्षम तूं जैसा हुताश शीतातें ॥६९॥

नियंता तुला नाम वा आगमांत (भु. प्र.)
तुझें हस्तकौशल्य भासे जगांत ।
जसें वाळवंटीं भुजंगप्रयात
तुझी दावि सत्ता करी चित्त शांत ॥ ७० ॥

नियममूर्तिच तूं असती हरी (द्रु. वि.)
नियति नित्यचि या जगता धरी ।
सकल गोलगणांसि तुझ्यामुळें
द्रुतविलंबित चाल नभीं मिळे ॥ ७१ ॥

अयम तूं तुज कोण नियामक
यम महेश सुरेंद्र विनायक ।

---

१ समर्थ. २ अग्नि ३ सर्पाचें गमन ४ जलद व सावकाश.

असासि या सकलांसिहि नायक
**यम**हि तूं यति-चित्तनिरोधक ॥ ७२ ॥

**सत्त्ववान्** हरी तूंचि एकला (का.)
रजतमोमयी एकही कला।
नाहिं तूझिया अंगि निर्मला
धैर्यवीर्यवान् शूर तूं भला ॥ ७३ ॥

**सात्विक** तूंते वदती सात्वतगण पूर्णशुद्धसत्त्वाते। (आ.)
**सत्य**हि संज्ञा देती सुख देशी नित्य सर्व संतांते ॥ ७४ ॥

**सत्यधर्मपरायणा** हर
सत्यरक्षणिं तूंच तत्पर।
धर्ममूर्तिच तूज जो ह्मणे
वाल्मिकी तुज वर्णुनी शिणे ॥ ७५ ॥

**अभिप्राय** तूंते मुनी नाम देती (भु.प्र.)
तुझ्या पायिं सारे सदा धांव घेती।
नद्या सिंधुमाजीं जशा सर्व जाती
तसे धर्म सारे तुझी वाट घेती ॥ ७६ ॥

कुणी पूजिती वृक्ष पाषाण पाणी
कुणी वेद वाणी शशी सूर्य कोणी।
कुणी पावकाते कुणी धातुमूर्ती
निराकार देवा कुणी पुण्यकीर्ती ॥ ७७ ॥

कुणी नाम देती तुला वा महेश
कुणी राम विष्णू विठोबा गणेश।
कुणी दत्त देवी जगन्नाथ देव
कुणी सच्चिदानंद वा ब्रह्म नांव ॥ ७८ ॥

---

१ पूर्ण म्हणजे भरलेलें आहे शुद्ध सत्व ज्याच्यांत असा २ अर्मीते. ३ पवित्र आहे कीर्ति ज्यांची असे (अवतारिक). ४ भक्तवर्ग

तथापी तयांचा अभिप्राय एक
जरी नामरूपें असीं हीं अनेक ।
नसे नाम देव नसे रूप देव
अभिप्राय जो वा मनीं तोच देव ॥ ७९ ॥

**प्रियार्ह** तूं यास्तव देवराजा (उप.)
प्रेमें तुला अर्पिति सर्व पूजा ।
पुष्पें फलें कुंकुम चंदनातें
देती करोनी तुज वंदनातें ॥ ८० ॥

खाद्यांत जी उत्तम वस्तु तूप
त्याचा दिवा लावुनि देति धूप ।
सर्वां गुणांहीं असंसीच धन्य
प्रियार्ह तूंते सम कोण अन्य ॥ ८१ ॥

**अर्ह** तूं सकळ तूज पूजिती· (रथो.)
अर्चनीं विविध भोग योजिती ।
शंकरादिसुर-मानभाजना
योग्य कोण तुजहूनि पूजना ॥ ८२ ॥

**प्रियकृत्** सकलांतें तूं करोत अथवा कुणी न तव भजना ।( आ.)
स्तविती नित्य तुला जे घडती त्यांते समस्त लाभ जना ।८३।

**प्रीतिवर्धन** असें तुज वाचें (स्वा.)
वर्णिती भजनिं जे रत साचे ।
प्रेम वाढविशि भक्तजनाचे
तो तुझ्या भजनिं नित्यहि नाचे ॥ ८४ ॥

**विहायसगती** असे वदति ईश तूंते मुनी (पृ.)
असे पद तुझे शुची गगनिं उच्च सर्वांहुनीं ।
प्रसिद्ध पद विष्णुचें ह्मणुनि जें पुराणांतरीं
रवी गगनिं जो फिरे तव विभूति तोही खरी ॥ ८५ ॥

---

१ प्रिय पदार्थ देण्याला योग्य. २ शंकरादि देवांच्या मानाला पात्र. ३ पवित्र.

ज्योतिर्नाम तुझें प्रसिद्धचि असे वेदीं पुराणीं हरी (शा. वि.
तेजोरूप तुझें मुनी बघति वा भ्रूमध्यभागांतरीं ।
ज्याची लोपवि भा सहस्र रविच्या तेजासि ऐसी श्रुती
ऐसें ऊर्जित तेजही करितसे चित्तप्रसादा अती ॥ ८६ ॥

सुरुचि तूं सखया अति सोज्वळ (द्रु. वि.
रुचिर कांति तुझी अति निर्मळ ।
अमित जी सुख दे मुनिच्या मना
विमलही मनिंच्या तव कामना ॥ ८७ ॥

हुतभुक् तुजला वदती भक्षिसि कीं हवन वन्हिरूपानें । (आ.
विभु तूं सर्वव्यापी शक्ति तुझी वर्णुं केंवि मापानें ॥ ८८ ॥

रवि तुला वदती कवि वैदिक (द्रु. वि.
निजकरीं पिशि वृक्षरसादिक ।
फिरुनि तें जल अर्पिशि वृष्टिते
करुनिया करण्या जनतुष्टिते ॥ ८९ ॥

विरोचन असें तुला उचित होय नामार्पण (पृ-
रवी शशि तसे असंख्य गगनस्थ तारागण ।
हुताश चपला तसे इतर पुंज तेजोमय
अशा विविध मूर्तिते धरुनि शोभसी चिन्मय ॥ ९० ॥

सूर्यरूप धरुनी जगताते (स्वा-
देशि तूं प्रसव वा बहुताते ।
जेंवि मेघ जनि दे सरिताते
भूमि जेंवि गवता हरिताते ॥ ९१ ॥

सविता तरि नाम ह्मणूनि तुला (तो-
भुवना जनिं देशिच तूं सकला ।
रविलोचन तूं बघशी अवघें
मुनि तो टक लावुनि जेंवि बघे ॥ ९२ ॥

---

१ तेज. २ आपल्या किरणांनीं. ३ आकाशांतील. ४ अग्नि. ५ वीज. ६ जन्म. ७ नद्यांना. ८ हिरव्या गवताला.

अनंत नामा तुज देति संत (उप.)
लागे तुझा या न कुणासि अंत।
देशीं तसा कालिंहि तूं अनंत
विभूति तो शेष तुझी अनंते ॥ ९३ ॥

हुतभुक् तरि तूं कृपाघन (वियो.)
तुजसाठीं हवि घे हुताशन।
मुख तो तव बोलती श्रुती
प्रलयीं जें जग भक्षुनी कृती ॥ ९४ ॥

भोक्ता तूंते अनलवदना बोलती या कवी ते (मंदा.)
यज्ञामाजीं सकलहि हरी भक्षिसी तूं हवीतें।
विश्वाच्या या असासि जरिही रक्षणीं शूर भारी
मंदाक्रांता बघुनि रमशी गोपिंच्या तूं मुरारी ॥ ९५ ॥

सुखद तूं असती निज सेवका (द्रु. वि.)
स्मृति तुझी अति दे सुख भाविका।
अगद ती भवरोग हरावया
तरि खरी भवसिंधु तरावया ॥ ९६ ॥

नैकज बोलति तूंज मुनी ते (दो.)
उद्धरण्यास्तव या अवनीते।
घेशि युगींयुगिं तूं अवतार
नेशि भवांतुनि सज्जन पार ॥ ९७ ॥

नैकद तूं जगिं देशि जनांना
धान्यफलास्तव उद्भिज नाना।
धातु विचित्र नद्या जल-पाना
गंध सुवासिक पक्षिहि गाना ॥ ९८ ॥

अग्रज नामा देती घेशी तूं ब्रह्मदेवजननाते। (आ.)
पहिला जन्म तुझा हा निर्मिशि मम या समस्त भुवनाते ॥

---

१ ज्याला अंत नाहीं असा. २ अनंत नावाचा जो शेष. ३ कृतार्थ. ४ अग्नि हेंच ज्याचें मुख. ५ मंद गतीतें. ६ नाहूं. ७ वृक्ष. ८ ब्रह्मदेवाचा जन्म.

**अनिर्विण्ण[1]** तूं सर्वदा तृप्तियुक्त
सदा सृष्टिकार्यांत होशी नियुक्त ।
नये वीट तूंते जगा रक्षितां या
पुन्हां संहराया पुन्हां तें कराया ॥ १०० ॥

**सदामर्षि** तूं सज्जनाच्या कृतीते (भु. प्र.)
करूनी क्षमा अर्पिशी सत्कृतीते ।
भृगूची उरीं लाथ घेऊनि साची
तुवां केलि वा पादसेवाचि त्याची ॥ १०१ ॥

**लोकाधिष्ठान** तूं वा शिरुनि भुवनिं या राहशी त्यांत लीनें[3] (स्र.)
तप्तायःपिंडिं जैसा अनल लवण वा सागरीं संविलीन ।
वाहे शक्ती तुझी हे ग्रहगण घनही ऋक्षमाला[4] धरित्री
त्यांचा आधार ती वा भुवन-गण[5]मणि-स्रग्धरा तीच तंत्री[6]।१०२।

**अद्भुत** साऱ्या हरि तव लीला (मौ. मा.)
विस्मित माझ्या करिति मतीला ।
सृष्टिंत सारें नवलचि भासे
मन हें शास्त्रें जरिहि विकासे ॥ १०३ ॥

वृक्ष वडाचा अणुकणिं मावे
शुक्रकणाते मति कशि पावे ।
सूर्य कसा तो सततचि पेटे
विस्मय याचा खचितचि वाटे ॥ १०४ ॥

विस्तृत तारा-ग्रहगण-माला
पाहुनि होई नवल मनाला ।
माप जियेचें मनिं अनुमाया
शक्य तया जो तरि तव माया ॥ १०५ ॥

---

१ दुःखरहित किंवा उत्साही. २ गुप्त. ३ विरघळलेलें. ४ नक्षत्रमाला. ५ भुवनगण-रूपी मण्यांची माला धारण करणारी ६ तार. ७ सत्कार ८ तापलेल्या लोखंडाच्या गोळ्यांत

लोकां पाडिशि विस्मयीं शिशुपणीं प्राणासवें ओढितां (शा.वि.)
दुग्धप्राशनिं पूतनाकुचघटा[1] गाडा पदें पाडितां ।
माती भक्षिलि काय पाहुं म्हणुनी तुंडाब्ज[2] उद्घाटितां
मातेते मुखिं विश्व दावुनि तिलाही विस्मयीं पाडितां ।१०६

खोड्या पाहुनि ताडितां नयनिं ते अश्रू बळें काढितां
लोणी खावुनि कोपुनीहि वरवंट्यानें रवी फोडितां ।
दाव्यांनीं तुज बांधितां अमितहीं पूरीं न तीं पाडितां
वृक्षां पाडुनि अर्जुनद्वय बका चंचूसवें फाडितां ॥ १०७ ॥

हस्ताग्रें धरितां महीधर[3] पदीं कालीय संपीडितां
हत्ती मत्तहि पाडुनी उपटुनी दंती धनू मोडितां ।
चाणूरादि बलाढ्य मल्ल वधुनी कंसासही तोडितां
वर्णूं मी किति बा त्वदीय मथुराशार्दूल[11] विक्रीडितां[12] ।१०८।

**सनात्** तुला बा वदती सनातन (उप.)
तू कालरूपी असती चिरंतन[4] ।
सर्वांहुनी तूं पहिला पुरातन
करी कृपाळो यमपाशकृंतन[5] ॥ १०९ ॥

**सनातनतम** प्रभो तुजसि नाम हें सार्थक (पृ.)
पितामह[6] जरी जगज्जनक तो तुझें अर्भक[7] ।
सदाशिवहि तो स्वयें वदतसे अजोबा तुला
पुरातनपणीं तुझी वद करूं कुणाशीं तुला[8] ॥ ११० ॥

**कपिल** मूर्ति तुझी धरि भूमिला (द्रु. वि.)
हटवि तेज जिचें वडवानला ।
करुनि हुंकृति जीं सगरात्मजा[9]
करि विनष्ट मृगेंद्र[10] जसा गजा ॥ १११ ॥

---

१ स्तनरूपी घट २ मुखकमल. ३ पर्वत. ४ चिरकाल राहणारा. ५ तोडणें ६ ब्रह्मदेव. ७ मुलगा. ८ तुलना. ९ सागराचे जे पुत्र त्यांना. १० सिंह ११ मथुरेचा व्याघ्र (कृष्ण) १२ विविध क्रीडा.

कपि असे वदती तुज सन्मती (द्रु.वि.)
धरुनि सूकरमूर्ति महाकृती ।
करुनि उद्धृत होशि मही कृती
कपि जसा वनिता तव ती सती ॥ ११२ ॥

अप्यय तूंते वदती विश्व प्रलयीं तुझ्यांतची शिरतें । (आ.)
राहे लीन तिथें तें बीजीं जैसे वटादि तरुवर ते ॥११३॥

शतक ९ वें समाप्त.

---

## शतक दहावें.

स्वस्तिद तूंते वदति वदान्या (मौ. मा.)
भक्तजनां तूं सुखद अनन्या ।
जे तुज येती शरण तयांते
देशि सदा तूं अमित सुखाते ॥ १ ॥

स्वस्तिकृत् ह्मणुनि नामहि देती (स्वा.)
सर्व मंगल असे तव हातीं ।
स्वस्तिरूप हरि तूं सुखधाम
स्वस्तिभुक् ह्मणुनीहि तुज नाम ॥ २ ॥

रक्षणीं असासि दक्ष सदाही
कीर्ति ही तव दिशांतहि दाही ।
वाहसी सतत तूं स्वजनाचा
क्षेम योग तव हा पण साचा ॥ ३ ॥

---

१ मोठ्या आकृतीची. २ कृतार्थ. ३ स्त्री. ४ साध्वी [पतिव्रता]. ५ दाता, उदार उपकार करणारा. ६ ज्याला अन्य (देव) नाहीं असे (भक्त). ७ रक्षण ८ संपादन

**स्वस्तिदक्षिण** असें तुज नाम (स्वा.)
शीघ्र तूं करिशि पूरित काम ।
जे तुझ्या स्मरति नित्य पदाते
स्वागता सकलसिद्धि तयाते ॥ ४ ॥

**अरौद्र** तूंते अति कोमलाते (उप.)
रुद्रप्रियाते अति निर्मलाते ।
वैराग्यशीलासि महाबलाते
संज्ञा असे देवकिच्या मुलाते ॥ ५ ॥

**कुंडली** तुला विश्व-मंडना (का.)
नाम देतिही दुःखखंडना ।
हेमंकुडलें कर्णि साजती
मेघमंडलीं जेंवि वीज ती ॥ ६ ॥

**चक्री** तुला नामहि आत्तचक्रा (उप.)
तूं चालवीसी भवकालचक्रा ।
घेऊनि हस्तीं अति तीक्ष्ण चक्रा
विदारिशी तूं अघघोरनक्रा ॥ ७ ॥

**विक्रमी** तुला देति बा पदा (का.)
दीर्घ टाकुनी व्योमिं तूं पदा ।
सर्व जिंकिशी दैत्यसंपदा
स्वर्ग सोडुनी जाय आपदा ॥ ८ ॥

**ऊर्जितशासन** तूं बा आज्ञा तव ती अलंघ्य सर्वांते । (आ.)
प्रेरिशि निजकर्मीं तूं रवि शशि विधि हरि सुरेंद्र शर्वाते ९

**शब्दातिग** तुज वदती वर्णुनि शास्त्रें समस्त तुज शिणती।
वेदांतें नकळे जें काय तिथें मनुजबुद्धिची गणती ॥ १० ॥

---

१ सहज प्राप्त झालेल्या. २ सुवर्ण. ३ चक्र धारण केलेला. ४ पापरूपी भयकर सुसरीला. ५ नाम. ६ आकाशांत- ७ पावलाप्रत ८ शंकराला ९ संसारचक्राला व कालचक्राला.

**शब्दसह**हि असती तूं, तात्पर्यें तुजसि वर्णिती शास्त्रें ।
प्रेमें सहनाचि करिशी स्तवितां तूंतें सहस्रधा स्तोत्रें[१] ॥११॥

**शिशिर** असासि तूं बा मेघसा नीववीशी (मा.)
प्रखरभवदवाग्नित्रस्त जे जीवराशी ।
निज सदय कटाक्षें वर्षुनी शीतधारा
अमृतसम हरी तूं तप्त जीवासि थारा ॥ १२ ॥

**शर्वरीकर** श्रीधरा तुला
नाम हें असे ज्ञानहेतुला । (का.)
ज्ञानियासि तूं शर्वरी[१]परी
करिशि सर्व ही संसृती[२] खरी ।
अज्ञ जे तया आत्मरूप तें
गुप्त ठेविशी रुक्मिणीपते ॥ १३ ॥

**अक्रूर** तूंतें वदतीहि संत (इं. व.)
हिंसा नसे बा तुजला पसंत ।
तूं मारिशीही जरि राक्षसांतें
देशी तया उच्चतमा पदातें ॥ १४ ॥

**पेशल** तूं बा केशव कोमल तन मन कृती तुझी वाणी । (आ.)
पाहुनि तूंतें गोपी भुलती गाती सदा तुझीं गाणीं ॥ १५ ॥

**दक्ष** तूजला नाम शोभतें (का.)
शीघ्रकर्मि[३] तूं हे प्रजापते ।
सृष्टिच्या मिषें तूंच वाढशी
सर्व शक्तिही तूंच वाहशी ॥ १६ ॥

**दक्षिण** तूं बा असासि उदारा, (मौ.)
लोक तुला ते प्रिय नच दारा[४] ।
शक्ति तुझी बा अमित जरी ती
जी प्रिय लोकां अशि तव रीती ॥ १७ ॥

---

१ रात्र २ संसार. ३ त्वरित काम करणारा. ४ स्त्रिया.

**क्षमिणांवर** तुज वदती द्वंद्वसहाते, समस्तभारवहा ( आ.
पृथ्वीतेही धरिशी वदती जीते धरित्रि सर्वसहा ॥ १८ ॥

**विद्वत्तम** एकचि तूं, तुजसम जगीं या नसे कुणी ज्ञाता
तूं प्रेरक बुद्धीचा, ज्ञानाचा तेंवि तूंचि बा दाता ॥ १९ ॥

**वीतभय**हि वास्तव तूं, शक्तिज्ञानाल्पताचि भयहेतू
भक्ता निर्भय करिशी; तूं या संसारसागरा सेतू ॥ २० ॥

**पुण्यश्रवणकीर्तन** प्रभो हे ( पु. श्र )
ज्याच्या तव सुनाम कर्णि राहे ।
कंठीं धरिहि नित्य जो तयाते
पापा हरुनि पुण्य जोडवी तें ॥ २१ ॥

**उत्तारण** तुज वदती, तारिशि लोकां भवाब्धिपासून । ( आ. )
**दुष्कृतिहा** असती तू टाकिशि दुष्कर्मवृक्ष तासून ॥ २२ ॥

**पुण्य** नाम तूं घेशि वामना ( का. )
स्वर्धुनीहि[1] जी लोकपावना ।
शंभु जी धरी आपुल्या शिरीं
ती तुझ्या पदीं जन्मली खरी ॥ २३ ॥

**दुस्वप्ननाशन** असें हरि नाम घेशी ( व. ति. )
दु:स्वप्नजन्य फल तूं नच होउं देशी ।
दु:स्वप्न तें नच कधींहि पडे तयातें ।
जो चिंतितो शयनकालिं तुझ्या पदातें ॥ २४ ॥

**वीरहा** तुला नाम अर्पिती ( का. )
भिन्न भिन्न ज्या लोक पावती ।
खुंटवूनि त्या दुःखदा गती
मोक्ष देशि त्या रुक्मिणीपती ॥ २५ ॥

---

१ आकाशगंगा.

**रक्षण** तूंते वदती, दक्षचि तू लोकरक्षणीं सतत । ( आ. )
धांवसि गजार्थही मग नर तव भजनांत कां न होय रत ।२६।

**संत** विभूती तव ते, संताते तूं सदाहि बा थारा
संतहि तूंते कोणी वदती जैं येथ घेशि अवतारा ॥ २७ ॥

**जीवन** संतां तूंची वांचति ते तव पदाब्जमधुपानें[2]
जीववि‍सी जीवांते राहुनि देहांत जीवरूपानें ॥ २८ ॥

**पर्यवस्थित** तुला वदती ते ( स्वा. )
व्यापुनी उरशि या जगतीते ।
जेथ सूर्य न शशी नच तारे
तेथ तेज विलसे तव बारे ॥ २९ ॥

**अनंतरूप** प्रभु तूं विचित्र ( उप. )
तू चंद्र, तारागण, तूच मित्र ।
वायू, तडित्पावक, तूच मेघ[3]
मही, तरू, पर्वत तूं जलौघ ॥ ३० ॥

**अनंतश्री** असासि हरि तूं तुझ्या विविधा किती ( कां. )
जगीं शक्ती दिसति अमिता जया श्रुति वर्णिती ।
तुझी कांता तनु बघुनि जे मनीं सुख पावती
तयांते श्री स्थिर अमितही मिळे तशि सद्गती ॥ ३१ ॥

**जितमन्यू** ह्मणुनिच तूं, क्रोधा कारण खरेंच दुर्बलता ( आ. )
नग[6] काय पवनवेगें हाले जैसी वनांत नागलता ॥ ३२ ॥

भयावह दिसे भवांबुधि तरी ( ज. )
जया तव मिळे पदांबुजतरी ।
तया सहज तो तिच्यांतुनि तरी
**भयावह**चि तूं ह्मणोनिच हरी ॥ ३३ ॥

---

१ रममाण. २ पादकमलाचा मकरंद पिवून ३ वीज. ४ अग्नि.
५ पाण्याचे प्रवाह ( नद्या इ ). ६ पर्वत ७ नागवेल ( पानवेल ) ८ भवसागर.
९ पादकमलरूपी नौका

तुझ्याविण नसे दुजी तरि बरी ( ज. )
भवार्णव तरावया मज हरी ।
जलोद्धतगती महार्णवि जशी
भयावहचि ती भवार्णवि तशी ॥ ३४ ॥

**चतुरस्त्र** तुला वदती सुकवी ( तो. )
नयवृत्ति जना तव ती सुखवी ।
फल देशि जगीं बघुनी करणी
सुख पंडुसुता तव जे चरणीं ॥ ३५ ॥

रत शुद्धहि जे निज आचरणीं
शकुनिप्रभृती कुरुवीरमणी
छळली बहु ज्यांहिं सती रमणी
चवघांसि तया रडवीशि रणीं ॥ ३६ ॥

**गभीरात्मा** तुजसि वदती, तुझी गहना मती ( कां. )
स्वरूपाते कथन करितां तुझ्या शिणली श्रुती ।
सहा शास्त्रें निगमगणही स्मृती कर टेंकिती
पुराणेंही सकल थकलीं, तशा कविंच्या कृती ॥ ३७ ॥

**विदिश** वदति तूंते वेद हे विश्वरूप ( मा. )
विविध फल जनांते देशि कर्मानुरूप ।
तव दशहि दिशांते व्यापुनी देह राहे
तुजसि नच उपाधी देशकालादि बा हे ॥ ३८ ॥

**व्यादिश** तूंते वदती, देशी तूं कीं स्वर्थे निदेशांते । ( आ. )
अधिकाराही त्या त्या, रविशशिगिरिशीं मरुत्सुरेशांते ।३९।

**दिशही** संज्ञा देती, उपदेशिसि कीं समस्त लोकांते ।
कर्में फलांसहित तीं बहुविध, घेवोनि वेदरूपाते ॥ ४० ॥

---

१ पाण्याच्या सवळण्यानें बेकाम झाली आहे गति जिची असी ( तरी ).
२ न्यायाचें आचरण. ३ साध्वी (द्रौपदी). ४ सुंदरी. ५ आज्ञा. ६ शंकराला
७ वायु व इंद्र यांना.

**अनादि** तूं बा जगदादिकारण (वं.)
नसेच कांहीं तुज अन्य कारण ।
तुझेच वंशस्थ विरिंचि शंकर
पुराण तूं पूरुष तूं परात्पर ॥ ४१ ॥

**भू** जी धरी भूतगणा तिलाही (उप.)
तुझीच शक्ती धरिते सदाही ।
तू भूमिभूमी ह्मणुनीच तूंते
भू नाम देती भुवनेश्वरांते ॥ ४२ ॥

**भुवोलक्ष्मी** तूते वदति रणवीरा रघुवरा (शि.)
तुझी रम्या मूर्ती, कृति, मति गती शोभवि धरा ।
तुझी सत्कीर्ती ती सकल भुवना व्यापुनि असे
तुझ्या नामोच्चारें सुकृति भव तापा हरितसे ॥ ४३ ॥

**सुवीर** तूं बा रघुवंशनाथ (उपें.)
वनीं तुझे साधु अनेक पंथ ।
तसेच सुग्रीवकपीश्वरादी
सुवीर जे रक्त तुझ्याच पादीं ॥ ४४ ॥

**रुचिरांगद** तुज वदती, शोभति बहु अंगदीं तुझे बाहू (आ.)
तनु तू योग्यहि देशी यद्योगें शकति भक्त तुज पाहूं ॥४५॥

**जनन** हें तुजला अभिधान गा (द्रु. वि.)
जनक तूंचि खरा अखिला जगा ।
करिति लोक जगीं युवती तरी
तव निदेशचि संतति करी ॥ ४६ ॥

**जनजन्मादि** प्रभु तूं, प्राणिप्रसवा निदान तू सांचें (आ.)
प्रकृती जड कैशी ती चेतवि परमाणु पंचभूताचे ॥ ४७ ॥

---

१ ब्रह्मदेव. २ पुरातन. ३ भूमीचीही भूमी ह्मणजे आधार. ४ पुण्यवान्. ५ अनुरक्त. ६ आज्ञा. ७ प्राण्याचे उत्पत्तीस ८ आदिकारण.

भीमरूपही घेशि तूं कधीं
प्रलयकालिंचा दाविशी विधी ।
अग्निरूप जें भूमिभीतरीं
तें तुझें कधीं धाव घे वरी ॥ ४८ ॥

जाळुनी नगा[1] भस्म तें करी
भस्मराशिते उंचही हरी ।
राखची करी जीवजन्तुची
ध्वस्त देशही होति फारची ॥ ४९ ॥

घोर जाळ ते अभ्र चुंबिती
वायुवेग त्या दूर वाहती ।
तप्त धातुचे पाट वाहती
सर्वही दिशा धूम्र घेरिती ॥ ५० ॥

होय जैं सुरू वृष्टिचा ऋतू
क्षुब्ध होशि तैं अब्धिरूपें[2] तूं ।
आगबोटि त्या नाचती किती !
लोक भीतिनें फार कांपती ॥ ५१ ॥

घेरि येउनी देह टाकिती
रिक्तकोष्ठही रक्त ओकिती ।
जीव घाबरे, धीरही उडे
पावती अती कष्ट बापुडे ॥ ५२ ॥

कोणि बोलती ही नव्हे तरी
सत्यची असे ही जरीमरी ।
घोर रूप हें त्वत्स्मृती करी
येथ एकची गोष्ट ही बरी ॥ ५३ ॥

भीमपराक्रम तूं बा, रणिं जिंकिशि रावणादि रणशूर   ( आ. )
त्राहित्राही ज्यांहीं केलें जगता जगांत महशूर ॥ ५४ ॥

---

१ पर्वताला. २ समुद्ररूपी

**आधारनिलय** तूतें वदती तू कीं समस्त आधारा (आ.)
भूम्यादि पंचभूतां आधारचि या जगास तूं धारा ॥ ५५ ॥

**धाता** पुन्हा तू अभिधान येशी (इं. व.)
कल्पांतिं हे विश्व समस्त पीशी ।
कल्पांतवन्ही वितळीं तयांशी
एकाच घोटें उदरांत घेशी ॥ ५६ ॥

अधाता असेंही असे नाम तूंतें (भु. प्र.)
नसे अन्य धाता तुला विश्वमूर्ते ।
तुला तूंचि आधार ही वेदवाणी
जगाची प्रतिष्ठाचि तूं चक्रपाणी ॥ ५७ ॥

**पुष्पहास** तव या मृदु नामीं (स्वा.)
अर्थ दोन दिसती बहु नामी ।
आद्य शक्ति विलसे कलिका जे
विश्वपुष्पचि तिचें बहु साजे ॥ ५८ ॥

विश्वपद्म खुलतें बहु नामी
हास्य जेंवि तव त्या व्रजधामीं ।
पाहुनी उभयही मुनि भारी
हर्ष पावति तशा व्रजनारी ॥ ५९ ॥

**प्रजागर** तुला अजामिळरुजाहरा नाम गा (पृ.)
कृतादरचि तूं सदा बहु समुद्धराया जगा ।
सुषुप्ति तुजला नसे कधिं प्रबुद्ध तूं सर्वदा
कसें रविपुढें टिके तम चिदात्मका शर्मदा ॥ ६० ॥

**ऊर्ध्वग** परात्परातें वदती तूतें, अधोक्षजा शिवदा (आ.)
अत्युच्च धाम तव तें विलसे भुवना पलीकडे चवदा ॥६१॥

---

१ ज्याला दुसरा कोणी धाता ( धारण करणारा ) नाहीं असा. २ कळी.
३ गोकुळांतलि घरांत ४ जागृत. ५ कल्याण करणारा.

**सुत्पथाचार** तू पावशी नाम गा (स्र.)
वर्तनें दाविशी मार्ग तूं या जगा ।
मूर्तिमान्धर्म तूं, नीतिंचें मंदिरू
इंदिरावासही[1] सज्जनांचा गुरू ॥ ६२ ॥

**प्राणद** प्रभो होशि तूं जना (उप.)
करुनि त्याजला मोक्षभाजना[2] ।
दावुनी तया सत्पथाप्रती
स्वपदिं लावुनी तेंवि तन्मती ॥ ६३ ॥

**प्रणव** तव प्राप्तीचें साधन जो सार सर्व वेदांचें (आ.)
अवयव चार तयाचे सूचक तव चार मूर्तिभेदाचे ॥ ६४ ॥

अकार संकर्षणमूर्ति दावी (उप.)
प्रद्युम्नही तेंवि उकार दावी
मकार तैसा अनिरुद्ध दावी
श्रीकृष्ण तो ब्रम्हाचि अर्धमाला ॥ ६५ ॥

**पण** म्हणजे विकणारा; घेउनि कर्में जनांसि तूं विकसी (आ.)
तोलोनि फलें तीं तीं, घेउनि पैका दुकानदार जसीं ॥६६॥

पण उचित तुला हें नाम सौदागिरातें (मा.)
जपतप करुनी जे पूजिती लोक तूंतें ।
वरदें[3] नियत होशी देशि त्या इष्ट सारें
बहुत तव पुराणीं गोष्टि ऐशा प्रकारें ॥ ६७ ॥

**प्रमाण** संज्ञा तव बोधवाची (उप.)
सत्ता तुझी ज्ञानमयीच साची ।
महाब्धि तूं ज्ञानमयोदकाचा
तयांत हा जीव तरंग साचा ॥ ६८ ॥

**प्राणनिलय** म्हणुनिच तूं जीव समस्तहि तुझ्यांतची मिळती (आ.)
सागरिं तरंग जैसे, सैंधवकण वा अशेषें[4] विरघळती ॥६९॥

---

१ लक्ष्मीचें निवासस्थान. २ मोक्षाला पात्र. ३ वर देणारा ४ सर्व.

**प्राणभृत्** प्रभो नाम वाहसी ( कृ. )
अन्न देउनी प्राण रक्षिशी ।
प्राणपंचका वा तुझ्यामुळें
**प्राणजीवन** त्राण तें मिळें ॥ ७० ॥

**तत्त्व** तूंचि वा एक या जगीं
अन्य वस्तु ती व्यर्थ वाउगी ।
**तत्त्ववित्** तरी तूंचि वा खरा
काय या कळे पामरा नरा
तूंच तूजला जाणसी हरा ॥७१ ॥

**एकात्मा** तूं विश्वरूपी तनूचा ( शा. )
स्वामी तूंची सर्व या चिज्जडाचा ।
भोक्ता तूंची सर्वविश्वाभिमानी
अज्ञानानें जीव मी मींच मानी ॥ ७२ ॥

**जन्ममृत्युजरातिगा** तुला ( ल. र. )
षड्विकार न होति निष्कला ।
जन्म वा नच मृत्यु पावशी
वृद्धता नच जाणशी कशी ॥ ७२ ॥

**भूर्भुवःस्वस्तरू** तूंजला नाम गा ( स्र. )
व्याहृतीच्या बळें तारिशी तूं जगा ।
लोक हे वृक्षसा व्यापिशी तीन तू
लोकरूपींच वा वृक्ष तूं शाश्वतू ॥ ७४ ॥

**तार** हें असें नाम तूजगा ( का. )
तारिशी हरी तूंचि या जगा ।
प्रणवरूपही तारितें तव
नाम त्यासही तार यास्तव ॥ ७५ ॥

---

१ भू', भुवः, स्व' हे जे तीन लोकांचे दर्शक तीन शब्द त्यांना व्याहृती ह्मणतात.

**सपिता** वदती तूतें असती तूं कीं समस्त जगताचा (आ)
एकचि पिता समानचि पालक तू जनक तूंचि बा साचा ।७६।

**प्रपितामह**ही वदती, पितामहाचाहि तूच बा तात
विधिचें नाम पितामह, जन्मे तो तवचि नाभिवृतात ॥७७॥

**यज्ञ** तूंचि बा कर्मजन्य तो (का.)
कर्म तेंहि बा वेद निर्मितो ।
वेद ही तुझी होय वैखरी
यज्ञ यापरी त्वत्तनू खरी ॥ ७८ ॥

**यज्ञपती** यज्ञाचा भोक्ता त्राता तसाच तूं स्वामी (आ.)
यागत्राणमिषानें कौशिक नेयी तुलाच निजधामीं ॥ ७९ ॥

**यज्वा** तूं बा करिशी बहु तू अश्वमेधादि यागा (मं.)
विप्रातेही सुखविशि बहु राघवा वीतरागा ।
सर्गारंभीं यजन करिशी तू असी वेदगाथा
सृष्टिव्यापारचि तव मला भासती यज्ञ नाथा ॥ ८० ॥

**यज्ञांग** ऐसें तुज वेद कीर्ती (इं व.)
होशी पुरा यज्ञवराहमूर्ती ।
पृथ्वी तुवां यज्ञमयस्वरूपें
उद्धारिली दिव्यवराहरूपें ॥ ८१ ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय. नं. ता. (स्था.) ठाणे.

**यज्ञवाहन** तुला हरि नाम
यज्ञभूमि तव हे प्रियधाम ।
यज्ञ जेथ करिती फलकाम
तेथ तूं प्रकट होशिच राम ॥ ८२ ॥

**यज्ञभृत्** तुझें नाम चिंतितां (का.)
यज्ञकर्मिं बा येइ पूर्णता ।

---

१ बेंबीच्या देठांत (नाभिकमलांत.). २ यज्ञसरक्षणनिमित्तानें ३ विश्वामित्र ४ वैराग्यशील. ५ वेदांचें सागणें. ६ यज्ञ. ७ स्वगृहीं.

सर्व जातिचें कर्म संपतां
विप्र वदिती तूज अच्युता ॥ ८३ ॥

**यज्ञकृत्** तुला नामही हरा
करिशि सृष्टिच्या पूर्वि अध्वरा ।
नाशिसी तया सृष्टिशेवटी
दक्षयज्ञ तो जेंवि धूर्जटी[1] ॥ ८४ ॥

**यज्ञी** तूतें वदती, अधिदैवत तूंचि सर्व यजनांत (आ.)
यज्ञहि बहुतचि असती तुजसाठीं विहितें[2] तीन वेदांत ।८५।

**यज्ञभुक्** तुला नाम ईश्वरा (का.)
भोगिशीच तूं सर्व अध्वरा ।
इंद्र, सूर्यही तूंचि चंद्रमा
रुद्र वन्हिही तूंचि अर्यमा ॥ ८६ ॥

**यज्ञसाधन** असें तुज नाम (स्वा.)
प्राप्त होय यजनें तव धाम[3] ।
धर्मराज करि ज्या यजनासी
तूच सिद्धिस तया हरि नेसी ॥ ८७ ॥

**यज्ञांतकृत्** हें तुज-नाम युक्त
पूर्णाहुतीनें तव मंत्रयुक्त ।
सर्वत्रही यज्ञसमाप्ति होते
फल क्रतूचेंहि[4] तुझ्याच हातें ॥ ८८ ॥

ज्ञानें समाप्तीप्रति जाय कर्म
गीतेंत तूं सांगसि हेंच वर्म ।
तें ज्ञानही होय तव प्रसादें
यज्ञांतकृन्नाम तुला श्रुती दे ॥ ८९ ॥

**यज्ञगुह्य** वदती हरि तूंते
यज्ञगुह्य समजाविसि तूं तें ।

---

१ शंकर. २ सांगितलेले. ३ स्थान. ४ यज्ञ.

त्यक्तसंग करणें निजकर्म
हेंच यज्ञगत सांगसि वर्म ॥ ९० ॥

त्यक्तसंग करुनी निजकर्म
अर्पिणें तुजसि हा वर धर्म ।
गुह्य हेंच कथिसी निजमित्रा
यज्ञगुह्य तुज नाम पवित्रा ॥ ९१ ॥

अन्नही असे नाम हें तुला (का.)
भक्तवर्गसंतोषहेतुला ।
अन्न जेंवि या पुष्टि दे जना
तेंवि तू नरा मोक्षभाजना ॥ ९२ ॥

अन्न जेंवि दे मोद मानवा
तेंवि तू निजा नित्य या नवा ।
प्रलयकालिं तूं भक्षिसी जगा
यामुळेंहि हें नाम तूज गा ॥ ९३ ॥

अन्नाद तूं या हरि विश्वरूप (उप.)
शिरूनि सर्वांतरिं तू अरूप ।
नानाविधान्ना करिशीच फस्त
अन्नाद तूं अन्नहि तूं समस्त ॥ ९४ ॥

आत्मयोनि तूं ईश निर्गुण (का.)
हेतु आपुला तूंचि आपुण ।
विश्वयोनिही तूंचि सन्मते
विश्व दागिना तूचि हेम तें ॥ ९५ ॥

स्वयंजात तूं अन्य तूतें न कर्ता (भु. प्र.)
स्वतःसिद्ध तू तूंचिही विश्वकर्ता ।
जसें गाडगें निर्मितो तो कुलाल
तसें विश्व हें निर्मिसी तूं सलीलें ॥ ९६ ॥

---

१ मोक्षाचें स्थान ( हें ईश्वराचें संबोधन आहे ). २ विश्वोत्पत्तीचें कारण ( उपादान ). ३ सहज ( लीलेनें ) ४ निरिच्छपणें. ५ श्रेष्ठ. ६ स्वभक्तांना. ७ सोनें. ८ कुंभार.

**वैखान** ऐसें वदती तुला ते (•उप.)
म्हणूनि तूं या वसुधातलाते।
पातालिं जासी वधसी खलाते
हरोनि जो नेइ पुरा श्रुतीते ॥ ९७ ॥

**सामगायन** तुला वदती ते
मुक्त गाति तुज नैगम गीतें।
साम तूंहि वससी हरि गात
तूंच गायकवरिष्ठ जगात ॥ ९८ ॥

**देवकीनंदना**, पूतनाकंदना (स्र.)
दैत्यनिर्दालना, नागसमर्दना।
कंसविध्वंसका गोपिकावल्लभा,
भक्तसंतारका नास्तिका दुर्लभा ॥ ९९ ॥

भूमिच्या पालका, बाल गोपालका
विश्वसंचालका, देवकीबालका।
विश्व तूं निर्मिशी, तूंचि तें रक्षिसी
अंतिं विध्वंसुनी तूंचि तें भक्षिसी ॥ १००

कोण जाणे तुझी गूढ माया हरी
प्रार्थितों तूज मी मुक्त मालें करी।
तूंच देशी मती, तूंच गाशी स्तुती
भक्तिवृद्धि करो या जनीं ही कृती ॥ १०१ ॥

**स्रष्टा** तूं बा नवल मग तें काय तू वत्सगोपां (मं.)
निर्मूनीया चकित करिशी ब्रह्मदेवासि गोपा।
किंवा त्या बा कुरुपरिषदीं निर्मुनी वस्त्रमाला
पाचालीचें व्यसन हरण्या दाविशी आत्मलीला ॥ १०२ ॥

**क्षितीश** तूं बा रघुनाथ एक (उप.)
होतील, झाले नृपती अनेक।

---

१ पूर्वकालीं. २ वैदिक. ३ वासरें. ४ गुरें राखणारे. ५ हे गोपाला! ६ कौरवसभेंत ७ द्रौपदीचें.

नये तुझें साम्य तयांत कोणा
तू एकची सर्व नृपात राणा ॥ १०३ ॥

**पापनाशन** असें तुज नाम (स्वा.)
नाशिशी त्वरित तू अघ राम ।
पाप कोणि न शकेच कराया
नाम जें तव समर्थ हराया ॥ १०४ ॥

**शंखभृत्** तुला नाम बा हरे (का.)
नित्य वाहसी शंख तूं करें ।
पांचजन्य ज्या नाव बा असे
भूतपंचका सूचवीतसे ॥ १०५ ॥

**नंदकी** असें नाम पावसी
नंदको करीं वाहसी असी ।
ज्ञान लोहि बा सूचवी हरे
अज्ञतालता छेदि जो त्वरें ॥ १०६ ॥

**चक्री** सदा सजवि चक्र तुझ्या करातें (व. ति.)
देती सुदर्शन असी अभिधा जयातें ।
तत्त्वासिं तें सुचवितेंहि मनोमयातें
चक्रापरी फिरविशी हरि तूं भवातें ॥ १०७ ॥

**शार्ङ्गधन्वा** तुला नाम देती हरी (स्र.)
शार्ङ्गचापा तुझा हस्त उभा धरी ।
इंद्रियादी अहंकार जें सूचवी
शत्रुवर्गीं तुझा हस्त ज्या वाकवी ॥ १०८ ॥

**गदाधर** असें गदादिकंहरा तुला नाम गा (पृ.)
गदी तव खरीच बा अशनि पापरूपी नगा ।

---

१ पाप २ नंदकनामक ३ तरवार ४ जगातें. ५ त्रिविध अहंकारांपैकीं इंद्रियादि किंवा राजस अहंकार ६ रोगादिकांचा नाश करणारा. ७ वज्र. ८ पर्वत.

तसें सुचवि ती, कवी वदति, बुद्धितत्त्वाप्रती
निर्णे मिळविले किती असुर पंचतत्वाप्रती ॥ १०९ ॥

**रथांगपाणी** वदती तुलाही ( उप. )
चक्रा सदाही तव हस्त वाही ।
भीष्मावरी हाणिशि चक्र कृष्णा
अतीच बा ती तव युद्धतृष्णा ॥ ११० ॥

**अक्षोभ्य** तूज वदती मुनि पांडुरंग ( व. ति )
न क्षोभवी रिपु तुला बहिरंतरंग ।
लाजे तुला बदरिकाश्रमिं तो अनंग[1]
तूं शांत त्या जलधिसा[2] न जया तरंग ॥ १११ ॥

**सर्वप्रहरणायुध** प्रभो हे ( पुष्प. श्र. )
सीमा तव महायुधासि नोहे ।
जीं जीं प्रहरणार्थ आयुधें तीं
हस्तां तव समस्त शोभवीती ॥ ११२ ॥

तूतें नमन मी करूनि आतां
हें बा करिन काव्य पूर्ण ताता ।
नामावलि सहस्रपुष्पमाला
घालीन तव कंठिं नंदबाला ॥ ११३ ॥

घेई रुचिर मानुनीच तीतें
जैसा पति कुरूपही सतीतें[3] ।
देई स्तवनशक्ति मन्मतीतें
नेई त्वरित दास सद्गतीतें ॥ ११४ ॥

सहस्र तव बा शिरें असति सर्वविश्वात्मका ( पृ )
सहस्र करही, मुखें, नयन, कर्णही नासिका ।
सहस्र तुजला मुनी विविध देति नामें तशीं ।
सहस्रगुणवर्णना मग समर्थ वाणी कशी ॥ ११५ ॥

---

१ मदन. २ समुद्र ३ पतिव्रतेते.

कृपाचि तव ही करी विवृत नाममाला जुनी
ह्मणोनि नच राहतां बुधजनासि मी लाजुनी ।
स्तवार्थ तव ह्मा यथामति सुसज्ज झालों जनीं
तुझें करिशि तूंचि बा स्तवन मन्मनीं राहुनी ॥ ११६॥

शतक १० वें समाप्त.

---

## फलश्रुति.

जया कीर्तितां सार्थता या जनीची		( भु. प्र. )
तया केशवाचीं महात्म्या प्रभूची ।
सहस्रांत जीं दिव्य नामेंच साचीं
अशा रीतिनें वर्णिलीं अर्थवाची ॥ १ ॥

सदा ऐकितां कीर्तितांही तयांते
इहामुत्रही दुःख नोहे नरातें ।
द्विजा ज्ञान देई जय क्षत्रियातें
धना वैश्यवर्गासि, शूद्रा सुखातें ॥ २ ॥

धना पावती द्रव्यकामी यथेष्ट
तसे पावती धर्मकामी अभीष्ट ।
जया आवडे भोग त्यातें तयाची
प्रजार्थी जना प्राप्ति होई प्रजेची ॥ ३ ॥

---

१ विवरण केलेली. २ नाम येणें ३ जन्माची ४ इच्छित.

शुचिर्भूत जो भक्तिनें एकचित्तें
पढे नाममाला सदा त्यास वित्तें ।
चिरस्थायि, कीर्ती, प्रतिष्ठा स्वगोत्रीं
मिळे, श्रेष्ठ कल्याण शक्तीहि गात्रीं ॥ ४ ॥

निरोगी, भयातीत, तेजस्वि होई
गुणाधिक्य, सौंदर्य, वीर्यादि येई ।
अजान्यास आरोग्य कैद्यास मुक्ती
अभीतीहि भीता, अशक्तासि शक्ती ॥ ५ ॥

तशी संपदाही विपन्ना[1] मिळे ती
सदा भक्तिनें स्तोत्र जे नित्य गाती ।
महापूरुषा कीर्तिती पुण्यकीर्ती
तरोनी त्वरें संकटा पार जाती ॥ ६ ॥

मुकुंदांघ्रिपद्मींच जे लीन होती
सदा भक्तिनें त्यास जे आकळीती ।
तयाचीं महापातकें नष्ट होती
परब्रह्मरूपासि ते पात्र होती ॥ ७ ॥

नसे दु:ख त्यातें जया कृष्णभक्ती
नसे जन्म मृत्यू जराव्याधिभीती ।
पढे स्तोत्र जो हें सविश्वासभक्ती
मिळे त्या सुख श्री धृति क्षांति[2] कीर्ती ॥ ८ ॥

स्मृती होय मोठी कुबुद्धीहि जाई
पळे लोभ मात्सर्य न क्रोध येई ।
नरा पुण्ययोगें जडे कृष्णभक्ती
धरी विश्व सारें हरीचीच शक्ती ॥ ९ ॥

मही, स्वर्ग, नक्षत्र, आकाश, सूर्य
तसे चंद्र, अब्धी, धरी कृष्णवीर्य ।

---

१ विपत्ति पावलेल्याला. २ क्षमा ( सहनशीलता ).

अधीन प्रभुच्या असे विश्व सारें
जिथें देवदैत्यादिकाचे पसारे ॥ १० ॥

धृती, बुद्धि, शक्ती, तसें चित्त, जीव
दहा इंद्रियें, क्षेत्र[1] हीं वासुदेव ।
सदाचार मुख्य श्रुतीमाजिं चार
तयापासुनी होय धर्मप्रचार ॥ ११ ॥

प्रभू सर्व धर्मा असे वासुदेव
ऋषी, पंचभूतें, पिते, धातु, देव ।
श्रुती, शिल्प, विद्या, तसे सांख्य, योग
करी सर्व वस्तू हरीचाच योग[2] ॥ १२ ॥

महाभूत विष्णू अनेकींहि देहीं
शिरूनी वसे व्यापुनी लोक तीहीं ।
असे तोचि आत्मा समस्ताहि भूतां
जगा रक्षितो, अव्ययी तोचि भोक्ता ॥ १३ ॥

महा स्तोत्र हें बा जया व्यास कीर्ती
पढे जो तयाते मिळे भुक्ति[3] मुक्ती ।
अनादीहि जो सृष्टिसंहारकर्ता
भजे पद्मनेत्रा न त्या दुःखवार्ता ॥ १४ ॥

जडो जनमती त्वदीय पदिं ऐकुनी हा स्तव (पृ.)
तदीय मनही रमो श्रवणिं सद्गुणांच्या तव ।
करो जन सदा स्वदेशरति ऐक्यवृद्धीस्तव
मिळो सकल सौख्य त्या, त्वरित तो तरो हा भवें[4] ॥ १५ ॥

ॐ तत्सत्.

---

१ शरीर. २ योगशक्ति ३ भोग ४ संसार.

परिशिष्ट.

# स्पष्टीकरणार्थ टीपा

मंगलाचरण श्लोक १ यांत मीमांसक शब्द कर्ममीमांसा व ब्रह्ममीमांसा ह्या दोन्हींच्या प्रतिपादकांस उद्देशून योजिला आहे. पूर्वमीमांसकांना ईश्वर वाङ्मयब्रह्मरूपी ह्मणजे वेदरूपी भासतो. ह्मणजे वेद किंवा वैदिक कर्म हाच त्याचा ईश्वर. उत्तरमीमांसक ह्मणजे वेदांती. यांच्या दृष्टीनें ईश्वर गुणरहित म्हणजे निर्गुण ब्रह्म होय. त्यांना तो निर्गुण ब्रह्मरूपी भासतो.

उपक्रम श्लो. १ भारती युद्धानंतर धर्मराजाला आपल्या हांतून जी भयंकर जीवहत्या झाली, आप्त इष्ट, चुलते पुतणे, बाल वृद्ध, गुरू इ. जे अनेक मारले गेले, त्यांजबद्दल फार दुःख व पश्चात्ताप झाला असतां व्यासादिकांनीं इतिहासांतील पुष्कळ गोष्टी वगैरे सांगून त्याचें सांत्वन करण्याचा पुष्कळ प्रयत्न केला; अश्वमेध यज्ञ करावयास सांगितलें; श्रीकृष्णांनीं बोध केला, तरी त्याच्या मनाची शांति झाली नाहीं. पुढें तो सर्व बंधूसह भीष्म जेथें शरपंजरीं पडले होते त्या ठिकाणीं त्यांना भेटण्याकरितां आला. श्रीकृष्णाचे मनांत भीष्माकडून त्याला उपदेश करवायाचें होते व तोच उपदेश फलद्रूप व्हावा अशी त्याची इच्छा होती. अंगांत शेंकडो बाण रुतले असून, ते प्रत्यक्ष शरशय्येवर निजले असून देखील त्यांच्या भक्तिप्रभावानें व श्रीकृष्णाच्या कृपावलोकनानें त्यांना बाणांच्या जखमाची कांहींच व्यथा न होतां त्यांचें मन शांत व कृष्णपरायण झालें होतें. त्यांच्या तोंडावर इतकें तेज होतें कीं, भूतलावर आलेल्या एखाद्या स्वर्गातील देवाप्रमाणें ते दिसत होते.

भीष्माचार्यांनीं धर्मराजाला प्रथम राजधर्म, मोक्षधर्म, दानधर्म इ. अनेक धर्मासंबंधानें उपदेश केला व अनेक तीर्थें, व्रतें व तपें यांचा पावन करण्याचा महिमा सांगितला; तेवढ्यानें समाधान न झाल्यामुळें अल्पप्रयास व बहुफल असा धर्म जाणण्याच्या इच्छेनें या व पुढील श्लोकांतील एकंदर पांच प्रश्न धर्मराजानें केले आहेत. सर्वांत वरिष्ठ-स्थान याचा अर्थ हा कीं, ज्या स्थानाची प्राप्ति झाली असतां, सर्व संशय नाहींसे होऊन दुःखहानि, कर्मक्षय व सुखप्राप्ति होऊन पुनः कोणतीच तळमळ रहात नाहीं व त्या श्रेष्ठ स्थानापासून माघारीं यावें लागत नाहीं ॥ १ ॥

श्लो. २ जो जप भवा वारी म्हणजे ज्याच्या योगानें जन्ममर-णाचा फेरा व अनेक दुःखें यांनीं युक्त अशा संसारापासून मनुष्य मुक्त होऊन आनंदरूप राहतो ॥ २ ॥

## शतक पहिलें.

श्लो. १ वेदादि सर्व मंत्राची सुरुवात ॐकारापासून करावयाची असा प्राचीन कालापासून शिष्टाचार आहे. उपनिषदादिकामध्यें ॐ काराचें महत्व फार सांगितलें आहे. त्यालाच प्रणव म्हणतात. ह्या श्लोकांत सुचविल्याप्रमाणें तो एकाक्षरी वेद व ईश्वराचें मुख्य नाम आहे एवढेंच नव्हे तर अ, उ व म् हीं जीं त्याचीं तीन अंगें त्याच्या योगानें तो तीन लोक ( भू. भुव स्व पृथ्वी, अंतरिक्ष व स्वर्ग किंवा पाताळ भूमी व स्वर्ग ), तीन देव किंवा ईश्वराच्या तीन मूर्ति—ब्रह्मा, विष्णु व रुद्र—तीन अवस्था ( जागृत्स्वप्नसुषुप्ति ), तीन देह ( स्थूल; सूक्ष्म व कारण ), इ. अनेक त्रिपुटींचा सूचक आहे. भगवंतांनींहि गीतेमध्यें सर्व सत्कर्म प्रणवपूर्वक करावीं असें सांगितलें आहे. या श्लोकांत ही ईश्वरांची आद्यसंज्ञा असें जें म्हटलें आहे तें दोन अर्थांनीं. १ नामावळींत हें नाम पहिलें आहे; २ हें सर्व ईशनामामध्यें मुख्य आहे. ( तस्य वाचक प्रणव प्रणव हा ईश्वराचा वाचक आहे असें पतंजलीनें म्हटलें आहे ). वर सांगितलेला त्याचा अत्यंत व्यापक

अर्थ, त्याचें एकाक्षरत्व, व म्हणूनच सुरस व सुलभ उच्चार व तज्जन्य चित्तवृत्तिनिरोधकत्व हीं त्याच्या श्रेष्ठत्वाचीं कारणें होत. प्रणवाचा जो सूक्ष्म ध्वनि त्याचे योगानें निर्गुण ब्रह्माचा बोध कसा होतो इत्यादि माहिती योगातील रहस्य असल्यामुळें ती गुरुमुखानेंच समजून घेतली पाहिजे.

श्लो. २ 'आकार वा स्फुट यदीय' इ. प्रणवाचा आकार श्रीगणपतीच्या तोंडाचा दर्शक आहे. प्रणवाक्षरालाच मूर्त (घन) रूप दिलें असतां तें कांहींसें गजवदनासारखें दिसतें. श्रीगणपति हा प्रणवरूपीच आहे अशी श्रुतीही आहे. ह्या पहिल्या दोन श्लोकांत प्रणवाचा अर्थ सांगण्यामध्येंच साहजिक रीतीनें परमात्मा, त्याच्या तीन मूर्ती (ब्रह्मा, विष्णु व रुद्र) व विघ्नहर्ता गजानन या सर्वांनाच मंगलाचरणार्थ नमन केलें गेलें आहे. पहिल्या दोन श्लोकात ॐ नमो भगवते वासुदेवाय हा द्वादशाक्षरी मंत्र साहजिकरीत्या आणला आहे. हीं बारा मंत्राक्षरें किंचित् जाडच्या टाईपांत दाखविलीं आहेत

श्लोक ६–'देवता अतिमा ती' ऐतरेय ब्राह्मणादि ग्रथांत ज्या वेदोक्त ३३ देवता सांगितल्या आहेत त्यांत वषट्कार ही देवता शेवटीं दिली आहे, ह्मणून श्रुतिप्रोक्त अतिमा देवता असें येथें ह्मटलें आहे.

श्लोक ७–भूत, भव्य व भवत् हे शब्द भूतादि तीन कालांचे वाचक तर आहेतच पण वायुपुराणांत एक आख्यायिका सांगून ते भू भुवः व स्व या तीन लोकांचेही सूचक आहेत असें ह्मटलें आहे. हाच अर्थ श्लोकांत भुवनत्रयी या शब्दानें व्यक्त केला आहे. तात्पर्य, परमेश्वर तिन्ही काली तिन्ही लोकांचा प्रभु आहे.

श्लोक ८–'ओषधींस पोशितो इ.' चंद्र जरी ओषधींचें पोषण करितो तरी सूर्यापासूनच त्याला प्रकाश मिळाल्यामुळें मुख्य पोषक तोच आहे. त्याचप्रमाणें जरी ब्रह्मदेव सृष्टि करितो तरी त्याचा प्रवर्तक परमेश्वर असल्यामुळें 'भूतकृत्' हें नाव त्यालाच योग्य आहे.

श्लोक ३–ॐकारानंतर सहस्रनामाच्या आरंभींच जें विश्व हें नाम योजिलें आहे त्यांतील उद्देश हा कीं, ईश्वराचें अगदीं उघड उघड स्वरूप ह्मटलें ह्मणजे विश्व हेंच होय. ‘सर्वं खल्विदं ब्रह्म’ ह्या श्रुतिवाक्याप्रमाणें, ‘इदं हि विश्वं भगवानिवेतर’ ह्या श्रीमद्भागवतांतील वाक्याप्रमाणें किंवा ‘वासुदेवः सर्वमिति’ ह्या भगवंताच्या वाक्याप्रमाणें विश्व हेंच ईश्वर होय. विश्व हें ईश्वराचा स्थूल देह ह्मटला तरी चालेल. श्रीमद्भागवतांत ( स्कंध १ अध्याय ३ ) ईश्वराचीं जीं निरनिराळीं रूपें किंवा अवतार वर्णन केले आहेत त्यांत अगदीं पहिलें रूप ह्मटलें ह्मणजे विश्वरूप किंवा विराटस्वरूप होय व तेंच नाना अवतारांचें निधान व अविनाशी बीज होय, असें सांगितलें आहे. ईश्वराच्या सर्व सगुणस्वरूपांमध्यें हेंच श्रेष्ठ असून त्याची उपासना करणें फार श्रेयस्कर आहे असें भगवद्गीतेच्या १२ व्या अध्यायाचे आरंभीं व श्रीमद्भागवताच्या दुसऱ्या स्कंधाच्या पहिल्या अध्यायात सुचविलें आहे. ह्या विराटस्वरूपाच्या कल्पनेंतच ईश्वराची सहस्रनामानीं स्तुति करण्याच्या पद्धतीचें बीज आहे. कारण जसे विराटपुरुषाचीं डोकीं, हात, पाय वगैरे अवयव सहस्र ( ह्म. असंख्य ) कल्पिले आहेत, तशींच त्याची नांवेंही सहस्र मानणें साहजिकच आहे. या दृष्टीनें पाहिलें असतां विश्व हें नाम सहस्रनामांच्या अगदीं आरंभी येणें सयुक्तिक दिसतें. विश्व या नामांतच ईश्वराचें सहस्ररूपत्व ( अनंतरूपत्व ) व्यक्त होतें. सर्वांभूतीं ईश्वर पाहणें हें चित्ताला समत्व आणण्यास कारणीभूत होतें, सर्वांवर प्रीति उत्पन्न करितें व पदोपदीं व ठिकठिकाणीं ईश्वराची सत्ता भासमान झाल्यामुळें मनुष्य निर्भय होतो. हेंच ४ थ्या श्लोकांत व्यक्त केलें आहे.

श्लोक ९–शुद्धरूपीं व प्रपचरूपीं राहसी याचा अर्थ हा कीं, ईश्वराची सत्ता दोन प्रकारची, एक त्रिगुणात्मक सृष्टिरूप ( प्रपचरूप ) व दुसरें गुणातीत असें शुद्ध आत्मरूप.

श्लोक ११–‘भूतभावन’ यांतील भावन या शब्दांत उत्पन्न करणें, वाढविणें, पोषण व पालन करणें हे सर्व अर्थ येतात.

श्लोक १२—सृष्ट्यादि सर्व जगद्व्यापार हे ईश्वराच्या साहजिक लीलेनें उत्पन्न होतात; त्यांत त्याचा प्रयत्न, इच्छा किंवा हेतु नसतो हें दाखविण्याकरितां ' स्वभावधर्मानें ' असें ह्मटलें आहे.

श्लोक १३—यांतील ह्मणुनिच याचा संबध वरील श्लोकांत ध्वनित केलेली जी ईश्वराची निरिच्छता त्याजकडे आहे. सर्व कर्मांत निरिच्छता असणें हेंच परमात्मत्वाचें कारण. ह्मणूनच अति शुद्ध बुद्ध ( ज्ञानवान् ) इ. विशेषणें पुढें दिलीं आहेत.

श्लोक १६—पुरुष शब्दाची निरुक्ति उपनिषदादि ग्रंथांत अनेक प्रकारची केली आहे व त्याप्रमाणें त्याचे अर्थही अनेक होतात. विष्णुसहस्रनामांत हें नाम दोन वेळां आलें असल्यामुळें त्याचे निदान दोन प्रकारचे तरी अर्थ समजले पाहिजेत. ' पुरिं ( देहरूपी पुरांत किंवा नगरांत ) शेते ' ( शयन करितो ) ह्मणून पुरुष ( आत्मा ). तसेंच तो सर्वत्र पूर्ण भरलेला आहे ( पृ धातु पूरणार्थ आहे ) किंवा तो पूर्वींपासून आहे ( पुरा आसीत् इति पुरुषः ) म्हणून पुरुष. हे सर्व अर्थ दर्शविण्याकरितां प्रस्तुत श्लोकांत पूर्णा, पुराणा हीं विशेषणें दिलीं आहेत.

श्लोक २१।२२—' योगविदानेता ' हें नाम देण्यामध्यें योग्यांवर कटाक्ष आहे असें दिसतें. कारण, योगमताची अशी घमेंडी आहे कीं, प्राणायामादि साधनांनींच सर्व सिद्धि व मोक्ष प्राप्त होतात. ईश्वरभक्तीचा भाग ते गौण समजतात. परंतु ईश्वरभक्तीवांचून सर्व योग व्यर्थ आहे असा ( भगवद्गीतेंत सुचविल्याप्रमाणें ) खरा सिद्धांत आहे. ६ व्या अध्यायाचे शेवटीं तपस्वी, ज्ञानी व कर्मठ या सर्वांपेक्षां योगी श्रेष्ठ आहे असें सांगून सर्व योग्यांमध्यें जो माझा निदिध्यास करून श्रद्धायुक्त ( प्रेमपुरःसर ) माझें भजन करितो तोच श्रेष्ठ असें सांगितलें आहे. दावुनि सुयोगमाला ' असें जें २२ व्या श्लोकांत सांगितलें आहे तें, हा जो भगवंतांनीं सांगितलेला भक्तियुक्त योग त्यालाच उद्देशून आहे. त्यालाच सुयोग ह्मणावें. ' सुयोगमात्रा ' या शब्दांत श्लेष आहे. योग्याकडे लावतांना सुयोग मात्र ( ह्मणजे

फक्त सुयोगच ) असा अर्थ व रोग्याकडे लावतांना सुयोगांची मात्रा ( उत्तम औषधांच्या संमेलनापासून केलेली मात्रा ) असा अर्थ करावा.

श्लो. २३—प्रधानपुरुषेश्वर हें नाम देण्यामध्यें सांख्यावर कटाक्ष आहे. साख्य मताप्रमाणें प्रधान (प्रकृति) व पुरुष (आत्मा) हीं दोनच तत्वें असून सर्व जग त्यांजवर चाललें आहे. सृष्ट्यादि सर्व व्यापार प्रकृतीपासून होतात. तिला नियामक कोणीही नाहीं. आत्मा फक्त द्रष्टा आहे. वैदिक मत ( खरा सिद्धांत ) याहून निराळें आहे हें श्वेताश्वतर उपनिषदांत स्पष्ट सुचविलें आहे. 'क्षर प्रधानममृताक्षरो हरः' 'क्षरात्मानावीशते देव एक.' 'प्रधानक्षेत्रज्ञपतिर्गुणेशः' इ. वाक्यांवरून उघड दिसतें कीं, प्रकृतिपुरुषांचा नियामक असा ईश्वर आहे. भगवद्गीतेच्या १५ व्या अध्यायांतही प्रधानाला क्षर व पुरुषाला ( क्षेत्रज्ञ, आत्मा, कूटस्थ ) अक्षर ह्मटलें आहे व ह्या दोघांहून पृथक् व श्रेष्ठ जो ईश्वर त्याला पुरुषोत्तम ह्मटलें आहे ह्मणून प्रधानपुरुषेश्वर ह्या नामामध्यें श्वेताश्वतरोपनिषदुक्त ईश्वराचें प्रधानक्षेत्रज्ञपतित्व व गीतोक्त पुरुषोत्तमत्व ध्वनित केलें आहे.

श्लो. २७—२८—केशव शब्द सहस्रनामांत दोन वेळा आला आहे व त्यांचे अर्थ तीन प्रकारचे आहेत. ह्या पैकीं, २ अर्थ २७ श्लोकांत व तिसरा २८ श्लोकांत दर्शविला आहे. केश शब्दाला व प्रत्यय लागून चांगल्या केसांचा असा अर्थ दर्शविणारा केशव शब्द सिद्ध होतो असें एक सूत्र आहे. तसेंच केशव शब्दाची क ( ब्रह्मदेव ) अ ( विष्णु ) व ईश ( रुद्र ) अशीं पदें पाडून 'व' प्रत्ययाचा अर्थ, वशात राहणारे असा केल्यास ब्रम्हा, विष्णु व रुद्र यांचा स्वामी असा अर्थ निघतो. तिसरा अर्थ केशी दैत्याचा वध करणारा असा आहे.

श्लो. २९—पुरुषोत्तम शब्दाची व्याख्या गीतेंतील १५ व्या अध्यायाच्या १६, १७, व १८ ह्या तीन श्लोकांत दिली आहे. ह्या श्लोकांत क्षर व अक्षर ह्या दोहोंपलीकडचा जो तो पुरुषोत्तम असें म्हटलें आहे. क्षर ह्मणजे जड सृष्टि किंवा प्रकृति. व अक्षर ह्मणजे

चैतन्यात्मक सृष्टि किंवा पुरुष. हा अर्थ श्वेताश्वतर उपनिषद् रामानुज भाष्य व वामन पंडित ( यथार्थदीपिकाकार ) यांना अनुसरून आहे. श्रीशंकराचार्यांनी अक्षर याचा अर्थ माया असा केला आहे व क्षर याचा अर्थ सर्व चराचर भूतें असा केला आहे. कोणताही अर्थ घेतला तरी पुरुषोत्तम ह्मणजे चित् व जड ह्या दोहोंच्या पलीकडचें ईशतत्व असाच होतो.

श्लो. ३९--भर्ता हा शब्द भृ धातूपासून निघाला असून त्याचे दोन अर्थ होतात, धारण करणारा व पोषण किंवा रक्षण करणारा. ईश्वर विश्वाचें धारण व रक्षण करितो ह्या दोन्ही गोष्टी त्यानें कृष्णावतारीं गोवर्धन पर्वत उचलून धरून गोपालाचें रक्षण करण्यामध्यें प्रदर्शित केल्या असें ह्या श्लोकांत सुचविलें आहे.

श्लो. ४०--( हे ईश्वरा ) तूं सकल भुवनाला 'प्रभव' ह्मणजे उत्पत्तिकारण आहेस. जगाचें उपादान ( ह्मणजे ज्या द्रव्यापासून जग तयार झालें आहे तें द्रव्य ) तूंच व निमित्त कारणही तूंच. पृथ्वी जसी सुवर्णादि सर्व धातूंचें किंवा सोनें आभरणाचें ( अलंकारांचें ) उपादान कारण तसेंच घट ( गाडगें ) व पट ( वस्त्र ) यांचें निमित्त कारण जसें अनुक्रमें कुंभार व कोष्टी तसा तूं जगाचें दोन्हीं प्रकारचें कारण आहेस.

श्लो. ४२--द्वितय ( ह्मणजे दोन ) वस्तू एकाच जागीं राहू शकत नाहींत व ईश्वर तर सर्वव्यापी असल्यामुळें तो व जग एकाच ठिकाणीं राहतात असें ह्मणावें लागेल. हा विरोध न यावा ह्मणून जग मिथ्या ह्मणजे मुळींच नाहीं असें मायावादी ( मृगजलाचा दृष्टांत देऊन ) जगाचें मिथ्यात्व प्रतिपादन करितात; परंतु ईश्वराच्या मायाशक्तीची त्यांना कल्पना नाहीं ह्मणून ते अशा अध्यासवादाच्या भानगडींत पडतात असें ह्या श्लोकांत सुचविलें आहे. ईश्वरांत जग व जगांत ईश्वर असणें व तो जगापासून अलिप्त असणें हें त्याच्या अतर्क्य मायाशक्तीस असंभवनीय नाहीं.

श्लो. ४५--स्वयंभु शब्द ईश्वराप्रमाणें ब्रह्मदेवालाही लावतात

म्हणून ' स्वयंभू दुजा ( दुसरा ) जो विधि ( ब्रह्मदेव ) ' असें ह्मटलें आहे. ब्रह्मदेव ईश्वरानेंच उत्पन्न केला आहे.

श्लो. ५४--यांत मुनिजन जो अंतरीं ध्वनि श्रवण करितात असें सुचविलें आहे त्याला अनाहत ध्वनि ह्मणतात. हा ध्वनि इतर ध्वनी प्रमाणें कोणत्याही आघातापासून होत नसून एकाग्रता करून बसले असतां व आंत लक्ष दिलें असता ऐकू येतो व तो ऐकण्याचा अभ्यास ठेवला असतां समाधि लागते. हा ध्वनी ईश्वरप्राप्ति करून देणारा असल्यामुळें ईश्वराला महास्वन असें नांव देतां येईल असा या नावांतील आणखीही एक हेतु ग्रंथकर्त्यानें दाखविला आहे.

श्लो. ७०-- तूं वृद्ध तो ( ध्रुव ) तरुणाचि याचा भावार्थ हाच कीं आकाशांतील ध्रुव जरी सर्व खगोलसृष्टीला धारण करणारा आहे तरी तुझ्याशी तुलना करून पाहतां तो तरुणच ह्मणजे कालचाच समजावयाचा व त्याला उत्पत्ति असल्यामुळें तो विनाशीही आहेच. ( तसा तू नाहींस ).

श्लोक ७७ ते ८१---ह्या पांच श्लोकात त्रिककुब्धाम ह्या नामाचे एकंदर ६ प्रकारचे अर्थ दिले आहेत. ' त्रिदिशा ' ह्मणजे तीन दिशांतील तीन लोक---स्वर्ग, भूमी व पाताळ. त्रिपदात्मक अंतरिक्ष ' याचा अर्थ सर्व चराचर विश्वाच्या पलीकडे जी नुसती पोकळी आहे ती. ती विश्वापेक्षां पुष्कळ पटीनें मोठी आहे ह्मणून पुरुषसूक्तांत " पादोऽस्य विश्वा भूतानि त्रिपादस्यामृत दिवि " असें म्हटलें आहे. याचा अर्थ हें चराचर विश्व ईश्वराचा एक पाद ( म्हणजे चौथा अंश ) आहे व द्यु लोकाच्याही पलीकडील आकाश हें त्याचें अमृतरूप किंवा शुद्ध स्वरूप असून तें एकंदर विश्वाच्या तिप्पट आहे. तिप्पट याचा अर्थ येथें अनेकपट असा घ्यावयाचा. म्हणजे विश्वाच्या पलीकडील पोकळी, जी विश्वाच्या पुष्कळपट मोठी ( त्रिपदात्मक अंतरिक्ष ) आहे ती ईश्वराचें शुद्ध स्वरूप होय. येथें अधोक्षज हें संबोधनही सहेतुक आहे. कारण, अधोक्षज याचा अर्थ अक्षज म्हणजे इंद्रियांनीं ज्ञेय असें जें विश्व तें आहे अध म्हणजे

खालीं ज्याच्या असें शुद्ध ब्रम्ह. ककुप् शब्द दिशावाचक असून शास्त्र किंवा ग्रंथ असाही त्याचा अर्थ आहे. त्रिककुप् म्हणजे वेदत्रयी हीच आहे. धाम म्हणजे देह किंवा मूर्ति ज्याची तो त्रिककुब्धाम. हा तिसरा अर्थ. श्लोक ८० यांत आणखी दोन प्रकारचे अर्थ दिले आहेत. त्यांपैकीं एका अर्थानें त्रिककुप् म्हणजे श्रुति, स्मृति व पुराणें हीं तीन शास्त्रें व दुसऱ्या अर्थाप्रमाणें तीन अंगांनीं युक्त जो प्रणव किंवा ॐकार. ईश्वर प्रणवांत राहतो ( तो त्याचें घर आहे ) याचवे अर्थ गुरुमुखानें प्राप्त झालेल्या प्रणवाच्या उपासनेनें तो प्रकट होतो. सहावा अर्थ ८१ श्लोकाच्या उत्तरार्धांत दाखविला आहे.

श्लोक ८५ ते ९० — ह्या श्लोकांत प्राणद ह्या नामाचे दोन प्रकारचे अर्थ दिले आहेत. प्राणदनाम सहस्रनामात चार वेळां आलें असून त्याचे चार प्रकारचे अर्थ होतात. त्यांपैकी दोन प्रकारचे अर्थ येथेंच दाखविले आहेत प्राणद म्हणजे प्राण देणारा (प्राणान् ददाति) व प्राण घेणारा ( प्राणान् द्यति, खडयतीति प्राणद ). हे दोन अर्थ ८५ श्लोकाच्या दोन्ही अर्धांत अनुक्रमें सांगून ८६ व ८७ मध्यें पहिल्या अर्थाचा व ८८, ८९ व ९० मध्यें दुसऱ्या अर्थाचा विस्तार उदाहरणाच्या रूपानें केला आहे.

श्लोक ९८—मधु नांवाचा एक असुर व त्याचा भाऊ कैटभ हे भगवंताच्या कर्णमलापासून उत्पन्न झाले अशी कथा पुराणांतून सांगितली आहे. म्हणून येथें ‘ मल त्या तुझिया श्रुतिचा बनवी ’ असें म्हटलें आहे.

श्लोक १००— शीतभानुरविवंशललाम ’ हें भगवताचें विशेषण असून चंद्र व सूर्यवंशाचें भूषण असा जो त्याचा अर्थ आहे तो श्रीकृष्ण व राम यांना उद्देशून होय.

श्लोक १०१---यांत जें धन्वी असें नाम आलें आहे त्याचा अर्थ धनुर्धारी ( म्हणजे धनुर्धाऱ्यांमध्यें श्रेष्ठ ). धन्वी हें नांव अर्जुनालाही लावतात व अर्जुन भगवंताचाच अंश असल्यामुळें या श्लोकांत

त्याचें धनुर्धारित्वामध्यें श्रेष्ठत्व दाखविलें आहे व तो भगवताचा शिष्य असल्यामुळें अर्थातच भगवंताचें धनुर्धाऱ्यांमध्यें श्रेष्ठतमत्व सिद्ध झालें असें ध्वनित केलें आहे.

**श्लोक ११३**---यात ' भजति चार जे भक्त तूज गा ' असें जें म्हटलें आहे तें भगवद्गीतेंत सांगितलेले आर्त, जिज्ञासु, अर्थार्थी व ज्ञानी ह्या चार प्रकारच्या भक्तांना उद्देशून आहे. ( आर्त म्हणजे रोगादिकांनीं गांजलेला ).

---

# शतक २ रें.

**श्लोक ३**----यात ज्या नृपाला हिरण्याची ( सोन्याची ) आशा फार तोच खरा हिरण्याक्ष असें जें म्हटलें आहे तें हिरण्यावर अक्ष म्हणजे डोळा ( नजर ) ज्याचा असा अर्थ लक्षात आणून म्हटलें आहे.

**श्लोक ५**---' धरी राईचा हें हरि तुजपुढें विश्व अणिमा'. ' अणिमा म्हणजे अणुत्व किंवा सूक्ष्मत्व. विश्वामध्यें जसी एक राई ( मोहरी ), तसें तुजमध्यें हें विश्व आहे. हें जें तुझें अतिमहत्व तें तू वामनावतारीं आपलें लहान स्वरूप अमर्याद करून दाखविलेंस; तसेंच महाप्रलयांचे वेळीं जेव्हा तूं बालरूप धारण करून वटपत्रावर शयन करीत होतास त्या वेळीं मार्कंडेयऋषि तुझ्या श्वासोच्छ्वासाबरोबर तुझ्या पोटांत गेला असतां व तेथें त्याला सर्व विश्व दृष्टीस पडतांच त्याला तूं आपल्या

मायेनें चकित करून आपलें अमर्याद रूप त्याच्या मनावर ठसविलेंस. ( ह्यासंबधानें भागवत स्क. १२ अ. ९ पहा. )

श्लोक ६ ते ११---ह्या सहा श्लोकात सर्वयोगविनिसृत या नामाचे एकदर ४ प्रकारचे अर्थ दर्शविले आहेत. पहिला अर्थ सर्व प्रकारच्या योगांपासून ( म्हणजे कर्मापासून किंवा सृष्टीपासून ) अलिप्त. दुसरा अर्थ, भक्तीवांचून हठयोगादि जे नुसते योगमार्ग आहेत त्यांतून तू निसटून जातोस म्हणजे त्यांना तूं गवसत नाहींस. तिसरा अर्थ, सर्व प्रकारच्या योगमार्गांपासून ( गीतेंत सांगितलेल्या ) जो काढला जातो ( म्हणजे जाणला जातो ). चवथा अर्थ, कंसानें योजलेल्या सर्व मारक योगांतून म्हणजे उपायांतून किंवा युक्त्यांतून निसटून निघालेला. पाचव्या श्लोकांत अलिप्ततेचा अर्थ थोडक्यांत सांगून त्याचाच विस्तार पुढील दीड श्लोकांत केला आहे. येथें योग शब्दाचा अर्थ 'पश्यमे योगमैश्वर' ह्या गीतेंतील वाक्याप्रमाणें ईश्वराचें जगद्व्यापारात्मक कर्म असा केला आहे. गीतेंतीलच दुसऱ्या एका वाक्यावरून ( एतां विभूतिं योगंच मम यो वेत्ति तत्वत ) योग शब्दाचा अर्थ सर्व सृष्टि असा लक्षणेनें केला असता ईश्वर कर्मापासून व सृष्ट पदार्थांपासून अलिप्त आहे असा अर्थ निघतो. आठव्यांतील शेवटचे दोन चरण व नववा श्लोक यांत दुसरा अर्थ दाखवून तिसरा व चवथा अर्थ पुढील दोन श्लोकांत दाखविला आहे.

श्लोक १२—वसु शब्द वेदांत मूळचा उत्तर ध्रुवाकडे दिसणाऱ्या कांहीं तेजोमय पदार्थांना ( Aurora Borealis ) लावलेला असून पुढें सूर्य, चंद्र, अग्नि, वायु इ. आठ प्रकारच्या विभूतींना लावलेला आढळतो. ह्या आठांना अष्टवसु अशी संज्ञा आहे. यालाच आम्हीं ह्या व पुढील श्लोकांत वसुगण असें म्हटलें आहे. वसुगणात म्हणजे अष्टवसूत अग्नि श्रेष्ठ असल्यामुळें ती भगवंताची विभूति असें भगवद्गीतेंत सांगितलें आहे.

श्लोक १३--'विमलता द्युति दोहिंतही वसे' याचा अर्थ अष्ट वसु व सुवर्ण हीं जीं वसु शब्दानें सुचविलीं जातात त्या दोहींत

स्वच्छता व तेज आहेत. ह्मणून मनाला वसूची उपमा दिली आहे. वसु शब्दाचा धात्वर्थ तेजस्वी असाच आहे व ह्मणूनच तो अष्टवसूंना व सुवर्णाला लावला आहे.

श्लोक २०---पुंडरीकाक्ष ह्या शब्दाचे दोन प्रकारचे अर्थ शांकरभाष्यांत व तिसऱ्याच एक प्रकारचा रामानुज भाष्यांत असे तीन अर्थ आढळण्यात आले असून ते तिन्ही ह्या श्लोकांत सुचविले आहेत. पुंडरीक याचा मुख्यार्थ कमल असून लक्षणेनें हृदय-कमल व ( रामानुजाप्रमाणें ) वैकुंठ असा होतो. ह्मणून पुंडरीकाक्ष यांतील अक्षपद अश् ह्या व्याप्तिवाचक धातूचें रूप धरून हृदयकमलांत किंवा वैकुंठांत राहणारा असा अर्थ करता येतो व पुंडरीकाप्रमाणें ( कमलाप्रमाणें ) अक्ष ह्मणजे दृष्टि ज्याची असा तिसरा अर्थ निघतो, तो शेवटच्या दोन चरणात सुचविला आहे. तुझी दृष्टि भक्तांना पुंडरीकाप्रमाणें सुखदायक असें जें ह्मटलें आहे यांत पुंडरीकाप्रमाणें याचा अर्थही दोन प्रकारचा करितां येईल. १ कमलाप्रमाणें सुख-दायक; २ पुंडरीक जो विठ्ठलभक्त त्याजवर जशी तूं कृपादृष्टि केलीस तशीच सर्व भक्तावर करितोस.

श्लोक २२।२३--'वृषाकृति' ह्या नामाचे दोन अर्थ होतात. रामानुजभाष्याप्रमाणें वृष ह्मणजे वर्षाव करणारी आहे आकृति ज्याची, सौंदर्य व तेज यांच्या योगानें भक्तजनांवर अमृतवृष्टि करणारें रूप ज्याचें. शांकरभाष्याप्रमाणें वृष ह्मणजे जो धर्म त्याकरितां आहे आकृति म्हणजे शरीरधारण ज्याचें 'धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे' ह्या भगवताच्या वचनानुरूप ईश्वर धर्मसंरक्षणार्थ अवतार धारण करितो. पहिला अर्थ २२ व्या श्लोकात व दुसरा २३ व्या श्लोकांत दिला आहे.

श्लोक २६---'शिरकर्म तूं करिशी अडसी न जसा क्रतू' याचा अर्थ असा कीं, तुला जरी हजार डोकीं कल्पिलीं आहेत तरी खरोखर तुला डोकें मुळींच नसून डोक्याचें म्हणजे ज्ञानेंद्रियाचें काम

तूं स्वशक्तीनेंच करितोस. पूर्वी रुद्रानें यज्ञाचा शिरच्छेद केला होता तेव्हां त्याचें काम जसें अडलें तसें डोक्यावांचून तुझें काम अडत नाहीं. यज्ञाचें शिर सधान अश्विनीकुमारांनीं केलें तेव्हां त्याचें काम सुरू झालें इ. कथा ब्राह्मणग्रंथांतून आढळतें.

श्लोक ३३--वरारोह. आरोह ह्मणजे वर जाणें ( परमात्मप्राप्ति ) वर ह्मणजे श्रेष्ठ आहे प्राप्ति ज्याची तो वरारोह. दुसरा अर्थ असा कीं ज्याच्या प्राप्तीकरितां जें मार्गक्रमण ( आरोह ) तेंही उत्तम आहे. ह्मणजे साधकांनाही ईश्वरप्राप्तीचे मार्गांत पुष्कळ सुख असतें. हाच अर्थ चवथ्या चरणांत ( असें सौख्य मार्गींहि जातां गतीतें ) दाखविला आहे.

श्लोक ३४--यातील 'महातपा' या शब्दांत जो 'तप' शब्द आहे त्याचे तीन अर्थ होतात. तप ह्मणजे ज्ञान, प्रताप किंवा शरीरक्लेशात्मक कर्म. 'यस्य ज्ञानमयं तप' ' असें उपनिषदांत ईश्वरास उद्देशून ह्मटलें आहे. हाच अर्थ दुसऱ्या चरणांत दाखविला आहे. तिसऱ्या चरणार्थ दुसरे दोन अर्थ देऊन चवथ्यांत त्याचेंच उदाहरणावरून स्पष्टीकरण केलें आहे. 'त्यजूनि पंचचामरा' ह्मणजे छत्रचामरादि पंच चिन्हांनीं युक्त अशा राज्यलक्ष्मीचा त्याग करून–हें वृत्तही पंचचामरा असल्यामुळें येथें मुद्रिकालंकार होतो

श्लोक ३७–जनार्दन या शब्दांत अर्द धातू असून त्याचे तीन अर्थ होतात. ते तिन्ही पहिल्या तीन चरणांत दिलेल्या अर्थास आधारभूत आहेत.

श्लोक ४४--' आजा हराचा ' ईश्वराच्या नाभिकमलापासून ब्रह्मदेव झाला व ब्रह्मदेवाच्या कपाळांतून रुद्र निघाला ह्मणून ईश्वराला आजा हराचा असें ह्मटलें आहे.

श्लोक ४६–'कृताकृत' याचा अर्थ कार्य ( विश्व ) व कारण ( ब्रह्म ). ईश्वर दोन्ही रूपानें आहे.

श्लोक ४७।४८—ह्या श्लोकांत चतुरात्मा व चतुर्व्यूह अशीं जीं दोन नामें आलीं आहेत तीं पांचरात्र मतांतील होत. ह्यालाच सात्वतशास्त्र असेंही एक नांव आहे. हें फार जुनें वैष्णवमत असून त्याचा महाभारतांत उल्लेख आहे. ह्या मताप्रमाणें शुद्ध जें परमात्मस्वरूप किंवा परब्रह्म त्याला वासुदेव ह्मणतात. तेंच परब्रह्म किंवा वासुदेवस्वरूप सर्गस्थितिलयार्थ तीन रूपें धारण करितें. सृष्टि उत्पन्न करणाऱ्या रूपाला अनिरुद्ध, रक्षण करणाऱ्या रूपाला प्रद्युम्न व संहारशक्तीला संकर्षण अशी संज्ञा आहे. हीं जीं वासुदेवादि चार रूपें त्यांनाच चतुर्व्युह अशी संज्ञा आहे. याच शास्त्राचें आणखी असेंही मत आहे कीं, परमात्मा जो वासुदेव तोच जीवात्मा होऊन पुढें मन व अहंकार हीं रूपें धारण करितो. ह्मणून त्याला चतुरात्मा असें नाम होतें. परमात्मा, जीवात्मा, मन व अहंकार हीं चार ईश्वरात्म्याचींच स्वरूपें असल्यामुळें ईश्वराला चतुरात्मा ह्मणतात.

श्लोक ५०—चतुर्द्रंष्ट्र हें विशेषण जसें नारसिंहावताराला लागू तसेंच रामकृष्णादि अवतारालाही लावता येतें. कारण, चार दाढा हें महापुरुषाचें लक्षण आहे असें सामुद्रिकशास्त्रांत सांगितलें आहे. ( रामायण सु. का. अ. ३५ श्लो. १९ पहा. ) मारुतीनें सीतादेवीचा शोध लावून जेव्हां तिचें प्रथम दर्शन घेतलें तेव्हां रामाचीं चिन्हें वर्णन करतांना त्यानें त्याला चतुर्द्रंष्ट्र हें विशेषण लाविलें आहे. नारसिंहावतारीं तर चतुर्द्रंष्ट्र होताच. परंतु ह्या अवतारीं देखील तो पूर्व संस्कार घेऊनच जणू चतुर्द्रंष्ट्र झाला आहे अशी येथें उत्प्रेक्षा केली आहे.

श्लोक ५६—जगदादिज ह्मणजे ईश्वराचा पहिला आविर्भाव ज्याला हिरण्यगर्भ ह्मणतात, ह्मणून येथें हिरण्यगर्भ असें संबोधन केलें आहे.

श्लोक ७७—माधव या नामांत मौन, ध्यान व योग हे अर्थ गूढ ( गुप्त ) आहेत असें जें त्या आर्येच्या उत्तरार्धांत सुचविलें आहे तें

महाभारताच्या उद्योगपर्वातील ७० व्या अध्यायांत 'मौनाद्ध्यानाच्च योगाच्च विद्धि भारत माधवम्' ह्या वाक्याला उद्देशून लिहिलें आहे.

श्लोक ७८---मकरद गजेंद्राही यांत मकरद शब्दात श्लेष आहे. एका अर्थानें गजेंद्र जो पशु तोही भक्त असल्यामुळें त्याला तूं मकरंदासारखा प्रिय आहेस. दुसऱ्या अर्थानें गजेंद्राला तूं मकरंद झालास ह्मणजे मकराचें खंडन करणारा झालास ( मकरंद्यतीति मकरंद ).

श्लोक १०२---हन् धातु गति व हिंसा असे दोन्ही अर्थ वितो व तदनुसारें हस शब्दाचे जे जे अर्थ होतात ते सर्व येथें सु विले आहेत. वेदात हस शब्द सूर्याला लाविला आहे. संचार करणाऱ्या प्राणवायूलाही हंस ह्मणतात. महाप्रलयांत धारण करून ईश्वर समुद्रांत शयन करितो त्यालाही पुरा संज्ञा दिलेली आढळते. ज्या हंसावतारानें ब्रह्मदेवास उपदेश असे भागवतांत सांगितलें आहे त्यालाच उद्देशून शेवटचे दोन लिहिले आहेत.

ग्रं. क्र. ९८०९
REFBK-0001691